नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)


महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत



अनुक्रमणिका

महाराष्ट्र साहित्य पत्रिका

अंक क्र. ३०२
जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २००२

अनुक्रमणिका

म.सा.प.तर्फे घेतल्या जाणाऱ्या परीक्षेसंबंधी

मराठीचा बाणा । सार्थ अभिमान
बाळगावे ज्ञान । मराठीचे ॥

या वर्षी परीक्षासमितीने २००२ ते २००५ या वर्षाच्या कालावधीसाठी नवीन अभ्यासक्रमाची निवड केली आहे.

प्रथमा परीक्षेसाठी एकूण १०० गुणांची एकच प्रश्नपत्रिका असून 'घामाची फुले' अर्थात् सानेगुरुजींच्या गोड गोष्टी (भाग-२) या पाठ्यपुस्तकावर, तसेच व्याकरण व लेखनावर आधारित ही प्रश्नपत्रिका असेल.

'प्रवेश' परीक्षेसाठी एकूण २०० गुणांच्या दोन प्रश्नपत्रिका असून जाईजुई (य. गो. जोशी) व काव्यगंगा (संपादक : डॉ. भीमराव कुलकर्णी) या गद्य-पद्य संग्रहावर आधारित पहिली प्रश्नपत्रिका असून व्याकरण, अलंकार, लेखन व भाषांतराचा दुसऱ्या प्रश्नपत्रिकेत समावेश असेल.

'साहित्य-प्राज्ञ'साठी एकूण ३०० गुणांच्या तीन प्रश्नपत्रिका आहेत. त्यात सारे प्रवासी घडीचे (जयवंत दळवी), अंमलदार (पु. ल. देशपांडे) आणि जोगिया (ग. दि. माडगूळकर) या अर्वाचीन गद्य-पद्यावर आधारित १०० गुणांची एक प्रश्नपत्रिका, आणि पु. भा. भावे या विशेष ग्रंथकार म्हणून अभ्यासासाठी निवडलेल्या ग्रंथकाराच्या 'सतरावे वर्ष', 'अकुलिना', 'रक्त आणि अश्रू', 'वाकुल्या' या कथा-कादंबरी-वैचारिक निबंध-ललित लेख इत्यादी वाङ्मयप्रकारांच्या अभ्यासावर आधारित दुसरी १०० गुणांची प्रश्नपत्रिका आहे. तिसऱ्या १०० गुणांच्या प्रश्नपत्रिकेत सर्व प्रकारच्या व्याकरण लेखनाचा समावेश असेल.

'साहित्य-विशारद' परीक्षेसाठी एकूण ६०० गुणांच्या सहा प्रश्नपत्रिका आहेत. शतपत्रे (लोकहितवादी) आणि अग्निनृत्य (शि.म. परांजपे यांचे संपादित निबंध) या ग्रंथाभ्यासास १०० गुण, ज्ञानेश्वरी अध्याय पहिला आणि महानुभाव गद्य (संपादक : शं. गो. तुळपुळे) या ग्रंथाभ्यासास १०० गुण, अर्वाचीन 'कथा' वाङ्मयाच्या अभ्यासास १०० गुण, भारतीय साहित्य शास्त्राची मूलतत्त्वे - १०० गुण, भाषाविज्ञान व व्याकरण - १०० गुण आणि उपयोजित मराठी - १०० गुण अशा ६०० गुणांच्या सहा प्रश्नपत्रिका असतील.

प्रथमा, प्रवेश व साहित्य-प्राज्ञ अभ्यासक्रमाचा कालावधी प्रत्येकी एक वर्षाचा असून, त्यासाठी परीक्षा शुल्क अनुक्रमे १५, ३० आणि ५० रु. ठेवलेले आहे. 'साहित्य-विशारद'चा कालावधी दोन वर्षांचा असून परीक्षा शुल्क १०० रु. (दोन वर्षांसाठी) ठेवलेले आहे. साहित्य-विशारदच्या एकूण सहा प्रश्नपत्रिकांपैकी १ ते ३ प्रश्नपत्रिका पहिल्या वर्षी ५० रु. परीक्षा शुल्क भरून तर ४ ते ६ प्रश्नपत्रिका दुसऱ्या वर्षी ५० रु. शुल्क भरून देण्याची सोयही उपलब्ध आहे. सर्व परीक्षा जानेवारी महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात घेतल्या जातात. जानेवारी २००३ मध्ये होणाऱ्या परीक्षांचे काम सुरू झाले आहे.

डॉ. कल्याण इनामदार,
निमंत्रक व परीक्षाप्रमुख,
फोन : ९५२०-५४४३५५५

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे त्रैमासिक मुखपत्र

❑

महाराष्ट्र साहित्य पत्रिका

अंक ३०२

जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर २००२

❑

संपादक
प्रा. डॉ. अरविंद वामन कुळकर्णी

❑

महाराष्ट्र साहित्य परिषद
टिळक रोड, पुणे ४११ ०३०.
दूरध्वनी : ४४७५९६३

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

हा तों साहित्यकुसुमांचा आस्वादु

मुद्रक-प्रकाशक : रवींद्र भट, प्रमुख कार्यवाह, महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रोड, पुणे ४११ ०३०.
मुद्रणस्थळ : जंगम ऑफसेट प्रा. लि., २५/१० नांदेड फाटा, पुणे ४११ ०३०.
अक्षरजुळणी : यशश्री एंटरप्रायझेस, २४, ईशदान सोसायटी, अभ्यंकर स्टीलजवळ, पौड फाटा, कोथरूड, पुणे ४११ ०२९. फोन : ५४६०६०२.
मूल्य : रुपये ३०/- **वार्षिक वर्गणी संस्थांसाठी :** रु. १००/-
आजीव सदस्य शुल्क : रुपये १,०००/- **वार्षिक सदस्य शुल्क :** रु. १००/-
अंक क्र. ३०२ : जुलै २००२ ते सप्टेंबर २००२
(महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने या नियतकालिकाला अनुदान दिले आहे. या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी सा. सं. मंडळ किंवा राज्यशासन सहमत असेलच असे नाही. अंकात व्यक्त झालेल्या विचारांशी संपादक आणि संपादन समिती नेहमीच सहमत असेलच असे नाही.)

संपादकीय

❑

'पत्रिके'चा हा ३०२ क्रमांकाचा अंक. ३०१ क्रमांकाच्या गेल्या अंकाचे वाचकांनी चांगले स्वागत केले हे कळविण्यास आनंद वाटतो. मराठी साहित्यात अजून प्रस्थापित न झालेल्या, पण उल्लेखनीय लेखन करणाऱ्या लेखक-लेखिकांची प्रांजळ आणि ताजी आत्मकथने आवडल्याचे 'पत्रिके'ला सतत कळविले जात आहे. लेखक आणि वाचक यांच्यात एक नाविन्यपूर्ण चळवळ उभी करणाऱ्या 'ग्रंथाली'च्या श्री. दिनकर गांगल यांनी तर प्रस्तुत अंकासाठी ज्या नावांचा विचार केला गेला, ती सर्व यादीच 'पत्रिके'कडून मागवून घेतली आहे. ते त्यातून अधिक चांगले असे काही नक्कीच उभे करतील!

शान्ताबाई शेळके गेल्यानंतर मराठीतील जवळजवळ सर्व नियतकालिकांमधून त्यांच्या साहित्यासंबंधी लिहिले गेले. 'पत्रिके'मध्ये त्यांच्याबद्दल लिहिले जावेच, पण विषय वेगळा असावा, अशी अपेक्षा ठेवली होती. कराडच्या प्रा. बोबडे या नव्या समीक्षकाचा 'शान्ता शेळके यांच्या कवितेतील मातृभाव दर्शन' हा लेख या अंकात म्हणूनच असलेला दिसेल. कै. अरविंद देशपांडे हे इतिहासाचे नामवंत आणि विरळे प्राध्यापक होते. विरळे अशासाठी की, त्यांचा साहित्याचा व्यासंग चांगला होता. त्यांचे हे वैशिष्ट्य नेमकेपणाने आत्मसात केलेले त्यांचे शिष्य डॉ. राजा दीक्षित यांचा देशपांडेसरांवरचा लेखही या अंकात आहे. तसाच सानेगुरुजींवरील त्यांच्या 'मुलां'पैकी एक असलेल्या डॉ. गं. ना. जोशी यांचा लेख. या अंकात 'कॅण्डीशास्त्री'वर लिहिणारे संभाजीराव भोसले कार्पोरेशन बँकेत अधिकारी आहेत. १९ व्या शतकातील अव्वल इंग्रजीचा कालखंड त्याचा प्रधान कुतुहलविषय असून फावला वेळ ते त्याच्या वाचनातच घालवीत असतात. मराठी भाषा व शिक्षण यांच्या बाबतीत उल्लेखनीय कार्य केलेल्या तत्कालीन 'साहेब मजकुरां'वर त्यांच्याकडून आणखीही लेखन अपेक्षित आहे. हे सर्व लेख वाचकांना आवडतील, असे विश्वासपूर्वक वाटते. याशिवाय या अंकात जे लेख आहेत, ते वरवर जरी पाहिले तरी त्यात विविधता आणि मौलिकता जपण्याचा केलेला प्रयत्न ध्यानी येईल.

'हा तो साहित्यकुसुमांचा आस्वादु' हे सदर गेल्या अंकात देऊ शकलो नव्हतो. त्याची भरपाईच या अंकात केली आहे. प्रा. ग. प्र. प्रधान किंवा म. श्री. दीक्षित अशांसारख्या बुजूर्गांचा 'साहित्यकुसुमास्वाद' त्यात आढळेल.

डॉ. मीरा घांडगे यांच्या लेखाचा स्वतंत्र उल्लेख करायला हवा. त्या सध्या म. सा. पत्रिकेच्या आजवरच्या अंकांची सर्वांगीण सूची तयार करण्याचे काम करीत आहेत. या अंकात त्यांनी पूर्वी म. श्री. दीक्षित यांनी केलेले काम अद्ययावत करून 'पत्रिके'च्या गेल्या ७५ वर्षांतील संपादकांची कालासह यादी तयार करून दिली आहे. त्यावरून 'पत्रिके'च्या संपादनाचा संपन्न वारसा लक्षात येऊ शकेल.

मे २००२ पासून आजवर अनेक नामवंतांचे देहावसान झाले. पुणे विद्यार्थिगृहाचे का.

गं. सोनार, शाहीर पिराजी सरनाईक, ज्येष्ठ अभिनेत्री नसीमबानू, घनपाठी विद्वान गोपाळशास्त्री गोरे, स्वातंत्र्यसैनिक द. ना. जोशी, नाट्यदिग्दर्शिका विमलाबाई पुरुषोत्तम साठे, समाजसेविका मालतीबाई थत्ते, इतिहासतज्ज्ञ डॉ. अरविंद देशपांडे, उद्योगसम्राट धीरुभाई अंबानी, गिर्यारोहक डॉ. बापूकाका पटवर्धन, जर्मम भाषेचे प्रा. प्रमोद देव, शिवाजी राजांचे सुप्रसिद्ध चित्र काढणारे जी. कांबळे, संगीतसम्राट सुधीर फडके, सनईवाले बबनराव गायकवाड, लेखिका डॉ. शरदिनी डहाणूकर, धन्वंतरी ह. ना. फडणीस, कादंबरीकार चिंतामणी लागू नाशिकच्या समाजसेविका शांताबाई दाणी, ज्येष्ठ पत्रकार ना. बा. तथा बापूराव लेले अशा वेगवेगळ्या क्षेत्रांतील या नामवंत व्यक्ती. या सर्वांच्या निधनाबद्दल 'पत्रिका' तीव्र शोक व्यक्त करीत आहे.

'साधना' साप्ताहिक पुण्यात आल्यानंतरचे पहिले संपादक, ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, चौफेर व्यासंग आणि घरंदाज ऋजू व्यक्तिमत्त्वासाठी सर्वश्रुत असलेल्या रावसाहेब पटवर्धनांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्या निमित्ताने 'पत्रिके'चे त्यांना नम्र अभिवादन.

म. सा. परिषदेचे कार्याध्यक्ष आणि प्रमुख कार्यवाह यांची दोन स्वतंत्र आवाहने या अंकात अन्यत्र दिली आहेत. त्यांचा वाचकांनी कृतिशील सहानुभूतीने विचार करावा, अशी आग्रहाची विनंती आहे.

हा अंक सिद्ध करताना परिषदेच्या कर्यालयातील कर्मचारी आणि इतर तंत्रज्ञ यांची मोलाची मदत झालेली आहे. त्यांचे मन:पूर्वक आभार. अस्तु: इति लेखन सीमा.

❑

अरविंद वामन कुळकर्णी
१४, स्वयंसिद्धा सोसायटी, पौड रस्ता, पुणे ३८. फोन : ५४३६१२९.

अमळनेरच्या वा. रा. सोनार यांच्या 'चेतश्री प्रकाशना'ला तीस वर्षे पूर्ण झाली.

वा. रा. सोनार हे नाव मराठी वाचकांना कवी म्हणून परिचित आहे. या कवीने ९ ऑगस्ट १९७२ रोजी प्रकाशनाच्या व्यवसायात उडी घेतली. स्वत: वाङ्मयोपासक असल्यामुळे गुणवत्तेच्या दृष्टीने चांगली ठरतील अशी आजवर २३० पुस्तके प्रकाशित केली. गेल्या तीस वर्षांत त्यांनी प्रकाशित केलेल्या चाळीसेक पुस्तकांना अनेकविध पुरस्कार लाभलेले आहेत. शिवाय त्यांचे 'चेतश्री प्रकाशन' दरवर्षी वैचारिक ग्रंथाला 'मुक्ताई' पुरस्कार देते. आजवर अनेक मान्यवरांना हा पुरस्कार दिला गेला आहे. या तीस वर्षाच्या वाटचालीबद्दल वा. रां.चे अभिनंदन करतानाच 'पत्रिका' खिन्न करणाऱ्या एका वस्तुस्थितीचा निर्देश करू इच्छिते.

स्वतः सोनारांनी प्रकाशनाचा आढावा घेताना आता थांबावे, असा विचार व्यक्त केला आहे. कारण सांगताना ते लिहितात, "प्रकृतीचे कारण तर आहेच, पण व्यवसायातील भीषण साठमारी आणि बुडवेगिरी." हा अनुभव आलेल्या सोनारांचे सांत्वन कसे करायचे ? तरी त्यांना असे सांगावेसे वाटते, की त्यांनी त्यांचे 'अपूर्ण राहिलेले स्वप्न' पुरे करावे आणि थांबावे. कारण त्यांच्यासारख्याला प्रतिकूल वस्तुस्थितीपेक्षा 'अपूर्ण स्वप्ने' जास्त छळतील, असे वाटते.

काहीही असो, वा. रा. सोनार आणि 'चेतश्री'ने तीस वर्षांची वाटचाल पुरी केल्याबद्दल अभिनंदन!

आभार आणि आवाहन

❑

डॉ. गं. ना. जोगळेकर

❑

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या या वर्षीच्या वर्धापन समारंभांत (२७ मे २००२) परिषदेच्या दोन हितचिंतकांचा सत्कार करण्यात आला.

(१) श्री. माधवराव मदाने हे परिषदेचे आजीव सदस्य असून परिषदेवर त्यांचा विशेष लोभ आहे. काही वर्षांपूर्वी त्यांनी कै. भा. रा. तांबे आणि कै. ना. घ. देशपांडे या श्रेष्ठ कवींच्या नावाने प्रत्येकी रु. ११००/- चे पारितोषिक देण्यासाठी परिषदेकडे देणगी ठेव म्हणून ठेवली असून या ठेवीच्या व्याजातून प्रतिवर्षी ही पारितोषिके ज्येष्ठ कवींना २६ मे रोजी समारंभात सन्मानपूर्वक दिली जातात. श्री. मदाने हे बरीच वर्षे संयुक्त राष्ट्रसंघात (यूनो) जबाबदारीच्या पदांवर काम करीत होते. अनेक देशांचा प्रवास त्यांनी केला असून इंग्रजीमधून ग्रंथरचनाही केली आहे. मराठी साहित्याची त्यांना विशेष आवड असून परिषदेच्या कार्यक्रमांना ते आवर्जून उपस्थित असतात.

दि. २७ मे २००२ रोजी त्यांनी परिषदेस एक लक्ष रुपयांची देणगी दिली असून, ही रक्कम परिषदेच्या विकास-योजनांसाठी वापरावी एवढीच त्यांची माफक अपेक्षा आहे. याखेरीज त्यांची अट अशी कोणतीच नाही. श्री. मदाने यांच्या या उदार देणगीमुळे परिषदेच्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन मिळाले असून इतर हितचिंतकांपुढे त्यांनी एक आदर्श निर्माण केला आहे. श्री. मदाने यांच्या देणगीबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे परिषदेचे कर्तव्य आहे.

(२) परिषदेजवळ उत्साही कार्यकर्त्यांचा संच आहे, पण आधुनिक सोयी-सुविधा नाहीत. परिषदेची ही अडचण ओळखून श्री. मधुकरराव जोशी यांनी परिषदेच्या कार्यालयासाठी एक संगणक संच भेट म्हणून दिला आहे. या संचाबरोबर त्यांनी मुद्रणयंत्रही (प्रिंटआऊट मशीन) दिले आहे. वस्तुरूपाने दिलेली ही देणगी रुपये पंचावन्न हजार इतके मूल्य असलेली आहे. परिषदेच्या दैनंदिन कामात आधुनिकता यावी, एवढाच श्री. जोशी यांच्या देणगीमागे हेतू आहे. श्री. जोशी यांचीही या देणगीसंबंधात अन्य कोणतीही अट नाही. श्री. जोशी हे बांधकाम व्यावसायिक असून मराठी साहित्याचे रसिक वाचक आहेत. त्यांच्याकडून ही भेटवस्तू मिळण्यासाठी प्रमुख कार्यवाह

अनुक्रमणिका

श्री. रवीन्द्र भट यांनी विशेष प्रयत्न केले. श्री. जोशी यांच्या या विनाअट देणगीबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार. या संगणक-संचाचा यथायोग्य वापरही आता सुरू झाला आहे. परिषदेच्या कार्यकारी मंडळाने श्री. जोशी यांना 'सन्माननीय सभासद' करून घेऊन त्यांच्याबद्दलची कृतज्ञता व्यक्त केली आहे.

(३) ज्ञानकोशकार डॉ. श्री. व्यं. केतकर यांची कमला नेहरू उद्यानातील समाधी बरीच जीर्ण झाली होती व तातडीने तिचे नूतनीकरण करण्याची आवश्यकता होती. या कामासाठी माजी महापौर श्री. दत्ता गायकवाड, नगरसेवक श्री. अनिल शिरोळे व सौ. ज्योत्स्ना सरदेशपांडे, मा. आयुक्त श्री. बेंजामिन यांनी पुढाकार घेऊन या स्मारकस्तंभाचे नूतनीकरण सुबकपणाने करून घेतले. या औचित्यपूर्ण सहकार्याबद्दल परिषद सर्व संबंधितांची ऋणी आहे.

(४) डॉ. केतकर स्मृतिदिनी (१० एप्रिल २००२) नूतन महापौर सौ. दीप्ती चौधरी, विरोधी गट नेते श्री. विजय काळे, नगरसेवक श्री. विकास मठकरी, सौ. ज्योत्स्ना सरदेशपांडे आणि सौ. मुक्ता टिळक यांनी परिषदेस भेट देऊन परिषदेच्या कार्याची माहिती करून घेतली. परिषदेच्या कार्यकर्त्यांनी त्यांना परिषदेचे उपक्रम व परिषदेच्या गरजा यांची सविस्तर माहिती दिली व महानगरपालिकेकडून अर्थसाहाय्य मिळण्याची विनंती केली.

परिषदेच्या कामात आस्थेने लक्ष घालून मा. सौ. दीप्ती चौधरी व अन्य माननीयांनी नुकतीच परिषदेला रु. २५,०००/- ची देणगी जाहीर केली आहे. याबाबत स्थायी समितीचे अध्यक्ष श्री. सुभाष जगताप व नगरसेवक डॉ. सतीश देसाई यांचेही सहकार्य मिळाले. महानगरपालिकेकडून देणगी मिळावी, यासाठी विश्वस्त डॉ. वि. वि. घाणेकर व कोषाध्यक्ष श्री. रत्नाकर कुलकर्णी यांनी विशेष प्रयत्न केले.

परिषदेतर्फे या सर्वांचे मन:पूर्वक आभार.

परिषदेचे सर्वत्र असलेले सभासद व हितचिंतक नजिकच्या काळात परिषदेला शक्य ते सर्व अर्थसाहाय्य करतील, अशी उमेद आहे. येत्या तीन वर्षांत परिषदेच्या शताब्दीनिधीसाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन आहे.

❑

डॉ. गं. ना. जोगळेकर,
कार्याध्यक्ष, म. सा. प.,
टिळक रस्ता, पुणे ३०.

इतिहास आणि साहित्य : डॉ. अरविंद देशपांडे यांचे सेतुबंधन

❑

डॉ. राजा दीक्षित

❑

मी एम्. ए. करत होतो तेव्हाची गोष्ट. इतिहासाचा विद्यार्थी असूनही कविता करतो म्हणजे जणू मी कोणी गुन्हेगारच आहे, अशा नजरेने बघणारे काही महाभाग होते ! पण इतिहासाच्या एका प्राध्यापकांनी मात्र या गोष्टीचे उदंड कौतुक केले. त्यांची-माझी ओळखच मुळी कवितेमुळे झाली. पुणे विद्यापीठाच्या नियतकालिकातल्या माझ्या कविता वाचून त्यांनी मला बोलावून घेतले आणि त्या दिवसापासून सुमारे पाव शतकाहून अधिक काळ आमचा सुसंवाद चालू राहिला. हे माझे गुरू, किंबहुना मित्र-तत्त्वज्ञ-मार्गदर्शक म्हणजे डॉ. अरविंद महादेव देशपांडे. एम्. फिल्.च्या परीक्षेनंतर ते मला म्हणाले, ''राजा, तू पहिला आलास हे तर ठीकच; पण वर्गातल्या तू एकट्यानंच साहित्याच्या सामाजिकतेबद्दलचं उत्तर लिहिलंस, हे अधिक महत्त्वाचं. मुख्य म्हणजे तुझ्या या लिखाणात मला संशोधनातल्या नवतेची बीजं दिसताहेत.'' सरांच्या या शाबासकीचे फलित म्हणजे माझे 'इतिहास, समाजविचार आणि केशवसुत' हे पुस्तक.[१] एम्. फिल्.साठी मी या विषयावर संशोधन करू लागलो, तेव्हा मुळात त्याला मान्यता मिळण्याबाबत समस्या होती. इतिहासाचा अभ्यासक रुक्षच असला पाहिजे, त्याने चौकोनी चेहरा करूनच बसले पाहिजे, साहित्यासारख्या गोष्टींच्या वाटेला त्याने जरासुद्धा जाता कामा नये — या थाटाच्या वातावरणात मला देशपांडे सरांच्या रूपाने खरे ओॲसिस भेटले. इतिहासाबाबतची त्यांची दृष्टीच फार वेगळी होती. इतिहासाचा अन्वयार्थात्मक आणि तत्त्वज्ञानात्मक विचार ते करत असत. मानवी जीवनाच्या सर्व अंगांना इतिहास व्यापून टाकतो, इतिहास ही घटनांची निव्वळ गोळाबेरीज नसून ती एक मानसिकता असते, इतिहास-लेखनाची प्रक्रिया साहित्य-निर्मितीप्रमाणे अत्यंत सर्जनशील असते, इतिहास हा भूतकाळाचा अभ्यास असला तरी भूत-वर्तमानाचा तो अखंड संवाद असतो आणि तात्त्विक अर्थाने सर्व इतिहास समकालीन असतो — या सर्वाची जाणीव आम्हाला देशपांडे सरांनी करून दिली. सनावळ्या, राजकारण आणि युद्धकथा यांच्या चाकोरीतून इतिहासाला बाहेर काढून कार्ल मार्क्स, आंतोनिओ ग्रामची, इ. एच. कार, आर. जी. कॉलिंगवुड, डी. डी. कोसांबी अशांच्या तात्त्विक व अन्वयार्थात्मक मांडणीकडे त्यांनी आमचे लक्ष वेधले. साहित्याच्या समाजशास्त्राचे धडे त्यांनीच आम्हाला दिले. आमचे इतर शिक्षकही ज्ञानसंपन्न आणि आदरणीय होते. परंतु देशपांडे सरांची चतुरस्र विद्वत्ता, विचारप्रवर्तक शैली, रसिकता, विनोदबुद्धी आणि माणुसकी यांमुळे ते आम्हाला विशेष जवळचे वाटत. देशपांडे सर मार्गदर्शक होते म्हणून तर माझा एम्. फिल्.चा विषय मंजूर होऊ शकला. पुढे माझ्या लघुप्रबंधाला 'आऊटस्टँडिंग ग्रेड'

मिळाली, नारायण सुर्वे यांनी पुढाकार घेऊन 'लोकवाङ्मय'तर्फे तो प्रबंध प्रकाशित केला आणि 'म. सा. पत्रिके'त डॉ. रा. ग. जाधव यांनी त्याचे भरभरून कौतुक केले, तेव्हा कोठे आमच्या नव्या मांडणीतील तथ्य इतिहासातील परंपरावाद्यांच्या गळी उतरू लागले. मराठीतील अलीकडच्या विद्यापीठीय इतिहास-संशोधनात खऱ्या अर्थाने इतिहास आणि साहित्य यांना जोडणारा भक्कम सेतू बांधला गेला. या सेतुबंधनाला माझ्या प्रबंधाचे निमित्त असले, तरी त्यामागील मार्गदर्शक-प्रेरणा अरविंद देशपांडे यांचीच होती.

डॉ. अरविंद देशपांडे यांनी इतिहासाच्या तत्त्वज्ञानाविषयी आणि इतिहासाच्या समाजशास्त्राविषयी प्रचंड वाचन आणि चिंतन केले होते. मुख्य म्हणजे या संदर्भातील सैद्धांतिक भूमिकेचे उपयोजन महाराष्ट्राच्या इतिहासाबाबत करण्याची त्यांची धडपड असे. साहित्य हे मूलत: सामाजिक असते, ते एकाच वेळी सामाजिक निर्मिती आणि सामाजिक शक्तीसुद्धा असते, लेखन-प्रक्रियेतील सामाजिक सहेतुकता महत्त्वाची असते, लेखकाची आणि त्याच्या वाचकांची वर्गीयता लक्षात घ्यावी लागते, मूल्यांविषयीच्या अनेक लढाया साहित्याच्या रणभूमीवर खेळल्या जातात, साहित्य हे धुरिणत्वाचे एक प्रभावी साधन असते — यांसारखे विचार ते मांडत असत. पण तेवढ्यावरच न थांबता महाराष्ट्राच्या इतिहासाच्या संदर्भात या विचारांच्या अनुषंगाने ते प्रश्न उपस्थित करत. छत्रपती आणि पेशव्यांची नामावळी आम्हांला पाठ असते, पण संतचरित्रकार महिपतीला आम्ही ओळखतही नाही, अशी खंत ते व्यक्त करत. १८ व्या शतकातील महाराष्ट्र हा ठरीव सरंजामशाही चौकटीतील साचेबंद समाज होता, या रूढ कल्पनेला त्यांनी धक्का दिला. त्यासाठी १८ व्या शतकातील महाराष्ट्रेतिहासाचा पुनर्विचार त्यांनी आरंभला. १८ व्या शतकात गतिशीलतेच्या सुप्त क्षमता कशा होत्या, हे राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक मीमांसेद्वारे मांडून दाखवले. ते मांडताना शाहिरी वाङ्मयाची सामाजिक अर्थवत्ता त्यांनी उलगडून दाखवली. आधुनिकता निव्वळ ब्रिटिशांद्वारे आली, हे रुढ प्रमेय त्यांनी नाकारले. मध्ययुगीन महाराष्ट्र आणि आधुनिक महाराष्ट्र यांच्यातील सातत्य व बदलाची द्वंद्वात्मक प्रक्रिया स्पष्ट केली. १९ व्या शतकातील सामाजिकता आणि मराठी साहित्य यांचे नाते त्यांनी उलगडून दाखवले. त्यांच्या मांडणीतील मला जाणवणारे काही मुद्दे पुढीलप्रमाणे नमूद करता येतील —

१९ व्या शतकातल्या मराठी साहित्यातील नवा आशय आणि त्या साहित्याचे नवे घाट यांचा तत्कालीन सामाजिक बदलाशी अणि समाजविचाराशी संबंध होता. महात्मा फुले यांचा कार्यहेतू आणि त्यांचा वाचकवर्ग लक्षात घेतल्याशिवाय त्यांची रांगडी भाषा आणि संवाद-माध्यम यांचा उलगडा होत नाही. मध्यमवर्गीय ब्राह्मणी सुधारणावादाचे आणि या सुधारणावादाच्या मर्यादांमधून उद्‌भवणाऱ्या तडजोडवाद व पलायनवादाचेसुद्धा दर्शन हरिभाऊ आपटे यांच्या साहित्यातून घडू शकते. महाराष्ट्रातील सर्व मूल्यात्मक सामाजिक लढे साहित्याच्या रणभूमीवर खेळले जात होते. अभिजनांच्या धुरिणत्वासाठीच्या हालचाली आणि बहुजनांचा विद्रोही उर्ध्वगामी दबाव या दोन्ही संदर्भात तत्कालीन साहित्याची साक्ष महत्त्वपूर्ण ठरते. शासकीय कागदपत्रांमधून न उलगडणारे मानसशास्त्रीय दुवे साहित्यातून मिळू शकतात आणि

युगधर्माचाही वेध घेता येतो. अर्थात इतिहासाच्या संशोधनात साहित्याच्या समाजशास्त्राचा वापर अत्यंत काळजीपूर्वक करावा लागतो. ही वाट फार निसरडी असते. साहित्य अणि समाज-वास्तव यांचे एकास एक नाते ढोबळ पद्धतीने जोडू पाहणारा सवंगपणा उपयोगाचा नाही. अत्यंत सूक्ष्मतेने आणि कौशल्याने साहित्याची सामाजिक अर्थवत्ता शोधावी लागते आणि इतिहास-लेखनात ती गुंफावी लागते. साहित्य हा निव्वळ उर्ध्वरचनेचा भाग नसून पायाचाही भाग असू शकतो. ते धुरिणत्वाचे अदृश्य, पण प्रभावी हत्यार असते. पारंपरिक संस्कृतीचा ते भाग असतेच; पण पर्यायी संस्कृतीच्या निर्मितीमध्येसुद्धा साहित्याची भूमिका अर्थपूर्ण ठरू शकते. वर्गीयता व जातीयतेचे सूक्ष्म पदर साहित्याद्वारे उलगडून दाखवता येतात. साहित्य हे इतिहासाचे महत्त्वाचे, परंतु अनेक साधनांपैकी एक साधन आहे, हे विसरून चालत नाही.

एखाद-दुसऱ्या लेखाचा अपवाद[२] वगळता देशपांडे सरांनी हे विचार छापील स्वरूपात मागे ठेवले नाहीत. वर्गातील अध्यापन, चर्चासत्रे, भाषणे, अनौपचारिक चर्चा यांमधून ते ही मांडणी करीत राहिले. पण पुस्तकरूपाने सिद्धांत व उपयोजनाचा मेळ घालणारी पद्धतशीर आणि विस्तृत मांडणी त्यांच्याकडून होऊ शकली नाही. डॉ. अरविंद देशपांडे यांचे ४ जुलै २००२ रोजी वयाच्या ६५ व्या वर्षी हृदयविकाराने आकस्मिक दु:खद निधन झाले. इतिहास आणि साहित्याला जोडणाऱ्या सेतुवरून पुढे जाऊन लेखन-संशोधनाच्याद्वारे मराठीत आणखी विस्ताराने व सोदाहरण मांडणी करण्याची जबाबदारी आता त्यांच्या विद्यार्थ्यांवर आहे. किंबहुना तशी वाटचाल करणे हीच देशपांडे सरांना खरी श्रद्धांजली ठरेल.

❑

संदर्भ

१. राजा दीक्षित, *'इतिहास, समाजविचार आणि केशवसुत'*, लोकवाङ्मयगृह प्रा. लि., मुंबई, १९९३.

२. अरविंद देशपांडे, 'इतिहासलेखन व ललित साहित्य', समाविष्ट ह. श्री. साने (संपा.), *'सामाजिक शास्त्रे आणि साहित्य : अंत:संबंध'*, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९९५. (पूर्वप्रसिद्धी : *परामर्श*, पुणे, खंड २, अंक १-२, एप्रिल-जुलै १९७९.)

❑

डॉ. राजा दीक्षित
२, भालचंद्र हाइट्स,
८४७, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.
दूरध्वनी : ४४७७८३७

काही लोकप्रिय स्तोत्रांविषयी फुटकळ विचार

❑

गं. रा. पटवर्धन

❑

स्तोत्रे म्हणणारे लोक सामान्यत: अस्तिक असतात आणि पाठ करून म्हटल्यामुळे अभ्युदय आणि / अथवा नि:श्रेयस मिळवण्याची अपेक्षा करतात. माझा दृष्टिकोन अज्ञेयवादी व फलनिरपेक्ष आहे. अलिप्तपणे पाहण्याचा प्रयत्न करण्यासाठी सहा संस्कृत व एक मराठी अशी सात स्तोत्रे मी निवडली आहेत. त्यांची लांबी कमी अधिक आहे, आणि माझे विचारही (वाटल्यास तर्क म्हणू) कमी अधिक आहेत, व प्रमाणानुसार नाहीत. एवढी प्रस्तावना पुरे.

१. बुधकौशिक ऋषींची रामरक्षा

प्राचीन चरित्रकोशात बुधकौशिकांविषयी माहिती नाही. रामरक्षा केव्हा रचली त्या काळाचा कुणी निर्देश केलेला नाही. तेव्हा त्याची पार्श्वभूमी कशी असावी, याविषयी मी तर्क मांडू इच्छितो. प्राचीन काळी भारतात निवास करणारी काही माणसे व त्यांचे समूह स्वत:ला देव, ऋषी, राक्षस, वानर इत्यादी नावे घेऊन ओळखत. लढाई करण्यात देव प्रवीण होते, आणि त्यांच्या पराक्रमी महानायकांना 'इंद्र' असे म्हटले जाई. फ्रान्समधे नेपोलिअन जसा झाला तसेच हे इंद्र. देवांना व त्यांच्या महानायकांना बौद्धिक क्षेत्राविषयीही आस्था होती. नेपोलिअनने फ्रेंच भाषेची काळजी घेण्यासाठी ॲकॅडमी स्थापली, नागरी कायद्यांचे विद्वानांची मसलत घेऊन एक संकलन (Code) केले, याची आठवण करावी. प्राचीन इंद्रांनी ऋषींची विद्वत्-सभा स्थापली असणार. अशा सभेने बटूंसाठी संस्कृत शिकवणारे पाठ्यपुस्तक रचण्याचे काम बुधकौशिकांना सांगितले असावे. लेखनाची सोय नसल्याने असे पुस्तक पद्यात रसाळ व सोपे करण्याची गरज असणार. श्रीरामांना उद्देशून, वाल्मिकींच्या महाकाव्याशी तन्मय होऊन, रचलेली रामरक्षा विविध आश्रमांतून शिकवण्यासाठी वापरली जात असणार. अनेक मायबोली असणाऱ्या बटूंना एक प्रमाण भाषा शिकण्याचा मार्ग आखला गेला. केवळ ३८ श्लोकांत या स्तोत्राने संस्कृतची सुलभ ओळख विखुरलेल्या आश्रमशाळांतून लहान मुलांना झाली असेल.

अनुष्टुभ छंदात स्तोत्र रचले आहे असे त्याच्या सुरवातीला म्हटले असले तरी इतर वृत्तेही योजली आहेत. (उदा. २६,२९,३२). त्यामुळे रसाळपणात भर पडली आहे. या पाठ्यपुस्तकाचे दोन भाग दिसतात : श्लोक १ ते १६ व श्लोक १७ ते ३८. दोन्ही भागांत शंकरांनी स्फूर्ती व मदत दिल्याचा उल्लेख आहे. म्हणजे विष्णूची महत्ता अप्रत्यक्षपणे बटूंच्या मनावर ठसत असणार. श्लोक ३० मध्ये ते ठासून मांडले आहे. संस्कृतमध्ये द्विवचनाचा उपयोग होतो. श्लोक ५ ते ९ व नंतर १७ ते २० यात द्विवचनांचा सोपा वापर केला आहे. श्लोक ४ ते ९ यात शरीराचे अवयव वरून खाली अशा क्रमाने दिले आहेत. श्लोक क्र. ३७ मधे नामाच्या आठ विभक्ती

एकवचनी रूपात शिकवल्या आहेत. या सर्व गोष्टी प्राथमिक शिक्षणासाठी आहेत.

व्यासांचा किंवा कृष्णाचा उल्लेख अजिबात नसल्यामुळे बुधकौशिक ऋषी कौरवपांडव (महाभारत) युद्धाच्या आधी झाले असावेत. स्तोत्रात त्यांनी वापरलेले नृ व गृ (क्र. २५, २९) हे शब्द, नक्तंचर हा निशाचराऐवजी वापरलेला शब्द (वृत्ताच्या सोयीसाठी ? क्र. ३), अप्रमेय असा अपरिमेय ऐवजी वापरलेला शब्द (क्र. २३) यावरून ते पाणिनीच्या बरेच आधी होऊन गेले असतील.

क्र. १२ व २७ मध्ये राम, रामभद्र व रामचंद्र अशी तीन नावे वापरली आहेत. रामभद्र हे नाव आता प्रचलित राहिलेले नाही. भवभूतीच्या नाटकात वासंती या पात्राच्या तोंडी रामभद्र असा उल्लेख झाला आहे. रामाच्या संदर्भात दशरथाचा उल्लेख क्र. २२ व २३ मध्ये आहे, तसाच ककुत्स्थाचा आहे. रघुनंदन, रघुनाथ, रघुवंशनाथ असे उल्लेख २८, ३१, १, २७ व ३२ मध्ये आहेत, रघुत्तम असेही १९, २२ मध्ये म्हटले आहे. पण अज, दिलीप इ. पूर्वजांचा उल्लेख नाही.

रामाविषयी सांगताना वारंवार धनुष्यबाणाचा उल्लेख आहे, अगदी पहिल्या ध्यान श्लोकापासून क्र. ३,६,१९,२०,२१,२८ मध्ये सुद्धा तसे वर्णन केले आहे. शांतपणा (क्र. २६), कारुण्यरूपम् (क्र.३२) असे दोनदा वर्णन आहे. तेव्हा असे वाटते की विद्या शिकण्याबरोबर, शस्त्र व अस्त्र यांचेही महत्त्व ठसवण्याचा हेतु असावा. ब्रह्मचर्य (क्र.१८), अश्वमेध (क्र.२४) हे उल्लेख लक्षणीय आहेत. मुक्ती व भुक्ति असा क्र. १२ मधील उल्लेख पुरुषार्थांत मोक्षाची गणना सुरू झाल्याचे चिन्ह असावे.

रामाचे वर्णन सावळा, निळा, असे केले आहे. (क्र. २, २६) शिवाय त्याचे नाव विष्णूच्या हजार नावांहून श्रेष्ठ (क्र.३८) धरले आहे. यावरून गोऱ्या रंगाचा अभिमान ऋषि लोक मानीत नसावेत असे वाटते. ध्यानाचा श्लोक, तसेच क्र. ३१ चा श्लोक, यावरून पत्नी पतीच्या डावीकडे राहण्याचा प्रघात रामाच्या काळात होता असे दिसते. ध्यानाचा श्लोक व क्र. २ यात रामाच्या जटांचा उल्लेख आहे. तो केवळ वनवासापुरता नसावा. श्लोक क्र.११ मध्ये पृथ्वी व आकाश यांच्याबरोबर पाताळाचा निर्देश आहे. पाताळ प्रदेशाचा ऋषिलोकांना पत्ता केव्हा लागला हे शोधायला हवे, कारण गायत्री मंत्रात पृथ्वी व स्वर्गाप्रमाणे भुवलोक (अंतराळ ?) असा उल्लेख होतो.

२. याज्ञवल्क्य ऋषींची शिवरक्षा

या स्तोत्रांत केवळ १२ श्लोक आहेत. रामरक्षा डोळ्यासमोर ठेवून रचना केली असावी. श्लोक ३ ते ८ यांत शरीराच्या अवयवांचे सदाशिव रक्षण करील याविषयी प्रार्थना केली आहे. नंतर त्रैलोक्यांचा उल्लेख आहे. शेवटच्या श्लोकात विष्णू स्वप्नात येऊन हे स्तोत्र सांगतात असेही सांगितले आहे. शंकर व शिव ही एकाच देवतेची नावे आहेत असे समजल्यास रामरक्षेविरुद्ध प्रतिपादनाचा हेतु असावा.

३. नारद पुराणातील गणेश स्तोत्र

या स्तोत्रात गणपतीच्या बारा नावांचा उल्लेख आला आहे, पण तो बराच कृत्रिम वाटतो.

गजवक्त्र, गजानन अशी समानार्थ नावे घेतली आहेत. धूम्रवर्ण हा रंग गोऱ्या रंगाला महती देण्याच्या विरुद्ध आहे. कृष्णपिंगाक्ष डोळे कसे असतील याची कल्पना करणे कठीण आहे, पण सध्या असणाऱ्या आफ्रिकन व भारतीय हत्तीचे डोळे तसे असतात का?

दिवसातून तीन वेळा म्हणण्यामुळे मिळणारी फळे क्र. ५,६,७ मध्ये सांगितली आहेत. यात सिद्धी मिळविण्याचा उल्लेख आहे. क्र. ८ मध्ये आठ वेळा लिहून आठ ब्राह्मणांना द्यावे असे म्हटले आहे, त्या अर्थी लेखन कलेचा चांगला प्रसार झाल्यानंतर या स्तोत्राची रचना झालेली असावी.

४. व्यासांचे नवग्रह स्तोत्र

ओळीने नऊ श्लोकांत कुणा ग्रहांना नमस्कार करावा हे यात सांगितले आहे. ग्रहांचा उलटसुलट सन्मान केलेला दिसतो. रविवार ते शनिवार अशा सात दिवसांची गणना सुरू झालेली दिसते. राहू चंद्राला व सूर्याला ग्रासून टाकतो, पण चंद्र व सूर्य हे आधी येतात व त्यांचा आदराने उल्लेख आहे. केतूचे रूप भीषण आहे व स्वभाव भयंकर आहे व तो सर्व तारकांमध्ये श्रेष्ठ असे म्हटले आहे. शनी हा रवीचा मुलगा असला तरी आईप्रमाणे काळा-निळा दाखविला आहे. पृथ्वी थंड होत असताना तिचा एक मोठा तुकडा वेगळा होऊन तिच्या भोवती फिरू लागला असे या स्तोत्रावरून दिसते. पाश्चिमात्य विद्वान त्याला चंद्र समजत. या खळग्यात पाणी साठल्यावर त्याचा पॅसिफिक सागर झाला असे ते मानत. इथे क्र. ३ मध्ये पृथ्वीपासून मंगळ तयार झाला असा उल्लेख आहे.

देव आणि ऋषि हे दोन समूह सलोख्याने राहत असावे. बहुधा देव अधिक नागर आणि ऋषी अधिक कृषीवल असावेत. दोन्ही समूहांकडून सारखाच मान मिळणारे वसिष्ठ ऋषी होते, पण विश्वामित्र किंवा शुक्राचार्य तसे नसावेत.

राहूला जन्म देणारा सिंहिक किंवा जन्म देणारी सिंहिका, कोण असावेत यासाठी इतर पुराणांशी ताडून पाहावे लागेल.

या स्तोत्राच्या पठणामुळे होणारे फायदे सांगताना 'वाईट स्वप्नांचा नाश होईल' असे सांगितले आहे व नंतरच ऐश्वर्य किंवा आरोग्य यांचा क्रम लावला आहे. मानसशास्त्रीय उपाययोजना सांगण्याचा हा प्रयत्न आहे काय? विष्णूच्या एका स्तोत्रात 'दु:स्वप्ने स्मर गोविंदम्' असे सांगितले आहे. ग्रहांचा रंग सांगताना व्यासांनी विशिष्ट उपमाने वापरली आहेत. सूर्य जास्वंदीच्या फुलासारखा लालभडक आहे, तर केतूचा लाल रंग पळसाच्या फुलासारखा आहे. चंद्राचा पांढरा रंग दही, शंख व बर्फ यांच्यासारखा आहे. तर शुक्राचा पांढरा रंग कुंदासारखा, कमळाच्या देठासारखा व हिमासारखा आहे. मंगळाचा रंग विजेप्रमाणे आहे. याचा अर्थ तो लाल नसावा. बुधाचा रंग सावळा आहे, गुरूचा रंग सोन्यासारखा आहे. शनीचा रंग नीलमणी व काजळ यांच्यासारखा आहे. फक्त राहूला रंग नसावा असे दिसते.

५. शंकराचार्यांचे देवीस्तोत्र

या स्तोत्रात भक्तीचा उमाळा आहे आणि देवीपाशी लहान बाळाने हट्ट करावा अशा तऱ्हेने जवळजवळ सगळे स्तोत्र रचले आहे. पूजा कशी करावी हे देखील त्याला माहीत नाही, तो

आळशी व अवखळ आहे. एखाद्या वेळी मुलगा वाईट निपजेल, पण आई कधीही वाईट असणार नाही असा निर्वाळा तो देतो.

असे असले तरी एका श्लोकांत (क्र.५) वय ८५ च्यापुढे आहे असेही आचार्य म्हणतात. नवव्या श्लोकांत आचार्य आपण रुक्ष शब्दांच्या जंजाळात अडकलो असे म्हणतात. तर बाराव्या श्लोकांत त्यांच्यासारखा पापी कोणी नाही अशी कबुली देतात.

तेव्हा हे स्तोत्र आद्य शंकराचार्यांनी खरोखर रचले आहे असे वाटत नाही.

६. वाल्मिकी ऋषींचे गंगास्तोत्र

सुमारे नऊ श्लोकांचे हे स्तोत्र रसाळ असून आद्य कवींना शोभेल असे आहे. जगन्नाथ पंडितांचे गंगालहरी स्तोत्रही रसाळ व काकणभर अधिक आकर्षक आहे. गंगेच्या पाण्यात राहणारे कासव किंवा मासा अथवा काठावर राहणारा पक्षी, हे खूप भाग्यवान; पण तिला सोडून राहणारा पराक्रमी राजा होणे नको, अशी दुसऱ्या श्लोकांत वाल्मिकी रामचंद्रावर अभावित टीका करतात. चवथ्या श्लोकांत गंगा नदी तीन मार्गांनी जाते असा उल्लेख आहे, त्याचा संबंध यमुना व सरस्वती नद्यांशी असेल का? गंगेचे पाणी शुभ्र आहे, त्याची तुलना शंख, चंद्र व कुंद यांच्या रंगांशी केली आहे. सातव्या श्लोकात गंगा विष्णूच्या पायापासून निघते व नंतर शंकराच्या मस्तकावर विराजते, असे म्हणण्यात विष्णूला अधिक उच्च मानण्याचा हेतू असावा काय?

७. रामदासांचे मारुती स्तोत्र

संस्कृत भाषेतील स्तोत्रांप्रमाणेच मराठी भाषेतही अनेक स्तोत्रे आहेत. त्यातील सर्वांत लोकप्रिय म्हणजे संत रामदासांचे मारुतिस्तोत्र आहे. रामदासांच्या रचना काव्य म्हणून समीक्षकांना आवडत नसतील. सप्टेंबर १९४५ मध्ये श्री. वा. ना. देशपांडे यांनी त्यांची रचना ग्रोटस्क (grotesque=विचित्र) आहे, रांगडी आहे असे स्पष्ट म्हटले आहे. रामदासांच्या काळी गद्य रचनांचा प्रघात असता तर लोकांना बोध करण्यासाठी त्यांनी बहुधा गद्यच रचले असते.

भुजंगप्रयात हा रामदासांना प्रिय छंद, पण मारुतिस्तोत्र अनुष्टुभ छंदात आहे. सुभाषितवजा वचनें रामदासांच्या स्फुट रचनेत सापडतात. या स्तोत्रांत अनुप्रास विशेषाने दिसतात. काळाग्नि व काळरुद्राग्नि यात ते काय भेद करतात (क्र.५) ते उमगत नाही. मंदार पर्वता (मंद्राद्रि) सारखा द्रोणगिरी लंकेच्या उत्तरेला अनेक कोटी उड्डाणे (योजने?) दूर आहे असा उल्लेख आहे (क्र.९). तो गिरी उपटून आणला व परत नेला तेव्हा त्याच्या गतीला तुलना नाही असे वर्णन (क्र.१०) योग्यच आहे. पण एकंदर वर्णन वाचकांच्या व श्रोत्यांच्या मनाला धडकी भरावी असे आहे. अरबी भाषेतील गोष्टीमध्ये जीनी (genie) असावा तसा मारुती रामचंद्राच्या बाजूने लढताना दाखवला आहे. त्याखेरीज त्याने वनाचा विध्वंस केला, पाताळातल्या देवतांना मारले, दात आवळून धरले, दोन्ही हात उंच उगारले, भुवया ताठ केल्या, इत्यादी वर्णन बुधकौशिक ऋषीच्या वर्णनापेक्षा अतिप्रचंड असे वाटते.

क्र.१३ मध्ये सूर्यमंडळाला बालपणी ग्रासले व वाढू लागल्यावर त्याच्यापलीकडे असलेल्या शून्यमंडळाला भेदले असे उल्लेख जोतिषातील त्यांच्या समजुती दाखवतात.

फलश्रुती सांगताना क्र. १६ मध्ये पहिल्या ओळीत १५ श्लोकी रचना आहे असे सांगून पुढच्या ओळीत सोळा श्लोकी रचना आहे असे म्हटले आहे. पण त्यानंतर सतरावा श्लोकही येतो. मूळ स्तोत्रांत वाढ करण्याचा प्रसंग का यावा असे वाटते.

स्तोत्रे असंख्य आहेत, व प्रस्तुत लेखकाचा अभ्यास अपुरा असल्यामुळे स्वत:वर मर्यादा घातली आणि ती आता संपली आहे. स्तोत्रांकडे निर्लेप मनाने बघितल्यास त्यांच्या सकृत् अर्थापेक्षा वेगळे काही मिळू शकते हे दाखवण्याचा हा प्रयत्न इतर वाचक चालू ठेवतील अशी आशा करतो. ❑

गं. रा. पटवर्धन
८००, भांडारकर रोड, एरंडवणे, पुणे ४११ ००४.

स्वागत

पद्मगंधा प्रकाशन, पुणे यांची प्रकाशने

वळू बनातली : राजन खान, पृष्ठे १६८.
मला जगायचंय : विनायक कुलकर्णी, पृष्ठे १४२.
तेथे जीवाणू जगती : म. वि. दिवेकर, पृष्ठे १२८.
राजो, फरिया आणि सईद : अनु. वि. स. वाळिंबे, पृष्ठे १०४.
समाज आणि महिला : नीलम गोऱ्हे, पृष्ठे १६०.
मराठी साहित्य : विमर्श आणि विमर्शक : व. दि. कुलकर्णी, पृष्ठे ४८०.
नाटक : रंगाविष्कार आणि रंगास्वाद : व. दि. कुलकर्णी, पृष्ठे २४८.
गोदातटीचा अश्वत्थ : व. दि. कुलकर्णी, पृष्ठे १४०.
पोपट बोरकर : व. दि. कुलकर्णी, पृष्ठे १३०.
काव्य आणि काव्यस्वाद : व. दि. कुलकर्णी, पृष्ठे १५२.
शोध एलकुंचवारांच्या नाट्यकृतीचा : संजय आर्वीकर, पृष्ठे ३४२.
नव्या-जुन्याच्या काठावरती : अरुणा ढेरे, पृष्ठे १८०.
विज्ञान साहित्यविश्व : निरंजन घाटे, पृष्ठे १९२.
जना-मनातील यशवंतराव : नागनाथ हेगे, पृष्ठे २१४.
विज्ञानाने जग बदलले : निरंजन घाटे, पृष्ठे १४४.
'क्ष' किरणांची नवलकथा : सतीश पांडे, पृष्ठे ४८.
मेडिकल ट्रान्स्क्रिप्शन : गंगाधर महाम्बरे, पृष्ठे ११०.
रोबो कॉर्नर : अरुण मांडे, पृष्ठे १६४.
जगाची मुशाफिरी : निरंजन घाटे, पृष्ठे ८८.
समुद्रातले आकाश : महावीर जोंधळे, पृष्ठे १२०.
मी जयंत टिळक : ज. श्री. टिळक, पृष्ठे २२४.
पायाखाली हिरवळ : श्रीनिवास सिरास, पृष्ठे १७२.
समज आणि उमज : मधुकर तोरडमल, पृष्ठे १८२.

लोकोत्तर जीवनयोगी : पूज्य सानेगुरुजी

❑

डॉ. ग. ना. जोशी

❑

गुरुजी हे एक थोर समाजनेते, राजकीय पुढारी, शिक्षक, लेखक, पत्रकार असे सर्व काही असले तरी त्यांच्या मनाचा पिंड प्रामुख्याने भगवद्‌भक्ताचा होता. त्यांची खरी भिस्त परमेश्वरावरच होती. ते आपले जीवन प्रभूला पूर्णपणे शरण जाऊन त्याच्या प्रेरणेने व त्याला अर्पण करून जगणारे होते. ते पारंपरिक अर्थाने धार्मिक प्रवृत्तीचे नसले तरी ईश्वरशरण वृत्तीमुळे ते निखालस आध्यात्मिक जीवनाचे प्रेमी व साधक होते. गुरुजींच्या प्रत्येक श्वासात, कार्यात, विचारात व भावनेत ईश्वराचे स्मरण सातत्याने होत असे.

गुरुजी ईश्वर-समर्पित जीवन जगणारे अध्यात्मप्रेमी होते. ते देववेडे, रामवेडे होते. आपले संपूर्ण अंतर्बाह्य जीवन ईश्वराने व्यापून राहावे आणि आपण त्याच्या हातातील पावा, बासरी, साधना, उपकरण, बाहुले म्हणून जगावे अशी त्यांची उत्कट इच्छा होती. प्रभूला बिनशर्थपणे, निरपेक्षपणे व त्यांच्यापासून कशाचीही मागणी न करता शरण जावे व आपले चिमुकले जीवन त्याच्या हातात सोपवून जगता यावे अशी तळमळ त्यांना सदैव लागलेली असे.

गुरुजी म्हणतात -

तुझ्या करातील बनून पांवा।
कृतार्थ हा जन्म मदीय व्हावा।
करावया मूर्त शुभ स्वहेतू
करी मला साधन आपुले तू ।
असो तुझे नाव मदीय वक्त्री।

स्वत:ला पोकळ म्हणजे अहंकाररहित अशा पाव्याची, बासरीची, वेणूची उपमा त्यांनी रवींद्रनाथांप्रमाणे दिली. आपले संपूर्ण जीवन, शरीर, मन, बुद्धी सर्व काही प्रभूने व्यापलेले असावे, प्रभूशिवाय वेगळे असे आपल्यापाशी काही नसावे, आपल्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचा परमेश्वर हाच एक स्वामी, नियंता व धर्ता असावा अशी त्यांची उत्कट इच्छा होती. यावरून त्यांच्यावर महर्षी श्री अरविंदांच्या संपूर्ण ईश्वरशरणेच्या, पूर्णयोगाच्या सिद्धान्ताचा खोल परिणाम झालेला होता, असे दिसते.

त्यांनी 'पत्री'तील कवितेत म्हटले आहे -

जे आवडते तुज देवा ते करोत माझे हात
जे आवडते तुज देवा ते विचार मनिं नांदोत
जे आवडते तुज देवा ते शब्द ओठ बोलोत॥

उच्च दर्जाचे प्रभुमय, दैवी (Divine) जीवन जगावे असा ध्यास गुरुजींना जन्मभर लागला होता व हीच त्यांची जीवनसाधना होती.

गुरुजींना प्रिय वाटणारे व अभिप्रेत असलेले अध्यात्म हे एकांतात जाऊन ध्यानधारणा करण्यात रंगणारे, व्यक्तिकेंद्री, ईशस्मरण नाही. त्यांचे अध्यात्म समाजसन्मुख व समाजोद्धारक आहे. त्यांचे अध्यात्म नकारात्मक, निवृत्तिपर नसून समाजजीवनातील अनेक अनिष्ठ प्रवृत्ती, अन्याय, अत्याचार, शोषण व दुष्ट प्रवृत्ती यांच्याशी उघड उघड सामना करणारे कर्तृत्वशाली, पुरुषार्थी जीवन जगण्याला प्रेरणा देणारे सकारात्मक कृतिशीलतेचे, कर्मयोगाचे स्फूर्तिदाते आहे. भौतिक जग व त्यातील मानवसमाजातील अनेक प्रवृत्ती यांना मिथ्या न समजता त्यांच्याविरुद्ध विवेकपूर्ण रीतीने संघर्ष करून असत्यावर व दुरितावर सत्याचा व मंगलाचा विजय प्रस्थापित करू पाहणारे असे ते शूराचे आचारशास्त्र आहे. गुरुजींना अभिप्रेत असलेले 'अध्यात्म' हे स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, महायोगी श्री. अरविंद यांनी प्रतिपादिलेले जीवनाला उन्नत करून उदात्ततेचा अनुभव मिळविण्यास प्रेरणा देणारे लढाऊ, विजयिष्णू, आणि कृतिशील स्वरूपाचे पोषक व प्रेरक शास्त्र आहे. गुरुजींना अभिप्रेत असलेले अध्यात्म उदात्ततेकडे नेणारे आहे. ते निरुद्देश नसून गीतेने सांगितल्याप्रमाणे निष्काम आहे आणि 'विगतज्वर' होऊन सर्व दुरितांविरुद्ध निर्भयपणे लढण्यास प्रेरणा देणारे, तेजस्वी जीवन जगण्यास स्फूर्ती व प्रेरणा देणारे, जीवनसंवर्धक व मानवांचे आत्मबल वाढविण्यास उत्तेजन व वाव देणारे आहे.

गुरुजी 'प्रेमधर्म' हाच खरा धर्म मानणारे आहेत. त्यांची 'खरा धर्म' ही कविता सुप्रसिद्ध आहे. त्या कवितेत त्यांनी म्हटले आहे —

खरा तो एकची धर्म। जगाला प्रेम अर्पावे॥
जगी जे हीन अतिपतित
जगी जे दीन पद-दलित
तयां जाऊन उठवावे॥ जगाला प्रेम अर्पावे॥
जिथे अंधार औदास्य
जिथे नैराश्य आलस्य
प्रकाशा तेथ नव न्यावे॥ जगाला प्रेम अर्पावे॥
असे जे आपणापाशी
असे जे वित्त वा विद्या
प्रकाशा तेथ नव न्यावे॥ जगाला प्रेम अर्पावे॥
असे हे सार धर्माचे
असे हे सार सत्याचे
परार्थ प्राणही द्यावे॥ जगाला प्रेम अर्पावे॥

सानेगुरुजींच्या व्यक्तिमत्त्वाचे अत्यंत सूक्ष्म दृष्टीने आकलन करायचे झाले तर त्यांच्या व्यक्तिमत्त्वात, विचारात, भावनांत व मनोवृत्तीत एक लोकविलक्षण व विलोभनीय असे उच्च

प्रतीचे व अद्‌भुत रसायन (Alchemy) पाहावयास मिळते. भारतीय संस्कृतीवर गुरुजींचे निरतिशय प्रेम होते. त्यांचे वर्णन वेदांत 'कविर्मनीषि:' असा जो अर्थपूर्ण शब्दप्रयोग केलेला आहे त्याने करणे उचित ठरेल. गुरुजींच्या मनाच्या घडणीत प्राचीन वेदांच्या ऋचांची रचना करणाऱ्या ऋषींचे प्रतिभ अंतर्ज्ञान (Intuition), उपनिषदांची अंतिम सत्तेचा व सत्याचा खोल वेध घेणारी तत्त्वदृष्टी, रसिकता, कलात्मकता व सर्वंकषता यांचा खोल प्रभाव पडलेला आढळतो. गुरुजींची परिष्कृत भावनाप्रधान जीवनदृष्टी ही साधीसुधी, उथळ, वरपांगी स्वरूपाची नव्हती, तर ती मर्मग्राही, मूलग्राही, मर्मभेदी आणि प्रगाढ स्वरूपाची होती. त्यांच्या विचारात आणि भावनांत भगवान बुद्धाची करुणा, मैत्री व प्रगाढ वैश्विक सहानुभूती; रामाचा तीव्र ध्येयवाद व आदर्शवाद; श्रीकृष्णाची खेळकर व मनोहर स्थितप्रज्ञता; भीष्माचार्यांचे सर्वगामी प्रज्ञान, शंकराचार्यांचे निस्सीम वैराग्य; रामानुजांची प्रांजल भक्तिभावना (प्रपत्ति), वल्लभाचार्यांची मुक्त आनंदमयी मधुराभक्ती या सर्वांचे विलक्षण व विलोभनीय संमिश्रण व संश्लेषण होऊन ज्याचे वर्णन करण्यास कोणतेही शब्द अपुरे व अपर्याप्त ठरावेत असे सुंदर जगावेगळे एकरसीय रसायन (Alchemy) झालेले होते. गुरुजींमध्ये प्राचीन ऋषींची प्रतिभा व द्रष्टेपण होते, तसेच मध्ययुगातील संतांचे गुण व दिव्यता एकीभूत झालेली होती असे वाटते. ज्ञानदेवांची रसिकता, काव्यात्मकता व ज्ञानाची प्रचंड झेप, नामदेवांची आर्तता, एकनाथांचे पांडित्य, तुकारामांची सरलता आणि हृदयाची प्रांजलता व हृदयंगमता, समर्थ रामदासांचे प्रखर वैराग्य व ऐहिक जीवनाचे खोल आकलन व प्रज्ञान हे संतकवींचे वेगवेगळे प्रधान गुण एकजीव होऊन गुरुजींच्या विचार-भावनांतून व्यक्त झालेले दिसतात. गीतेत वर्णिलेली दैवीसंपद् गुरुजींच्या मनात, वाणीत व आचरणात जणू साकार झालेली होती.

तसेच अलीकडच्या काळातील गुरुजींचे प्रमुख दैवत महात्मा गांधी, वंदनीय रवींद्रनाथ टागोर, महान कृतिशील वेदान्ती स्वामी विवेकानंद, श्री रामकृष्ण परमहंस, महायोगी श्री अरविंद, स्वामी रामतीर्थ, तत्त्वज्ञ राधाकृष्णन्, वैराग्यमूर्ती मर्मग्राही विनोबा भावे या प्रत्येकाचे खोल संस्कार गुरुजींच्या संवेदनाशील मनात व हृदयात संकलित व पुंजीभूत झालेले सापडतात. गुरुजींना दत्तात्रयाप्रमाणे जणू अनेक गुरू होते व त्या सर्वांचे गुण व विचार गुरुजींनी स्वत:मध्ये मुरवून व एकत्रित करून त्यांचे जिवंत एकरस मधुर, सुगंधी रसायन स्वत:च्या हृदयकुपीत बनविले होते. गुरुजींच्या ठिकाणी जसे पुरुषाची कठोरता, धैर्य, हिंमत, लढाऊपणा, कर्तव्यकठोरता व संयम हे गुण होते तसेच त्याचबरोबर मातेची वत्सलता, स्त्री-हृदयाची कोमलता, उदारता, सेवाशीलता, सहनशीलता हेही गुण त्यांच्या समवेत मैत्रीभावाने नांदत होते. तसाच न्यायमूर्ती रानड्यांचा निखळ विवेक, महात्मा फुले यांची दलितांविषयीची अगाध करुणा, आंबेडकरांची विषमतेविरुद्धची तीव्र वैचारिक झुंज, लोकमान्य टिळकांचा आदर्श व खंबीर ध्येयवाद, आगरकरांचा तीव्र बुद्धिवाद, रामकृष्णांची अलिप्तता व अनासक्ती असे उत्तमोत्तम दैवीगुण एकत्रित झाले होते. गीतेत व गांधीजींनी सांगितल्याप्रमाणे रणभूमीवर प्रतिपक्षाविषयी द्वेष, तिरस्कार न बाळगता 'युध्यस्व विगतज्वर:।' या संदेशाचे पालन ते करीत असत. तसे स्वत: गुरुजी एकटेच स्वसम होते आणि त्यांचे व्यक्तिमत्त्व असामान्य, लोकोत्तर

व मनस्वी होते. भारतीय संस्कृतीचे रहस्य सर्वसामान्य लोकांना सोप्या व सुगम रीतीने समजावून सांगणारे व तिच्या महतीचा प्रसार करणारे रामदासस्वामीसारखे ते एक आधुनिक मिशनरी सत्पुरुष होते. गुरुजी हे आधुनिक काळातील एक थोर प्रबोधनकार ऋषी होते. ते मठात किंवा आश्रमात बंदिस्त राहून कार्य करणारे संन्यासी नव्हते. ते समाजाच्या सर्व थरांतील लोकांमध्ये मोकळेपणाने मिसळून व त्यांच्याशी संवाद साधून समाजाच्या प्रत्यक्ष दैनंदिन जीवनात आध्यात्मिक तत्त्वांचा आचार करण्यास प्रवृत्त करणारे, प्रेरणा देणारे अध्यात्मप्रवण जीवन जगत होते आणि आत्मोद्धाराबरोबर समाजाचाही उद्धार व उन्नती करू पाहात होते. समाजसेवेतच त्यांना स्वत:ला मोक्षाचे समाधान हवे होते. 'आत्मनो मोक्षार्थं जगद्‌हितायच' या ध्येयाचे गुरुजी एक सत्पुरुष होते. गुरुजी दैनंदिन ऐहिक जीवनात जणू अध्यात्माचे उपयोजन (Application) करणारे एक जीवनयोगी होते.

गुरुजी जुन्याचा तिरस्कार न करता नवीनाचे स्वागत व स्वीकार करण्यास तयार असत. जीवन जुन्या साच्यात तुंबून राहून कुजत न ठेवता त्यात सतत परिवर्तन करीत राहून त्याचे प्रवाहित्व सतत चालू ठेवणे आवश्यक आहे असे मानत. म्हणून ते आधुनिक काळातील ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, कौशल्य, संशोधन, प्रयोगशीलता यांचा मोकळ्या मनाने स्वीकार करून त्यांचा प्राचीन विचार व आदर्श यांच्याशी घर्षणरहितपणे समन्वय करण्याचा पुरस्कार करणारे होते. सनातनत्व म्हणजे जुन्या, जीर्ण, निर्जीव विचारांना व आचारांना आंधळेपणाने व हट्टीपणाने, अंधश्रद्धेने चिकटून न राहता त्यांचे मर्म व रहस्य नीट समजून घेऊन त्यांच्यात प्राण ओतून त्यांना जीवनाला पोषक रूप दिले पाहिजे असे मानणारे होते. त्यांच्या मते सनातनत्व म्हणजे नित्यनूतनत्व असावयास पाहिजे.

गुरुजी परनेय व कच्च्या मनाचे नव्हते. ते स्वयंप्रज्ञ व आत्मप्रामाण्यवादी होते. त्यांना कोणतीच संकुचित सांप्रदायिकता मानवत नसे. त्यांच्या ठिकाणी संतपण व राजकीय कार्य यांचा अनुपम संगम झालेला होता. गुरुजी एका अर्थाने सर्वोदयाचे म्हणजे अन्त्योदयाचे पुरस्कर्ते होते. त्यांची शिकवण वर्ण, भाषा, धर्म, संप्रदाय, देश यांसारख्या सर्व भेदांना उल्लंघून त्यांच्या पलीकडे नेणारी मानववादी, मानवधर्मीय होती. त्यांना पक्षांची व संप्रदायांची बंदिस्त चौकट मानवत नव्हती. म्हणून ते पक्षीय राजकारणापासून अलिप्त राहात असत. त्यांना मुख्यत: सर्व गरीब, पददलित, शोषित असे कामगार, मजूर, शेतमजूर, छोटे शेतकरी, स्त्रिया, बहिष्कृत समाज (अस्पृश्य) यांच्याविषयी निरतिशय कळवळा व आत्मीयता वाटत असे. त्यांच्या उद्धाराकरिता, उन्नतीकरिता ते सातत्याने लिहित व बोलत असत. राजकारण करीत असूनही त्यांनी कधीही मानाची पदे, सत्ता, नेतृत्व यांचा लोभ धरला नाही. ते सदैव नम्रतेने मागे राहात. त्यावेळी कॉंग्रेस श्रेष्ठींनी त्यांनी केलेल्या कॉंग्रेसच्या प्रचंड कार्याची जाणीव ठेवून त्यांना प्रांतिक व अखिल भारतीय कॉंग्रेस समितीवर सदस्य करून घेण्याचे सौजन्य दाखविले नाही. राजकीय क्षेत्रात त्यांची मोठी पात्रता असूनही त्यांची उपेक्षाच होत गेली. पण त्याची त्यांना कधी खंत वाटत नसे.

भारताला लौकरात लौकर स्वातंत्र्य मिळावे यासाठी गुरुजी अहर्निश कार्य करीत होते.

अनुक्रमणिका

भारताला स्वतंत्र करण्याचा त्यांना ध्यास लागला होता. भारतमातेविषयी त्यांना कमालीचा आदर व प्रेम वाटत होते. ते थोर देशभक्त व राजकीय नेतेही होते. स्वातंत्र्यासाठीच्या सर्व आंदोलनांत त्यांनी हिरिरीने भाग घेतला होता व अनेक वेळा तुरुंगवासही भोगला होता. धुळे, नाशिक, येरवडा, त्रिचनापल्ली येथील तुरुंगात त्यांनी अनेक वर्षे शिक्षा भोगली होती. तुरुंगवासात त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली होती. 'श्यामची आई' या त्यांच्या अत्यंत प्रसिद्ध असलेल्या पुस्तकाचे लेखन कारावासातच केले होते. आचार्य विनोबा भावे यांच्यासमवेत १९३२ साली ते धुळ्याच्या तुरुंगात राजबंदी असताना विनोबांनी गीतेच्या १८ अध्यायांवर जी तुरुंगात प्रवचने केली होती ती गुरुजींनी अत्यंत जलद हाताने तशीच्या तशी शब्दश: लिहून घेतली होती व ती पुढे 'गीता प्रवचने' या शीर्षकाने प्रसिद्ध झाली. अनेक सुंदर पुस्तकांचे त्यांनी कारावासात मराठीत रूपांतर, भाषांतरही केले होते. त्यांच्या लेखणीला विलक्षण गती असे. त्यांचे मन विचारांनी व भावनांनी सदैव जणू तुडुंब भरलेले, ओथंबलेले असे. त्यामुळे त्यांचे लेखन सहज व उत्स्फूर्तपणे होत असे. ते जे पहिले लेखन करीत त्यात व्याकरणाची एकही चूक राहात नसे.

साहित्याच्या क्षेत्रातही सुमारे १०० पुस्तके त्यांनी रचूनही त्यांना पुण्याकडील तत्कालीन 'सुवर्णतुला' करणारे साहित्यिक व समीक्षक साधे साहित्यिकही समजून त्यांचा गौरव करण्यास तयार नसत. 'गुरुजी कलावंत तर नाहीतच पण साहित्यिकही नाहीत' असे म्हणण्यापर्यंत साहित्यिकांनी त्यांच्याविषयी अनुदार उद्गार काढून गुरुजींवर मोठा अन्याय केला होता व त्यांची उपेक्षाच केली होती. कथा, कादंबऱ्या, निबंध, चरित्रे, काव्य अशा सर्व प्रकारांत गुरुजींनी ग्रंथनिर्मिती करूनही गुरुजींची साहित्यिक सर्जनक्षमता मान्य करून तत्कालीन प्रस्थापित साहित्यिक त्यांना मानाने वागवत नसत. गुरुजींनी टॉलस्टॉय यांच्या What is art या दीर्घ निबंधाचा मराठीत अनुवाद करून त्याला स्वत:ची जी दीर्घ प्रस्तावना लिहिली होती तिच्यात कलेविषयी गुरुजींनी आपले जे मत व्यक्त केले होते, त्यावर कलावादी साहित्यिकांनी टीकेची झोड उठविली होती, आणि गुरुजींच्या मताचा विपर्यस्त अर्थ लावून त्यांच्यावर नको ती टीका केली होती. ते कळल्याने अर्थातच गुरुजींचे मन व्यथित झाले होते.

'कला हा जीवनाचा सुगंध असतो', असे काका कालेलकरांचे मत गुरुजींना पटत असे. गुरुजी आपल्या लेखनात आपले हृदय, आत्मा ओतणारे असे **रक्ताने लिहिणारे लेखक होते. नुसत्या शाईने लिहिणारे लेखक नव्हते.** गुरुजींना कलेचे जड, ठोकळेबाज व यांत्रिक तंत्र अमान्य असे. स्वत: गुरुजी हे भावनायुगाचे प्रवर्तक होते व ते जीवनवादी लेखक होते. त्यांच्या मते खरी कलाकृती ही कलावानाच्या हृदयसमुद्रातून न्हाऊनमाखून बाहेर यावयास पाहिजे. खरी व चांगली कलाकृती कलावानाची औरस संतती असावी, दत्तक घेतलेली नसावी. तिच्यासाठी जिवंत भावनाशीलता, उत्कटता, जिव्हाळा व आत्मीयता असावयास पाहिजे. शिवाय भावना स्पष्ट व स्वच्छ असाव्यात म्हणजे त्या दुसऱ्याच्या हृदयात थेट सहज प्रवेश करू शकतात. कलाकृती दुर्बोध, केवळ शब्दांनी नटवलेली नसावी, तिच्यात कृत्रिमता नसावी तर तिच्यात सळसळणारे असे जिवंत चैतन्य असायला पाहिजे. कलाकृतीत कलावानाचा

आत्मा प्रांजलपणे व्यक्त झाला तर तिच्यात जिवंतपणा येतो व ती रसरशीत बनते, असे गुरुजींना वाटत असे.

महापुरुषांनी सांगितलेले विचार व दाखविलेले मार्ग हे कलावंतांनी आपल्या प्रभावी कलाकृतींतून अज्ञानी, पीडित बहुजनसमाजापर्यंत सोप्या, सरळ आणि परिणामकारक कलाकृतींद्वारा पोहोचवावे असे गुरुजींना प्रामाणिकपणे वाटते व नेमके हेच कलावादी लेखकांना मान्य नव्हते व म्हणून त्याच मुद्यावर गुरुजींवर अनुदारपणे टीका केली गेली.

चरित्रपर पुस्तकांव्यतिरिक्त गुरुजींनी जी साहित्यनिर्मिती केली त्या सर्व पुस्तकांत त्यांच्या अंत:करणाचे प्रतिबिंब स्वच्छपणे पाहावयास मिळते. त्यांचे जीवन आणि साहित्य अवियोज्य आहेत. त्यांचे साहित्य हा त्यांच्या प्रत्यक्ष जीवनाचा आविष्कार आहे. त्यांचे साहित्य म्हणजे त्यांच्या जीवनाचा जणू सुगंध आहे. सानेगुरुजींच्या साहित्याविषयी आचार्य प्र. के. अत्रे यांनी लिहिले होते की सानेगुरुजी अनुभवांची उधारी-उसनवारी करून लिहिणारे नव्हते. ते जे करीत, जगत तेच लिहीत असत व जे लिहीत असत ते स्वत: करीत व जगत असत.

गुरुजींचे साहित्य एका अर्थाने आत्मनेपदी (Subjective) आहे. पाण्यात रंग, हवेत गंध तसे आपल्या साहित्यात गुरुजी सर्वत्र भरलेले, उपस्थित असलेले जाणवतात. सी.एम.जो या तत्त्वज्ञाने म्हटले आहे, The greatest writer is strictly personal. गुरुजींचे साहित्य त्यांचे आत्मदर्शन आहे. गुरुजी आत्मप्रामाण्यवादी आहेत. गुरुजींचे साहित्य रडके, दुबळे नाहीच. उलट ते आपल्या लेखनातून लोकांना सहृदय बनवीत असत. ते वाचकांना माणुसकीचा धर्म शिकवीत असत. ते लोकांच्या सद्‌भावना, आत्मविश्वास, स्वाभिमान, आत्मबल जागृत करत असत. त्यांची भाषणे व लेख फार जहाल व प्रखर असत. ते स्वत: लढाऊ, झुंजार वृत्तीचे होते. ते लोकमनात तेज, धैर्य, हिंमत व पुरुषार्थ जागृत करून त्यांना अन्यायाविरुद्ध उभे करत असत. गुरुजी स्वत: आत्मबलाने लढणारे सत्याग्रही योद्धे व क्रांतिकारक होते.

गुरुजींच्या 'पत्री' या काव्यसंग्रहात पुरुषार्थास, शौर्यास चेतवणाऱ्या, वीरश्रीने भरलेल्या अनेक कविता आहेत. त्यांपैकी काही कवितांची शीर्षके 'जा रे पुढे, व्हा रे पुढे', 'तुफान झालो', 'बलाची उपासना', 'प्रतिज्ञा', 'खरा हुतात्मा', 'नवयुवक' अशी आहेत. बाळासाहेब भारदे गुरुजींच्या साहित्याचे वर्णन 'पाचवा वेद' या शब्दांत करतात. आचार्य अत्रे यांनी परखड शब्दांत त्यावेळच्या मराठी साहित्यिकांविषयी लिहिले होते —

'गेल्या १६-१७ वर्षांत गुरुजींनी केवढे प्रचंड वाङ्मय निर्माण केले. कोणत्याही समकालीन लेखकापेक्षा गुणांनी आणि संख्येने त्यांचे साहित्य श्रेष्ठच ठरेल. साहित्यभक्त मात्र मख्खासारखे इतकी वर्षे त्यांच्याकडे पाठ फिरवून बसले होते. त्यांच्या वाङ्मयाचे समीक्षण करण्याचा कोणाही प्रथितयश साहित्यिकाने प्रयत्न केला नाही. साहित्यविषयक सभांत आणि संमेलनामध्ये त्यांना कुठेही मानवंदना मिळाली नाही...'

गुरुजींनी आयुष्यभर खूप कष्ट केले, तुरुंगवास भोगले, तन-मन-धनाने झिजले आणि शेवटी थकल्यानंतर त्यांनी स्वत:च जगाचा निरोप घेण्याचा एकट्याने निर्णय घेतला. त्यांनी स्वत:च्या जीवनाचा अंत केला व या जगातून प्रयाण केले, त्याची काही लोक उपहासाने व

कुत्सितपणे 'आत्महत्या' अशा शब्दात चेष्टा करतात. पण गुरुजींचे मरण हे त्यांनी स्वत:च आपले निर्वाण करण्यासाठी स्वेच्छेने पत्करले असल्याने त्यात एक प्रकारचे वेगळेपण, भव्यता आणि वैशिष्ट्य होते. त्यांच्या मृत्यूचे वर्णन आचार्य अत्रे यांनी 'मृत्यूचे चुंबन घेणारा महाकवी' अशा शब्दांत केले होते. गुरुजींनी स्वत:च आपला अंत कोणत्या कारणास्तव केला असावा हेही कोणालाही माहीत नव्हते व ते कधीही समजणारेही नाही. पण झोपेच्या बऱ्याच गोळ्या एकदम घेऊन ते अनंतात विलीन झाले. कोणावर रागावून, रूसून, त्रागा वगैरे करून त्यांनी जगाचा निरोप घेतला नाही. त्यांच्या मृत्यूसमयी त्यांचे वय ५१ वर्षांचे होते. आता आपल्याला काही करण्यासारखे उरले नाही, देशाला स्वातंत्र्य मिळाले, त्यासाठी जे जे व जेवढे करता येण्यासारखे होते ते आपल्याकडून झाले, 'भारतीय संस्कृती' सारखा ग्रंथ लिहून प्रसिद्ध झाला. बालकांसाठी गोड गोष्टींची अनेक पुस्तके लिहिली. सुमारे ४०० पेक्षा अधिक कविता लिहिल्या हे एक समाधान त्यांना वाटले असेलच. पण स्वातंत्र्यानंतर मात्र सामाजिक जीवनात ज्या घटना घडत गेल्या त्या त्यांना निराशाजनक वाटत होत्या. भाषावार प्रांतरचनेमुळे भारतातील विविध भाषिक लोकांत व प्रांतांत दुरावा येत गेला. म्हणून त्यावर उपाय म्हणून त्यांनी 'विश्वभारती' सारखी 'आंतरभारती'ची स्थापना केली. देशाची अखंडता व एकता कशी टिकेल याची त्यांना काळजी वाटत होती. त्यासाठी १९४८ साली त्यांनी 'साधना' साप्ताहिक सुरू केले. पंढरपूरचा विठोबा अस्पृश्यांसाठी मुक्त व्हावा म्हणून प्राण पणाला लावले. पण त्यांच्या भावनाशील मनाला मानसिक चिंता व तणाव सहन होणे कठीण होत गेले. म्हणून त्यांनी मृत्यूला आवाहन केले. १९३२ साली धुळ्याच्या तुरुंगात असताना त्यांनी 'मी केवळ मरुनी जावे' अशी एक कविता लिहिली होती. परंतु एकूण त्यांना मृत्यूचे आकर्षण जन्मभर वाटत होते असे दिसते. त्यांनी मरणाच्या वेळी व्यवस्थित कपडे केले होते व ते शांतपणे झोपी गेले. त्यांच्या मृत्यूचे वर्णन मी 'निद्रा समाधी' या शब्दांत करतो. त्यांनी जणू निद्रेच्या द्वारा समाधीच घेतली व शांतपणे स्वत:ची जीवनज्योत विझवली.

गुरुजींचा जीवनकाल २४ डिसेंबर १८९८ ते ११ जून १९५० एवढा होता. मृत्यूची भीषणता वाटू नये म्हणून 'भारतीय संस्कृती' या आपल्या पुस्तकात 'मृत्यूचे काव्य' या शीर्षकाचे एक प्रकरण त्यांनी लिहिले आहे. त्यात त्यांनी कबीराचा मृत्यूविषयी एक दोहा उद्धृत केला आहे, तो असा :

कर ले शृंगार चतुर अलबेली
साजन के घर जाना होगा ।
न्हाले धूले शीस गुथाले
फिर वहाँसे नहि आना होगा ॥
मिट्टि ओढावण मिट्टि बिछावन
मिट्टी में मिल जाना होगा
कर ले शृंगार चतुर अलबेली
साजन के घर जाना होगा ॥

अशाच अवस्थेत गुरुजीही प्रियकररूप मृत्यूकडे स्वेच्छेने निघून गेले असावेत. स्वतःच्या इच्छेने व स्वतःच जीवनाचा अंत करण्यासाठी लागणारे प्रचंड धैर्य व दृढ संकल्प गुरुजींपाशी असल्याशिवाय असे स्वेच्छामरण पत्करणे झाले नसते. म्हणून आचार्य अत्रे यांनी त्यांचे शेवटी केलेले 'मृत्यूचे चुंबन घेणारा महाकवी' हे वर्णन अत्यंत अर्थपूर्ण वाटते.

❑

डॉ. ग. ना. जोशी
'जीवनविहार', ३४, क्षिप्रा सहनिवास, कर्वेनगर, पुणे ४११ ०५२. फोन : ५४४ ०४७६

'मराठी'चा एक थोर 'इंग्रज' अभ्यासक : मेजर टॉमस कॅण्डी

❑

संभाजी ग. भोसले

❑

मराठी भाषेच्या विकासाची प्रक्रिया अविरत चालू आहे. मराठीवर होणाऱ्या इतर भाषांच्या आक्रमणाबद्दल, भाषाशुद्धतेविषयी परिसंवादातून, साहित्यसंमेलनातून सतत चिंता व्यक्त केली जाते. बोलीभाषेत व लिखित स्वरूपात आज आपण जी मराठी भाषा व्यवहारात वापरतो, तिला जुन्या काळात व्याकरणदृष्ट्या शुद्ध स्वरूपात वळण लावण्यासाठी सतत सुमारे पन्नास वर्षं अविरत मेहनत करणारी व्यक्ती एक इंग्रज सैन्याधिकारी होती, हे कित्येकांना माहितसुद्धा नसेल. महाराष्ट्रात पेशवाईची इतिश्री झाल्यानंतर इंग्रजी सत्तेची स्थापना झाली. ही सत्ता दृढमूल करायची असेल तर लोकशिक्षण हाच मार्ग आहे, याची जाणीव तत्कालीन मुंबईचा गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन याला झाली होती. स्वकीयांचा विरोध असूनही त्याने एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात शालेय वाङ्मय निर्माण व्हावे म्हणून प्रयत्न केले. युरोपातील ज्ञानाचा उपयोग एतद्देशियांना व्हावा म्हणून भाषांतरित पुस्तकांचा समावेश शालेय पुस्तकात करण्यात आला. या एलफिन्स्टनच्या प्रयत्नांबद्दल एकदा ले. ब्रिग्ज या लष्करी अधिकाऱ्याने त्याला विचारले, "येथील जनतेला शहाणे करून आपण एके दिवशी आपले राज्य गमावणार आहोत, असे तुम्हाला वाटत नाही का ?" यावर एलफिन्स्टनने उत्तर दिले, "काही काळानंतर हे सुशिक्षित लोक आपल्याला युरोपात परत जाण्याचा रस्ता दाखवतील, याची मला पूर्ण कल्पना आहे; परंतु राज्यकर्ते म्हणून कुठल्याही परिस्थितीत त्यांच्याविषयीच्या कर्तव्याला आपण बांधील आहोत." एलफिन्स्टन धूर्त, धोरणी, पण उदारमतवादी होता. महाराष्ट्रातील शिक्षणपद्धतीचा पाया घालण्याचे श्रेय त्याच्याकडे जाते.

पेशवाईच्या काळात पुण्यात दक्षिणापद्धती चालू होती. ती पेशवाईनंतर एकाएकी बंद करणे एलफिन्स्टनला योग्य वाटले नाही. काही काळ ही पद्धत चालू ठेवून त्यातील शिल्लक रकमेतून ६ ऑक्टोबर १८२१ मध्ये पुण्यात विश्रामबागवाड्यात हिंदू कॉलेज — पुणे पाठशाळेची स्थापना करण्यात आली. या पाठशाळेमागे मुख्य प्रेरणा एलफिन्स्टन व दक्षिण विभागाचा कमिशनर चॅपलीन यांची होती. येथे प्रथम धर्म, न्याय, ज्योतिष, व्याकरण इत्यादी दहा शाखांचा अभ्यास संस्कृतमधून होत असे. सुरुवातीला या पाठशाळेत शंभर विद्यार्थी होते. आधुनिक शास्त्रीय दृष्टिकोन आणण्याच्या दृष्टीने ही संस्था अपयशी झाल्यामुळे ती बंद करावी, असा विचार पुढे आला. मुंबईचे गव्हर्नर क्लेअर व ग्रँट यांनी असा अभिप्रायही सरकारकडे पाठवला; परंतु ही पाठशाळा सुरू करण्यामागील संस्थापकांचा उद्देश, उदात्त हेतू लक्षात घेऊन अशी संस्था बंद न करता त्यात आवश्यक ते फेरबदल करावेत, भाषांतरकार येथून तयार

व्हावेत असे शिक्षणतज्ज्ञांचे विचारांती मत बनून ही पाठशाळा चालू राहिली. याच 'पूना कॉलेज'चे पर्यवेक्षक म्हणून टॉमस कॅण्डी यांची नेमणूक झाली.

मेजर टॉमस कॅण्डी यांचा जन्म इंग्लंडमध्ये १३ डिसेंबर १८०४ मध्ये झाला. वयाच्या सोळाव्या वर्षी १८२० मध्ये लष्करी खात्यात ते व त्यांचा जुळा भाऊ जॉर्ज यांची भारतात नेमणूक झाली. इंग्लंडमध्ये ओरीएन्टल इन्स्टिट्यूटमध्ये भारतीय भाषेत कॅण्डीनी प्रावीण्य प्राप्त केले होते. मराठी भाषेची परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे त्यांची नेटिव्ह इन्फन्ट्रीत दुभाषी म्हणून नेमणूक झाली. परकीयांना मराठी भाषेची तोंडओळख होण्यासाठी मराठीतील कोशग्रंथाची आवश्यकता भासू लागली. मराठी-इंग्रजी कोशाचा कर्ता मोल्सवर्थ हाही लष्करात असल्यामुळे त्याच्या कॅण्डीशी परिचय झाला. १८२६ मध्ये मराठी-इंग्रजी कोशाच्या कामात त्याने कॅण्डीची मदत घेतली. दोघांनी मिळून मराठी-इंग्रजी आणि इंग्रजी-मराठी शब्दकोशांची निर्मिती केली. १८३१ मध्ये हे काम पूर्ण झाले. या कोशाच्या रचनेचे काम १८३२ ते १८३५ पर्यंत केले. याच्या रचनेत मराठी शास्त्रीपंडितांचेही साहाय्य घेण्यात आले. तरीही या कोशाचे श्रेय दोन्ही साहेबांना दिले पाहिजे. मराठी गद्याला मिळालेले महत्त्व हा या कालखंडातील विशेष आहे. या कोशाच्या कामाच्या वेळी टॉमस कॅण्डी यांचा मराठी भाषेशी आमरण संबंध आला. पुढे मोल्सवर्थ आजारी पडला व इंग्लंडला जाताना त्याने कोशाची कागदपत्रे सोबत नेली. या कोशाचे कामकाज अपूर्ण राहिल्यामुळे सरकारच्या विनंतीवरून १८४० मध्ये टॉमस कॅण्डी यांनी कोशाचे काम सुरू करून १८४७ मध्ये पूर्ण केले. या काळात पुणे पाठशाळेच्या पर्यवेक्षक पदावरून त्यांना तात्पुरते मुक्त करण्यात आले होते. १८४७ मध्ये पुन्हा त्यांची पाठशाळेचे भाषांतरकार व रेफरी म्हणून नेमणूक करण्यात आली. त्यांच्याच काळात १८५१ मध्ये पाठशाळा व इंग्रजी शाळा एकत्र केली गेली. याचे नामकरण 'न्यू पूना कॉलेज' केले गेले. एतद्देशीयाच्या धर्मभावना न दुखावण्याचे धोरण कॅण्डीनी ठेवले होते. पाठशाळेत बूट व चपला घालून येऊ नये, हा नियम त्यांनी शिक्षण खात्यातील मुख्य सेक्रेटरी वार्डन यांच्याशी वादविवाद करून कायम ठेवला. त्यांनी शास्त्रीमंडळाची स्थापना केली होती. संस्कृत, मराठी या भाषांविषयी यात चर्चा केली जाई. यामुळे विद्यार्थ्यांनी कॅण्डीना कॅण्डीशास्त्री असे नाव ठेवले होते.

कॅण्डीनी शिक्षणखात्यातर्फे मराठीतील प्रसिद्ध होणारी शालेय क्रमिक पुस्तके व इतर प्रसिद्ध होणारी पुस्तके तपासण्याचे व स्वतः क्रमिक पुस्तके लिहिण्याचे काम केले. शालेय विद्यार्थ्यांसाठी क्रमिक पुस्तके तयार करण्याची कल्पना कॅण्डीच्या मनात घोळत होती. त्यांनी अनेकांकडून धडे लिहून घेऊन पुस्तके तयार केली. मुलांकरिता चौथे पुस्तक तयार करताना या पुस्तकात चाळीस धडे स्वतः कॅण्डीनी लिहिले असून बाकी धडे अन्य लेखकांकडून लिहून घेतले आहेत. अशाप्रकारे १८५७ ते १८६१ या काळात मराठी क्रमिक पुस्तके लिहिली गेली. या बाबत 'बालबोध'कार लिहितात, ''ह्या कामाची सगळी सूत्रे मेजर कॅण्डी साहेबांनी आपल्या हाती ठेवली होती. इंग्रजी भाषेतील अनेक क्रमिक पुस्तके जमवली होती. त्यातल्या धड्यांची निवड कॅण्डी साहेबांनी करावयाची. त्यांची मराठी भाषांतरे मंडळीने करावयाची. ती साद्यंत

त्यांनी तपासवयाची. त्यातल्या भाषापद्धतीविषयी आणि परिज्ञानाविषयी शंकासमाधाने व्हावयाची आणि मग ती छापावयाची, असा क्रम असे. त्या मंडळींच्या सांगण्यात येत असे की, ही मराठी क्रमिक पुस्तके इंग्रजीतल्या क्रमिक पुस्तकांच्या नमुन्यावर तयार व्हावी, अशी त्या साहेबांची फार इच्छा असे. त्यांनी कधी एकही वाक्य चालढकलीवर नेले नाही. शब्दशुद्धीकरण आणि अर्थस्पष्टतेवर त्यांचा फार कटाक्ष असे (बालबोध, पु. ३०, १९११, पृ. २४४).'' कॅण्डीनी इंडियन पिनल कोड व शिक्षणखात्याच्या नियमांचे मराठीत भाषांतर केले. प्राचीन गद्य वाङ्मयात विरामचिन्हांचा वापर होत नव्हता. चरण (।) किवा विसर्ग (:) हीच चिन्हे वापरात होती. इंग्रजी आमदानीच्या सुरुवातीस गद्य वाङ्मयात विरामचिन्हांचा वापर आढळत नाही. उदाहरणार्थ, 'पंचोपाख्यान' (१८२२), 'विदूरनीति' (१८२३), 'सिंहासन बत्तिशी' (१८२४) या सुरुवातीच्या काळात प्रसिद्ध झालेल्या ग्रंथात विरामचिन्हांचा उपयोग केलेला आढळत नाही. मेजर कॅण्डीनी ह्या चिन्हांचा वापर कटाक्षाने मराठी भाषेत केला जावा, म्हणून प्रयत्न केले. विरामचिन्हे, उद्गारवाचक चिन्हे, पूर्णविराम इ. मराठीतील चिन्हे म्हणजे कॅण्डीनी मराठी भाषेला दिलेली देणगी होय. त्यांनी १८५० मध्ये 'विरामचिन्हांची परिभाषा' हे पुस्तक लिहिले. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत ते म्हणतात, ''मराठी भाषेतील ग्रंथात विरामचिन्हे घालण्याची चाल मागे नव्हती; परंतु युरोपखंडातील इंग्लिश वगैरे भाषांमध्ये ह्या चिन्हांपासून बहुत उपयोग होतो, हे पाहून मराठी भाषेतही ही चिन्हे घालण्याची चाल पडावी, अशी इच्छा अलीकडे बहुतांश झाली आहे. म्हणून इंग्लिश भाषेतील जी चिन्हे मराठी भाषेत घ्यावयाजोगी आहेत, ती घेऊन त्यांचे ज्ञान सर्व लोकांस व्हावे, या हेतूने ही परिभाषा केली आहे.'' ('ज्ञानोदय', १५ ऑगस्ट, १८५०). कॅण्डीने शालेय अभ्यासक्रमाची केलेली जडणघडण आजही कायम आहे. तत्कालीन एतद्देशीय शिक्षणतज्ज्ञांना मार्गदर्शन करण्याचे काम त्यांनी केले. शालेय विद्यार्थ्यांच्या बुद्धीला पेलवेल असा अभ्यासक्रमाचा आराखडा त्यांनी शिक्षणखात्याला दिला. मराठी व संस्कृत तज्ज्ञांच्या मदतीने शास्त्रीमंडळाची स्थापना केली. या मंडळात भाषेच्या जडणघडणीविषयी व व्याकरणावर चर्चा केली जाई. कॅण्डी स्वतः मराठीतील अधिकारी पंडित होते. माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टननंतर मराठी ग्रंथनिर्मितीची धुरा वाहण्याचे काम त्यांनी केले. आपल्या कार्यकालामध्ये त्यांनी चांगल्या भाषांतरकारांची मालिका निर्माण केली. या पदासाठी निवड होऊन कॅण्डीना चांगले मदतनीस मिळाले. भाषांतरकारांनी केलेली भाषांतरे कॅण्डी बारकाईने तपासत. त्यांच्या संमतीविना पुस्तक छापले जात नसे. ते या काळात कुणाचीही भीडभाड ठेवत नसत. बाळशास्त्री जांभेकर, कृष्णशास्त्री चिपळूणकर, तर्खडकर इत्यादी लेखकांच्या लेखनातील चुकाही त्यांनी टिपलेल्या आढळतात; परंतु लेखकांना सतत प्रोत्साहन देण्याचे काम कॅण्डी नेहमीच करीत.

तत्कालीन लेखक वि. कों. ओक 'बालबोध'मधील एका लेखात म्हणतात, ''ते अनुस्वार, विसर्गापर्यंत बारीक पाहात असत. तरी त्यामध्ये त्यांचे एक मोठे धोरण हे असे की, कोणाही लेखकाची हिम्मत खचू द्यायची नाही. चुका दाखवायच्या, ग्रंथ शुद्ध करावयाचा आणि त्या रीतीने त्या सुधारण्यास ग्रंथकारांना सुचवायचे. ते इतके जपून करावयाचे की, पुस्तक वाईट

असे सहसा म्हणावयाचे नाही (बालबोध पु. ३०, अंक ११)." कॅण्डीच्या धोरणामुळे अनेक विद्वानांना ग्रंथनिर्मितीची प्रेरणा मिळाली. 'नवनीत'कार परशुरामपंततात्या गोडबोले कॅण्डीच्याच तालमीत तयार झाले व त्यांनी कॅण्डीची मर्जी संपादन केली. 'नवनीत' मराठीतील निवडक उत्कृष्ट वाङ्मयाचा मुकुटमणी होते. या काळात नवे ग्रंथकार व ग्रंथनिर्मितीची लाटच पसरली. विनायक कोंडदेव ओकांसारखे लेखक लिहितात, "मला मराठी लिहिण्यास मेजर कॅण्डीसाहेबांनी शिकवले. चांगल्या गुरूने आपल्या विद्यार्थ्यास जसे आस्थेने शिकवावे, त्याचा हात धरून त्यास सुमार्गास लावावे, त्याप्रमाणे कॅण्डीसाहेबांनी मला मराठी लिहिण्याच्या मार्गास लाविले. हे त्यांचे उपकार मी यावज्जीव आठवीन." लक्ष्मणशास्त्री चिपळूणकरांनी कॅण्डीना महाराष्ट्र-गुरू म्हटले आहे.

न्यू पूना कॉलेजचे प्राचार्य व मराठी भाषांतरकार म्हणून कॅण्डीनी १८५६ पर्यंत काम केले. १८५६ मध्ये ते इंग्लंडला गेले. १८५७ मध्ये ते परत आल्यावर पूना कॉलेजच्या वार्षिक तपासणीत कॉलेजमध्ये गैरशिस्त व गैरकारभाराबाबत योग्य लक्ष न दिल्याबद्दल सरकारी तपासनीस काऊपर यांनी आपल्या अहवालात मेजर कॅण्डीवर ठपका ठेवला व सहाय्यक प्राध्यापक कृष्णशास्त्री चिपळूणकर यांना कॉलेजमधून चार महिन्यांकरिता निलंबित करण्यात आले. या प्रकरणामुळे कॅण्डीना खूप मन:स्ताप सहन करावा लागला. त्यांचे वेतन ६०० रुपयांवरून दोनशे सदुसष्ट रुपये करण्यात आले. स्वत: कॅण्डी शिस्तप्रिय व कडक होते. तरीही या प्रकरणाची नैतिक जबाबदारी त्यांना स्वीकारावी लागली. सरकारने त्यांची बाजू ऐकून न घेता त्यांना प्राचार्यपदावरून दूर करून फक्त भाषांतरकाराचे काम दिले. या काळात त्यांना आर्थिक हलाखीत दिवस कंठावे लागले. १८६३ मध्ये कॅण्डीच्या विनंती अर्जाचा विचार होऊन त्यांना Classified Recorder म्हणून तीनशे रुपये वेतनावर नेमण्यात आले. १८६५ मध्ये त्यांनी केलेल्या क्रमिक पुस्तकांच्या कार्याबद्दल त्यांना तीन हजार रुपये बक्षिस देण्यात आले. कॅण्डीनी या पदावर १८७३ पर्यंत काम केले.

व्याकरणाच्या बाबतीत कॅण्डी पुस्तकांची तपासणी अत्यंत काटेकोरपणे करीत. कधीकधी त्यांचा हा स्वभाव लेखकांना जाचक होई. त्यामुळे त्यांच्या एकाधिकारशाहीच्या विरोधात भाऊ महाजन 'प्रभाकर'मधून आवाज उठवीत. या सर्व आक्षेपांना कॅण्डी विनम्रपणे 'ज्ञानोदया'तून उत्तरे देत.

एकोणिसाव्या शतकात इतिहास, भूगोल, पदार्थविज्ञान, अर्थशास्त्र, यंत्रविज्ञान, भाषा इत्यादी विषयांवर ग्रंथनिर्मिती झाली. शिक्षणखात्याच्या प्रमुख भाषांतरकारपदी मेजर कॅण्डी असल्याने ही सर्व पुस्तके त्यांच्या नजरेखालून बारकाईने गेली होती. त्यांचा मराठी भाषेचा व व्याकरणाचा सखोल अभ्यास होता. त्याच्या जोरावर त्यांनी मराठी भाषेच्या घटनेत महत्त्वाचे फेरबदल घडवून आणले. बहुतांश तेच अद्यापही मराठीत कायम आहेत. पुस्तके तपासण्याव्यतिरिक्त त्यांनी उपयुक्त इंग्रजी पुस्तकांचे मराठीत भाषांतर केले, करवून घेतले. भाषांतर करताना व्याकरण-शुद्ध मराठीत मूळ आशय कसा आणावा, शब्दश: भाषांतर कसे टाळावे, परकीय भाषेतील शब्द मराठीत कसे लिहावेत, अनोळखी शब्दांबाबत टीपा कुठे व

कशा द्याव्यात, शास्त्रीय शब्दांना पारिभाषिक शब्द कसे तयार करावेत, याविषयी सूचना त्यांनी 'Hints for the guidance of translators' या लेखात दिलेल्या आहेत. शिक्षणखात्यातील व इतर अनेक खाजगी संस्थांशी ते निगडित होते. मराठी वाक्यरचना सुटसुटीत करून मराठी भाषेला त्यांनी बंदिस्तपणा आणला. व्यावहारिक माहितीपर भाषा शाळांमधून शिकवण्यावर त्यांचा भर होता.

मेजर कॅण्डी धार्मिक प्रवृत्तीचे होते. त्यानी ख्रिस्ती धर्मसंदर्भातील काही पुस्तकेही लिहिली. अधू दृष्टीमुळे त्यानी २१ ऑगस्ट, १८७६ मध्ये सरकारकडे राजीनामा दिला. २६ फेब्रुवारी, १८७७ मध्ये महाबळेश्वर येथे या थोर मराठी पंडिताचे देहावसान झाले. पन्नास वर्षे अविरत मराठीची सेवा करणाऱ्या मेजर कॅण्डीचे ऋण मराठी सारस्वताने मान्य करायलाच हवे.

संदर्भ सूची

१. मराठी वाङ्मयाचा इतिहास
खंड ४ था : संपादक - प्रा. रा. श्री. जोग, म. सा. प., १९६५
२. बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर यांचे जीवनवृत्त व लेखसंग्रह
३. मराठी ग्रंथनिर्मितीची वाटचाल : शं. गो. तुळपुळे, १९७४
४. आधुनिक मराठी गद्याची उत्क्रांती : डॉ. कृ. भि. कुलकर्णी, १९५६

❑

संभाजी ग. भोसले
१४८०, सदाशिव पेठ, टिळक रोड, एस. पी. कॉलेज पोस्टासमोर, पुणे ४११ ०३०.
दूरध्वनी : ४४९४४९९

स्वागत

वसंत डोह : देविदास फुलारी, इसाप प्रकाशन, नांदेड, पृष्ठे ५६.
गीत शिवायन : दि. आ. कुलकर्णी, अमराळे प्रकाशन, पुणे, पृष्ठे ४८.
मन पाखरु पाखरु : निर्मल कुमार फडकुले, सुविद्या प्रकाशन, सोलापूर, पृष्ठे १५०.
शब्द भेटण्याच्या वयात : राजेंद्र दास, सुविद्या प्रकाशन, सोलापूर, पृष्ठे १०८.
ऋणवेध : अनुराधा फाटक, मनोदय प्रकाशन, पुणे, पृष्ठ ९४.
कायापालट : मंदा नाईक, साधिक प्रकाशन, पुणे ८०.
गार्गी : मधु जामकर, विद्याभारती प्रकाशन, लातुर, पृष्ठे ४८.
तळठाव घेताना : प्रमोद कोपर्डे, नीळकंठ प्रकाशन, पुणे, पृष्ठे १४०.
साहित्य कौस्तुभ : नंदकुमार रोपळेकर, वसंत बुक स्टॉल प्रकाशन, मुंबई, पृष्ठे २०८.
आयुष्य नावाचं महाकाव्य : बाळ राणे, वंदना प्रकाशन, मुबंई, पृष्ठे ११४.
झंकार : श्यामकांत कुलकर्णी, अद्वैत प्रकाशन, नागपूर, पृष्ठे ८४.
कोण? : जयंत धुपकर, प्रकाशक - मोहन जोहारी, पुणे; पृष्ठे १५८.
फणसाखालचं घर : चंद्रकुमार नलगे, राजकिरण प्रकाशन, इस्लामपूर, पृष्ठे २१६.

अनुक्रमणिका

आदिवासी साहित्यातील देवदेवतांचे स्थान

❑

प्रा. डी. जी. पाटील

❑

प्राचीन काळापासून माणसाच्या मनात देवदेवतांची संकल्पना दृढ झालेली आहे. मनुष्य मग तो जगाच्या कोणत्याही भागात राहणारा असो, तसेच तो मागासलेला असो वा पुढारलेला असो; त्याच्या मनात देवदेवतांविषयी संकल्पनेचा घट्ट पगडा बसलेला आढळतो. देवाविषयीचा हा घट्ट पगडा का व कसा आढळतो याचा विचार केला तर असे आढळते की, मनुष्य ज्या निसर्गात किंवा पर्यावरणात वावरत असतो त्यातील काही घडणाऱ्या घटना त्याच्या आवाक्या-बाहेरच्या किंवा कुवतीबाहेरच्या असतात. त्या पाहून तेथे तो स्वत:ला दुर्बल समजतो. त्यामुळे आपल्या कुवतीची किंवा दुर्वलतेची त्याला जाणीव होते. या धरतीचा किंवा निसर्गाचा कुणीतरी कर्ताधर्ता आहे. तो आपल्यापेक्षा श्रेष्ठ असतो. त्याच्यामुळेच किंवा त्याच्या देखरेखीखालीच निसर्गात अनेक घडामोडी घडत असतात. अशा घडामोडींवर त्याचे नियंत्रण असते, आपले जीवन हे त्याच्या नियंत्रणाखालीच चालते, आपल्या चांगल्या-वाईट कार्यावर त्याची सतत नजर असते, अशी जेव्हा माणसाची खात्री पटते त्यावेळी त्याच्या मनात देवाची संकल्पना पक्की बसते आणि तो देवाला भजू लागलो, पुजू लागतो.

आपण चांगले कृत्य केले तर देव आपल्यावर प्रसन्न होतो, वाईट कृत्य केले तर आपल्यावर कोप होतो अशी जेव्हा जेव्हा त्याची खात्री पटते तेव्हा तेव्हा माणसावर काही विशिष्ट अरिष्टे किंवा संकटे कोसळतात, त्या वेळी तो देवास संतुष्ट करण्यासाठी आटोकाट प्रयत्न करीत असतो. त्यासाठी देवाचा पूजाविधी करून देवास नैवेद्य अर्पण करून देवास प्रसन्न करण्याचा प्रयत्न करतो. तो ज्या पर्यावरणात रहातो, त्या पर्यावरणातील घडणाऱ्या घटनांचा त्याच्या जीवन जगण्याच्या पद्धतीवर हमखास परिणाम होत असतो. अशा पर्यावरणातील विशिष्ट घटकांचा उदा. ऊन, वारा, पाऊस, नदी, नाले, डोंगर, हिंस्त्र पशुपक्षी, झाडं-झुडपांपासून ते मोठमोठे वृक्ष, दुष्काळ, प्रलय, महापूर आदींचा प्रभाव त्याच्या जीवनपद्धतीवर होत असतो. त्या सर्वांच्या प्रभावामुळेच वरील घटकांना देवदेवता मानून निरनिराळ्या देवदेवतांची त्याच्या मनात संकल्पना निर्माण होतात व अस्तित्वात येतात. मानव सपाट मैदानी प्रदेशात राहणारा असो, सागरकिनारी राहणारा असो किंवा दऱ्याखोऱ्यांत वा जंगलात राहणारा असो, तेथील उपलब्ध साधन-सामुग्रीचा वापर आपापल्या देवदेवतांच्या पूजाविधीत तो करीत असतो. सपाट मैदानी प्रदेशात राहणारे मानवी समूह गोडधोड पदार्थांचा वापर देवाला नैवेद्य म्हणून करतो. सागरी किनाऱ्यावरील मानवी समूह नैवेद्य म्हणून भात-माशांचा वापर करतो. तर जंगल किंवा डोंगरदऱ्यांच्या भागात राहणारा मानवी समूह देवाला नैवेद्य अर्पण करण्यासाठी

तेथील पशुपक्षी, दारू आदी वस्तूंचा वापर करीत असतो. तेथे ऊसच पिकत नसल्यामुळे गोडधोड पदार्थांचा वापर त्याच्या पूजाविधीत नसतो. हळद, कुंकू, शेंदूर, अगरबत्ती आदी वस्तूंचा वापर मात्र भारतात पूजाविधीसाठी सर्व मानवीसमूहात होत असतो.

वरील विवेचन करण्याचे कारण असे की, आदिवासींमध्ये ज्या निरनिराळ्या देवदेवतांना तो भजत असतो, पूजत असतो, त्याचा पूजाविधी सपाट मैदानी प्रदेशातील मानवी समुदायापेक्षा अलग आढळतो. असा पूजाविधी तो राहत असलेल्या पर्यावरणाशी जवळचे नाते दाखवतो. ही पूजाविधीची पद्धत तो राहत असलेल्या पर्यावरणालाच अनुसरून असते. म्हणून ती सर्वस्वी आगळीवेगळी वैशिष्ट्यपूर्ण असते.

आदिवासी पावरा लोक महाराष्ट्रातील सातपुड्याच्या परिसरात, सातपुड्याच्या पायथ्याशी राहतात. तसेच त्यांचे भाईबंधू सातपुडालगतच्या मध्यप्रदेशात आणि गुजरातमधील विंध्य प्रदेशातील डोंगराळ भागात व जंगलात राहतात. त्यांच्या देवदेवता, देवदेवतांची पूजाविधी करणारा पुजारी हे जवळजवळ सारखेच असतात. प्रस्तुत लेखकाने वरील प्रदेशात फिरून त्यांच्या देवदेवतांची पूजाविधीची पद्धत अगदी जवळून पाहिलेली आहे. त्यातून आदिवासी मौखिक पावरा साहित्यात देवदेवतांचे स्थान व स्वरूप कसे असते हा सदर लेखाचा उद्देश आहे.

आदिवासी पावरा ज्या सातपुड्याच्या परिसरात राहतात आणि वर उल्लेखलेल्या प्रदेशात राहतात त्यांच्यासोबत भिल्ल आदिवासी राहतात. त्यांच्याही देवदेवतांच्या संकल्पनेचा परिणाम आदिवासी पावरांच्या देवदेवतांच्या संकल्पना आणि पूजाविधीत आढळतो. आदिवासी पावरा लोकांशी चर्चा करताना, तसेच त्यांच्या मौखिक साहित्यातील कहाण्या, लोकगीतं, शिवाय त्यांच्या सणावारी होणाऱ्या पूजाविधीतून आदिवासी पावरा लोकांच्या देवदेवतांची माहिती मिळते.

आदिवासी पावरा लोकांच्या देवदेवतांचा सखोल अभ्यास करताना असे आढळते की, त्यांच्या झोपडीतच गिरहूण या त्यांच्या कूलदेवतेची स्थापना केलेली असते. मंगलप्रसंगी तिचा पूजाविधी होत असतो. तसेच बापदेव किंवा वाघदेव, इंदल आदी देवदेवतांचा पूजाविधी ऋतुमानानुसार होत असतो. या देवदेवतांचा पूजाविधी कसा, कोणत्या प्रसंगी, केव्हा होतो ते आता पाहू.

या देवदेवतांमध्ये सभोवतालच्या डोंगरदऱ्यांत आढळणाऱ्या देवदेवता, शेतीशी संबंधित देवदेवता, सणवारप्रसंगी पूजल्या जाणाऱ्या देवदेवता, लोककथांमधील देवदेवता अशा निरनिराळ्या देवदेवतांना ते भजत असतात, पूजत असतात.

पूजाविधीप्रसंगी कोव म्हणजे जगाचा देव, या देवाचे स्मरण केले जाते. तसेच धरतीची निर्माती विरदाती या देवीचेही स्मरण केले जाते.

सणवार प्रसंगी काही देवदेवतांचा पूजाविधी होतो. बापदेव किंवा वाघदेव, इंदल किंवा इंदौल, बिलपी हिव्वार देव, होलका, बिलटदेव, इडोवदेव, दहरू; दिवाळी, पोळा या प्रसंगी वरील देवदेवतांचा पूजाविधी होतो. मंगलप्रसंगी लोकगीतंही गायली जातात. उदा. इंदल.

इंदल : घरात धनधान्याची समृद्धता आली, तसेच मूल होत नसल्यास या देवास नवस करतात. मूल झाल्यावर इंदलचा उत्सव साजरा करतात. हा सुखसमृद्धीचा व बरकतीचा देव आहे असे मानले जाते. त्या प्रसंगी रात्रभर इंदल देवाची पूजा होत असताना आबालवृद्ध ढोलाच्या तालावर रात्रभर नाचत असतात. तेव्हा ते खालील प्रकारचे गीत म्हणतात.

इंदिराजा चौरेमा बोढयो, इंदिराजा बांदोडे बोयेओ,
इंदिराजा लिंबोवा मेल्यो, इंदिराजा बांदोडे बोयेओ,
इंदिराजा लूगडोमे गुवयो, इंदिराजा बांदोडे बोयेओ,
इंदिराजा कूकडाने भुक्यो, इंदिराजा बांदोडे बोयेओ,
इंदिराजा बुकडाने भुक्यो, इंदिराजा बांदोडे बोयेओ

अर्थात, इंदिराजा अंगावर धोतर टाकून अंगणात चौरंगावर बसलेला आहे. इंदिराजाला नारळ, लिंबू अर्पण करा. इंदिराजा कोंबडा व बकऱ्याचा भुकेला आहे.

तसेच सणवार प्रसंगीचीही गीतं म्हटली जातात. दिवावी (दिवाळी), ऊली (होळी) या दोन सणांविषयी अरण्याईला व लोकगीते मौखिक पावरा साहित्यात प्रचलित आहेत. दिवाळी व होळी या दोघी बहिणी आहेत. त्या पृथ्वीवर कशा अवतरल्या त्या संदर्भातील गीत पाहू.

ऊलीन दिवावी बायी आवी बाय
मने विचारे वाले
दिवावी अथमाय कूड्या सेताहा बाय
अली आथमा ताला
बर हियाले दिवावी आवेहे बाय
बर ऊनाले ऊली

याचा अर्थ दिवाळी हिवाळ्यात पृथ्वीवर अवतरते तर उन्हाळ्यात होळी पृथ्वीवर अवतरते.

आदिवासींचा सगळ्यांत मोठा सण 'होळी' हा असतो. होळीमाता आपल्या मनोकामना पूर्ण करते. तिच्या कृपेने घराला बरकत असते, सगळे सुखी असतात, असे या होळी देवीचे गीत —

बावाने बुध्या तियारी करे ऊली बाय
गराह खाती जाहे
भोंगऱ्या मेलादा लेती आवी ऊलीबाय
गुलदाल्या लेती आवी
बारा मयनामा आवली ऊली बाय
सुखने दुखे लेती जाहे.

अर्थात, होळी सणासाठी बावा, बुध्या तयारी करतात. होळीबाई नैवेद्य खाते. भोंगऱ्या मेलदा होळीबाई घेवून आली. डाळ्या व गुळ घेवून आली. बारा महिन्यांतून होळीमाय येते, सुख घेऊन येते आणि दु:ख घेऊन जाते.

त्यांच्या सणांमध्ये 'नवाय' हा सणही येतो. त्यात पूर्वजांची आठवण करून श्राद्ध घातले

जाते. तर शेतातून निघणाऱ्या नवीन धनधान्याचा पूजाविधी होत असतो.

शेतीशी संबंधित देवदेवता : शेतीशी संबंधित अनेक देवदेवतांचा पूजाविधी होत असतो. त्यात 'खेतरपाऊ' हा शेतीचा संरक्षक देव. शेताच्या कोपऱ्यात तीन दगड मांडून या देवाची पूजा होते. शेतात धान्य पेरण्याप्रसंगी शेती-अवजारांची पूजा होते. त्याला 'ओलपूजणूं' म्हणतात. शेतात मळा वाढल्यावर डूडामूकायचा पूजाविधी होतो. ज्याच्या साहाय्याने शेती केली जाते त्या खांदीराजाची म्हणजे बैलाची पूजा पोळ्याच्या वेळी होत असते. शेतातल्या अन्नधान्याची मळणी ज्या खळ्यातून होते त्या खोवोदेवाची म्हणजे खळ्याच्या देवाचा पूजाविधी होतो. करहणफूवर ही अन्नधान्याची देवता घरात अन्नधान्य आल्यावर या देवतेचा पूजाविधी होतो.

दरीखोरी व आकाशातील देवं : डोंगरदऱ्यातील उंच जागी डूंगऱ्या देवाची स्थापना केलेली असते. दऱ्याखोऱ्यांत वाहणाऱ्या वाऱ्यार (खाटी वाह्याने) वायुदेवता समजले जाते. त्यास वाहत्या बामण असेही म्हणतात. तसेच पाडे/खेडे यांच्या वेशीवर, शिवेवर, गोवीदेव, शिवारदेव (हिव्वार देव), वाघदेव, आयखेडा यांची स्थापना केलेली असते. पावसाळ्याच्या वेळी वीज चमकते तिला 'बिजला कूवर' असे संबोधले जाते. आकाशात चमकणारा ध्रुवतारा त्याला 'मेंढ्योतारो' म्हणतात. आकाशातील चंद्रसूर्य यांना 'चांदहुरेज' या देवतेचे स्वरूप दिले आहे. मोठ्या नद्यांना 'दऱ्या' म्हणतात. 'दऱ्या' हा सागर या अर्थी शब्द जरी असला तरी दऱ्या हा शब्द ऊर्दूतून आला आहे. ऊर्दूत दऱ्या मोठ्या नद्यांना म्हणतात. वरील सर्वांना पवित्र मानले जाते.

याशिवाय लोककथेत देवांशी संबंधित कहाण्या व गीतं आदिवासी पावरा बोलीभाषेत प्रचलित आहेत. त्यात राजा फानरा, गांडा ठाकूर, रूपान देवी, रुणजू देव, पांढरमाता, आयखेडा, राणी काजल, कूंभायराणा, मेघूराणा, चोहूराणा, सोहूराणा आदी पवित्र देवदेवता आणि पवित्र माणसांच्या कहाण्या व लोकगीतं प्रचलित आहेत. उदा. राणी काजल.

राणी काजलची सातपुड्याच्या परिसरात काही विशिष्ट स्थानकं आहेत. पावरा लोक त्यांना पवित्र मानतात. या राणी काजलविषयीच्या कहाण्या, गीतं पावरी बोली भाषेत प्रचलित आहेत. वानगीदाखल एका गीताच्या काही पंक्ती पाहू.

चांद हूरेज मागणी, केन्या राणी लाजले
राजा वियाव वाणान तियारी
दादा चांद हूरेज राजा केन्या राणीन मागणी
दादा चांद हूरेज राजा वाजा गुजा हादला

अर्थात चांद हूरेज म्हणजे चंद्रसूर्याने राणी काजलच्या बापाजवळ तिच्या लग्नाची मागणी घातली. राजा राणी काजलच्या लग्नाची तयारी करू लागला. त्याने वाजंत्र्यांना बोलावणे पाठवले.

आदिवासी पावरांच्या देवदेवतांमध्ये आदिवासी भिल्लांच्या काही देवदेवतांचा समावेश होतो. कारण त्यांच्या शेजारी आदिवासी भिल्ल राहतात. एकमेकांच्या सानिध्यामुळे आदिवासी

भिल्लांचेही देवदेवता ते भजू लागले आहेत. उदा. देवमोगरा येथील यहामोगी देवीची पूजा ते करतात व यात्रेला जातात. तसेच राजा फानरा व गांडा ठाकूर, पांढरमाता, रूपलादेवी यांनाही ते पवित्र मानतात. तोरणमाळ येथील महादेव, मच्छिंद्रनाथ आदींचीही पूजा करतात. याप्रकारे आदिवासी पावरा साहित्यातही या देवदेवतांचा उल्लेख येतो.

आदिवासी पावरांच्या जीवनात देवदेवतांचे महत्त्व किंवा देवदेवतांचे स्थान महत्त्वाचे असते. इतकेच नव्हे तर या देवदेवतांनी त्यांच्या जीवनाचे भावविश्व व्यापले आहे. या देवदेवतांचा पूजाविधी त्यांना संतुष्ट करून ते आपला जीवनक्रम आक्रमीत असतात. त्यांच्या रोजच्या संसारात या देवदेवतांची आठवण ठेवून आपल्या संसाराचा गाडा ते हाकीत असतात. जातपंचायतीत भांडण-तंट्याच्या प्रसंगी न्यायनिवाडा करताना काही विशिष्ट देवदेवतांचे स्मरण केले जाते.

त्यांचे देव घर, पाडे, गावशिव, डोंगरदऱ्या, आकाश अशा निरनिराळ्या सर्व ठिकाणी आढळतात. ऋतुमानानुसार सणवार प्रसंगी त्यांची यथासांग पूजाविधी पुजाऱ्यामार्फत होत असते.

याप्रकारे आदिवासींचे भावविश्व व्यापून असलेल्या पवित्र देवदेवतांभोवती खास वलय असते आणि या वलयांमुळेच त्यातून लोककथा, लोकगीतं यांची निर्मिती होत असते. लग्नप्रसंगी, सणवारप्रसंगी किंवा इतर मंगलप्रसंगी अशा देवदेवतांची स्तुतिपर लोकगीतं गायली जातात आणि त्यांच्या कहाण्या सांगितल्या जातात. या प्रकारे आदिवासी पावरांच्या लोकसाहित्यात देवदेवतांचे स्थान अढळ आणि अटळ असते.

(या बाबतीत विशेष संदर्भ म्हणून सदरहू लेखकाची 'पावरा समाज व संस्कृती', 'आदिवासी पावरांच्या कथा', 'आदिवासी पावरांच्या देवकहाण्या' हे लेखन पाहावे.)

❑

प्रा. डी. जी. पाटील
१६, गणेशनगर, मोहिदा रोड, जि. नंदुरबार,
शहादा ४२५ ४०९.

स्वागत

तिन्हीसांजा : विलास वि. कुवळेकर, स्पंदन प्रकाशन, लांजा, पृष्ठे ८२.
पिंपळपान : बाबासाहेब भोंजाळ, पृथ्वीराज प्रकाशन, पुणे, पृष्ठे ४८.
क्षितिज : झुंजार सावंत, पिंपरी-चिंचवड साहित्य संस्कृती मंडळ, पृष्ठे ७२.
ऋतुरंग : झुंजार सावंत, पिंपरी-चिंचवड साहित्य संस्कृती मंडळ, पृष्ठे ९४.
तृतीय रत्न : संपा. दत्ता भगत, शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पृष्ठे १२८.
तुकारामाची काठी : पुरुषोत्तम पाटील, सुजय प्रकाशन, धुळे, पृष्ठे १९२.
प्रेमाचा शब्द : गोविंद कुलकर्णी, प्रतिभा प्रकाशन, औरंगाबाद, पृष्ठे ९६.
धारानृत्य : मंगेश पाडगावकर, मौज प्रकाशन, मुंबई, पृष्ठे ९०.

अनुक्रमणिका

हरवलेल्या दृष्टांतकथा

❑

प्रा. डॉ. यशवंत साधु

❑

संतांनी आपले अनुभव कथन करण्यासाठी विविध उपमा, दृष्टांत, रूपकें यांचे उपयोजन केले. विशेषत: तत्त्वनिरूपणासाठी संतांनी मार्मिक दृष्टांतांची व उपमांची योजना केली. आपले निरूपण रुचकर व मनोज्ञ व्हावे यासाठी संतांनी लोकव्यवहारात प्रचलित असलेल्या अनेक सामाजिक संदर्भांचा वापर केला. कधी कधी एखादी लोककथा आपल्या अभंगात गुंफून तुकोबा आपला आशय अधिक रुचकर करतात. उदा, 'वाघे उपदेशिला कोल्हा' या अभंगात वाघ आणि कोल्हा यांच्यातील संवादातून तुकोबांनी ठकाला महाठक भेटला म्हणजे कशी गंमत निर्माण होते हे दाखवून दिले आहे. किंवा 'परिसे गे सूनबाई' या अभंगात एका संसारासक्त सासूबाईचे जिवंत चित्र रेखाटून तुकोबांनी विनोदनिर्मिती केली आहे. संतांच्या साहित्यात केवळ रुक्ष तत्त्वनिरूपण नसते तर अनेक पौराणिक, सामाजिक, लौकिक कथासंदर्भ योजून ते निरूपण लोकांना समजेल, आवडेल अशा भाषेत संतांनी कथन केले आहे. परंतु हे कथा-संदर्भ नेहमीच स्पष्ट शब्दांत संतांच्या वाणीत नसतात. आज आपण 'ज्ञानेश्वरी', 'एकनाथी भागवत', 'विवेकसिंधू' इ. ग्रंथांचे अवलोकन करतो तेव्हा त्यातील ओवीच्या ढोबळ अर्थातून हे कथासंदर्भ मुळीच लक्षात येत नाहीत. कारण काळाच्या ओघात हे संदर्भ पुसट व धूसर झालेले असतात. पण वारकरी संप्रदायाच्या निरूपण परंपरेने मात्र हे कथासंदर्भ मौखिक परंपरेने कीर्तन-प्रवचनातून जतन केलेले असतात. संतांनी ज्या काळात साहित्य लिहिले त्या काळातील श्रोत्यांना हे कथासंदर्भ चटकन जाणवत असतील पण नंतरच्या काळात मात्र सामाजिक स्थित्यंतरामुळे हे संदर्भ हरवत जाऊन संतांच्या वाणीची नुसती संहिता उरली. आज आपण ज्ञानेश्वरीचे किंवा एकनाथी भागवताचे फक्त शब्द वाचतो. फार तर त्या शब्दांचा ढोबळ अर्थ माहीत करून घेऊ शकतो पण त्या ओवीत लपलेला प्राचीन कथासंदर्भ किंवा सामाजिक संदर्भ आपल्या लक्षात येत नाही. अशा काही हरवलेल्या दृष्टांत-कथांचा परिचय यापूर्वी मी 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'च्या जुलै-ऑगस्ट-सप्टेंबर १९९२ च्या अंकात करून दिल्यानंतर माझे मित्र डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांनी अजून काही अशाच हरवलेल्या दृष्टांतकथांचा परिचय करून द्यावा असे मला वेळोवेळी सुचविले. पण आळसामुळे व अन्य कारणामुळे ते जमले नाही. प्रस्तुत लेखात पुन्हा एकदा अशाच काही हरवलेल्या दृष्टांत-कथांचा परिचय करून देण्याचे ठरविले आहे.

तेथ रागी प्रतिमल्लाचा। गोसावी सर्वदळाचा।
रथ सांडूनि पायांचा। होय जैसा॥ (ज्ञानेश्वरी १८-४९०)

'जोडीच्या पहिलवानाबरोबर कुस्ती खेळण्याचा षोक असलेला चतुरंग दळाचा सेनापती राजा ज्याप्रमाणे समोरच्या पहिलवानाबरोबर कुस्ती खेळण्यासाठी दंड थोपटून उभा राहावा' त्याप्रमाणे पूर्वी केवळ ज्ञातेपणाने जे चैतन्य असते तेच भोग्यविषय मिळविण्यासाठी 'कर्ता' या अवस्थेवर येते असा वरील ओवीचा ढोबळ अर्थ हाताशी येतो. मूळचे 'ज्ञाता' अवस्थेतील चैतन्य परंतु भोगेच्छेमुळे कर्त्याच्या निकृष्ट भूमिकेत कसे येते हे पटवून देण्यासाठी ज्ञानेश्वरमहाराजांनी वरील दृष्टांत दिला आहे. पण एका सम्राटाला पहिलवानाशी कुस्ती खेळण्याचा प्रसंग का यावा ? त्याला आपले सिंहासन, रथ, घोडे इत्यादी ऐश्वर्य सोडून कुस्तीच्या आखाड्यात उतरण्याची पाळी का यावी ? हे संदर्भ वरील ओवीतून मुळीच लक्षात येत नाहीत. पण त्यामागे एक गोष्ट आहे ती अशी —

'एक राजा होता. त्याच्या पदरी अनेक पहिलवान व कुस्तीगीर होते. त्याला स्वत:ला कुस्ती खेळता येत नसे परंतु प्रतिवर्षी तो देशोदेशीच्या कुस्तीगीरांना निमंत्रण पाठवून कुस्तीचे महोत्सव आयोजित करीत असे. राजाच्या पदरी असलेल्या पहिलवानांची ताकद एवढी जबरदस्त की, ते परराज्यातून आलेल्या पहिलवानांना पाहता पाहाता चीत करीत असत. आपल्या पहिलवानांनी दुसऱ्या राज्यातील पहिलवानांना पराभूत केल्याचे पाहून राजाला अतिशय आनंद होत असे. असा क्रम वर्षानुवर्षे चालत असे. पण एका वर्षी एका महोत्सवात परराज्यातील पहिलवानाने राजाच्या अट्टल कुस्तीगीराचा एका झटक्यात पराभव केला. आपल्या पहिलवानाचा दुसरा राज्यातील पहिलवानाने पराभव केला याचा राजाला एवढा अपमान वाटला की त्या दु:खाच्या भरात स्वत: राजाच त्या परराज्यातील पहिलवानाशी कुस्ती खेळण्यासाठी आखाड्यात उतरला. एवढा मोठा सम्राट पण लंगोट बांधून कुस्ती खेळण्यासाठी मैदानात उतरला. त्याचा परिणाम काय झाला असेल हे सांगण्याची गरजच नाही. कुस्तीतले काहीही न कळणाऱ्या राजाला पहलवानाने पाहता पाहता खाली पाडले. एवढा मोठा राजा पण त्याच्या नाका-तोंडात माती गेली. राजाचा अजून मोठा अपमान झाला. हा कथासंदर्भ लक्षात घेतल्यावर मात्र मूळचे ज्ञानरूप चैतन्य भोग्यविषयाच्या लालसाने कसे कर्ता बनून सुखदु:खाचे चटके सहन करते हा ज्ञानदेवांचा आशय अधिक सुंदर बनून श्रोत्यांच्या मनात घर करून राहातो.

बालक एक एकुलता। त्यासि माथा हाणितली लाता।
मग पाटोळाही नेसविता। क्षोभली माता समजेना॥

(एकनाथी भागवत-११-११९३)

'एका आईच्या एकुलत्या एक बाळाला डोक्यात लाथा हाणून त्या आईला मात्र रेशमी साडी नेसवायची या अनुभवामुळे त्या आईला जो राग येतो तो कुणीही दूर करू शकत नाही. त्याप्रमाणे माझ्या संतांचा अपमान करून माझी मात्र सेवा करतो अशा लोकांवर मी रागावतो, असे भगवान श्रीकृष्ण उद्धवाला म्हणाले. असा हा ओवीचा शब्दश: अर्थ आहे पण वरील ओवीत एकुलत्या एक बाळाला कुणी लाथा मारल्या ? रेशमी वस्त्र नेसवूनही आईला कशाचे वाईट वाटले ? याचा आज काहीही उलगडा होत नाही. पण त्यामागे असणारा कथा-संदर्भ लक्षात घेताच सर्वच उलगडा होतो. तो संदर्भ असा —

'एका बाईने कुठल्यातरी व्रताचे उद्यापन केले. त्या उद्यापनासाठी शेजारच्याच एका गरीब बाईला सुवासिनी म्हणून तिने जेवावयास निमंत्रित केले. खूप छान सुग्रास स्वयंपाक केला. पाट, रांगोळी केली. सुवासिनीला जेवण्यासाठी बोलावणे पाठविले. सुवासिनी आली, पण तिने येताना आपल्या बाळाला आणले होते, ते बाळ एकुलते एकच. घरी ठेवण्यापेक्षा चार गोड घास त्यालाही खावयास मिळतील या हेतूने त्या बाळाला तिने आणले. पण यजमानीण-बाईंना ते सहन झाले नाही. तिने बोलून दाखवले नाही. पण तिचे म्हणणे असे की, 'मी या बाईला सुवासिनी म्हणून जेवावयास बोलावले, हिच्या बाळाला थोडेच बोलावले होते?' पण प्रगट न बोलता तिचा राग त्या बाळावर व्यक्त होत होता. जेवणाची पाने मांडली. वाढावयास सुरवात झाली. सुवासिनीने आपल्या बाळाला आपल्याच शेजारी आपल्याच पानात बसवून घेतले. माजघरातून यजमानीणबाई ओसरीवर बसलेल्या सुवासिनीला वाढत होत्या. माजघरातून ओसरीवर पाऊल टाकताना नेमके ते बाळ वाटेत यायचे. एकदा तर रागारागाने यजमानबाईने वाटेत आलेल्या बाळाला जोरात लाथच मारली. ते बाळ कडमडत रडत दूर गेले. तरीपण यजमानीणबाईंनी पुन्हा एकदा त्या बाळाच्या डोक्यात लाथ मारली. भुकेले बाळ विव्हळून रडू लागले. आईला अतिशय वाईट वाटले. तिला एक घासही घशाखाली उतरत नव्हता. भोजनानंतर यजमानीणबाईंनी एक भारी रेशमी पातळ तिला नेसवले. पण त्या आईला एवढा राग आला की ते पातळ तेथेच टाकून ती निघून गेली. आपल्या बाळाला लाथाडून आपला सत्कार केलेला कोणत्या आईला आवडेल?' हा संदर्भ लक्षात घेतल्यावर मात्र ओवीतील दृष्टांत अधिक परिणामकारक व अर्थपूर्ण वाटतो. आज हे संदर्भ हरवले आहेत. असेच एक उदाहरण पुढीलप्रमाणे —

श्वानारूढ खंडेरावो। सुवर्णाचा करविला पहाहो।
तेथे पाहाता श्वान आणि देवो। सुवर्णान्वये अभिन्न॥
(एकनाथकृत चतुःश्लोकी भागवत-५८०)

'कुत्र्यावर आरूढ झालेली खंडोबाची सोन्याची मूर्ती, पण अन्वय दृष्टीने पाहिल्यास कुत्रा आणि खंडोबा एक सोने म्हणूनच जसे दिसतात' त्याप्रमाणे परमात्म वस्तूंपासून हे सर्व मायाकार्य जगत् झाले असे म्हटले तरी अन्वयदृष्टीने परमात्म्यापासून जग मुळीच भिन्न नाही. असा हा वरील ओवीचा ढोबळ अर्थ आहे. पण खंडोबा आणि त्याचे वाहन कुत्रा या दोन्हीकडे केवळ सोने म्हणून पाहाण्याचा प्रसंग कुणावर व का आला यापाठीमागे एक मनोरंजक गोष्टच आहे. ती गोष्ट अशी —

'एक गृहस्थ होते. ते खूप श्रीमंत होते. पण प्रारब्धवशात त्यांना गरिबी आली. गरिबीपायी त्यांना शेती विकावी लागली. घरातील चीज-वस्तू, भांडी-कुंडी विकावी लागली. तरीपण भागेना, तेव्हा त्यांनी देव्हाऱ्यातील देव विकण्यास सुरुवात केली, आरंभी शंख-घंटा विकली. गरूड, हनुमंत हे चांदीचे देव विकले. शेवटी पाळी आली कुलदेवतेची. त्या गृहस्थाचे

कुलदैवत होते खंडोबा. सोन्याचे जाडजूड कुत्रे आणि त्यावर सोन्याचीच खंडोबाची छोटीशी मूर्ती स्वार झालेली. शेवटी त्या गृहस्थाने ती श्वानारूढ खंडोबाची मूर्ती विकण्यासाठी सराफाकडे आणली. सराफाने सोन्याची पारख केली. खंडोबाच्या मूर्तीचे वजन केले. कुत्र्याचे वजन केले आणि त्या गृहस्थास सांगितले की, कुत्र्याचे जास्त पैसे मिळतील व खंडोबाचे कमी पैसे मिळतील. गृहस्थास वाईट वाटले. कुत्रा माझ्या खंडोबाचे वाहन असून त्याचे जास्त पैसे आणि खंडोबा माझे कुलदैवत असून त्याचे पैसे कमी, असे का? पण सराफाची दृष्टी फार वेगळी होती. तो कुत्रा आणि खंडोबा या दोघांना सोने या दृष्टीनेच पाहात होता. कुत्र्याचे वजन जास्त म्हणून त्याचे जास्त पैसे आणि खंडोबाचे वजन अगदीच कमी म्हणून त्याचे कमी पैसे अशी सराफाची अन्वयदृष्टी होती. हा देव आहे, हा कुत्रा आहे ही दृष्टी सराफाकडे नव्हती, हा संदर्भ लक्षात आल्यामुळे नाथांच्या निरूपणातील अन्वयदृष्टीवर पुरेपूर प्रकाश पडतो. हे आणि यापूर्वी उल्लेखलेले सर्व कथासंदर्भ माझे वडील वै. शंकरमहाराज खंदारकर यांच्या प्रवचनांतून व कीर्तनांतून मला ऐकावयास मिळाले आहेत. असे कथासंदर्भ संतांच्या वाणीत कितीतरी ठिकाणी विखुरले आहेत. शेकडो वर्षांच्या कीर्तन-प्रवचनांच्या परंपरांनी या दृष्टान्तकथा जतन केल्या आहेत. महानुभावपंथाचे महात्मा चक्रधर हे तर निरूपण करताना अगदी सहजपणे असे दृष्टांत कथन करत असत. 'आधारीचेया परिसाचा दृष्टांत', 'कठियाचा दृष्टांत', 'कुष्ठियाचा दृष्टांत' या उत्कृष्ट कथाच आहेत. संतांनी देखील निरूपणासाठी अशा अनेक कथांचे संदर्भ योजून आपले विवेचन रोचक केले. पण काळाच्या ओघात या कथा आज लोप पावल्या आहेत. पण वारकरी संप्रदायाच्या परंपरेने या कथांचा ओघ आजही कायम ठेवला आहे.

संतसाहित्याच्या अभ्यासास परंपरेतील अनेक माध्यमांच्या सूक्ष्म अभ्यासाची जोड दिल्यास त्या अभ्यासास एक वेगळे वाङ्मयीन परिमाण प्राप्त होऊ शकेल हे वरील चर्चेवरून लक्षात यावे.

❑

प्रा. डॉ. यशवंत साधु
श्रीनगर वसाहत, बिदर रस्ता,
उदगीर (जि. लातूर)

अनुक्रमणिका

ततः किम् ततः किम्; व्हॉट् देन् व्हॉट् देन?

❑

वसंत मिरासदार

❑

दोन कविता. एक, हजार वर्षांपूर्वीची. दुसरी, पन्नास-पाऊणशे वर्षांपूर्वीची. एक गीर्वाण भाषेतील, म्हणजे संस्कृतातील रचना; तर दुसरी आजच्या जागतिक भाषेतील, म्हणजे इंग्रजीतील रचना. एकीचा कवी महान ईश्वर भक्त, महायोगी, श्रेष्ठ तत्त्वज्ञ; दुसरा विद्वान, रसिक. साहित्यासाठीचा सर्वश्रेष्ठ नोबेल पारितोषिक विजेता. एक पौर्वात्य. एक पश्चिमात्त्य. एकाच प्रश्नाला दोघेही सामोरे गेलेले. एकाचे खणखणीत उत्तर; दुसरा निरुत्तर.

भाषा, धर्म, संस्कृती, स्थलकाल याबाबत इतकी कमालीची भिन्नता असूनही या दोन कवींची एकेक कविता अशी आहे की, आशय आणि अभिव्यक्ती या बाबतीत या दोन कवितांमधील साधर्म्य काहीसे चकित करणारे आहे.

हे दोन कवी आहेत —– श्रीमद् आदि शंकराचार्य आणि आयरिश सांस्कृतिक पुनरुजीवनाचा एक शिल्पकार डब्ल्यू. बी, येटस् (W.B.Yeats).

आदिशंकराचार्यांनी जी अनेकानेक स्तोत्रे रचली, त्यापैकी 'अनात्मश्रीविगर्हणम्' हे एक स्तोत्र आहे, 'विगर्हणम्' या शब्दाचा अर्थ निंदा, निर्भत्सना असा आहे. या ठिकाणी 'उपदेशपर कानउघाडणी' असा तो अर्थ घेता येईल. व्यक्तीला जोपर्यंत आत्मसाक्षात्कार होत नाही, तोपर्यंत तिचे सारे ऐहिक वैभव, ऐश्वर्य केवळ व्यर्थ आहे; आणि म्हणून व्यक्तीने आपल्या खऱ्या स्वरूपाचा - म्हणजेच आपण ईश्वरी शक्तीचा अंश आहोत या गोष्टीचा, प्रत्यक्ष अनुभव घेण्याचा प्रयत्न करावा, असे या काव्यात आचार्यांनी पुनःपुन्हा सांगितले आहे. हा आत्मसाक्षात्कार जोपर्यंत होत नाही, तोपर्यंत लौकिक जीवनातील यशाला फारसा अर्थ नाही; आत्मसाक्षात्कार हेच मानवी जीवनाचे उद्दिष्ट आहे आणि तो प्राप्त करून घेण्यातच आयुष्याचे खरे सार्थक आहे, असा एकूण या स्तोत्राचा आशय आहे.

'अनात्मश्रीविगर्हणम्' या काव्यात (सर्व स्तोत्रे ह्या कविताच असतात; सर्व कविता ह्या स्तोत्रे असतातच असे नाही) एकूण सतरा कडवी असून प्रत्येक कडवे, चार ओळींचे आहे. प्रत्येक कडव्यातील पहिल्या तीन ओळींच्या शेवटी 'ततः किम्' हे शब्द योजलेले आहेत आणि चौथी ओळ 'येन स्वात्मा नैव साक्षात्कृतोऽभूत' अशी असून ती धृपदासारखी प्रत्येक कडव्याच्या शेवटी येते.

येट्स्च्या कवितेचे शीर्षक 'व्हॉट् देन?'' (What then?) असं आहे. या कवितेत पाच कडवी आहेत आणि या कडव्यांचे स्वरूप आणि रचना श्लोकासारखीच आहे; मात्र प्रत्येक कडव्यात चार ऐवजी पाच ओळी आहेत. आचार्यांच्याप्रमाणेच येट्स्नेही प्रत्येक कडव्याचा

शेवट एकाच शब्दपंक्तीने केला आहे. What then? sang plato's ghost; What then? ही ओळ प्रत्येक कडव्याच्या शेवटी येते.

आचार्यांच्या स्तोत्राची सुरुवात अशी होते —

लब्धा विद्या राजमान्या ततः किम्।
प्राप्ता संपत्प्राभवाढ्या ततः किम्॥
भुक्ता नारी सुंदरांगी ततः किम्।
येन स्वात्मा नैव साक्षात्कृतोऽभूत॥

एखाद्याने कितीही राजमान्य विद्या संपादन केली व अत्युच्च पदव्या मिळवल्या तरी त्याचा काय उपयोग ? वरिष्ठ अधिकारासह विपुल संपत्ती मिळवली तरी त्याचा काय उपयोग ? सुंदर स्त्रीच्या समागमात सुखाने आयुष्य घालवले तरी त्याचा काय उपयोग ? जोपर्यंत आत्मसाक्षात्कार झाला नाही, तोपर्यंत या सर्व गोष्टी मनाला समाधान देऊ शकणार नाहीत.

येट्स्‌ची कविता ही आत्मनिवेदनपर आहे. बाह्यात्कारी जरी कवी एका त्रयस्थाची कहाणी सांगत असला, तरी हा त्रयस्थ दुसरातिसरा कोणी नसून, स्वत: कवीच आहे, ही गोष्ट ज्याला येट्सच्या आयुष्याचा थोडाबहुत परिचय आहे, तो सांगून टाकेल. या कवितेतून कवीच्या अस्वस्थ संदेही अंतरंगाचे दर्शन होते. अगदी लहानपणापासूनच्या कवीच्या ज्या ज्या इच्छा-आकांक्षा होत्या, त्या त्या साऱ्या पुऱ्या झालेल्या आहेत; आणि तरीही कवीला एका अबोध मानसिक पोकळीने, अस्वस्थतेने पछाडलेले आहे. 'या लौकिक जगातील जे जे हवे ते सारे मला मिळाले आहे; मग माझी अस्वस्थता का ?' असा सवाल जणू कवीने स्वत:लाच केलेला आहे.

येट्स्‌च्या कवितेची सुरुवात अशी होते -

His chosen Comrades thought at school
He must grow a famous man;
He thought the same and lived by rule,
All his twenties crammed with toil;
'What then?' sang Plato's ghost, What then?

कवीच्या जवळच्या मित्रांना तो पुढे कोणीतरी फार मोठा होईल, अशी खात्री होती. त्याप्रमाणे ऐन तारुण्यात कवीने अपार कष्ट घेऊन त्यांच्या अपेक्षा फलद्रूप केल्या. पण एक प्रकारचे असमाधान कवीला सतत सतावीत होते.

All his happier dreams came true -
A small old house, wife, daughter, son,
grounds where plum and cabbage grew,
poets and wits about him drew;
'What then?' sang plato's ghost, What then?

पुढे नावलौकिक मिळाला, घर झालं, लग्न होऊन मुलंबाळं झाली. नामवंत कलावंत भेटी-गाठीला येऊ लागले. हे सगळं रीतसर झालं. पुढे कवीचं वय झालं. म्हातारपण आलं. ''मला जे जे मिळवायचं होतं, ते सारं मिळालं आहे, लोकांना काय म्हणायचंय ते म्हणू देत, मी कुठेही माझ्या तत्त्वांशी तडजोड केलेली नाही,'' कवी वरकरणी स्वत:शी म्हणत राहिला.

पण कवीचा आतला आवाज खूपच मोठ्याने त्याला विचारीत राहिला, 'आता पुढं काय? तू समाधानी आहेस काय? तुझा अंतरात्मा तृप्त आहे काय?' याचं उत्तर 'नाही, नाही' असंच होतं. सारं सारं मिळूनही कवीच्या अंतरात्म्याची तडफड सुरूच राहिली.

वैफल्य आणि निराशा या भावना चित्रित करणाऱ्या कविता मराठीत पुष्कळच आहेत. बालकवींची 'उदासीनता' ही कविता प्रसिद्धच आहे —

कोठून येते मला कळेना
उदासीनता ही हृदयाला
काय बोचते ते समजेना
हृदयाच्या अंतर्हृदयाला

पण बालकवींच्या कवितेतील अस्वस्थतेचा सूर आणि येट्स्‌च्या या कवितेतील अस्वस्थतेचा सूर यामध्ये खूपच फरक आहे. बालकवींचे अंत:करण निराशेने ग्रासलेले होते. या नैराश्याचे कारण त्यांनाही कळत नव्हते. पण या निराशेचे स्वरूप एका अनामिक भीतीचे, दडपणाचे होते यात शंका नाही. येट्सच्या हृदयात नैराश्य नाही; पण सगळं मिळूनही मंझिल मिळालेली नाही, अशी अतृप्तीची जी भावना आहे, ती आध्यात्मिक स्वरूपाची आहे असंच म्हटलं पाहिजे.

आपल्या अंतरात्म्याच्या आवाजासाठी येट्सूने 'प्लेटोचे पिशाच्च' हे प्रतीक वापरले आहे. प्लेटो हा पाश्चात्य तत्त्वज्ञानाचा एका अर्थाने आद्यपुरुषच; म्हणजे पाश्चात्यांचा आदिशंकराचार्यच. प्लेटोच्या तत्त्वज्ञानात भक्ती, आत्मा, आत्मसाक्षात्कार या गोष्टींना कसलेच स्थान नाही. भारतीय अध्यात्मक्षेत्रात अंतिम सत्याप्रत जाण्यासाठी भक्तीद्वारे आत्मसाक्षात्काराचा विचार फार महत्वाचा मानलेला आहे. प्लेटोप्रणीत तत्त्वज्ञानात अंतिम सत्याच्या शोधासाठी शुद्धबुद्धी आणि तर्क वा अनुमान यांना प्रधान साधने मानली आहेत.

माणसाच्या आयुष्यामध्ये श्रेयस् कोणते आणि प्रेयस् कोणते, याचा स्वच्छ निवाडा करून शंकराचार्यांनी श्रेयसचा मार्ग हाच अंतिमत: कल्याणकारी मार्ग आहे, हे स्पष्टपणे बजावले आहे. भौतिक सुखातून मिळणारे समाधान क्षणिक स्वरूपाचे असते; आत्मसाक्षात्कारातून मिळणारे समाधान हेच खरे शाश्वत समाधान, ईश्वरी शांतीचा अनुभव देणारे समाधान असा आचार्यांचा निष्कर्ष आहे; याउलट, येट्सूने प्रेयसची निवड केली; त्यामुळे सर्व काही प्राप्त होऊनही त्यांचा आत्मा, त्यांचा आतला आवाज शेवटी त्याला ओरडून सांगतो, ''अरे, हो, हो बाबा! सगळं खरंच; पण आता पुढे काय, सांग ना!''

तत्त्वज्ञान, गूढविद्या या विषयांमध्ये येट्सूला पहिल्यापासूनच रस होता. आयुष्याच्या उत्तरार्धात तो भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यासक झाला. या तत्त्वज्ञानाने त्याला इतके भारून टाकले की, त्याने संस्कृतचाही थोडाफार अभ्यास केला. पुरोहितस्वामींच्या साहाय्याने त्याने संस्कृतमधील काही ग्रंथही वाचले. काही उपनिषदांची इंग्रजीत भाषांतरेही केली. या कालावधीत त्याने शंकराचार्यांची स्तोत्रे वाचली असण्याची बरीच शक्यता आहे. आणि त्यापैकी 'अनात्मश्रीविगर्हणम्' हे स्तोत्र ह्याच्या मनावर खोल परिणाम करून गेले असण्याची शक्यता नाकारता येत नाही. हा परिणाम 'व्हॉट देन' या कवितेच्या रूपाने अभिव्यक्त झाला असावा,

असे मानण्यास बरीच जागा आहे.

आचार्यांनी आपल्या स्तोत्राचा शेवट असा केला — 'आत्मसाक्षात्कारावाचून राहिलेल्या मनुष्याचे विद्यावैभवादि गुण कितीही उत्कृष्ट असले तरी ते शोभत नाहीत. त्यांची तुच्छता दाखविणारे हे स्तोत्र ज्यांच्या अंत:करणामध्ये उत्तम ठसेल, तोच सदा आत्मसाक्षात्काराला पात्र होईल. मायिक जगाच्या भ्रांतिजालात गुरफटलेल्या लोकांना कधीही आत्मसाक्षात्कार होणार नाही.'

येट्‌स्‌च्या कवितेचा शेवट असा आहे -

"The work is done," grown old he thought,
According to my boyish plan;
Let the fools rage I swerved in naught,
Something to perfection brought;
But louder sang that ghost, 'What then?'

पहिल्या तीन कडव्यांत प्लेटोचं पिशाच्च कवीच्या कानात गुणगुणतंय; पण शेवटच्या कडव्यात मात्र हेच पिशाच्च जवळपास किंचाळूनच कवीला 'आता पुढे काय सांग ना?' असं विचारतंय हे आपल्याला जाणवतं. आणि हे एका अर्थी स्वाभाविकच आहे. शैशवात, तारुण्यात आणि प्रौढावस्थेत 'पुढे काय?' हा विचार फार प्रबळ स्वरूपात पुढे येतच नाही. कारण तो काळ, आचार्यांच्या शब्दात सांगायचे तर, 'भ्रांतिजालात' गुरफटण्याचा असतो. वृद्धावस्थेत ते ऐहिकाचे पटल बरेचसे विरळ होते; आणि पूर्वकाळात केलेल्या कर्माचा पट एक वेगळेच, क्लेशदायक रूप घेऊन पुढे येतो, येट्‌स्‌च्या उत्तरायुष्यात त्याला आलेल्या 'हरपलेल्या श्रेयांचा अनुभव' या शेवटच्या कडव्यात व्यक्त झालेला आहे.

कुठल्याही युगातील, काळातील श्रेष्ठ कवी हा त्या काळातील संवेदनशीलतेचे (Sensibility) प्रतिनिधित्व करीत असतो. संवेदनशीलतेचा, वैचारिक पातळीचा तो विश्वासार्ह बॅरॉमीटरच असतो. येट्‌स्‌ हा असा विसाव्या शतकाच्या पूर्वार्धातील पाश्चात्य संवेदनशीलतेचा खराखुरा प्रतिनिधी होता. 'लेक आईल ऑफ इनिसफ्री' (Lake Isle of Innisfree) 'सेलिंग टु बायझान्टियम्' (Sailing to Byzantium) आणि 'अ प्रेअर फॉर माय डॉटर' (A Prayer for my daughter) या त्याच्या तीन महत्त्वाच्या कवितांमधून त्याच्या मनोरचनेची सारी परिमाणे स्पष्टपणे समोर येतात. बौद्धिक अहंकार, भोगवाद यांचे पाश्चिमात्य जगावर वाढत चाललेले सावट, श्रेष्ठतम मूल्यावर आधारित असलेल्या प्राचीन संस्कृतीच्या पुनर्स्थापनेची उत्कट इच्छा, फक्त निसर्गाच्या सहवासातील एकांतवासाची आंतरिक तळमळ हे त्याच्या मनोरचनेचे विविध पैलू अध्यात्म आणि श्रद्धा यांना श्रेष्ठ मूल्ये मानणाऱ्या भारतीय मनोवृत्तीशी जुळणारेच आहेत. १९१२ साली त्याने रवींद्रनाथ टागोरांच्या 'गीतांजली'ला लिहिलेल्या प्रस्तावनेतून ही जवळीक स्वच्छपणे प्रकट झाली आहे.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात जन्मलेल्या (१८६५) आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात म्हणजे दुसऱ्या महायुद्धाच्या अगदी सुरुवातीस (१९३९) निधन पावलेल्या येट्‌स्‌ला शतकाचा अग्रमानांकित कवी (Voice of the Age) होण्याचा बहुमान लाभला नाही. दुसऱ्या

महायुद्धातील भीषण संहारानंतर मानवी संस्कृतीची झालेली पडझड आणि मानवी संवेदनशीलतेच्या उडालेल्या चिंधड्या याचा त्याने अनुभव घेतला असता, तर त्याच्या कवितेने, शतकाचा आवाज होण्याचे बिरुद कदाचित प्राप्त केले असते. अर्थात 'शतकाचा आवाज' हे मानाचे बिरुद जरी पुढे टी.एस्. एलियट या कवीकडे गेले असले, तरी एलियटच्या काव्यातील प्राणसुरांचे अस्पष्ट ध्वनी - पार्श्वसंगीत आपणाला येट्स्च्या कवितेतून ऐकू येतात. आध्यात्मिक मूल्याचे महत्त्व आणि मूल्यावर आधारित अशा समाजाची पुनर्स्थापना व्हावी, अशी आंतरिक आस; हा या दोन मोठ्या कवींमधील समान धागा होता.

असाच समान धागा येट्स्चा जुळला होता तो भारतीय संस्कृतीशी; या संस्कृतीच्या अध्यात्मविद्येशी आणि या विद्येचा एक प्रमुख प्रवक्ता म्हणून कदाचित आदिशंकराचार्यांशीही. प्रखर बुद्धिवादाच्या आधारावर उभारलेल्या प्लेटोप्रणीत पाश्चात्य तत्त्वज्ञानापेक्षा पौर्वात्य तत्त्वज्ञानातील गूढतेकडे येट्स्चा अधिक ओढा होता हे निर्विवादच आहे. 'याचसाठी केला होता अट्टाहास; शेवटचा दिस गोड व्हावा' ही तळमळ पूर्ण करण्याची शक्ती भारतीय अध्यात्मविद्येतच आहे, हाच विचार 'व्हॉट देन्' ही कविता लिहिताना त्याच्या मनात प्रबळ असेल काय? ❑

वसंत मिरासदार

२६ पर्वती, पुणे ४११ ००९.

शांता शेळक्यांच्या कवितेतील मातृभावदर्शन

❑

प्रा. सुहासकुमार बोबडे

❑

भारतीय संस्कृतीत मातृत्व ही भावना अनादि कालापासून श्रेष्ठ मानली गेली आहे. त्यामुळेच अनेक ग्रंथकार, कवी, लेखक यांनी ह्या भावनेच्या अनेक भावच्छटांना आपल्या कलाकृतींचे विषयही बनवले आहे. 'प्रेमस्वरूप आई, वात्सल्यसिंधू आई' इथपासून ते 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी' इथपर्यंत आईच्या महनीयतेची रमणीय वर्णने अनेक काव्यपंक्तींतून आढळतात.

ह्या लेखात प्रसिद्ध कवयित्री शान्ता शेळके यांच्या कवितेतील मातृदर्शनाचा शोध घेण्याचा प्रयत्न आहे. खरे तर शान्ताबाईंची उत्स्फूर्त कविता ही बरीचशी आत्मलक्षी असल्यामुळे ती त्यांच्या व्यक्तित्वाचा आत्ममग्न उद्‌गार बनते. मध्यमवर्गीय जीवन जगलेली ही कवयित्री. 'वर्षा' हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. त्यानंतर १९५६ मध्ये त्यांचा 'रूपसी' हा दुसरा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. ह्या दोन काव्यसंग्रहानंतर त्यांचे काव्यलेखनाकडे काहीसे दुर्लक्ष झाले. आपल्या काव्यप्रतिभेला कृत्रिमपद्धतीने वाकवून १९५६ नंतरच्या काळात त्यांनी काही कोळीगीते, भक्तिगीते, गौळणी, लावण्या, द्वंद्वगीते लिहिली. चित्रपटाच्या कथेच्या अनुषंगाने बरीचशी चित्रपटगीतेही लिहिली. त्यांच्या 'मी डोलकर' सारख्या कोळीगीतातील विरहिणी कोळीण. 'गणराज रंगी नाचतो' सारख्या भक्तिगीतांतून त्यांची प्रतिभा जणू काही भक्तिरसात न्हाऊन निघाली. तर 'कशी गौळण राधा बावरली' सारख्या चित्रपटासाठी लिहिलेल्या गौळणीच्या निमित्ताने 'गौळण' हा काव्यप्रकारही त्यांनी हाताळला. 'शूर आम्ही सरदार'-सारख्या स्फूर्तिगीतातून त्यांनी मराठी शूरवीरांच्या पराक्रमाचा पोवाडा गायला. हे सारे काव्यलेखन जरी काहीसे अर्थकृते ह्या प्रयोजनातून झाले असले तरी उत्कट काव्यगुणांनी ओतप्रोत भरलेले आहे. अशा ह्या उत्कट १०२ भावगीतांचा 'तोच चंद्रमा' हा गीतसंग्रह १९७३ मध्ये प्रसिद्ध झाला. आणि त्यानंतर दोनएक वर्षात १९७५ मध्ये त्यांच्यातील हळवे स्त्री-मन जपणारा 'गोंदण' हा काव्यसंग्रहही प्रसिद्ध झाला.

ह्या पार्श्वभूमीवर शान्ताबाईंच्या कवितेचा विचार करीत असताना एका गोष्ट ध्यानात येते, ती म्हणजे त्यांची उत्स्फूर्त कविता हा स्त्री-मनाचा आणि स्त्री-जीवनाचा उत्कट आविष्कार आहे. त्यांनी लिहिलेली भावगीते मात्र वैविध्यपूर्ण असून प्रणय, भक्ती, अध्यात्म, पराक्रम अशा नानाविध विषयांवर ती लिहिली आहेत. त्यातही त्यांच्या 'तोच चंद्रमा' मधील अंगाई गीतामधून स्त्रीमनातील मातृभावना विशेषत्वाने प्रगटताना दिसते. मातृत्व ही स्त्री-मनातील एक सहजसुलभ प्रेरणा. स्त्रीमध्ये अगदी लहानपणापासून ही भावना तिच्या मनात कुठे तरी खोलवर

दडलेली असते. म्हणूनच अलीकडच्या फ्लॅट संस्कृतीतील मुली बाहुलीशी अर्थात महागड्या बाहुलीशी खेळून तिचे बाळ करतात, तर ग्रामीण भागातील पोरी शेणाची आणि काटक्यांची बाहुली करून तिला 'बाळ बाळ' करतात. मुलगी लेकुरवाळ्या स्त्रीचे सूक्ष्म निरीक्षण करते आणि तशीच त्या शेणामातीच्या बाळाशीही चाळे करते. जणू स्त्री आपल्या बालपणापासून तिच्या मनात वात्सल्य भावना जोपासत असते.

शान्ताबाईंच्या अंगाई गीतांमध्ये झोपेची वेळ होऊनही बाळ झोपत नाही, ही त्याच्याविषयीची गोड तक्रार येते. खरे तर तो आता झोपेला आला आहे —

पाऊल चाळा
घुंगुरवाळा
का नीज नाही राजा तुला?
इवल्या पापण्या शिणल्या ना!

असे आपल्या बाळाशी हितगुज करणारी ही आई. त्याच्या इवल्या इवल्या पापण्या शिणल्या आहेत तरीदेखील त्याचा पाऊलचाळा मात्र सुरूच आहे. म्हणून 'का नीज नाही राजा तुला?' असा आपल्या बाळालाच ती गोंडस प्रश्न विचारते आहे. ह्या तिच्या प्रश्नातून तिच्या मनातील वात्सल्यभावना तर प्रकट होतेच, पण त्याच बरोबरीने स्वत:चा जीव कसा थकला आहे, हेदेखील ती आपल्या बाळालाच सांगताना दिसते —

काम सारे उरकताना
थकला ग माझा जीव
नको हालू तूही राणी
येऊ दे ना जरा कीव

त्या बाळाशी ती जशी बोलते आहे त्यावरून ते बाळ तिची मुलगी असावे. दिवसभर कामधाम उरकता उरकता आणि तिच्या त्या बालराणीचे बघताबघता ती पुरती थकून गेली आहे. जणू काही आपले मन मोकळे करण्याचे एकमेव ठिकाण म्हणजे, ती तिची बालिका आहे आणि तिचा त्या बालिकेशी चाललेला हा एकेरी संवाद आहे.

मातृत्व हे स्त्री-जीवनाचे पूर्णत्व आहे, ही कल्पनाही त्यांच्या अंगाई गीतांमधून व्यक्त होते.

देवकी राही दुरी दाटला उरी पान्हा
यशोदे हरि वाढे गोकुळी तिचा तान्हा
पालखी जोजविते बाह्यरूप गोजीरे!

कृष्णाच्या जन्माबरोबर देवकीला त्याला आपल्यापासून दूर करावे लागले ही देवकीतील मातेची खंत. तिचा तान्हा जरी यशोदेघरी वाढत होता, तरी तिला पान्हा फुटतच होता. देवकी काय किंवा कोणतीही सामान्य माता काय! मातृत्व ह्या भावनेपुढे दोघीही एकच. आजही कित्येक सामान्य देवकींची तान्हुली यशोदाच सांभाळतात. तेव्हा ह्या देवकींचाही पान्हा दाटल्याशिवाय राहात नाही. आजच्या नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने घराबाहेर पडणाऱ्या माता म्हणजे देवकीच नाहीत काय?

शान्ताबाईंच्या बालगीतांमधून बालांचा आईविषयक दृष्टिकोन अभिव्यक्त होतो. कवयित्रीचे अनुभवविश्व मध्यमवर्गीय समाजातील असल्यामुळे त्यांच्या बालगीतांमधूनही अलीकडच्या मध्यमवर्गीयांची पप्पामम्मी संस्कृती आविष्कृत होते.

पप्पा सांगा कुणाचे ?
पप्पा माझ्या मम्मीचे
मम्मी सांगा कुणाची ?
मम्मी माझ्या पप्पांची

ही काही नुसती शब्दांची फिरवाफिरवी नाही, तर शान्ताबाईंच्या प्रौढ मनाने बालमनात परकाया प्रवेश करून अलीकडच्या 'हम दो हमारे दो' संस्कृतीतील छोट्याशा घरकुलाचे त्यांच्या मनातील चित्रच उभे केले आहे. मुलांनी स्वत:च 'पप्पा सांगा कुणाचे ? असा प्रश्न विचारावा आणि स्वत:च 'पप्पा माझ्या मम्मीचे' असे उत्तरही द्यावे.

आणि मग पुढे म्हणावे —

इवल्या इवल्या घरट्यात
चिमणा चिमणी राहातात
....
पंखाशी पंख हे जुळताना
चोचीत चोचही मिळताना
हासते, नाचते, घर सारे
हासती छप्पर भिंती दारे

ह्या मुलांचे पप्पा आणि मम्मी हेच हे चिमणा चिमणी. त्यांचे ते घर म्हणजे इवले इवले घरटे. त्या घरट्यातील मम्मी-पप्पांची आपल्या मुलांबद्दलची माया ह्या बालगीतातून पुढे अधिक स्पष्ट होत जाते. शान्ताबाईंनी हे जरी बालगीत म्हणून लिहिले असले, तरीदेखील त्यामागे त्यांच्या प्रौढ व प्रगल्भ जीवनविषयक चिंतनाची नाजुक किनार आहे. त्यांचे प्रौढ चिंतनशील व्यक्तिमत्त्व ह्या बालगीतातून व्यक्त होते. कारण ह्या गीतातील विचार बालमनातील नाहीत. अर्थात लहान मुलांच्या दृष्टीने त्यांचे आईवडील हेच त्यांचे विश्व, सर्वस्व. किंबहुना लहान मुलांच्यामधील भांडणमध्येही मुले 'आईला सांगेन' असे म्हणतात — तेही आईवरील केवढ्या अगम्य विश्वासाने. त्यांचा सर्वतोपरी आपल्या आईवर विश्वास असतो.

शान्ताबाईंच्या प्रौढ मनालादेखील बाळांच्या मनाचे कमालीचे आकर्षण आहे. म्हणूनच त्यांचे प्रौढ मन बालमनाशी गुजगोष्टी करीत राहते. बालांच्या मनातील सूक्ष्म बारकावे टिपून त्यात प्रौढमनातील छटा बालांच्या भाषेत व्यक्त करताना साहजिकच भाषेला एक प्रकारची तरलता येते. बालांच्या बोलातून त्यांच्या आई-बाबांचे विश्व, त्याचबरोबरीने आई-बाबांचा त्यांच्या छकुल्यांविषयीचा वात्सल्यभावही व्यक्त होतो. हा वात्सल्यभाव आरशावर सूर्यकिरण पडून प्रकाशकिरण परावर्तित व्हावे, तसा परावर्तित होतो.

कवयित्रीच्या संस्कारक्षम व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब त्यांनी लिहिलेल्या काही बालगीतांमध्ये

अनुक्रमणिका

पडलेले दिसून येते.

वृंदावनामध्ये
उजळते वात
बाळा दिव्यापुढे
जोड बरे हात

असे आपल्या मुलाला सांगणारी ही आई. ह्या गीतातून आईचे सुसंस्कृत व संस्कारक्षम मन व्यक्त होते. हल्लीच्या वैज्ञानिक सुखसुविधांनी भरलेल्या मध्यमवर्गीय माणसांच्या दिवाणखान्यात संस्कार हरवत चालले असताना शान्ताबाईंच्या अशा गीतांमधील संस्कारक्षम आई निश्चितच प्रत्येक आईत हवी असे वाटते. याचा अर्थ इतर माता मुलांवर संस्कार करीत नाहीत असा नव्हे. पण त्याला कुठेतरी मर्यादा येतात हे देखील खरे. कारण आता नागरी जीवनातील अपरिहार्य अशा फ्लॅट संस्कृतीत तुळशी वृंदावन, देवघर ह्या बाबी लयाला चालल्या आहेत. अगदी ग्रामीण संस्कृतीतदेखील पूर्वीप्रमाणे ह्या बाबी हल्ली फारशा दिसत नाहीत. शिवाय हल्लीच्या जीवनावर झालेले दूरचित्रवाणीचे आक्रमण. जी वेळ पूर्वी मुलांची देवापुढे दिवा लावल्यावर 'शुभं करोति' म्हणायची, तीच वेळ आता दूरदर्शनच्या पडद्यावरील ओंगळवाण्या गीतांच्या प्रदर्शनाची. त्यामुळे हे वातावरण बालमनावर नेमके कोणते संस्कार करणार, हा प्रश्नच.

ह्या सर्व पार्श्वभूमीवर ही तुळशी वृंदावनात वात लावणारी आई आपल्या बाळाला जेव्हा दिव्यापुढे हात जोडायला सांगते ती माता निश्चितच आदर्श माता होय. अशा काही गीतांमधून मातृत्व-भावनेचे संस्कारक्षम पदर आपल्या प्रत्ययास येतात.

शान्ताबाईंच्या अंगाईगीतांमधून आणि बालगीतांमधून जेवढ्या प्रभावीपणे मातृभावनेचे दर्शन घडते, तेवढे त्यांच्या उत्स्फूर्त आत्मलक्ष्यी कवितेत घडत नाही. त्यांच्या कवितेत हळव्या स्त्रीमनाची भावानुभूती प्रकट होत असताना स्त्रीमधील मातृभावना फारच विरलत्वाने व्यक्त होते. म्हणजेच त्यांच्या अंगाई गीतांमधून आणि बालगीतांमधून जसे मातृभावनेचे दर्शन घडते तसे त्यांच्या उत्स्फूर्त कवितेत का घडत नाही, असा प्रश्न विचारणे हेही योग्य नाही. कारण जसा कवीचा भावानुभव असतो तशीच त्याची भावनाभिव्यक्ती असते. त्यामुळे कदाचित हा भावानुभव त्यांच्या उत्स्फूर्त कवितेला फारसा भावला नसावा. त्यामुळेही असे झालेले असावे. तरीही त्यांच्या 'वर्षा' काव्यसंग्रहातील 'तान्हुल्या मीनाक्षीस' ही कविता ह्या संग्रहातील मातृभावनेचे दर्शन घडविणारी एक सुंदर कविता आहे. ह्या मीनाक्षीची आई जणू काही कवयित्रीला आपलीच आई वाटते. ही तान्हुली मीनाक्षी म्हणजे गतकाळातील कवयित्रीचेच रूप तर नसेल, असा प्रश्न ही कविता आस्वादताना पडल्याशिवाय राहात नाही.

नेत्राची तुझिया सतेज दिसती मीनाकृती ही दळे
'मीनाक्षी' तव नाव ठेवूनी गमे औचित्य की साधले

असा हा ह्या मीनाक्षीच्या आईचा मीनाक्षीशी होणारा संवाद मीनाक्षीचे शब्दचित्रच उभे करतो. ती चिमुकली मीनाक्षी, तिचे ते जावळवजा केस कदाचित कपाळावरून रुळत असताना

तिची आई वात्सल्यभावाने ते केस मागे सारत असताना तिला तिच्या डोळ्यांची सतेज दिसणारी मत्स्याकृती दले. आणि म्हणूनच की काय तिचे मीनाक्षी म्हणजे 'मत्स्यासारख्या डोळ्यांची' हे नाव अगदी नेमके साधले आहे. अर्थातच आईच्या दृष्टीने तिचं कसलंही मूल तिला सुंदरच. त्यात जर ते बाळ खरेच सुंदर असेल तर..? तर काही विचारायलाच नको. इतके त्याचे कोडकौतुक होणे अगदी स्वाभाविकच आणि ह्या मीनाक्षीचे निश्चितच तिच्या आईकडून कोडकौतुक होत आहे. तिचे ते इवले इवले रूप पाहून जणू काही तिला वाटते —

माते ज्ञात न ईशरूप, नच मी अद्यापि त्या पाहिला
हो किंचित परि तो प्रतीत तुझिया बालस्वरूपी मला

'मुलं ही देवाघरची फुलं' असं म्हणतात पण ह्या आईच्या दृष्टीनं हे बालस्वरूप म्हणजेच ईश्वर. प्रत्यक्ष ईश्वर कसा असतो हे तिला माहीत नाही. कारण तो तिला अद्याप तरी दिसलेला नाही. त्यामुळे ती प्रत्यक्ष ईश्वराच्या रूपाविषयी काहीच सांगू शकत नाही. मात्र तिचे हे बालक म्हणजे जणू काही त्या ईश्वराचंच छोटंसं रूप अशी तिची अगाध श्रद्धा आहे.

'वर्षा' ह्या संग्रहातील ह्या एकाच कवितेतून शान्ताबाईंनी मातृप्रेमाचे व वात्सल्याचे भावगीत सुनावले आहे. त्यांच्या 'रूपसी' ह्या दुसऱ्या संग्रहातही या विषयावरील कविता विशेष नाही. ह्या संग्रहात 'मातृत्व' ही भावना शोधायचीच झाली तर ती 'गृहलक्ष्मी' ह्या कवितेत शोधता येईल.

भावी भाग्य रेखलेले भव्य तुझ्या भाळावर
देती मंगल ग्वाही तुझे सुलक्षणी कर
....
....
तुझ्या लोचनात पटे रम्य भविष्याची साक्ष
तुझ्यामुळे साधायचे धर्म, अर्थ, काम, मोक्ष

ही 'गृहलक्ष्मी' सध्यजीवनात माता नाही. परंतु शान्ता शेळक्यांमधील कवयित्रीला मात्र त्या नववधूमध्ये भावी जीवनातील माता दिसते. ही गृहलक्ष्मी जेव्हा आपले माहेर सोडून सासरच्या घरात पाऊल टाकते तेव्हा तिचे सासर तिच्या स्वागतासाठी सज्ज असते. कारण तिची कूस उजविल्यामुळे त्या घराची वंशवेल पुढे चालू राहाणार आहे ह्या आशेने तिचे सासर तिच्याकडे पाहात असते. तीदेखील आपले माहेर, आईवडील सोडून सासरची होते ती संसारसुखासाठीच. स्त्री ही खऱ्या अर्थानें पुरुषाची अर्धांगी. शान्ताबाईंना ह्या गृहलक्ष्मीच्या डोळ्यांत तिच्या रम्य भविष्यकाळाची साक्ष पटते आणि तिच्यामुळेच तिच्या पतीला धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष ह्या चार पुरुषार्थाचे स्वस्तिक प्राप्त होणार आहे असेही त्यांना वाटते. ही 'गृहलक्ष्मी' कवयित्रीला आज जरी नववधूच्या रूपात दिसत असली तरी देखील ती माता होणार आहे. हे भविष्यातील तिचे मंगल रूप ती आज न्याहाळते.

'गोंदण' ह्या संग्रहातही प्रत्यक्ष मातृभावना व्यक्त करणारी कविता एकही नाही. मात्र मातृभावनेचे परावर्तित रूप काही कवितांमधून व्यक्त होते. त्यातीलच 'खिडकीपाशी एक

मुलगी' ही कविता. ह्या कवितेत कवयित्रीचे शाळामाऊलीविषयीचे प्रेम व्यक्त झाले आहे. खिडकीपाशी उभी असलेली एक छोटी मुलगी पाहून कवयित्रीला स्वत:चे बालपण आठवते. खेड्यामधील ती शाळामाऊली कवयित्रीसमोर भूतकाळाचा सारा पट उभा करते आणि तिचा हुंदका गळ्यात अडतो. जणू काही वर्तमानकाळाला भूतकाळ एकसारखा डिवचतो आहे तो शाळेच्या दर्शनातून. शाळा ही दुसरी माऊलीच म्हटले तर वावगे ठरू नये. खिडकीपाशी उभी असलेली लहान मुलगी जशी कवयित्रीला भावव्याकूळ करते तशीच कठड्यावर कोपर टेकून खिडकीपाशीच उभी राहिलेली गोरी 'मालण' ही माहेरच्या गणगोतांची वाट पाहाताना शान्ताबाईंना दिसते तेव्हा 'मालण'च्या मनातील व्याकूळता कवयित्रीला व्याकूळ करते. कवयित्रीचे मन मालणच्या मनात शिरते.

धावत जाते मन तिजसंगे
आणि पोचते माहेराला
धापा टाकीत आईच्या छातीला बिलगुन
गिळू लागते कोसळणारे रडे अनावर

कवयित्रीचे स्त्री-मन मालणच्या स्त्री-मनाला भिडते. स्त्री म्हणून दोघींचेही मन सारखेच आहे. किंबहुना स्त्रीचं मन स्त्रीच ओळखू शकते. माहेरच्या माणसांची, विशेषत: आईची वाट पाहणारी ही मालण. पण माहेरचं कोणी येत नाही म्हणून ती माहेरी येते आणि धापा टाकत आईच्या छातीला बिलगून कोसळणारे अनावर रडे गिळू लागते. आईला बिलगण्यात देखील तिला केवढा आधार वाटतो. जणू काही आईला लेकीच्या जीवनातलं न सांगताच सारं काही कळतं. इथे मालणबरोबर धावणारे शान्ताबाईंचे हळवे मन काहीसे आत्मशोध करतानाही दिसते. ह्या मालणने आपल्या कपाळावर हौसेने गोंदून घेतलेले ते साजरे हिरवे स्वस्तिक आता पिंजऱ्यासारखे झाले आहे.

लगिनचुड्यावर अवघडलेली
असंख्य चित्रे
नजर लागते पुन्हा न्याहाळू
तनू बाळसेदार गोजिरी
आईच्या हाताने तिजला नेसवलेली
पहिली चुनडी फुलाफुलांची

मालणच्या शब्दचित्रातून तिच्या वेदनेबरोबरच तिचा आपल्या आईविषयीचा जिव्हाळा व्यक्त होत असतानाच तिच्या आईचाही लेकीबद्दलचा मायेचा ओलावा व्यक्त होतो. माहेर कितीही चांगलं असलं तरी स्त्रीला ते पूर्णत्व देऊ शकत नाही. तिला पूर्णत्व देतं ते मातृत्व आणि हे मातृत्व प्राप्त करण्यासाठी तिला हिरवा चुडा लेऊन सासरी नांदावं लागतं. तेव्हा साहजिकच पहिल्या रात्री माडीवरती जाताना तिला एकेक पायरी अलंघ्य पर्वतासारखी वाटते. तिच्या आईनेच तिला नेसवलेल्या फुलाफुलांच्या चुनडीची गाठ तिच्या कमरेला काचू लागते तेव्हा तिला आठवण येते ती फक्त आईचीच. सासुरवाशिणीच्या मनाला असणारी आईची

ओढ आणि आईच्या मनातील लेकीबद्दलची सदाहरित पालवी यांचा सुंदर समन्वय 'मालण' ह्या कवितेत झाला असून मालणच्या सहवेदनेतून तिच्या आईचे दर्शन घडविण्यात कवयित्री यशस्वी झाली आहे.

'एक लहान मूल' ह्या कवितेतूनही कवयित्रीला जेव्हा ढसढसून रडणारे लहान मूल दिसते तेव्हा त्याच्या रडण्याचे कारण काय असेल याचा विचार करताना तिला वाटते की, कदाचित त्याची आई तर हरवली नसेल?

'ढसढसून रडणारे एक लहान मूल, असहाय, अगतिक
मला त्याच्या रडण्याचे कारण माहीत नाही
त्याचा खाऊ कुणी पळवला? त्याचे खेळणे हरवले?
की.. धस्स होते छातीत माझ्या-हरवली त्याची आई?

त्याचा खाऊ कुणी पळवला असेल तर तो त्याला पुन्हा मिळेल. खेळणे हरवले तरीही ते पुन्हा मिळेल. मात्र त्याचे रडणे त्याची आई त्याच्यापासून हरवल्यामुळे असेल तर ती त्याला परत कधीही मिळणार नाही. म्हणून शान्ताबाईच्या काळजात धस्स होते. हे काळजात धस्स होणे अनिष्टाची छटा घेऊन येते.

हे आणि असेच मातृविषयक भाव 'गोंदण' मधून व्यक्त होतात. ज्याप्रमाणे 'वर्षा' व 'रूपसी' मध्ये शान्ताबाईच्या मनातील मातृभाव विरलत्वाने व्यक्त होतो तीच गोष्ट 'गोंदण'चीही. 'शान्ताबाईच्या काव्यात वात्सल्य-कविता फ़ारशा दिसत नाहीत. निसर्गाकडे मात्र त्या वात्सल्य भावनेने पाहातात' हे स.ग. यादव यांचे त्यांच्या कवितेविषयीचे विधान[१] बऱ्याच बाबतीत अर्थपूर्ण आहे. कारण त्यांच्या उत्स्फूर्त कवितेत जे मातृदर्शन घडते ते स्पष्टपणे न घडता कोणाच्या तरी माध्यमातून घडते. निसर्ग हे देखील असेच एक माध्यम, 'गोंदण'मधील 'हे एक झाड आहे' ह्या कवितेतून देखील कवयित्री वात्सल्य भावाने पाहात आहे असे वाटते.

हे एक झाड आहे — याचे माझे नाते
वाऱ्याची एकच झुळूक दोघांवरून जाते

इथे जरी जीवनविषयक चिंतन असले तरीदेखील निश्चितपणे मातेचा वात्सल्यभाव कवयित्रीला झाडामध्ये दिसत असावा. म्हणूनच ते झाड तिच्या मनात भरते. त्याचे आणि आपले काही नाते आहे असे त्यांना जेव्हा वाटते तेव्हा ह्या झाडापासून आपली निर्मिती झाली आहे आणि आपल्यातही असेच एक झाड आहे याची त्यांना जाणीव झाल्याशिवाय राहात नाही.

पहिल्यानेच याची मोहरताना फांदी
ठेवली होती बाळगाणी याच्या कटिखांदी

ह्या झाडाच्या साक्षीने तिने आपली बाळगाणी गायिली आहेत. त्यामुळे हे झाड म्हणजे साक्षात् मातेचेच वात्सल्य कवयित्रीच्या मनाला देताना दिसते. हीच भावना थोड्याफार फरकाने 'पाळणा' ह्या कवितेतूनही व्यक्त होते.

पाहता पाहता खाली खाली जाते जमीन

मागेपुढे झुलत राहतो आकाशाचा पाळणा
जवळ जवळ येतो वर टांगलेला चांदण्याचा खेळणा

इथे 'चांदण्याचा खेळणा' ह्या शब्दाऐवजी जर 'चांदण्याचा झोळणा' असा शब्द असता तर तो अधिक औचित्यपूर्ण झाला असता. पण कवितेत काय असावे आणि काय नसावे हे सांगणे रसिकाचे काम नाही हेही खरे. ह्या पार्श्वभूमीवर कवयित्रीचे मन आकाशाच्या पाळण्यात झुलते. जमीन तिला आई वाटत असावी.

अशा प्रकारे निसर्गातील वात्सल्य कवयित्रीचे मन एखाद्या टिपकागदासारखे टिपून घेते. प्रा. मालती किर्लोस्कर म्हणतात, 'इतर कवयित्रींप्रमाणे अपत्य वा वात्सल्यगीते हा शान्ताबाईंचा काव्यविशेष म्हणता येणार नाही.'[२] असे असले तरीदेखील शान्ताबाईचे स्त्री-मन ह्या ना त्या रूपात वात्सल्याचा शोध घेते, हे मात्र नाकारता येणार नाही. त्यांच्या आत्मलक्ष्यी उत्स्फूर्त कवितेत हे दर्शन जरी सकृतदर्शनी होत नसले तरी इतर तत्त्वचिंतनातून, निसर्गातून, व्यक्तिदर्शनातून हे मातृदर्शन या ना त्या प्रकारे घडत राहाते. मात्र त्यांच्या अंगाई गीतांमधून मातृभावनेचे विविध आविष्कार आविष्कृत होतात. त्यामागे कवयित्रीचे चिंतनशील स्त्री-मन झुलताना जाणवते. एक स्त्रीच दुसऱ्या स्त्रीचे मन जाणू शकते याची साक्ष त्यांची कविता अभ्यासताना पटत राहाते. त्यातही जेथे जेथे मातृभावनेची अभिव्यक्ती होते तेथे त्यांचे मातृभावनेबद्दलचे सूक्ष्म चिंतन अनुभवास येते व ह्या पार्श्वभूमीवरच त्यांच्या कवितेतील मातृदर्शनाचे प्रत्यंतर येते तेव्हा रसिकाच्या मनातही मातृभावनेचे विविध तरंग उमटल्याशिवाय राहात नाहीत.

(टीपा १ व २ : 'स्वप्नगात्री शांता शेळके' - डॉ. स. ग. यादव, पृ. ३१ व ३२)

❑

प्रा. सुहासकुमार बोबडे
मराठी विभाग, महिला महाविद्यालय, कराड ४१५ ११०
दूरभाष : (०२१६४) २०९३२

स्वागत

लोकपिय नाट्यगीते : संग्राहक - संपादक म. श्री. दीक्षित, पृष्ठे ६४.
काही शोधनिबंध : डॉ. आशा सावदेकर, ज्ञानेश प्रकाशन, नागपूर, पृष्ठे १७६.
जीवनगाणे : किरण जोगळेकर, अनंत प्रकाशन, कल्याण, पृष्ठे ६२.
सृजनाचा मोहोर : फादर फ्रान्सिस दिब्रिटो, निळकंठ प्रकाशन, पुणे, पृष्ठे १२६.
तिची वाटच वेगळी : मधु सावंत, संगत प्रकाशन, नांदेड, पृष्ठे १२४.
मधुकोष : राम कदम, शारदा प्रकाशन, पुणे, पृष्ठे ७२.
भुईरिंगण : राम कदम, शारदा प्रकाशन, पुणे, पृष्ठे १६८.
ओठांना फुटले पंख : उदर बरडे, प्रतिभास प्रकाशन, परभणी, पृष्ठे ११२.
प्रीती आणि प्रकाश : अनंत आठले, प्रकाशक - मालिनी आढळे, पृष्ठे ९८.

अनुक्रमणिका

संत कवयित्रींनी जोपासलेले स्त्रीत्व

❑

नंदा सुर्वे

❑

आपल्या महाराष्ट्राला संतकवींची जी मोठी परंपरा लाभली त्यात संत कवयित्रींचं स्थानही लक्षणीय आहे. मराठी स्त्री-संतांच्या रचनांमधून त्यांचे अनेकपदरी मनोविश्व उलगडलं गेलं आहे. त्यातून जसं त्या कालप्रवाहाचं प्रतिबिंब पडलेलं दिसतं तसं त्या रचनाकार स्त्रीच्या मनोव्यापारांचंही दर्शन होतं. कारण काव्याचा जन्म आत्मसाक्षित्वातून होत असतो. कोणत्याही विचारांचा, कल्पनेचा अंतर्मनाला स्पर्श झाल्याशिवाय काव्योत्पत्ती होणार नाही. कौटुंबिक ताणतणावांनी त्रस्त आणि ग्रस्त असलेलं त्या काळांतलं स्त्री-जीवन काव्यबद्ध झालं ते अध्यात्माच्या बैठकीवर. कारण थेट अभिव्यक्तीचा तो काळच नव्हता. मनातल्या असंतोषाला अध्यात्माचं कोंदण घालून काव्यनिर्मितीचा रास्त मार्ग त्यांनी पत्करला. एका प्रकारे मनातल्या मुक्ततेसाठीचा तो अंतर्लढाच होता. भक्तिमार्गे ही त्यांची जणू अनुच्चारित चळवळच होती.

या बहुतांश संत कवयित्रींनी सामान्य माणसाचं प्रतिनिधित्व करणारं काव्य जन्माला घातलं. त्यांच्या दैनंदिन जीवनातलं दुःख, कारुण्य, स्वतःची झिडकारलं गेल्याची खंत, कुचंबणा, घुसमट यातून दिशापालट करण्यासाठी या कवयित्री भक्तिरचना करत गेल्या. ईश्वराशी जवळीक साधणाऱ्या या अभंगरचनांमध्ये स्वतःला रमवत गेल्या. आपल्या दुःखमय, कष्टमय आयुष्यावर स्वतःच फुंकर घालायचा हा त्यांचा प्रयत्न होता. त्यांची काव्यनिर्मिती हा मुक्तीच्या वाटेवरचा पहिला उद्‌गार असावा. फक्त त्यांना तो छुपेपणानं काढावा लागला.

या संत कवयित्रींना वाट दाखवणारं कोणीही नव्हतं. ईश्वरच त्यांचा वाटाड्या. त्यांच्या श्रद्धाच तशा होत्या. त्यांना अन्य कोणी मार्गदर्शक नकोही होता. आत्मशोध ही त्यांची मुक्तीच्या वाटेवरची पहिली पायरी. त्यासाठी भक्तिमार्ग हा त्यांना विश्वासाचा वाटला. स्वतःसाठीही आणि इतरांसाठीही. सामाजिक अर्थानही तो रास्त मार्ग होता. त्यामुळे निःशंक मनानं भक्तिमार्गाची वाट धरली. त्यांच्या भक्तिकाव्यातून त्यांची जी जीवनदृष्टी दिसते, त्यांना जे प्रश्न पडलेले दिसतात त्यामधून समानतेचं भाष्य, व्यक्तिगत स्वातंत्र्याचं भाष्य त्यांनी केलेलं दिसतं. भक्तिमार्ग हा या कवयित्रींना मोठाच आधार सापडल्यासारखं झालं असावं. त्यांच्या बंदिस्त जीवनाला वाचा फोडण्यासाठी अन्य माध्यम नव्हतं आणि ईश्वरचरणी काहीही ठेवावं अशी जी समाजधारणा होती ती त्यांना या अर्थानं सोयीची झाली. ईश्वराकडे त्यांनी अभिजनाच्या रूपातच पाहिलं. त्यामुळे अन्य आधाराची त्यांना गरजही वाटली नसावी.

या संत कवयित्रींना अभिप्रेत असलेली समानता फक्त लिंगभेदाचीच नव्हती तर वर्गभेदाची-वर्णभेदाचीही असावी. त्यासाठी त्यांनी शांततेनं जाण्याचा भक्तिमार्ग निवडला. त्यात त्यांचा

कोणताही अभिनिवेश नव्हता. मनातला निषेध नोंदवण्याचं ते एक योग्य माध्यम होतं. त्यांचं काव्यलेखन फार अर्थपूर्ण, आशयधन असं होतं. त्यांना अनेक चाहते मिळाले. हे काव्य भक्तिरूपातलं असल्यानं हे चाहते म्हणजेच भक्तपरिवार. असा भक्तपरिवार निर्माण करण्याचं सामर्थ्य त्या कवयित्रींमध्ये होतं. त्यामुळे त्यांनी स्वत:चं असं स्थान निर्माण केलं होतं हे स्पष्ट होतं. संत मुक्ताबाई, संत बहिणाबाई यांना विद्वान वडिलांचा वारसा लाभला होता. संत जनाबाईंना ते भाग्य लाभले नव्हते. पण संत नामदेवांच्या घरात त्यांची आसरण होती. त्यामुळे त्यांचं काव्य ताकदीचं होतं.

भक्ती ते कठीण, इंगळाची खाई

भक्तिमार्गाने विठ्ठलाशी अद्वैताचं नातं जोडणाऱ्या जनाबाई भक्तीची वाट किती अवघड आहे हे जाणतात. विठ्ठल हे त्यांचं आराध्य दैवत. त्यांचं तन-मन तिथेच ओढ घेई.

नाम विठोबाचे घ्यावे
मग पाऊल टाकावे
नाम तारक हे थोर
नामे तारिले अपार

आपला भार विठ्ठलावर टाकण्याइतकी अपार श्रद्धा तर त्यांच्याजवळ होतीच, शिवाय 'नामे तारिले अपार' मध्ये त्या स्वत:च्या दु:खमुक्ततेचा हुंकार नोंदवतात.

जनाबाईंना अगदी लहान वयात म्हणजे त्या पाच सहा वर्षांच्या असताना त्यांच्या आईवडिलांनी त्यांना संत नामदेवांच्या वडिलांकडे नेलं. त्या दामाशेट्टींनी आपल्या कन्येवत् लहानग्या जनाबाईला सांभाळलं. दामाशेट्टी विठ्ठलभक्त होते. ते नेमानं पंढरपूरला जात. तेव्हा जनाबाईलाही बरोबर घेऊन जात. जनाबाईलाही विठ्ठलाची ओढ लागली. अशिक्षित असूनही तिला अभंगरचना करता येऊ लागली. जनाबाईला संतपद प्राप्त झालं. बघता बघता जनीची संत जनाबाई झाली. या जनाबाईच्या नावावर तीनशेच्या वर अभंग असल्याचे उल्लेख सापडतात.

दळिता कांडिता तुज गाईन अनंता

असं त्या म्हणतात. इतकं तादात्म्य पावणाऱ्या जनाबाई अधूनमधून तत्त्वप्रधान अध्यात्माचाही विचार करतात.

सत्व रज तमे असे हे बांधिले
शरीर दृढ झाले अहंकारे
सांडी अहंकार, धरी दृढभाव
हृदयी पंढरीराव धरूनिया

त्यांनी अतिशय आपुलकीनं विठ्ठलाला 'पंढरीराव' म्हटलंय. या पंढरीरावांचा विरह असह्य झाला की जनाबाई व्याकुळ होऊन म्हणतात.

वाट पाहते मी डोळा
का गा न येसी विठ्ठला?

किती आर्ततेनं त्या साद घालतात! अंगावर रोमांच उठावेत अशी ही आर्तता. जनाबाई

का बरं एवढी आतुरतेनं वाट पहात असतील? त्यांना काय सांगायचं असेल विठ्ठलाला? त्यांच्या पंढरीरावाला? त्यांच्या मनात काय खदखदत असेल?

इतर संत कवयित्रींपेक्षा जनाबाईचे आयुष्य वेगळं आहे. त्यांच्या समस्याही वेगळ्या. त्यांची धडपड वेगळी. आपलं शूद्रत्व, दास्यत्व, स्त्रीत्व हे अडसर ओलांडत ओलांडत तिनं संतत्व प्राप्त केलं.

शूद्र जातीची म्हणून तिला मंदिरप्रवेश नव्हता.

मज ठेवियले दारी, नीच म्हणोनी बाहेरी
मज टाकियेले परदेशी, नारा विठा तुजपाशी॥

आपली वेदना ती व्यक्त करते. तिचा दबलेला हुंदका शब्दावाटे बाहेर पडतो. ती आळवणी करते. म्हणते —

तुजवीण रे विठ्ठला, कोणी नाही रे मजला
आपुली म्हणवुनी, आपंगावी दासी जनी

स्वत:चं एकाकीपणाचं, उपेक्षेचं दु:ख हलकं करण्याचा प्रयत्न त्या करतात. आपल्या एकटेपणातलं भय निघून जाण्यासाठी त्या सोबत म्हणून विठ्ठलाला साद घालत रहातात. आपलं दु:ख निवारण्याचा त्या प्रयत्न करत राहतात. हा त्यांचा एकाकी लढाच होता. त्यातूनच अभंगांच्या निर्मितीमुळे जनाबाईंचा प्रवास सामान्यत्वाकडून असामान्यत्वाकडे झाला.

संत निर्मळा यांच्या वाट्यालाही उपेक्षित जिणं आलं. संत चोखामेळा यांची ही सख्खी बहीण. त्यांनाही विठ्ठलाचा ध्यास लागला होता. जो अनाथांचा नाथ आहे, ज्यानं अनेकांचा उद्धार केला आहे तो विटेवरचा पांडुरंग हाच तिचं धन आहे. चोखोबांप्रमाणेच निर्मळेलाही समाजाचे चटके सहन करावे लागले. त्यातून निर्माण झालेला प्रपंचाचा वीट तिच्या अभंगातून ठायी ठायी दिसतो. दारिद्र्यानं पिडलेला संसार आणि समाजाकडून होणारी अवहेलना हे तिचं अपार दु:ख होतं. त्यातून 'चहूकडे देवा दाटला वणवा' असा अनुभव तिनं मांडलाय. भौतिक संसाराचा तिला आत्यंतिक उबग आला होता. संसारात अणुमात्र सुख नसल्याचा अनुभव ती पचवत चालली होती. या प्रापंचिक चटक्यांमधून मुक्त होण्यासाठी तिनं पांडुरंगाला साकडं घातलं. असल्या त्रस्त करणाऱ्या संसाराचा पाश विठ्ठलानं तोडावा म्हणून ती आळवणी करत राहिली.

निर्मळा म्हणे तारा अथवा मारा,
तुमचे.तुम्ही सारा बोझे आता

संत बहिणाबाई या मराठवाड्यातल्या वेरूळजवळच्या देवगाव इथल्या. यजुर्वेदी, देशस्थ ब्राह्मण कुळातल्या. वडील आऊजी कुलकर्णी. आणि त्यांचं लग्न झालं होतं रत्नाकर पाठक नावाच्या बिजवर ज्योतिषाशी. दोघांच्या वयात खूप अंतर २७ वर्षांचं. त्यानाही प्रापंचिक जाच फार. त्यामुळे तो नीरस वाटू लागला. दारिद्र्यानं त्यांच्या संसाराला गांजलं होतं. केवळ भक्तिमार्गाकडे वळल्यामुळे त्या ते हलाहल पचवू शकल्या.

बहिणी म्हणे चित्त कासाविस
संसाराचा त्रास बहु झाला.

बहिणाबाईंचं वेदनागर्भ मन भक्तिरसात गुंतत गेले. अभंगलेखनानं त्या आपलं मन थोडं थोडं मोकळं करत गेल्या. शरीरभोगाबद्दल त्या लिहितात —

स्त्रियेचे शरीर पराधीन देह
न चाले उपाव विरक्तीचा
शरीराचे भोग वाटतात वैरी
माझी कोण करी चिंता आता

बहिणाबाईंच्या मनातले असे विचार किती प्रबळ होते, हे यावरून दिसतं. मनाविरुद्ध सोसावं लागण्याची वेदना बोलून दाखवण्याइतका निर्भीडपणा या मनस्विनीजवळ दिसतो. म्हणजे आज स्त्री-मुक्तीच्या संदर्भात, आपल्या मनाविरुद्ध पतीनं शरीरसंबंध केला तर तो बलात्कार समजावा, त्याचा निषेध करावा म्हणून आवाज उठवला जातो, स्त्री-मन सजग केलं जातं. त्याच कृतीची बीजं बहिणाबाईंच्या या निषेधदर्शक भूमिकेत दिसतात. पण तिला तिच्या मनातला हा धगधगता प्रश्न तसाच दाबून ठेवावा लागला. तसाच सोसावा लागला. प्रतिगामी काळाची अगतिकता तिच्यात दिसते.

अशा प्रतिकूल वातावरणामुळे बहिणाबाई प्रपंचाशी कधी मनानं बांधल्या गेल्या नाहीत. त्यांचा हा झगडा खरं म्हणजे प्रपंचाशी आहे म्हणण्यापेक्षा तो स्त्रीत्वाचा झगडा आहे. वयात एवढं मोठं अंतर असलेला, वृत्तीनं तापट, मारकुटा नवरा असेल, तर त्यांच्यात कुठून प्रेमभावना निर्माण होणार? आणि जिथे ही प्रेमभावना नाही, तिथे शारीरिक जवळीकही नको ही जाणीव शब्दबद्ध करणारी ही स्त्री म्हणजे क्रांतिकारक संतीणच म्हणायला हवी!

लाधले नरदेह स्त्रियेचेनि रूपे
असंख्यात पापे फळा आली

आपला स्त्रीदेह हाच बहिणाबाईंना आत्मदोष वाटतो. पुढे त्या म्हणतात —

बहिणी म्हणे ऐसा स्त्रीदेह घातकी
परमार्थ या लोकी केवि साधे
भोगणे न चुके ब्रह्मादिका दु:ख
इतर हे रंक कोण तेथे?
बहिणी म्हणे माझ्या देहाचे प्रारब्ध,
ऐसिया गोविंद काय करी?

बहिणाबाईंनी आपले दु:खभोग, देहभोगाची अगतिकता भक्तिरसात डुबवण्याचा प्रयत्न केला. त्यांचा आत्मविवेक सतत जागा असल्याचं दिसतं. स्वत:ला सावध ठेवत त्या म्हणतात —

विवेक वैराग्य सापडले मज
आता मना तुज कोण पुसे

धरुनी आणीन करीन ध्यानस्थ
होईल तो अस्त इंद्रियांचा

परिस्थतीचं भान त्या सांभाळताना दिसतात. ईश्वरभक्ती हे बहिणाबाईंच्या नीरस जीवनातलं सामर्थ्य ठरतं. प्रपंचाचे चटके खाताना मन विरक्तच होऊन गेलं होतं. मग आंतरिक समाधानाचं साधन काय, तर ईश्वरभक्ती. तिनं त्यांना तारलं. आयुष्याकडे पाहण्याचे वेगवेगळे अर्थ त्यांना लागत गेले.

संत कवयित्रींच्या मांदियाळीत संत कान्होपात्रांचा विशेष उल्लेख करायला हवा. कारण अगदी वेगळ्या, समाजबाह्य पार्श्वभूमीवर त्या जन्माला आल्या. संघर्षाच्या फळ्या पाडत पाडत त्या संतपदावर जाऊन पोहोचल्या. त्यांनी संतकाव्यामध्ये मोलाची भर घातली आहे. अप्रतिम लावण्य लाभलेली ही संतीण मंगळवेढ्याची. 'श्यामा' नावच्या वेश्येची, नृत्यांगनेची ही कन्या. तिनं आत्मोद्धारासाठी भक्तीची वाट धरली. आपलं जन्मगाव मंगळवेळा सोडून ती पंढरीनाथांच्या दारी येऊन विसावली. तिनं पांडुरंगाला जी आर्त साद घातली आहे, त्यानं कोणाचंही काळीज हेलावून जाईल. ती म्हणते —

जीवीचे जिवलगे माझे कृष्णाई कान्हाई
सावळे डोळसे करुणा येऊ दे काही

कान्होपात्रेच्या लावण्यावर मोहित होऊन बिदरच्या मोगल सम्राटाचे दूत तिला घेऊन जाण्यासाठी आले. पण तिनं पांडुरंगाचा आश्रय घेतला. स्वतःला बंदिस्त करून घेतलं. आपला देह तिनं विठ्ठलचरणी अर्पण केला. ती भावव्याकुळ होऊन, आत्मरुदन करत विठ्ठलाला म्हणते,

अगा वैकुंठीच्या राया, अगा विठ्ठला सखया
अगा नारायणा, अगा वसुदेव नंदना
अगा पुंडलिक वरदा, अगा विष्णू तू गोविंदा
अगा रखुमाइच्या कांता, कान्होपात्रा राखी आता

कान्होपात्रेला जे उपेक्षित जिणं जगावं लागलं, त्यातून तिला मुक्तता हवी होती. मुक्ततेचा तत्कालीन मार्ग म्हणजे फक्त भक्तियोग. आपल्याला हीन-दीन आयुष्याचे जे चटके सोसावे लागले, त्या पार्श्वभूमीवर कान्होपात्रेनं करुण शब्दांत म्हटलंय —

दीन पतित अन्यायी, शरण आले विठाबाई
ठाव देई चरणापाशी, तुझी कान्होपात्रा दासी

आपलं पूर्वायुष्य विसरण्यासाठी कान्होपात्रा सतत ईश्वराला विनवणी करत राहिली.

आता पंढरीनाथा नका पाहू अंत
आला तो आघात निवारावा
म्हणोनी कान्होपात्रा येत लोटांगणी
वारंवार विनवणी करीतसे

कान्होपात्रा आयुष्यभर उदासच राहिली. तिला समाधानाचं आयुष्य लाभलंच नाही. तिला

असल्या दुखऱ्या जिण्यातून सुटका हवी होती. पण ते तिच्या कपाळी लिहिलं नव्हतं. तिचं विषण्ण मन अगदी टोकावर पोहोचलं, की ती आत्मशरण होऊन म्हणे —

नको देवराया अंत आता पाहू
प्राण हा सर्वथा फुटो पाहे
मोकळोनी आस जाहले उदास
घेई कान्होपात्रेस हृदयात

कोणत्याही सहृदय माणसाच्या अंत:करणात कालवाकालव करणारे हे कान्होपात्रेचे शब्द. 'संचित माझे खोटे मज असे ग्वाही, तुम्हा बोल नाही, देवराया' असेही ती म्हणते. कारण 'लागला तो पाठी काळाचा दरारा' हेही ती जाणते.

संत मुक्ताबाई ही प्रखर ज्ञानवती, तेजस्विनी. त्यांचं काव्यलेखन परमार्थावर आधारित. त्यामध्ये वैश्विकता व्यापून राहिलेली आहे, हे जाणवत राहतं. त्यांच्या संयमी, सोशिक जीवनाचा वेध घेतला, तर त्यातली सखोलता जाणवते. मुक्ताबाई ही अध्यात्मवादी अभंगरचना करणारी एक अलौकिक संत स्त्री. आपल्या अध्यात्माच्या सामर्थ्यावर मुक्ताबाईनं ज्ञानदेव, नामदेव, चांगदेव या संतांना मार्गदर्शन केल्याचं सांगितलं जातं.

निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई यांना समाजबहिष्कृत जीवन जगावं लागलं. त्यातून त्यांना जे एकाकीपण तुटलेपण आलं, उपहास सोसावा लागला. त्यामुळे मुक्ताबाईंना अकाली प्रौढत्व आलं आणि त्याची परिणती त्यांच्या अभंगरचनेत आलेल्या जडपणात दिसते. त्या ज्ञानोपासक होत्या. व्यक्तिगत व बाह्य जगाकडे पाठ फिरवून त्या ज्ञानानुभावाला सामोऱ्या गेल्या.

आधी तू मुक्त होतास रे प्राणिया
परि वासने पाषीणिया नाडिलासी
आधीचे आठवी मग येई परी
हरिनाम जिव्हारी मंत्र सार

नाममहिमा जाणणाऱ्या मुक्ताबाई पुढे म्हणतात —

वेदे बोलियले ब्रह्मार्पण भावे
सदा मुक्त व्हावे अरे जना
मुक्ताई मुक्त हरिनाम सेवित
अवघेची मुक्त सेविता हरी

मुक्ताबाई तिच्या अभंगातून ज्ञानांकित होण्याचा प्रयत्न करताना दिसते. लहानपणापासूनच परिस्थितीचा दाह सोसल्यानंतर तिच्या भावविश्वाला तडा गेला. त्यामुळे तिच्या रचनेतून ती भावांकित होताना सहसा दिसत नाही. एकप्रकारच्या निर्विकारपणाचं सावट पडल्यासारखं दिसतं. त्यामुळे तिची रचना अध्यात्माकडे वळते. त्यामध्ये एक प्रकारचं प्रबोधनकारित्व प्रत्ययाला येतं.

तिच्या विवेकी, संयत मनाचा प्रत्यय तर सतत येत राहतो. 'ताटीच्या अभंगांमध्ये तिच्या

प्रगल्भतेची साक्ष पटते.

योगी पावन मनाचा
साही अपराध जनाचा
विश्व रागे झाले वन्ही
संत सुखे व्हावे पाणी
शब्द शस्त्रे झाले क्लेश
संती मानावा उपदेश
विश्वपट ब्रह्मदोरा
ताटी उघडा ज्ञानेश्वरा

इथे मात्र मुक्ताबाई भावुकतेनं, आपुलकीच्या नात्यानं मोठ्या भावाला समजुतीच्या शब्दांत सांगते. 'कोणी कोणा शिकवावे, सार सोधूनिया घ्यावे' या ओळीतून तिच्या धाकटेपणाच्या आत्मजाणिवा दिसतात.

मुक्ताबाईचं धाकटेपण, लहानपण हे केवळ म्हणण्यापुरतं. सामाजिक जाचानं हे लहानपण केव्हाच गळून पडलं होतं. वयाची कोवळीक, त्या कोवळीकीतलं फुलून येणं हे तिच्या अनुभवास कधी आलंच नाही. चैतन्याचा मोहोर कधी फुललाच नाही. त्यामुळे तिच्या भावसंवेदना गोठल्यासारख्या झाल्या. मग कुठल्या स्त्री-मनाच्या जाणीवा आणि कुठली आत्मोन्नती? आपल्या बहिष्कृत जीवनातून बाहेर पडण्यासाठी किंवा त्यावर मात करण्यासाठी तिला अध्यात्ममार्ग घ्यावासा वाटला. 'या आत्मज्ञानाच्या वाटेवरच तिला खरी मुक्ती सापडली' असं डॉ. इंदुमती शेवडे आपल्या ग्रंथात म्हणतात.

मुक्तावाईचा जीवनप्रवास भावजन्य न होता तो ज्ञानजन्य झाला. समाजाकडे पाठ फिरवून तिनं स्वत:चं आयुष्य स्वत:च्या बुद्धिमापनातच तोललं.

एकंदरीनं या संत कवयित्रींनी मुक्ततेसाठी अशी भक्तीचळवळ उभी केल्याचं दिसतं. त्यांना आपल्या वेगळेपणाची जाणीव होती. त्यातून त्यांचं स्वत:चं स्वतंत्र अस्तित्व प्रस्थापित होत गेलं. त्यांचा तसा हेतू नव्हता. त्यांना फक्त आपल्या व्यथेला, आपल्या सोसलेपणाला मोकळी वाट करून द्यायची होती. आपलं गाऱ्हाणं त्या ईश्वरापुढे मांडत गेल्या. म्हणजे अन्यायाविरुद्ध वाच्यता करून (अभंगरूपात) स्त्रीमुक्तीची बीजंच जणू त्यांनी पेरून ठेवली. यातूनच स्त्री-साहित्य उदयाला आलं. स्त्री स्वतंत्रपणे विचार करू शकते, ती ते मांडू शकते या तिच्या सामर्थ्याचा तो शुभारंभच म्हणायला हवा. कारण त्यांची अभंगरचना म्हणजे लिखित मराठी स्त्री-साहित्याचा पहिला फुलोरा म्हणावा लागेल.

या अभंगरचनेमुळे रोजच्या रामरगाड्यातून पिचून निघत असतानासुध्दा एक प्रकारची आंतरिक शांती लाभत असावी. त्या ज्या भक्तिरचना करत होत्या, त्यामध्ये दैनंदिन जीवनातली सुखदु:ख, अडचणी, आघात यांचा अंतर्भाव असे. ईश्वर हाच दु:खाचा निर्वाहक म्हणून त्यांच्या चरणी त्या आश्रय घेत गेल्या.

या कवयित्रींच्या रचनेत स्त्रीत्वाच्या व्यथा अनिवार्यपणे येतात. त्यांना आपल्या घराचा,

कुटुंबाचा त्याग करता येत नव्हता. म्हणून आपल्या या बंदिस्त जीवनाला छेद देण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या भक्तिरचनेतून केलेला दिसतो.

या भक्तिरचना अत्यंत भावसंपन्न आहेत. यात ईश्वराला उद्देशून वापरलेली स्त्रीसुलभ वेगवेगळी संबोधनं, विशेषणं, सुंदर सुंदर प्रतिमांचा वापर हे गुणविशेष दिसतात. आपल्या मनोव्यथा सांगताना त्या आदर्श, शुद्ध, निकोप जीवनपद्धतीचं सूत्रच जणू सांगतात.

या संत कवयित्रींच्या समस्त अभंगांमधल्या भाषेचं एक वैशिष्ट्य म्हणजे, या कवयित्रींच्या अंतरंगातले आस्थादर्शक शब्द त्यातून आविष्कृत झालेले दिसतात. हे वेगळेपण स्त्रीकाव्यातच दिसू शकतं. 'अगा', 'कागा', 'बछडे', 'छकुडे' असे ध्वनीयुक्त शब्द ममत्वाचं गहिरेपण सांगतात. स्त्री-मनाचं हे साक्षात उदाहरणच. लोकभाषेच्या माध्यमातून हे शब्द अधिक गोडवा घेऊन येतात.

एका महत्वाच्या गोष्टीची नोंद घ्यायला हवी. ती म्हणजे, या संत स्त्रियांना काव्य-निर्मितीच्या ऊर्मी येत गेल्या. म्हणून त्यांना आपल्या मनोवेदना मांडता आल्या. आणि त्यायोगे आपल्या समस्या थोड्या थोड्या हलक्या करता आल्या. या काव्याच्या माध्यमातून त्यांनी स्वस्तरावर जो लढा दिला, तो भविष्यकाळासाठी प्रेरक ठरला. आजची स्त्री छुपेपणानं न लढता उघड उघड लढताना दिसते आहे. ती कशामुळे? पूर्वस्रोत कधी मिटत नाहीत. ते अधिक जोमदार, अधिक ठसठशीत होताना दिसतात. संत कवयित्रींकडून उभ्या राहिलेल्या चळवळीचं हे यश! ठसठशीतपणा घेऊन आलेलं!!

याचा असा मुळीच अर्थ नाही की, आजच्या स्त्रीवादाच्या संत कवयित्री या प्रत्यक्ष जननी आहेत.

काळ आणि काळानुरूप बदलत गेलेल्या स्व-पर-जाणिवा लक्षात घेतल्या, तर असे म्हणणे केवळ अभिनिवेशापोटी सत्य ठरू शकेल. पण सर्वमान्य अशा भक्तिमार्गी अद्वैताचे तत्त्वज्ञान सांगतानाही या संतिणींनी आपले स्त्रीत्व जपले, ही मोलाची गोष्ट आहे.

मुळात आत्माविष्काराचे त्यांनी दाखविलेले धैर्यच महत्त्वाचे आहे. तसेच त्यांच्या लेखनातील स्वत:च्या स्त्रीत्वाच्या बिंदूची जाणीवही महत्त्वाची आहे. पुढे बदलत्या कालानुरूप या बिंदूने प्रवाहाचे रूप घेतले. फुले, आगरकर आदींच्या तत्त्वयोजनेमुळे त्याला प्रवाहाचे रूप प्राप्त झाले. म. गांधीजींच्या प्रयत्नाने त्याची नदी झाली आणि नंतर बेताबेताने आजवर त्याला महानदीची तात्त्विक खोली व विस्तार प्राप्त झाला, असे तार्किक अनुमान मानता येईल. हा एका दृष्टीने स्वत:च्या स्वतंत्र अस्तित्वाच्या शोधाचा, आत्मसामर्थ्याच्या जाणिवेपर्यंतचा विस्तारच म्हणता येईल. त्याचे विवरण वा निरूपण करताना अप्रत्यक्ष आद्यबिंदू असणाऱ्या संत-कवियित्रींचा विसर पडू नये आणि नव्या संशोधनाला रस्ता दाखवावा म्हणून हा प्रयत्न!

❑

नंदा सुर्वे
'आनन्द-रंग', २७/३ हिंगणे खुर्द, सिंहगड रस्ता, पुणे ४११ ०५१.
दूरध्वनी : ४३५९०८८

‘शौर्यगाथा सौराष्ट्राची’ या अनुवादाची कहाणी

❑

अंजनी नरवणे

❑

(१९ एप्रिल २००२ रोजी ‘श्री. ल.स.केळकर, पुणे ४११ ००४ पुरस्कृत कै. स. ह. मोडक अनुवाद पुरस्कार’ स्वीकारताना अनुवादिकेने व्यक्त केलेले मनोगत.)

नमस्कार! आपलं नवं वर्ष नुकतंच सुरू झालं आहे, तेव्हा सर्वप्रथम आपणा सर्वांना नव्या वर्षांच्या शुभेच्छा!

आयुष्याची ऐन उमेदीची म्हणतात ती पंचेचाळीस वर्षं महाराष्ट्राबाहेर घालवल्यानंतर चार वर्षांपूर्वी पुन्हा महाराष्ट्रात येऊन स्थायिक होताना आमच्या मनामध्ये धाकधुक होती. वडोद्यातील नातलग, स्नेहीमंडळी सर्व नाराज होती, कारण आता ह्या वयात परत जाऊन पुन्हा जुन्या मातीत रुजता येणार नाही, हरवल्यासारखं वाटेल, वगैरे-वगैरे काळज्या आमच्याबद्दल त्यांना वाटत होत्या. पण तसं काही झालं नाही. मूळचे इथलेच असलेले आम्ही सुखेनैव इथं परत रमलो; एवढंच नाही, तर आमच्या त्या दुसऱ्या कर्मभूमीतून मायभूमीत बरोबर आणलेली आमची काही कामही इथं रुजली, फोफावली. दुसरी मातृभाषा असल्याइतक्या जवळच्या झालेल्या गुजराती भाषेतल्या निवडक साहित्याचे मराठी अनुवाद करण्याचं तिथे अलीकडेच सुरू केलेलं काम इथेही जोमानं वाढत आहे. एका वेगळ्या मातीतलं साहित्य मराठी वाचकांपर्यंत पोहोचवण्याची इच्छा पुरी होत आहे.

आज महाराष्ट्र साहित्य परिषदेसारख्या प्रतिष्ठित संस्थेकडून हा पुरस्कार शंकर सारडांसारख्या प्रख्यात समीक्षकाकडून स्वीकारताना अतिशय समाधान वाटत आहे. पुरस्कार ज्या पुस्तकासाठी मिळाला आहे, त्या पुस्तकाचं आणि मूळ लेखकाचं नाव गुजरातमध्ये फार मोठं आहे आणि म्हणून ह्या अनुवादाची दखल घेतली गेली, त्याचा विशेष आनंद आहे.

‘शौर्यगाथा सौराष्ट्राची’ ह्या पुस्तकाचं मूळ नाव ‘सोरठ तारां वहेतां पाणी’ आणि मूळ लेखक झवेरचंद मेघाणी. झवेरचंद मेघाणी हे एक विलक्षण व्यक्तिमत्त्व होतं. जाज्ज्वल्य देशभक्त, उत्तम वक्ते, लोकोत्तर कवी आणि प्रतिभावान कादंबरीकार असं हे अजब मिश्रण होतं. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात त्यांची भाषणं ऐकण्याचं भाग्य लहानपणी ज्यांना लाभलं, अशी माणसं आजही अतिशय आदरानं, कौतुकानं त्यांची आठवण काढतात. त्यामुळं साहित्य अकादमीचं जेव्हा पत्र आलं की, झवेरचंद मेघाणींच्या ‘सोरठ तारां वहेतां पाणी’ ह्या कादंबरीचा अनुवाद तुम्ही कराल का, तेव्हा मी असंच उत्तर लिहिले की, हा अनुवाद करायला मिळाला तर मी स्वत:ला भाग्यवान समजेन, आणि मोठ्या उत्सुकतेनं पुस्तक हाती पडण्याची वाट बघू

लागले.

नंतर मात्र, काही मजेदार, काही चक्रावून टाकणाऱ्या, तर काही थक्क करून टाकणाऱ्या घटना घडल्या. ज्या दिवशी अकादमीचं करारपत्र माझ्या हाती पडलं, त्याच दिवशी रात्री दुसऱ्या एका पुस्तकाच्या संदर्भात, गुजराती साहित्य परिषदेचे कार्यवाह रमेश दवे ह्यांना फोन केला. कामाचं बोलणं संपल्यावर ते म्हणाले, ''मेघाणींच्या सोरठ तारा - चा अनुवाद तुम्ही करताय हे समजलं, आनंद झाला!'' म्हटलं, ''तुम्हाला तिथं अहमदाबादमध्ये कसं काय कळलं? आज तर कुठं करारपत्र आलंय!'' तेव्हा त्यांनी सांगितलं, की मला पाठवण्यासाठी पुस्तकाची एकही प्रत अकादमीला कुठेच मिळत नव्हती. अहमदाबादच्या गुजराती साहित्य परिषदेच्या ग्रंथालयात ती मिळाली; त्याची झेरॉक्स प्रत त्याच दिवशी केली होती आणि ती माझ्याकडे येणार होती! ह्या गमतीदार योगायोगानंतर लवकरच त्या झेरॉक्स प्रतीचा जाडजूड सुट्या कागदांचा गठ्ठा माझ्याकडे येऊन पोहोचला!

कुठलंही पुस्तक अनुवाद करण्यापूर्वी निदान एकदा ते पूर्णपणे वाचावं लागतं, तसे मी ते कागद वाचायला घेतले आणि ताबडतोब दोन गोष्टी लक्षात आल्या. भाषा अतिशय प्रभावी, कथानक पकड घेणारं — अर्थात हे अपेक्षितच होतं, पण — भाषा साधी, सरळ, शुद्ध गुजराती नव्हतीच! कथानक विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या वर्षांमधल्या सौराष्ट्रातल्या खेड्यांमधलं! म्हणजे भाषा सौराष्ट्रातली तर असणारच. बऱ्याच जणांना हे ठाऊक नसेल की, गुजरात, सौराष्ट्र, काठेवाड, कच्छ, ह्या सर्व भागांमधल्या भाषांमधे फरक आहे. जसा तो आपल्याकडला महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या भागातल्या मराठीत आहे. परंतु इथं ह्या पुस्तकातली सौराष्ट्रातली गुजराती भाषा होती ८०-९० वर्षांपूर्वीची त्या भागातली बोलभाषा! तीही पुन्हा काही पात्रांच्या तोंडी खेडवळ भाषा! बरे, कुठलाही अनुवाद करताना अनुमानधपक्यानं करून चालत नाही. मुळात संपूर्ण अर्थ समजून घेऊन मगच त्याचा योग्य भाषा वापरून अनुवाद करता येतो.

तरीही वाटलं, की ठीक आहे; शब्दकोशाचा वापर जरा जास्त करावा लागेल. इथं दुसरा बाका प्रसंग आला! पुस्तकातले बरेच शब्द विशिष्ट प्रदेशातल्या बोलीभाषेतले असल्यानं, ते मुळी शब्दकोशात नव्हतेच! मुळात आधी गुजराती - मराठी असा फार चांगला शब्दकोशच नाही. धर्माधिकारींचा आहे तो खूपच त्रोटक, साध्या गुजरातीला फार अडचण येत नाही. पण ही भाषा तर खूपच वेगळी! आता हा प्रश्न सोडवणं आलं! ज्यांना सोरठी, काठेवाडी, कच्छी गुजराती येते अशा काही स्नेहीमंडळींना पत्र लिहून काही शब्दांचे अर्थ विचारले. पण फारच थोडा उपभोग झाला. फक्त ध्रुव भट्ट हे प्रसिद्ध गुजराती लेखक एक सन्मित्र आहेत, ते मूळचे त्या भागातले आणि खूपच अभ्यासू वृत्तीचे, त्यांनी बऱ्याच शब्दांचे अर्थ कळवले. तरीही बरेच शब्द अडलेले होते. काही वाक्यं वगळून ठेवत अनुवादाचं काम चालू होतं.

परमेश्वर कुठल्या रूपानं कशी मदत पाठवेल, ते सांगता येत नाही, ह्याची ह्या वेळी प्रचीती आली. आमच्या घरी काही सुतारकाम चालू होतं आणि त्यासाठी कामाला येणारे सुतार पुरुषोत्तमभाई वाढिया हे मूळचे सौराष्ट्रचे होते. एक दिवस मी सहज त्यांना विचारलं,

''वाढियाभाई तुम्ही सौराष्ट्रातले ना? मग तुम्ही झवेरचंद मेघाणींचं नाव ऐकलंय?'' हातातला स्क्रूड्रायव्हर खाली ठेवत ते म्हणाले, ''ऐकलंय? मी तर त्यांचं एकूण एक पुस्तक वाचलंय!'' आता थक्क होऊन हातातलं काम बाजूला ठेवायची पाळी माझी होती! तुम्ही?... ''बेन,'' ते म्हणाले, ''तरुण वयात मी शिक्षक होतो. वाचनाची खूप आवड. शाळेच्या लायब्ररीतून पुस्तक घेऊन यायचो, रात्री कंदिलाच्या उजेडात वाचून काढायचो. मेघाणींची सगळी पुस्तकं तेव्हा मी वाचली.'' ''पण मग हे सुतार काम?'' ''आमचा खरा धंदा सुताराचाच. शिक्षकाच्या कामाची आवड होती, पण नोकरी टेम्पररी होती, ती गेली. पुढे पोटामागे इकडे आलो आणि मग ह्याच कामाला लागलो. पण ते जाऊ दे. तुम्ही का विचारलंत मेघाणींबद्दल?'' मी माझी अडचण सांगितली. ''असं करूया, अडलेल्या शब्दांची यादी करून ठेवा. ज्या दिवशी हे काम संपेल, त्या दिवशी आपण बसू यादी घेऊन.'' आणि तसे ज़्या दिवशी बसलो, त्या दिवशी वाढियाभाईंनी एकदाही न अडखळता, बुचकळ्यात न पडता, चाळीस तरी शब्दांचे नेमके अर्थ, वेगवेगळ्या संदर्भासह, धडाधड सांगितले!

अनुवाद पूर्ण झाला, शीर्षकाचा प्रश्न आला. कधी कधी अनुवाद करताना मूळ शीर्षक तसंच ठेवलं जातं. विशेषतः इंग्रजी पुस्तकांच्या बाबतीत तसं केलं जातं. प्रांतीय भाषांमध्ये मूळ नावाचा समर्पक अनुवाद करता आला तर ठीकच, नाहीतर कथेला अनुरूप असं वेगळं शीर्षक निवडावं लागतं. ह्या पुस्तकाच्या बाबतीत तसं निवडणं भागच होतं. मूळ नाव 'सोरठ, तारां बहेतां पाणी', ह्याचा अर्थ होतो, ''हे सौराष्ट्रा, तुझा हा वाहता जलप्रवाह''. आता असं मराठी शीर्षक ठेवून तर काहीही अर्थबोध झाला नसता, कानाला विचित्र वाटलं असतं, लक्षवेधी तर होत नव्हतं. दोन तीन नावं सुचली. जीवनधारा सौराष्ट्राची इ. पण शेवटी 'शौर्यगाथा सौराष्ट्राची'' हे नावच मला आणि अकादमीच्या लोकांनाही योग्य वाटलं.

त्याचं कारण असं की, कथेतील वेगवेगळ्या व्यक्तींच्या, वेगवेगळ्या प्रसंगी दिसून आलेल्या शौर्याची ही गाथा आहे. पूर्वार्धातील कथानायक महिपतराम फौजदार ह्यांनी 'एजन्सी सरकार'च्या म्हणजे ब्रिटिश सत्ताधीशांच्या अन्यायाविरुद्ध लढण्याचं दाखवलेलं प्रचंड धैर्य; नोकरीवरून कोढून टाकण्यात आल्यावर गरिबीत, हालात दिवस काढून कोणापुढेही हात न पसरता स्वाभिमान कायम ठेवून मरण पत्करणं, तसेच रुखड शेठ. ज्यानं त्यांच्या आईबद्दल अपशब्द उच्चारले, त्याचा उघडउघड सांगून सवरून खून करून त्याबद्दल फाशीची शिक्षा पत्करणं; अन्यायाविरूद्ध लढा देण्यासाठी रुखड शेठच्या बायकोनं बंडखोर होणं आणि अशा कितीतरी व्यक्तीचे आणि घटनांचे आदर्श समोर ठेवून मोठा होत असतो महिपतराम फौजदारांचा नातू पिनाकी. तोही वेगवेगळ्या परिस्थितीशी आणि व्यक्तींशी लढा देतो. सत्तेपुढे गोंडा घोळणारे लहानमोठे संस्थानिक इथं भेटतातच, पण त्याच वेळी ब्रिटिश सत्ता झुगारून देण्यासाठी धडपडणारे आणि त्यापायी राज्य गमावणारे संस्थानिकही भेटतात. अशा अनेक पात्रांच्या अनेक तऱ्हेच्या शौर्यकथांची ही कहाणी आहे आणि म्हणून मला ती 'शौर्यगाथा सौराष्ट्राची' वाटते. आणि नाहीतरी आपल्या मराठी बाण्याच्या लढाऊ वृत्तीला शौर्यगाथांचं आकर्षण असतंच!

आणि शेवटी, अनुवाद कशासाठी, त्याविषयी थोडंसं. तर स्वतंत्र लेखन करत असतानाही

मी अनुवादांकडे वळले, कारण मला प्रकर्षानं असं वाटतं की, आपल्या देशातल्या, अनेक भाषा बोलणाऱ्या, रहाणी-करणी, राजकीय, सामाजिक, आर्थिक प्रश्न प्रत्येक प्रांतात वेगळे असणाऱ्या आणि तरीही एका देशाचे नागरिक असणाऱ्या माणसांनी एकमेकांना जास्त समजून घेतलं, तरच ह्या देशाला तरणोपाय आहे. राजकारणी लोकं जे काय करत आहेत ते करोत, आपणच आता एकमेकांना समजून घेऊन, आपापलं वेगळेपण टिकवून धरूनही एकजूट होणं फार जरूर आहे. साहित्याची देवाणघेवाण हा जवळ येण्याचा एक मार्ग आहे. कारण समाजाचं प्रतिबिंब साहित्यात पडत असतं. भाषांभोवतालची कुंपणं आता तोडली पाहिजेत.

पु. लं.नी ह्या संदर्भात एका ठिकाणी ह्या कुंपणाचं फार छान उदाहरण दिलं आहे आणि योगायोगानं ते झवेरचंद मेघाणींशीच संबंधित आहे. ते सांगतात, तो काळ १९४०-४२ चा होता. पूर्व आणि पश्चिम विलेपार्ले असे दोन भाग मधून रेल्वेचे रूळ गेल्यानं झाले होते, पण पूर्व भागात मराठी वस्ती जास्त आणि पश्चिम भागात गुजराती. भाषांची कुंपणं अशी काही पडली होती की, पूर्व विलेपार्ल्यात न. र. फाटकांसारखा अत्यंत विद्वान माणूस राहतो हे पश्चिम पार्ल्यात कोणाला ठाऊक नव्हतं आणि पश्चिम भागात झवेरचंद मेघाणींसारखा लोकोत्तर व्यक्तिमत्त्वाचा लेखक राहतो, त्याची गंधवार्ताही पूर्व पार्ल्यात कोणाला नव्हती! ही परिस्थिती आता तरी बदलली पाहिजे. शिवाय आपल्या देशातल्या भाषांमध्ये समृध्द, उत्तम साहित्याचा विपुल खजिना असताना केवळ भाषा न येण्यानं आपण उत्तम वाङ्मय वाचायला मिळण्याच्या निखळ आनंदापासून वंचित राहतो आहोत. अनुवाद हाच ह्यावर उपाय आहे.

तसंच आपलं उत्तम साहित्य देशभर आणि जगभर पोहोचवण्यासाठी त्याचे इंग्रजी अनुवादही झाले पाहिजेत. इंग्रजी ही आज एक जागतिक भाषा झालेली आहे. इंग्रजीत लिहिणारे भारतीय लेखकही आज दाद मिळवत आहेत, पण त्यांच्या पुस्तकांच्या तोडीची किंवा काही तर कांकणभर सरसही असलेली आपली अनेक पुस्तके मात्र मागे रहातात. कारण ती बाहेर कोणाला माहीतच नसतात! एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे की, आत्तापर्यंत साहित्यासाठी नोबेल प्राइज आपल्याकडे फक्त रविन्द्रनाथ टागोरांच्या 'गीतांजली'ला मिळालं; ते मुळात बंगालीत लिहिलेल्या गीतांजलीचा टागोरांनीच इंग्रजी अनुवाद केला, तेव्हा! मग मात्र जगानं दाद दिली!

शेवटी पुन्हा एकदा, महाराष्ट्र साहित्य परिषदेला मनःपूर्वक धन्यवाद!

❑

अंजनी नरवणे
रो हौस नं. ४, सुखनगरी, बिजलीनगर,
चिंचवडगाव,
पुणे ४११ ०३३.

अनुक्रमणिका

मिलिंद बोकील ह्यांच्या कथा

❑

डॉ. नीलिमा गुंडी

❑

१९८५ च्या सुमारास लेखनाकडे वळलेले मिलिंद बोकील हे आजचे एक मान्यताप्राप्त कथालेखक आहेत. व्यवसायाने तंत्रज्ञ असलेल्या बोकील यांनी समाजशास्त्रात पीएच्.डी. पदवी संपादन केलेली आहे. 'उदकाचिया आर्ती' (१९९४) आणि 'झेनगार्डन' (२०००) या कथासंग्रहांबरोबरच 'समुद्रापारचे समाज' आणि 'जनाचे अनुभव पुसता' ही त्यांची पुस्तके प्रकाशित झालेली असून त्यांचे काही शोधनिबंध इंग्रजीतूनही प्रसिद्ध झालेले आहेत.

मिलिंद बोकील यांच्यात एक जिज्ञासू अभ्यासक, एक डोळस निरीक्षक आणि एक शोधक वृत्तीचा तत्त्वज्ञ लपलेला आहे. त्यांच्यातील कथालेखकाला समृद्ध करण्यात त्यांच्या या व्यक्तिवैशिष्ट्यांचा मोठा वाटा आहे. अभ्यासक या नात्याने त्यांनी एकीकडे आधुनिक तंत्रविज्ञान, पर्यावरण व सृष्टिशास्त्र यांचे शास्त्रशुद्ध ज्ञान मिळविले आणि त्याचवेळी भारतीय विद्याशास्त्राचे परंपरागत संचितही आपलेसे केले. समाजशास्त्र या त्यांच्या अभ्यासविषयाबाबत बोकील म्हणतात. ''समाजशास्त्र ह्या शास्त्राची मौज अशी आहे की, ते मानवशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, एवढेच नाही तर इतिहास आणि पुरातत्त्वशास्त्र ह्यांच्या संगमावर उभे आहे.'' (अंतर्नाद, ऑक्टोबर २००१, पृ. १७)

बोकीलांना या सर्वच शास्त्रांमध्ये सारस्य आहे, हे त्यांच्या कथा वाचताना जाणवते. देशभरातील स्वयंसेवी संस्थांच्या कार्याशी असलेला संबंध, तसेच आंतरराष्ट्रीय अभ्यासवृत्ती मिळाल्यामुळे केलेला प्रवास यांमुळे त्यांना ग्रामीण भारत ते सातासमुद्रापारचे प्रदेश या दरम्यानच्या सामाजिक चलनवलनाचे साक्षीदार होता आलेले आहे. मुळात जयप्रकाशजींच्या सामाजिक उत्थानाच्या भूमिकेने प्रभावित झाल्यामुळे त्यांच्या मनात वंचितांविषयीची व्यापक आस्था रुजलेली आहे. १९८० नंतरच्या सामाजिक वास्तवाशी निगडीत आशयसूत्रे त्यांच्या कथांमध्ये आढळतात. मात्र त्यांच्या कथा घटनाप्रधान अथवा वर्णनप्रधान नसतात. व्यक्ती, सामाजिक परिस्थिती आणि काळ यांच्या आंतरप्रक्रियांची साखळी उलगडून दाखवण्यात त्यांच्या कथेला रस असतो. त्यामुळे त्यांच्या कथांचा कल चिंतनाकडे झुकतो.

'उदकाचिया आर्ती' या त्यांच्या पहिल्या कथासंग्रहात आठ कथा समाविष्ट आहेत. त्यांपैकी 'भावी इतिहास', 'दुपार', 'भूमी', आणि 'उदकाचिया आर्ती' या कथांमधील मध्यवर्ती पात्रे सामाजिक कार्यकर्ती आहेत. समाजशास्त्राच्या बैठकीतून लेखन करताना अनेकदा व्यक्तिमनाचे स्वतंत्र अवकाश दुर्लक्षित राहण्याचा धोका संभवतो. परंतु बोकिलांची कथा 'सामाजिक तत्त्वज्ञाना'त रस घेणारी असल्यामुळे व्यक्तिमन आणि समाजमन या दोन्ही ध्रुवांचा नातेसंबंध

शोधण्यात ती गुंतते.

'भावी इतिहास' मधील 'क्रांतिकारी संघर्ष समिती'चा कार्यकर्ता शशिकांत दुष्काळी कामे काढण्यासाठी मामलेदार कचेरीवर मोर्चा काढतो. या मोर्च्यात मजुरांशी समरस होण्यासाठी अनवाणी चालण्यापर्यंत तो स्वत:ला बदलतो. मात्र त्याचे समाजविषयक आकलन, तसेच माणसांविषयीची समज पुस्तकी धाटणीची आहे. त्याला या संदर्भात जाग आणणाऱ्या घटना कथेत घडत राहतात. मोर्चानंतर पांगलेल्या श्रमिकांकडे पाहून त्याला प्रश्न पडतो. "कसली एकजूट? कसली सामाजिक बांधिलकी?" (पृ.२०) मोर्चानंतर येणारा रितेपणा, वाटेत झालेली मारहाण, अनोळखी डॉक्टरांकडून मिळणारी स्नेहपूर्ण वागणूक आणि अपत्यजन्मामुळे झालेला आनंद यामुळे तो नकळत बदलतो. त्याला एका क्षणात जाणवलेला हा बदल म्हणजे खरे तर एक मोठा मानसिक प्रवास असतो. हा मानसिक प्रवास कथेतून सूक्ष्म रीतीने व्यक्त होतो.

'दुपार' या कथेतील सामाजिक कार्यकर्ती सावित्री आणि तिचा पती यांचे घटस्फोटात परिणत झालेले नाते जणू दुपारच्या चटके देणाऱ्या उन्हासारखे आहे. घटस्फोटानंतर सावित्री भेटते ती दुपार त्याला मनाने पोळून काढते. त्यांच्या मुलाला तिने एका स्विस कुटुंबाला दत्तक देऊन टाकलेले असते. या बातमीने तो पुरता विव्हळ होतो. या कथेत त्याच्या भावकल्लोळावर प्रकाशझोत टाकलेला आहे. केवळ कार्यकर्त्या व्यक्तींनाच नव्हे, तर सर्वसामान्य माणसांनाही जाणून घेण्यात लेखकाला स्वारस्य आहे, हे येथे लक्षात येते.

'उदकाचिया आर्ती' मधील कथा रोहिणीची आहे. ती आणि तिचा पती अरुण यांचे सुरुवातीचे प्रेमपूर्ण नाते पुढे पुढे पार गढूळले. धरणग्रस्तांच्या प्रश्नासाठी जिवाचे रान करणारी रोहिणी अरुणच्या दुसऱ्या लग्नाच्या पत्रिकेमुळे काहीशी अस्वस्थ होतेच. राहिणीचे कौटुंबिक जीवन आणि कार्यकर्त्यांशी जोडले गेलेले सामाजिक जीवन या दोहोंचे चित्रण कथेत प्रसंगांच्या माध्यमातून येते. कथेत नदी हे एक पात्रच ठरते. रोहिणी, तिची आई आणि नदी यांच्या भावसंवादातून कथा पुढे सरकत जाते. अरुणच्या लग्नाची निमंत्रणपत्रिका नदीच्या प्रवाहात फेकून देण्याची तिची साधीशी कृतीदेखील एक घटनाच ठरते. भूतकाळाच्या पाशातून मुक्त होऊन नदीच्या साक्षीने स्वत:च्या आयुष्याचे प्रवाहीपण अनुभवण्याचा निर्धार त्यातून नकळत सूचित होतो. नदीचे प्रतीक, डोंगरावरील देवीचा उत्सव इ. संदर्भातून व्यक्त होणारे आदिवासींचे सांस्कृतिक मन, 'उदकाचिया आर्ती' या ('ज्ञानेश्वरी', अ.११, ओ. ५३ संपा. शं. वा. दांडेकर) शीर्षकामुळे साधले गेलेले श्रुतयोजन यांमुळे ही कथा काव्यात्म अंगाने संपन्न होते. 'उदकाचिया आर्ती' म्हणजे पाण्याच्या इच्छेने. रोहिणीची एकीकडे संसारसुखाची अतृप्त राहिलेली तहान आणि त्याचवेळी धरणग्रस्तांसाठी जीवन समर्पित करण्याची ओढ असे भावतरंग त्यातून सूचित होतात.

बोकील यांच्या काही कथांमध्ये मुळांपासून उखडल्या गेलेल्या माणसांना स्थान मिळालेले दिसते. 'भूमी' ही कथा अशाच प्रकारची आहे. मूळचे जर्मन असलेले फादर युध्दाचा कटू अनुभव घेऊन भारतात आले. सावर्ड्यासारख्या आडगावी २० वर्षे राहिले. ती भूमी आपली मानली. तेथील हरिजनांच्या जगण्याचा पोत सुधारावा म्हणून ते झटले. परंतु त्यांचे ते काम चर्चच्या सामाजिकतेच्या चौकटीत बसले नाही. त्यातच विदेशी मिशनरी येथे न ठेवण्याचे धोरण चर्चने

स्वीकारले. त्यामुळे फादरना तडकाफडकी देश सोडावा लागला. एका बाजूने आपण मानवता, विश्वात्मकता ही मूल्ये मानीत असतानाही आपल्या मनाला एखाद्या विशिष्ट भूमीविषयी खास आपलेपण वाटणेही साहजिक असते. या द्वंद्वाचे चित्रण या कथेतून घडते.

या संग्रहातील 'विदेश' ही कथा खूप अस्वस्थ करणारी आहे. 'कथा म्हणजे काळाचा एक तुकडा' असे बोकील एका निबंधात लिहितात. या कथेत ते विशेष प्रत्ययाला येते. काळ आणि परिस्थिती हे अदृश्य घटक आपल्या जगण्याचा आकार घडवताना किती प्रभावी ठरतात, हे या कथेत जाणवते. अमेरिकेत स्थायिक झालेला चंद्रशेखर भारतात येऊन सीमाशी लग्न करतो. पुढे अमेरिकेतील वास्तव्यात त्या बुजऱ्या सीमाचे रूपांतर क्रमाक्रमाने एका भोगवादी स्त्रीमध्ये होते. चंगळवादाच्या पगड्यामुळे तिच्या व्यक्तिस्वातंत्र्याविषयीच्या कल्पना उथळ बनत जातात. तिच्या दृष्टीने चंद्रशेखर 'टिपिकल मिडलक्लास इंडियन हजबंड' ठरतो. तेव्हा चंद्रशेखरला स्वत:च्या 'इंडियन' असण्याचा अर्थ खोलवर शोधावासा वाटतो. इंडियन असण्यात एकप्रकारचा कणखरपणाही अंतर्भूत आहे हे त्याच्या लक्षात येत जाते. अशा प्रकारे स्वत:त जपलेल्या संस्कृतीच्या अंत:प्रवाहाचे दर्शन या कथेतून घडते.

'चक्रव्यूह' ही कथा देखील सामाजिक वास्तवाचा संदर्भ घेऊन येते. एका जिल्हाधिकाऱ्याच्या मानसिक संघर्षाचे चित्रण त्यात येते. प्रतिमा या सामाजिक कार्यकर्तीशी जुळलेले नाजुक भावबंध एकीकडे आणि हरिजनांच्या जमिनी महाविद्यालयासाठी देण्याचे राजकीय दडपण दुसरीकडे, अशा कैचीत तो पकडला गेला आहे. प्रश्नांच्या विळख्यात अडकलेल्या असहाय्य जिल्हाधिकाऱ्यांच्या चित्रणाशीच कथा अचूक विराम पावते. 'ओझं' या कथेतील एक बालवाडी शिक्षिका परंपरागत नीतिकल्पनांना सरळपणे आव्हान देते. स्त्री-पुरुष संबंधाशी निगडीत चारित्र्याची पारंपरिक कल्पना आणि व्यक्तिमत्त्वातील सचोटी यांतील अंतर येथे ठळकपणे लक्षात येते. 'लेमन ट्री' मधील रामनाथ शेती क्षेत्रात नवनवे प्रयोग करतो, आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवितो. पण स्वत:च्या मनातील भावभावनांची आंदोलने वाचण्यात कमी पडतो. त्याच्यातील प्रेम आणि अहंकार यांचा झगडा कथेतून चित्रित केला जातो. 'उदकाचिया आर्ती' मुळे बोकील यांनी स्वत:च्या कथांविषयी निर्माण केलेल्या अपेक्षांना न्याय देणारा त्यांचा दुसरा संग्रह आहे 'झेनगार्डन!' यातही आठ कथा आहेत. त्यापैकी 'यंत्र', 'आरंभ', 'अधिष्ठान', 'पायऱ्या' आणि 'झेनगार्डन' या कथा विशेष उल्लेखनीय आहेत.

'यंत्र' मध्ये यंत्र दुरुस्त करण्याचा हरिहरचा अनुभवच नाट्यपूर्ण आहे. तपशिलांनी समृद्ध संवेदनांच्या चित्रणातून कारखान्याचे विश्व आकार घेते. हटवादी यंत्राविषयी सुरुवातीला हरिहरला वाटणारी शत्रुत्वाची भावना पुढे पुढे बदलते आणि मित्रत्वाकडे झुकते. सजीव-निर्जीव नात्यातील हे भावचित्रण प्रभावीपणे साकार होते. त्या साऱ्या अनुभवांतून जाताना 'आपणही एक यंत्र आहोत' हे हरिहरला झालेले आत्मभान आणि यंत्र चालू होऊनही शेवटी वाटणारा मलूल आनंद यांचे चित्रण मार्मिकपणे घडते.

'अधिष्ठान' या कथेत गायत्री आणि विश्वनाथ या पतिपत्नींच्या संवादानेच मोठा भाग व्यापलेला आहे. जीवघेणे प्रश्न डोक्यात वागवणारा आणि त्यासाठी स्थैर्याकडे वळलेल्या हिप्पी

लोकांचा अभ्यास करण्यासाठी घरदार टाकून अमेरिकेत अनेक वर्षे राहिलेला विश्वनाथ या कथेत भेटतो. त्याच्यामागे गायत्रीची झालेली परवड, नंतर तिला जगण्याचे गवसलेले अधिष्ठान — असा कथावस्तूचा प्रवास आहे. एकटी राहताना गायत्री ज्या अनुभवांमधून जाते, त्यांचे कथन करून काळाचे तुटलेले अंतर साधण्याचा प्रयत्न यात आहे. बोकिलांची कथा 'काळ' या परिमाणाला किती महत्त्व देते, हे या कथेतही लक्षात येते. आनुवंशिकता, सांस्कृतिक आदिबंध, पर्यावरण, मूर्तिशास्त्र अशा नानाविध संदर्भातून कथेतील पात्रांचे भावजीवन समृद्धपणे उलगडत जाते. 'पायऱ्या' ही कथा नजिकच्या काळातील सामाजिक-आर्थिक स्थित्यंतरावर भाष्य करणारी आहे. दहा वर्षांपूर्वी चळचळीत सक्रीय असलेला आणि आता सिंगापूरला स्थायिक होऊन छोटा उद्योग चालविणारा श्रीपाद चळवळीतील जुन्या सहकारी जयाला आवर्जून भेटायला बोलावतो. या भेटीत जया आणि तिचा नवरा अशोक यांच्या वागण्याबोलण्यातील दांभिकपणा उघड होत जातो. सचोटीने आणि कर्तृत्वाने यशाच्या पायऱ्या चढून गेलेला श्रीपाद म्हणजे समकालीन बदल आत्मसात करतानाही ध्येयवादीवृत्तीचा गाभा जपणारा 'नायक' वाटू लागतो. त्याचवेळी एकेकाळच्या आदर्शवादाचे वर्ख उडालेले रूपही कथेतून चित्रित होत जाते; हे महत्त्वाचे !

'झेनगार्डन' ही एक तत्त्वचिंतनपर अशी आगळीवेगळी कथा आहे. कथाकाराला समकालीन प्रश्नांइतकीच शाश्वत प्रश्नांविषयीही आस्था आहे, हे या कथेतून कळते. कल्याणी आणि निरंजन या पति-पत्नींच्या जपानच्या वास्तव्यातील अनुभवातून ही कथा आकार घेते. झेनपंथ हा ध्यानातून 'स्व' रूपाची ओळख करून देणारा एक पंथ. झेन म्हणजे चमकून जाणारे ज्ञान होय. लेखनासाठी अनुभवाच्या शोधात असलेली, 'जाणीवपूर्वक' चिंतनात शिरू पाहणारी कल्याणी आणि आहे त्या क्षणात खोल डूब घेणारा सहज मोकळा निरंजन ! या दोघांच्या संवाद-विसंवादातून कथेला गती येते. खडक आणि खडी यांनी तयार केलेली झेनगार्डन काहीशी गूढ वाटत राहते. जीवनातील गूढता, प्रतिकात्मता, अर्थ जाणणे नि अनुभवणे अशा तत्त्वज्ञानातील अनेक संकल्पना या कथेत आशयाशी एकजीव होतात. जीवनातील अर्थपूर्णतेचा शोध घेण्याचा यातील प्रयत्न लक्षणीय वाटतो.

माणसाच्या मनाची अंधारी गुहा जाणून घेण्याचा थोडाफार प्रयत्न करणारी 'आभास' ही यातील कथा वेगळी ठरते. मूळची हॉलंडची असलेली सिस्टर तेरेझिया रघुनाथमध्ये आपल्या मृत प्रियकराला - पीटरला शोधत राहते. मिशनमध्ये हॉलंडसारखा आसमंत निर्माण करण्याची तिची धडपडही आभासात्मकच ! यात सिस्टरची व्यक्तिरेखा खूप बारकाव्यानिशी ठसठशीतपणे रेखाटली गेली आहे.

'साथिन' या कथेत अन्यायग्रस्त स्त्रियांचे शिबिर हाच एक धगधगता अनुभव आहे. आधी काहीशी काठावर असलेली पण नंतर त्यात सामील होता होता मनाने मोकळी झालेली रेवती या कथेत भेटते. या कथेतून स्त्रीपुरुष नात्यातील सूक्ष्म ताण, बदलती स्त्रीप्रतिमा यांचे दर्शन घडते. 'निरोप' ही कथादेखील समाजकार्याच्या अनुभवातून फुलत जाते. ही कथा म्हणजे डोंगराळ आदिवासीभागात विधायक कार्यात रमणाऱ्या एका कार्यकर्त्याचे मनोगतच वाटते.

रमाकांतला मनाविरुद्ध गावकऱ्यांचा घ्यावा लागणारा निरोप आणि त्या प्रसंगातील सूक्ष्म

भावनाट्य हे या कथेचे बीज आहे.

या संग्रहातील 'आरंभ' ही कथा फँटसीच्या अंगाने जाते. मानवी संस्कृतीचा भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ यांचे मनोज्ञ असे एकात्मदर्शन या कथेतून घडते. अणुयुद्धामुळे जग नष्ट झाले असताना, मानवविज्ञान संघटनेच्या शोधमोहिमेत सामील होऊन कझान बेटांवरील प्रागैतिहासिक काळात जगणाऱ्या आदिवासींची माहिती मिळवणाऱ्या संशोधकांचे चित्रण यात आहे. स्वत:चा मृत्यू जवळ येऊन ठेपला असतानाही, दगडांवर संस्कृतीच्या उत्क्रांतीचा चित्ररूप आलेख कोरण्याची संशोधकाची धडपड अपूर्व आहे. त्यानिमित्ताने संस्कृतीतील संचिताविषयीचा त्याचा अंत:संघर्ष कथेला आशयसंपन्न करतो. शेवटी घड्याळ फोडण्याची त्याची कृती नव्या जगासाठी नव्याने कालचक्र सुरु करू इच्छिते. संस्कृतीविषयीच्या प्रगाढ आस्थेमुळे ही फँटसी आपल्याला तिच्यात दडलेल्या वास्तवाचे नव्याने भान आणून देते.

प्रश्नव्याकुळ कथा : वेगवेगळ्या प्रश्नांच्या गुंतागुंतीमुळे कथेच्या गाभ्याशी निर्माण झालेली स्पंदने शब्दबद्ध करण्यात बोकिलांना विशेष रस असतो. हे प्रश्न कधी मानवी मूल्यांच्या संदर्भातील असतात. देश सोडायला सांगितलेले फादर स्वत:ला विचारतात. 'त्यावेळी जे आपल्यासारखे नाहीत त्या सर्वांना आपण मारत गेलो... त्या कृत्याचं तर हे प्रायश्चित नाही ?' ('उ.आ.' पृ.७०). रोहिणीच्या मनातही अशीच खळबळ चालू असते. ती मनात म्हणते. ''अर्थात प्रश्न उभा करूनही तो सुटला नाहीच. उलट त्यातून आणखी प्रश्न तयार झाले. मोठी धरणं बांधावीत की नाहीत, इथपासून जगात चांगलं काय आणि वाईट काय इथपर्यंत'' ('उ.आ.', पृ. १६५). चंद्रशेखर तर स्वत:ला गिरमिटासारखा पोखरत राहतो. ''आपण एका कंपनीत जातो... ती कंपनी विमानांची इंजिनं बनवते. ती विमानं कोण वापरतं, कशासाठी वापरतं, ते आपल्याला माहीत नाही.'' ('उ. आ.' पृ. ८८)

हे प्रश्न केवळ देशकालपरिस्थिती विषयीचेच नसतात. त्याहून खोल अशा तत्त्वचिंतनाकडे नेणारेही असतात. हरिहरला वाटतं, ''कशासाठी चाललं आहे हे सगळं ? कशासाठी ?'' ('झे.गा.' पृ. १८). 'यंत्र' आणि 'आरंभ' या कथांमध्ये जगण्यातील अतर्क्यता आणि तरीही मानवी निर्णयाच्या अधिकारावरील विश्वास यांच्यातील ताण प्रकाशझोतात येतो. 'आरंभ' मध्ये तर भावना आणि बुद्धी यांच्यातील आंतरिक संघर्षालाही स्थान मिळते.

मूल्यांच्या जाणिवेमुळे निर्माण झालेले संघर्ष कथेला आतून घट्ट बांधत नेतात. कशापासून स्वातंत्र्य, हे न कळल्यामुळे हिप्पी झालेल्या लोकांचा अभ्यास करण्यासाठी गेलेला विश्वनाथ आणि त्याच्या स्वातंत्र्यामुळे जिला पुरेपूर किंमत चुकवावी लागली आहे, अशी गायत्री समोरासमोर आल्यामुळे 'अधिष्ठान' ही कथा लक्ष वेधून घेते. संघर्षाच्या क्षणी अंत:प्रेरणांना प्रमाण मानण्याकडे यातील पात्रांचा कल असतो. काही कथांमध्ये पात्रांना साक्षात्कारासारखे विजेच्या लोळासारखे येणारे आत्मज्ञान हे त्यापूर्वीच्या दीर्घ मानसिक संघर्षाचेच फलित असते. अशा आत्मप्रतीतीमुळे 'यंत्र' सारख्या कथेत तर भौतिक आणि आध्यात्मिक जाणिवा एकत्र येतात.

या कथांमधून धर्मसंस्कृतीविषयी मर्मदृष्टी देणारे चिंतन विखुरलेले आहे. उदा. सिस्टरला मेरी व्हर्जिन आहे, असे वाटत नाही. 'आरंभ' मधील संशोधकाला वाटते, ''माणसाचा आणि मानवी

समाजाचा अभ्यास करणे, ज्ञानाच्या नवीन नवीन पायऱ्या चढत जाणे ह्याशिवाय दुसरे ध्येय त्याला असू शकत नाही. तोच त्याचा धर्म.'' ('झे.गा.' पृ.१४४)

बोकिलांनी कथालेखन वृत्तिगांभीर्याने केलेले आहे. शिवाय 'कथा' या वाङ्मयप्रकाराची त्यांना चांगली जाणही आहे. नवनिर्मितीसाठी आवश्यक तो कल्पनाशक्तीचा आवाका आणि झेप त्यांच्याकडे आहे. ते कथेचा घाट जाणीवपूर्वक प्रयोगशील करण्याचा प्रयत्न करीत नाहीत. प्रथमपुरुषी अथवा तृतीयपुरुषी निवेदन, अर्थपूर्ण घटना, जिवंत व्यक्तिचित्रण आणि प्रवाही संवाद यांना त्यांच्या कथांमध्ये स्थान असते. मात्र त्यांचे निवेदन साध्याशा वाक्यातून आशयाला काव्यात्मता प्राप्त करून देते. उदा. 'ओझं' ही कथा नैतिकतेच्या तथाकथित कल्पनांना धक्का देणारी आहे. याबाबतीत चाकोरीबध्द विचार करणारा नायक शेवटी जेव्हा यशोदाबाईंनी दिलेले शेंगांचे बोचके घेऊन नावेत चढू लागतो, तेव्हा त्याची तारांबळ उडते. कथेचा शेवट होतो तो असा, ''आणि ते शेंगांचे बोचके मांडीवर घेऊन नदीच्या पाण्याची कातरत जाणारी धार पाहत एकटक बसून राहिलो'' ('उ.आ.' पृ. १३८). जगण्याचे नैसर्गिक प्रवाहीपण आणि मूल्यांची ओझी बाळगताना जाणारा तोल यांचे धारदार भान या वाक्यातून सूचित होते.

काही कथांमधून लेखकाच्या कलादृष्टीवर नकळत प्रकाश पडतो. 'झेनगार्डन' मधील कल्याणी स्वत:शी म्हणते, ''ते एक जुन्या पिढीतले संपादक. सोपे लिहा, ते म्हणाले होते.... आपल्याला ते काही पटले नव्हते. आपल्याला वाटले की, आधुनिक जीवन गुंतागुंतीचे आहे आणि म्हणून लिखाणात दुर्बोधता येणारच'' ('झे.गा.' पृ. २२२). तिला निरंजन म्हणतो, ''डोण्ट ब्रेक थिंग्ज इण्टु पार्टस्. लुक ॲट दी होल युनिव्हर्स, ऑर युनिव्हर्सल'' (पृ. २२८). कलेतील सहजता आणि दुर्बोधता याबाबतचे हे भाष्य विचारात घेताना बोकिलांनी नवकथेतील दुर्बोधता, मनोविश्लेषण, निराशावाद इ.चा सहेतुक वापर टाळल्याचे लक्षात येते.

बोकिलांच्या कथाकार या नात्याने जाणवणाऱ्या काही मर्यादाही नोंदवायला हव्यात. त्यांच्या कथांमधून सामोरा येणारा प्रदेश काही बाबतीत ठरावीक साच्याचा होऊ लागला आहे. 'भूमी' कथेतील फादरचे समाजकार्य आणि 'निरोप' मधील रमाकांतचे समाजकार्य यात फक्त तपशिलांचा फरक उरतो. सामाजिक कार्यकर्त्यांची मूस तीच राहते. बोकिलांचे लेखन क्वचित भावुकतेकडे झुकते. 'विदेश' मध्ये घटस्फोटाच्या प्रसंगी सीमा नणंदेसाठी आणलेले केशर आठवणीने देते, हे पटत नाही. तसेच बोकिलांच्या कथा काहीवेळा संथ शैलीमुळे पाल्हाळिक वाटतात. 'यंत्र' ही कथा काही ठिकाणी एकसुरी वाटत जाते. अर्थात अशा खटकणाऱ्या जागा थोड्या आहेत.

एक कथाकार या नात्याने बोकीलांना सामाजिक स्थित्यंतराची संथ प्रक्रिया (त्यातील कार्यकारणभावाच्या गुंतागुंतीसकट) वाचता येते आणि त्याच वेळी व्यक्तीच्या जीवनामध्ये उलथापालथ घडवू शकणारी क्षणातील आवेगपूर्णता जाणता येते. या दोहोंतून आलेली मर्मदृष्टी त्यांच्या कथालेखनामागे असल्यामुळे त्यांच्या कथा आशयदृष्ट्या कसदार वाटत राहतात.

❑

डॉ. नीलिमा गुंडी
३, अन्नपूर्णा, १२५९ शुक्रवार पेठ, सुभाषनगर, पुणे ४११ ००२. दूरध्वनी : ४४८६०१५

महाराष्ट्र साहित्य पत्रिका व तिचे संपादक

❑

डॉ. मीरा घांडगे

❑

महाराष्ट्र साहित्य पत्रिका स्वतंत्रपणे निघायला लागून ७५ वर्षे पूर्ण झाली व तिने ७६ व्या वर्षांत पदार्पण केले. महाराष्ट्र साहित्य परिषदेची १९०६ मध्ये स्थापना झाली तरी महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या जन्माला १९१३ च्या ऑगस्टपर्यंतचा काळ जावा लागला. १९१३ ते १९२५ महाराष्ट्र साहित्य पत्रिका काही काळ, केवळ बारा पानाची 'विविधज्ञानविस्तारा'ची पुरवणी या स्वरूपात निघू लागली. तिचे अंकही अत्यंत अनियमित असेच होते. उदा. १९१४ व १९१५ मध्ये मासिक रूपाने दर महिन्याला पुरवणीरूपात प्रसिद्ध झाली, ती तर १९१६ ते १९२१ पर्यंतच्या काळात तिला त्रैमासिक रूप प्राप्त झाले. त्यानंतर १९२२ मध्ये दोन अंक, १९२४ मध्ये तीन अंक व १९२५ मध्ये फक्त एक अंक (मे, वर्ष १३, अंक १) असे अंक निघाले व पत्रिका पूर्णपणे बंद पडली. या काळात पत्रिकेच्या अंकावर संपादकाचे नाव दिसत नाही. कदाचित् 'विविधज्ञानविस्तारा'चे संपादकच पत्रिकेच्या पुरवणीचे कार्य करीत असावेत. (महाराष्ट्र साहित्य परिषदेचे पहिले अध्यक्ष विष्णु मोरेश्वर महाजनी हेच आरंभीच्या काळात पत्रिकेच्या संपादनाचे काम पाहत असल्याचा उल्लेख श्री. म. श्री. दीक्षितांनी लिहिलेल्या परिषदेच्या इतिहासात आहे. — म. सा. प. ले. म. श्री. दीक्षित, पृ. २१)

त्यानंतर १९२८ मध्ये ना. गो. चापेकरांच्या प्रयत्नातून पत्रिका स्वतंत्रपणे त्रैमासिक स्वरूपात निघू लागली. (पहिला अंक - चैत्र-प्रतिपदा, मार्च १९२८), चापेकरांनी 'भाषिक आणि समाजशास्त्रीय संशोधनपर आणि संशोधनप्रवृत्तिपोषक लिखाण' हा पत्रिकेच्या संपादनाचा उद्देश कल्पून पत्रिकेची वाढ केली. त्यानुसार सुरुवातीच्या काळात पत्रिकेत लोकवाङ्मय (लोककथा, म्हणी, लोकगीते, म्हणी विषयक चर्चा इ.), विविध वाङ्मय प्राचीन संहिता, अनुवादित ग्रंथ, मराठी भाषा व वाङ्मयेतिहास (ले. भिडे) या सारख्या ग्रंथांना क्रमशः स्थान मिळाले. भाषाविषयक लेखनात शब्दसंग्रह, परिभाषा, कोशविषयक, शुद्धलेखन इ. विषयांवरील लेखन प्रामुख्याने छापले गेले. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेची सुरुवातीपासूनची महत्त्वाची कामगिरी म्हणजे 'वाङ्मय समालोचन' व 'ग्रंथ परीक्षणे' ही होय. विविध वाङ्मय प्रकारांतील जवळजवळ प्रतिवर्षी पत्रिकेतून आलेली वाङ्मय-समालोचने एकत्र केल्यास यथामूल 'वाङ्मयेतिहास' सिद्ध होईल. 'विविधज्ञानविस्तारा'च्या पुरवणी अंकापासून आजपर्यंत ग्रंथ परीक्षणाला पत्रिकेने महत्त्वाचे स्थान दिले आहे. विविध विषयांवरील महत्त्वपूर्ण ग्रंथांची आजपर्यंत दोन हजारांपेक्षा अधिक परीक्षणे पत्रिकेने छापली आहेत.

गेल्या ७५ वर्षांच्या काळात पत्रिकेला लाभलेल्या विविध संपादकांची संपादनाची स्वतंत्र दृष्टी पत्रिकेचे अंक पाहताना जाणवते. म. म. दत्तोवामन पोतदारांनी 'रद्दीतील रत्ने' सारख्या स्वतंत्र सदरातून तत्कालीन वृत्तपत्रातून वा अन्य ठिकाणी आलेली वाङ्मयविषयक महत्त्वपूर्ण माहिती पुनर्मुद्रित केलेली दिसते. (कै.) स. गं. मालशे यांनी 'शब्दवेध' नावाच्या सदरातून भाषाविषयक लेखन छापलेले दिसते. या संपादकांनी लिहिलेली 'संपादकीय' टिपणे — ही अत्यंत अभ्यासपूर्ण, तत्कालीन वाङ्मयीन घटनांचा वेध घेणारी अशी आहेत. उदा. वि. भि. कोलते यांनी 'मराठीचिये नगरी' या शीर्षकाने संपादकीये लिहिली. ती नंतर ग्रंथरूपाने प्रसिद्धही झाली.

सुरुवातीच्या काळतील ललितवाङ्मयप्रकारांना १९६० नंतरच्या काळात (काही प्रासंगिक विशेषांक वगळता) पत्रिकेत स्थान मिळालेले दिसत नाही. १९७० नंतरच्या काळात पत्रिकेने वैशिष्ट्यपूर्ण विशेषांक काढले.

व्यक्तिविषयक - पु. ल. देशपांडे, तांबे, वि. रा. शिंदे, न. चिं. केळकर, भा. वि. वरेरकर, वि. दा. सावरकर, विष्णु कृष्ण चिपळूणकर, शरच्चंद्र चट्टोपाध्याय, डॉ. श्री. व्यं. केतकर, रा. ग. गडकरी, श्री. म. माटे, श्री. कृ. कोल्हटकर, कृ. प्र. खाडिलकर इत्यादी.

वाङ्मयविषयक - (पत्रिकेच्या सुरुवातीच्या काळापासून 'वाङ्मय-समालोचन' विशेषांक निघाले आहेत.) ग्रामीण साहित्य विशेषांक, गझल विशेषांक, आत्मचरित्र विशेषांक, वाङ्मयीन वाद व वादळे विशेषांक, विनोद विशेषांक, दलित साहित्य विशेषांक, कादंबरी विशेषांक, वाङ्मयीन नियतकालिके समालोचन विशेषांक इत्यादी.

इतर विशेषांक - साहित्य संस्था विशेषांक, माझा वाङ्मयीन ऋणानुबंध विशेषांक इत्यादी. १९७५ मध्ये डॉ. भालचंद्र फडके संपादित 'ज्ञानेश्वर' विशेषांकाला केंद्र शासनाचा (ताम्रपट) पुरस्कार मिळाला होता.

महाराष्ट्र साहित्य पत्रिकेची ही कामगिरी लक्षात घेता, तिच्या यशात व वैविध्यतेत संपादकांचा मोलाचा वाटा आहे. कारण संपादकाची दृष्टी मासिकाचे स्वरूप सिद्ध करते.

१९२८ पासून आजवर 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'ला लाभलेले संपादक असे —

ना. गो. चापेकर	मार्च १९२८ ते मार्च १९३३
द. वा. पोतदार	जुलै १९३३ ते मार्च १९३६
मा. त्र्यं. पटवर्धन	एप्रिल १९३६ ते एप्रिल १९३७
मो. ज्ञा. शहाणे	जुलै १९३७ ते ऑक्टोबर १९३९
के. नारायण काळे	जानेवारी १९४० ते ऑक्टोबर १९४२
रा. श्री. जोग	जानेवारी १९४३ ते मार्च १९४६
के. नारायण काळे	एप्रिल १९४६ ते ऑगस्ट १९४६
श्री. म. माटे	मार्च १९४७ (८०-८१ जोड अंक)
य. दि. पेंढरकर	एप्रिल १९४७ ते जून १९५०

रा. शं. वाळिंबे	जुलै १९५० ते मार्च १९५१
रा. श्री. जोग	एप्रिल १९५१ ते मार्च १९५२
वि. भि. कोलते	एप्रिल १९५२ ते मार्च १९५५
वा. रा. ढवळे	एप्रिल १९५५ ते मार्च १९६१
दि. के. बेडेकर	एप्रिल १९६१ ते मार्च १९६३
वा. रा. ढवळे	एप्रिल १९६३ ते डिसेंबर १९६३
श्री. के. क्षीरसागर	जानेवारी १९६४ ते एप्रिल १९६५
के. नारायण काळे	जुलै १९६५ ते मार्च १९७०
स. गं. मालशे	एप्रिल १९७० ते मार्च १९७३
भालचंद्र फडके	एप्रिल १९७३ ते मार्च १९७६
हे. वि. इनामदार	एप्रिल १९७६ ते मार्च १९७९
आनंद यादव	एप्रिल १९७९ ते मार्च १९८२
भीमराव कुलकर्णी	एप्रिल १९८२ ते मार्च १९८५
वसंत स. जोशी	एप्रिल १९८५ ते एप्रिल १९८८
शंकर सारडा	जुलै १९८८ ते मार्च १९९२
वि. स. वाळिंबे	एप्रिल १९९२ ते मार्च १९९५
शंकर सारडा	एप्रिल १९९५ ते मार्च १९९७
ह. ल. निपुणगे	एप्रिल १९९७ ते मार्च २००१
अरविंद वामन कुळकर्णी	एप्रिल २००१ पासून

❑

आजवरच्या पत्रिकेच्या संपादनामध्ये माधवराव पटवर्धन, य. दि. पेंढरकर, के. नारायण काळे यांसारखे ज्येष्ठ चिकित्सक संशोधक; रा. श्री. जोग, रा. शं. वाळिंबे, दि. के. वेडेकर, श्री. के. क्षीरसागर, भीमराव कुलकर्णी यांसारखे मर्मज्ञ समीक्षक; वि. भि. कोलते, हे. वि. इनामदार, वसंत जोशी यांसारखे प्राचीन वाङ्मयाचे अभ्यासक; स. गं. मालशे यांसारखे भाषाशास्त्रज्ञ, आनंद यादवांसारखे ललित लेखक व समीक्षक इत्यादी मान्यवरांनी काम केले. या सर्वांनीच आपल्या स्वतंत्र दृष्टीने पत्रिका संपन्न व समृद्ध केली आहे.

❑

डॉ. मीरा घांडगे
मराठी विभाग, बी. ए. एम्. विद्यापीठ,
औरंगाबाद.

हा तों साहित्यकुसुमांचा आस्वादु

महादेव मोरेश्वर कुंटे यांच्या वाङ्मयीन व सांस्कृतिक कार्याचे व्यासंगपूर्ण विवेचन

❑

प्रा. ग. प्र. प्रधान

❑

(महादेव मोरेश्वर कुंटे : काल आणि कर्तृत्व, लेखिका : डॉ. पुष्पा लिमये, मानसन्मान प्रकाशन, पुणे ४११ ००४.)

'महादेव मोरेश्वर कुंटे : काल आणि कर्तृत्व' हा डॉ. पुष्पा लिमये यांचा ग्रंथ महाराष्ट्रातील एका उपेक्षित विद्वानाला न्याय देणारा आहे. दोष प्रत्येकाच्या स्वभावात असतात, लेखनात वा भाषणातही अपूर्णता असते. परंतु त्या व्यक्तीचे कार्य, कर्तृत्व आणि लेखनातील मुख्य आशय हे लक्षात घेणे आवश्यक असते. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या महादेव मोरेश्वर कुंटे यांच्यावरील टीकेमुळे महाराष्ट्रात कुंट्यांच्यावर अकारण अन्याय झाला. डॉ. पुष्पा लिमये यांनी या ग्रंथामध्ये कुंटे यांच्या व्यक्तिमत्त्वाची आणि कार्याची समग्र माहिती देऊन त्यांच्या कर्तृत्वावर योग्य रीतीने प्रकाश टाकला आहे.

महादेव मोरेश्वर कुंटे यांचे वडील साताऱ्याजवळ माहुली या क्षेत्रात भिक्षुकी करीत. ते फार लवकर वारले. कुंटे हे लहानपणी फार व्रात्य होते. पुढे शिकण्याची तीव्र इच्छा होऊन ते कोल्हापूरला आणि नंतर पुढील शिक्षणासाठी मुंबईस गेले. कुंटे यांनी दारिद्र्याचे चटके सोसत घेतलेले शिक्षण, कोल्हापूरला चांगले शिक्षक भेटल्यामुळे इंग्रजीवर त्यांनी मिळवलेले प्रभुत्व, पुढे विल्सन कॉलेजमध्ये असताना त्यांनी केलेले चौफेर वाचन आणि बी. ए. ला दुसरा वर्ग मिळवून शिक्षण खात्यात सरकारी नोकरीत त्यांनी केलेला प्रवेश हा सर्व तपशील सांगून डॉ. लिमये यांनी महादेव मोरेश्वर कुंटे यांच्या मनाची घडण कशी झाली आणि त्यांच्या बुद्धीस धार कशी आली, हे रेखीवपणे लिहिले आहे. महादेव गोविंद रानडे आणि कुंटे हे कोल्हापूरपासून बरोबर शिकत होते आणि हा त्यांचा स्नेह आयुष्यभर टिकला. कारण न्या. रानडे यांना कुंटे यांच्या गुणांची बरोबर पारख होती.

काही काळ सिंधमध्ये शिक्षक आणि नंतर तेथेच मुख्याध्यापक म्हणून नोकरी करताना उत्तम अध्यापक आणि प्रशासक असा लौकिक कुंटे यांनी मिळविला. नंतर त्यांची बदली कोल्हापूरला झाली. तेथे असताना त्यांनी संस्कृतचा उत्तम अभ्यास गाडगीळ शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली केला. त्यानंतर ते पुण्यात आले, आणि अध्यापनाबरोबरच त्यांनी सार्वजनिक जीवनात मनापासून कार्य केले. कुंटे हे उत्तम वक्ते होते. वसंत व्याख्यानमालेत त्यांनी अनेक व्याख्याने दिली, अनेकदा अध्यक्षपद भूषविले. त्यांचे वक्तृत्व विद्वत्तेमुळे रंगत असे, परंतु

त्यांच्या विक्षिप्त स्वभावामुळे ते अनेकदा तऱ्हेवाईकपणेही बोलत. ते एक कुशल अध्यापक होते, त्यांच्या शिकविण्यात जिवंतपणा होता, शिस्त पाळली पाहिजे हा त्यांचा आग्रह होता, परंतु विद्यार्थ्यांना ते करीत असलेल्या शिक्षेत अतिरेक नसे. कुंटे व त्यांचे विद्यार्थी यांचे संबंध जिव्हाळ्याचे असत. डॉ. लिमये यांनी कुंटे यांच्या विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या आठवणी, त्यांच्या भाषणासंबंधी त्या वेळच्या वृत्तपत्रात, तसेच पुस्तकांमध्ये आलेले वर्णन यांच्या आधारे यासंबंधीचे विवेचन सुव्यवस्थितपणे केले आहे.

कुंटे यांच्यावर विष्णुशास्त्रींनी केलेल्या टीकेसंदर्भात पुण्यातील एक थोर विद्वान यांचा अभिप्राय फार महत्त्वाचा आहे. सुरुवातीस आहिताग्नी राजवाड्यांच्या मनात कुंटे यांच्याबद्दल तुच्छतेची भावना होती. परंतु त्यांचे ग्रंथ वाचल्यावर राजवाडे यांना कुंटे यांचे मोठेपण कळले व त्यांच्याबद्दल आदर वाटू लागला. राजवाडे यांनी लिहिले आहे. 'मी आज विष्णुशास्त्री चिपळूणकरांना पार विसरून गेलो आहे, पण पंडितवर्य कुंटे यांच्या लेखनाचा मात्र माझ्या ग्रंथात पदोपदी उपयोग होतो.'

कुंटे यांच्या विक्षिप्तपणाचे विश्लेषण करताना डॉ. पुष्पा लिमये यांनी त्यांच्या दुर्दैवी कौटुंबिक जीवनाची माहिती दिली आहे. त्यांच्या पत्नी पार्वतीबाई या कर्कषा होत्या आणि कुंटे यांना गृहसौख्य नव्हते. चार मुलींची लग्ने झाली, परंतु मुलाला कुष्ठरोगाची दुर्धर व्याधी झाल्यामुळे त्याचे लग्न झाले नाही. याचाही परिणाम कुंटे यांच्या वर्तनावर, स्वभावावर झाला होता, हे डॉ. लिमये यांनी सांगितले आहे. कुंटे यांचे व्यक्तिमत्त्व व्यामिश्र, अनेक पदरी होते हे सांगून डॉ. पुष्पा लिमये लिहितात, 'स्वकाळात वा गतकाळात रमणारा तत्कालीन समाज व स्वकाळाची चौकट ओलांडून पुढे झेपावू पाहणारे कुंटे यांच्यातील अंतरामुळे समकालीनांना कुंटे यांचे सम्यक् आकलन झाले नाही, त्यामुळे त्यांची विद्वत्ता मान्य करूनही त्यांना विक्षिप्त ठरवण्यात आले.'

पूर्वेतिहास व पूर्वसंस्कृती याबद्दल कुंटे यांना डोळस अभिमान असला तरी आधुनिक पाश्चात्य आचारविचारांचे चिकित्सक मूल्यमापन करून जे पटेल, योग्य वाटेल, ते त्यांनी स्वीकारले.

पहिल्या विभागात डॉ. पुष्पा लिमये यांनी महादेव मोरेश्वर कुंटे यांच्या जीवनाची माहिती देऊन त्यांच्या शैक्षणिक सामाजिक व सांस्कृतिक कार्याचे मूल्यमापन केले आहे. कुंटे यांनी हंटर कमिशनपुढे साक्ष देताना मांडलेल्या शैक्षणिक विचारांचे मूल्यमापन मार्मिक आहे. दुसरा विभाग हा कुंटे यांच्या वाङ्मयीन कार्यावर लिहिलेला आहे. यांमध्ये 'राजा शिवाजी' या महादेव मोरेश्वर कुंटे यांनी सहा भागात लिहिलेल्या वीररसप्रधान महाकाव्याची 'पार्श्वभूमी, स्वरूप आणि समीक्षा' हा भाग या ग्रंथातील उत्कृष्ट भाग आहे. कुंटे यांचा इंग्रजी साहित्याशी उत्तम परिचय होता. त्याचप्रमाणे मराठीतील संतसाहित्य आणि शाहिरीवाङ्मयही त्यांनी चिकित्सकपणे वाचले होते. इतिहासाबद्दलची नवी जाण न्या. रानडे यांच्याप्रमाणेच कुंटे यांनाही झाली होती. कुंटे यांनी इंग्रजी साहित्याचे जे वाचन केले त्यातूनच महाकाव्याविषयक संकल्पना त्यांच्या मनात स्पष्ट झाली. डॉ. लिमये यांनी कुंटे यांच्या महाकाव्याविषयक विचारांची

माहिती देताना त्यामधील मुख्य सूत्रे सांगितली आहेत. कुंटे यांनी 'राजा शिवाजी' या महाकाव्यास लिहिलेल्या प्रस्तावनेत स्वदेश, स्वभाषा आणि स्वबांधव यांच्याबद्दलचे त्यांचे प्रेम कसे उत्कटपणे व्यक्त झाले आहे, याकडे डॉ. लिमये यांनी लक्ष वेधले आहे. 'राजा शिवाजी'तील व्यक्तिचित्रण, स्त्रीचित्रण, वीररसाची अभिव्यक्ती, तसेच शृंगार, करुण आणि अद्‌भुत रसांचा आविष्कार यांचे डॉ. लिमये यांचे विवेचन अत्यंत समतोल आणि वास्तवदर्शी आहे. या महाकाव्यातील युद्धवर्णनाप्रमाणेच निसर्गवर्णनांमुळे त्याला सौंदर्य प्राप्त झाले आहे हे सांगितले आहे. डॉ. लिमये यांनी प्रादेशिकता हे 'राजा शिवाजी'चे लक्षणीय वैशिष्ट्य आहे हे सांगताना मूळ वर्णनेच उद्‌धृत केली आहेत. डॉ. लिमये यांनी लिहिले आहे, '' 'राजा शिवाजी'तील वर्णनांतून अनेकदा रंगांचा, ध्वनीचा उल्लेख येतो. दृक्‌श्राव्य संवेदनांचे आवाहन कुंटे यांच्या मनापर्यंत चटकन पोहोचते याचीच ही खूण आहे. कुंटे यांना तेजाचे विलक्षण आकर्षण आहे.''

कुंटे यांच्या ''राजा शिवाजी''तील भाषाशैलीचे विश्लेषण फार मार्मिक आहे. डॉ. लिमये यांनी या आविष्कारात्मक वेगळेपणाचे कारण कुंटे यांच्या लोकाभिमुख काव्यविचारात आहे हे नेमके दाखवून दिले आहे. कुंटे यांच्या मर्यादा आणि सांकेतिकता यांचाही डॉ. लिमये यांनी स्पष्टपणे उल्लेख केला आहे. ''राजा शिवाजी'' च्या समकालीनांनी केलेल्या समीक्षेचीही समीक्षा डॉ. लिमये यांनी केली आहे.

कुंटे यांच्या अन्य काव्यासंबंधी लिहिताना पुष्पा लिमये यांनी 'मन' ही १८७२ मध्ये कुंटे यांनी लिहिलेली कविता ही मराठीतील पहिली चिंतनिका कशी आहे, हे सविस्तर सांगितले आहे. विष्णुशास्त्री यांनी या कवितेवर लिहिताना मुख्य विषय सोडून कुंट्यांच्यावर केलेल्या टीकेच्या एकांगीपणाचा परखड समाचार डॉ. पुष्पा लिमये यांनी घेतला आहे.

'ऋषि' या ऋग्वेदाधिष्ठित इंग्रजी कवितेचाही परिचय करून दिला आहे. हे काव्य ऋग्वेदाधिष्ठित असले तरी त्याची स्वतंत्र, समर्पक, आकर्षक मांडणी कुंटे यांनी केली आहे हे डॉ. लिमये यांनी दाखवून दिले आहे.

कुंटे यांच्या 'साहित्य विचारां'चे विवेचन करणारे प्रकरण फार महत्त्वाचे आहे. ''राजा शिवाजी''च्या प्रस्तावनेतून त्यांनी मांडलेल्या साहित्य विषयक विचारांचे स्वरूप स्पष्ट करून 'मन' या कवितेत कविमनाचे जे वर्णन कुंटे यांनी केले आहे त्याचा आशयही डॉ. लिमये यांनी नेमकेपणाने सांगितला आहे. डॉ. लिमये यांनी या प्रकरणात लिहिले आहे. 'काव्यनिर्मिती आणि काव्य-साहित्य-विमर्ष या दोन्ही क्षेत्रांत महत्त्वपूर्ण काम करणारे कुंटे हे त्या काळातील पहिले साहित्यिक विचारवंत आहेत.'

सातव्या प्रकरणात कुंटे यांच्या संशोधनपर वैचारिक लेखनाचा परिचय करून दिला आहे ''षड्‌दर्शनचिंतनिके''वर लिहिताना डॉ. लिमये यांनी हा ग्रंथ कुंटे यांच्या कर्तृत्वाची साक्ष देणारा, कर्तृत्वात भर टाकणारा आहे असे दाखवून दिले आहे.

महादेव मोरेश्वर कुंटे या काहीशा उपेक्षित लेखकाच्या लेखनासंबंधी आणि कार्यासंबंधीचा डॉ. पुष्पा लिमये यांचा हा ग्रंथ वाचताना विष्णुशास्त्रींनी केलेल्या टीकेमुळे मनात निर्माण

झालेले पूर्वग्रह दूर होतात आणि कुंटे यांच्या वैशिष्ट्यपूर्ण वाङ्मयीन व वैचारिक कार्याचे महत्त्व समजून येते.

❑

ग. प्र. प्रधान

५८३ सदाशिव पेठ, बॅ. गाडगीळ रस्ता, पुणे ४११ ०३०.

स्वागत

ज्युलिअस सीझर : मंगेश पाडगावकर, मौज प्रकाशन, मुंबई, पृष्ठे २२४.

कथा एका वास्तवाची : वासुदेव देशपांडे, अबोली प्रकाशन, सोलापूर, पृष्ठे १२८.

अळिंबी लागवड - कृषी पुरक उद्योग : दिनकर सावंत, संजय कोळसे, चिंतामणी देवकर, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, पृष्ठे १२४.

माणूस नावाचं गाव : राजेंद्र सोनावणे, अपीहा प्रकाशन, औरंगाबाद, पृष्ठे ६२.

आधुनिक महिपती : श्रीदासगणुमहाराज दर्शन

❑

म. श्री. दीक्षित

❑

(संतकवी दासगणुमहाराज दर्शन : शंब्दवाही मधुकर दत्तात्रय जोशी, प्रकाशक : डॉ. परिमल म. जोशी, पत्रकारनगर, पुणे १६.)

आचार्य अत्रे यांच्या 'मराठा' दैनिकाचे माजी प्रतिनिधी आणि पुण्याचे पत्रकारनगर उभारण्यात पुढाकार घेतलेले श्री. मधुकर द. जोशी गेली काही वर्षे संतकवी दासगणुमहाराज यांचे शिष्यत्व पत्करून मोठ्या निष्ठेने संतवाङ्मयाची निर्मिती करीत आहेत. शिर्डीचे साईबाबा हे त्यांचे आणखी एक निष्ठास्थान. साईबाबा आणि दासगणु या दोघांवरील भक्तिपोटी श्री. जोशी यांनी गतवर्षी 'संतकवि श्रीदासगणुमहाराज दर्शन' नावाचा एक भलामोठा संदर्भग्रंथ भक्तजनांसाठी उपलब्ध करून दिला आहे. रॉयल आकाराच्या ७०४ पृष्ठांच्या या ग्रंथाची संपादणी करताना त्यांनी जणू प्राणाची बाजीच लावली असावी.

मुखपृष्ठासह प्रस्तुत सचित्र ग्रंथाची छपाई आकर्षक झाली असून ग्रंथाचे अंतरंगही दासगणुमहाराजांच्या स्वकृत काव्यमय रचनांमुळे आणि त्या रचनांवरील अनके लेखकांच्या रसग्रहणात्मक परिचयलेखांमुळे बाळसेदार झाले आहे. दासगणुमहाराज (गणेश दत्तात्रय सहस्रबुध्दे) पूर्वायुष्यात पोलिसखात्यात नोकर होते, इतकेच नव्हे तर तमासगिरांच्या सहवासात राहून पोवाडे-लावण्या करण्याचा त्यांना छंद जडला होता. दैवयोगे १८९४-९५ मध्ये साईबाबांच्या सहवासात ते आले आणि त्यांच्या आशीर्वादामुळे वाल्याचा वाल्मिकी व्हावा असे महाराजांच्या जीवनात परिवर्तन झाले. महाराज साधे उपरणे पांघरून कीर्तने करू लागले आणि ती करता करताच ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, रामदास, कबीर, चोखा, सावता, शेखमहंमद इ. अनेक संतांवर ओवीबध्द कीर्तनोपयोगी चरित्रे रचू लागले. श्री वामनशास्त्री इस्लामपूरकर हे खरे तर दासगणुमहाराजांचे पहिले पारमार्थिक गुरु, आणि पुढे साईबाबा हे परात्परगुरु.

महाराजांच्या संतांवरील रचना आणि स्वकृत भक्तिलीलामृत, श्रीसाईनाथ स्तवनमंजिरी, भक्तिसारामृत इत्यादी ओवीबद्ध ग्रंथ हे विसाव्या शतकातील भक्तिवाङ्मयाला लाभलेले एक मोठे योगदान आहे. या रचनेत भक्तिभाव ओसंडून वाहवा यात नवल नाही. आश्चर्य वाटते ते महाराजांच्या रचनांमधील प्रासादिकतेचे. ओवी, अभंग इ. वृत्तांवरील त्यांचे प्रभुत्व हे प्रत्यक्ष आस्वादल्यावाचून कळणार नाही. अशा या आधुनिक महिपतीचे समग्र वाङ्मय, चरित्र

आणि त्या वाङ्मयाचा अनेक लेखकांनी, भक्तांनी करून दिलेला आस्वादक परिचय या सर्वांचे संकलन आणि संपादन करण्याची मोठी कामगिरी केल्याबद्दल मधुकरराव यांचे विशेष अभिनंदन करावेसे वाटते. वास्तविक शिष्योत्तम स्वामी वरदानंद (अ. दा. आठवले) यांनी यापूर्वी दासगणुमहाराजांचे चरित्र, कार्य आणि त्यांच्या काव्याची ओळख करून देणारे दोन प्रमाणभूत ग्रंथ लिहिलेले आहेत. त्या ग्रंथाचा मूलाधार घेऊन जोशीबुवांनी स्वत: आणखी माहितीची भर घालून आपला ग्रंथ 'शब्दवाही' या नम्र भूमिकेतून कष्टपूर्वक सिद्ध केला. त्यात थोडी विस्कळितता आणि पुनरुक्ती आढळली, तरीसुद्धा साईभक्त दासगणुमहाराजांचा शिष्यवर्ग आणि वाङ्मयाभ्यासक ग्रंथाचे स्वागत करतील, नव्हे त्यांनी ते करावे अशी शिफारस करावीशी वाटते. ❑

म. श्री. दीक्षित
२, भालचंद्र हाइट्स,
८४७, सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०.

स्वागत

भीमसेन : वसंत पोतदार, पृष्ठे २५४.
अफगाण डायरी : प्रतिभा रानडे, पृष्ठे २९२.
राजधानीतून : अशोक जैन, पृष्ठे ३३६.
श्रेष्ठ कोण ? स्त्री की पुरुष ? : सुमती चौगुले, इंदुजा प्रकाशन, मिरज, पृष्ठे २१२.

मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई यांची प्रकाशने

आठवणी प्रवासाच्या : संपादन अंजली कीर्तने, पृष्ठे १८०.
जे दर्पणी बिंबले : नीरज धुळेकर, पृष्ठे १९४.
आणखी गमती गमतीत : मुकुंद टाकसाळे, पृष्ठे ७६.
शर आणि अग्निशिखा : रमाकांत दत्तात्रय लाड, पृष्ठे १०६.
चमत्कार झालाच पाहिजे : रत्नाकर मतकरी, पृष्ठे ५४.
नावापुरत्या गोष्टी : मालती देशपांडे, पृष्ठे ६८.
मुळारंभ : मंदा खारकर, पृष्ठे ७२.

श्री. वा. गो. देशपांडे यांच्याकडून ग्रंथालयास सप्रेम भेट

अंतुल्यांच्या राज्यात, मधुतिष्ठति जिव्हाग्रे
संपूर्ण केशवसुत : संपादक शकुंतला क्षीरसागर, पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि., मुंबई, पृष्ठे ६२६.
खूप लोक आहेत : श्याम मनोहर : श्याम मनोहर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृष्ठे २२६.
कॅप्सूल्स : राम जावळे, विद्याभारती प्रकाशन, लातूर, पृष्ठे ८०.
लालित्य : अरुणा दामले, प्रकाशक - अनिल दामले, पुणे, पृष्ठे २०४.
गंधर्व छाया : स्वाती कर्वे, अक्षर छाया प्रकाशन, पुणे, पृष्ठे १५२.
भावगंध : शरद दांडेकर, प्रकाशक श्रीराम दांडेकर, मुंबई, पृष्ठे २४०.

गुरुची गुरुमाऊली-मुक्ताई - एक टिपण

❑

रवींद्र भट

❑

('गुरुची गुरुमाऊली मुक्ताई' : डॉ. विजया संगवई, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, पृष्ठे १६०.)

'गुरुची गुरुमाऊली मुक्ताई' हा डॉ. विजया संगवई यांचा छोटेखानी ग्रंथ म्हणजे आपल्या अध्यात्मशास्त्राची तोंडओळख करून देणारा आणि त्या शास्त्राची विराटता व्यक्त करणारा एक सहेतुक प्रयत्न आहे. रुढार्थाने या ग्रंथाची समीक्षा करणे, म्हणजे थेंबुरमाने सागराची मर्म-चिकित्सा केल्याप्रमाणे होईल. तो थेंबुरा सागरात सर्वार्थाने सर्वभावे मिसळून गेला तर त्याचे सूक्ष्मत्व नाहीसे होऊन तो स्वत:च सागरस्वरूप प्राप्त करून घेऊ शकतो, हे अध्यात्मशास्त्राचे मूलभूत गृहित आहे. 'अहं ब्रह्मास्मि' या पहिल्या वेदोक्त सूत्राशी या गृहिताचा थेट संबंध येतो. या संबंधाचे पूर्ण ज्ञान गुरुकृपेविना सर्वथैव अशक्य. म्हणूनच दुसऱ्या सूत्रात या ज्ञानालाच ब्रह्मस्वरूप बहाल केले आहे. 'प्रज्ञानं ब्रह्म !' या तपस्येने प्राप्त झालेल्या प्रज्ञेमुळेच सर्व चराचर सृष्टीच्या चलनवलनाच्या मागील मूळतत्त्व आपल्यामध्येच सामावलेले आहे, याची जाणीव साधकाला होते. 'तत्त्वमसि !' मग 'कोऽहं' ची प्रश्नचिन्हांची वर्तुळे संपतात आणि तो पूर्णज्ञानी पिंड 'सोऽहं' च्या आनंदभूमीवर निर्गुण निराकार स्वरूपात नित्य वास्तव्य करून राहतो. मोक्षाची संकल्पना याहून वेगळी नाही. माऊलीने या मोक्षकल्पनेलाच आनंदभूमीची उपमा दिली आहे. 'अमृतानुभव' ग्रंथामध्ये योगसाधनेने प्राप्त करून घेतलेल्या पूर्ण ज्ञानाविषयीच्या अलौकिक अनुभूतीचे विवेचन करताना माऊली म्हणते,

शिवा शिवा समर्था स्वामी। केव्हडी ये आनंदभूमी।
घेणे दिजे येके आम्ही। ऐसे केले ॥

स्थितप्रज्ञ संकल्पनेचे हे सर्व विवेचन मुक्ताईच्या साऱ्या चिंतनात्मक रचनांच्या विवेचनातून लक्षात येते. तिचे समग्र साहित्य हे अपार्थिवाचे एक अलौकिक देणे आहे. कुठल्याही पार्थिव पिंडाला ते झेपणार नाही. पेलणार नाही. म्हणूनच प्रारंभी म्हटल्याप्रमाणे या साहित्याची रुढार्थ समीक्षा करता येणार नाही. त्यासाठी तत्त्वज्ञानाची कास धरूनच त्यातील गुह्य, गुह्यतर आणि गुह्यतम या तिन्ही पातळ्यांवर काहीसा प्रकाश टाकता येईल. 'पिण्डे पिण्डे मतिर्भिन्न:' या उक्तीप्रमाणे प्रत्येक तत्त्वज्ञ आपापल्या पिंडाप्रमाणे त्या पूर्णसत्याचा शोध घेत असतो. स्वानुभावाप्रमाणे तो त्याची उकल झाल्यावर काही निश्चित गृहिते सिद्ध करीत असतो. त्यामुळे तत्वज्ञान हे पिंडसापेक्ष आणि भावरूप असते. त्यामुळे एखाद्याच्या चिंतनाचा एकवेळ गुणानुवाद करता येईल. पण भावानुवाद करणे सर्वस्वी अशक्य आहे. अनुभवातील साधर्म्याची सीमा

बाह्य वर्तुळापुरती सीमित असते. वर्तुळमध्याच्या सूक्ष्मबिंदूपर्यंत ती जाऊ शकत नाही. मुक्ताईच्या साहित्याचे अवगाहन करताना डॉ. संगवई यांना जो अनुभव आला, तो त्यांनी विविध गृहिते मांडून, मुक्ताईच्या अनेकविध रचनांचे दाखले देऊन, तिच्या जीवनातील अनेक घटना उद्धृत करून आणि ज्या संप्रदायात ती उमटली, त्या नाथसंप्रदायाचा मागोवा घेऊन या ग्रंथाद्वारे व्यक्त केला आहे. विषयाच्या अगदी मुळापर्यंत जाण्याचा त्यांचा हा प्रयत्न खरोखरीच प्रशंसनीय आहे. मात्र त्यांचे हे सारेच चिंतनात्मक लिखाण स्वान्तसुखाय आहे. इतर अभ्यासकांना ते भावेलच असे नाही. वैयक्तिक पातळीवर हे त्यांचे बलस्थान आहे! परंतु स्वानुभव जेव्हा सार्वत्रिक पातळीवर व्यक्त केला जातो तेव्हा तो एखाद्या 'शुगर कोटेड पिल'प्रमाणे रससिद्ध करूनच जनलोकासमोर मांडावा लागतो. तरच ती आदर्श टीका होऊ शकते. टीका हा शब्द मराठीत भाष्य या अर्थानेच पूर्वसुरींनी मांडला आहे. माऊलीने केलेली गीतेवरील टीका गीतेच्या प्रतिपाद्य विषयाचे विवेचन करता करता अनेक सौंदर्यलक्षी उपमा उत्प्रेक्षांनी नटवून, समकालीन लोकाचार, संस्कृती, लोकभाषा इतके नव्हे तर ऐहिक जीवनातील आनंद-दु:खांच्या क्षणाची पखरण करून, स्वत:ला भावलेले काही योगानुभव व्यक्त करून आणि ''भाष्यकाराते वाट पुसतु'' अशी स्वत:कडे विनम्र भावना बाळगून बहुजनापुढे मांडली. म्हणूनच तो ग्रंथ मराठी सारस्वताचा अमृतकुंभ ठरला. भागवतावर टीका करताना व्यासांच्या मूळ संहारकथेला एकनाथांनी भक्तिकथेचे अतिशय लोभस रूपडे दिले. तत्त्वज्ञानाचा अनवट राग आळविताना बहुजनांना भावणाऱ्या रागिण्यांचे नाद तालाचे अंगडे टोपडे घातल्याशिवाय कुठलेही गूढ ज्ञान बहुजनांना उमगत नाही, अशी माझी व्यक्तिगत धारणा आहे. डॉ. संगवई यांच्या या ग्रंथात हे अभावानेच जाणवते. म्हणूनच ही ग्रंथरचना ही 'स्वान्तसुखाय' निर्मिती आहे, असे मला प्रांजळपणे वाटते.

निवृत्ति-ज्ञानदेव-सोपाना-मुक्ताई ही भावंडे मूलत: अवतारस्वरूप आहेत. ब्रह्मा, विष्णु, महेश, देवर्षी नारद, देवेंद्र, देवगुरू या सर्वांनी आपापली शक्ती एकत्रित करून महिषासुर वधासाठी आदिमाया चित्कला निर्माण केली. तिने आपल्या सामर्थ्याने महिषासुराचा वध करून देवभूमी दानवमुक्त केली, अशी पुराणकथा आहे. आदिमाया हे स्त्रीशक्तीचे प्रतीक! तिथे वात्सल्य आहे, जिव्हाळा आहे, चुकलेल्याला चुचकारून सन्मार्गावर आणण्याची प्रेरणा आहे. मुक्ताई हा या आदिमायेचा अवतार आहे. तिचा जन्मच मुळी जीवोद्धारासाठी! काम क्रोधादि षड्रिपूंनी वेढलेले माणसातले महिषासुर नाहीसे करून समाजात सद्गुणांचे बीजारोपण करणे हे तिचे अवतारकार्य! तिचा श्वास वेदनेवर फुंकर घालणारा. तिचा स्पर्श वात्सल्याची पखरण करणारा आणि तिचा शब्द माणसातला संभ्रम नाहीसा करून त्याला पूर्ण ज्ञानाच्या वर्षावात अवभृथस्नान घालणारा! या गुणसमुच्चयामुळे आपल्या ज्ञानवंत भावाला — ज्ञानदेवाला — कर्मफलांचा क्षणिक संभ्रम पडताच ताटीच्या अभंगातून तिने पूर्वस्थितीवर आणले. चौदाशे वर्षे तपश्चर्या करूनही स्त्री-पुरुष यांच्यामधला भेद न विसरलेल्या चांगदेवाला आईच्या ममतेने मांडीवर बसवून त्याच्या कानी पूर्णज्ञानाचे गुह्य गूज घातले. सगुणभक्तीच्या छायारूपात अडकलेल्या भक्तराज नामदेवाचे मडके कच्चे आहे, ते सद्गुरूच्या सेवेत चांगले

भाजायला हवे, असे ठणकावून सांगितले. वैदिक कर्मकांडाच्या अतिरेकाने माणूसपण हरवलेल्या विसोबाला भक्तीमार्गाने आणि सद्गुरूकृपेमुळे लाभलेल्या योगसाधनेमुळे शरीराच्या परळावर मांडे भाजता येतात हे ज्ञानदेवांच्या साहाय्याने सिद्ध करून दिले. आणि अंती ज्ञानदेव, सोपान, वटेश्वर यांच्या संजीवन समाधीनंतर स्वत:चे विहित कर्तव्य सरल्याची जाणीव होऊन ती स्व-रूपात मिसळून गेली, सर्वार्थाने चित्कला ठरली, हे सारे प्रसंग आणि ते घडत असतांना मुक्ताईने त्या त्या प्रसंगी केलेले पूर्ण ज्ञानाचे विवेचन तिच्या अभंगरचनांमध्ये ठायाठायी प्रकट झाले आहे. त्यातील गूढता थोडीफार दूर करण्याचे काम आपल्या या ग्रंथांमधून लेखिकेने अत्यंत श्रद्धेने केले आहे. तत्त्वज्ञानाच्या या अभ्यासिकेकडून आणखी असेच कार्य व्हावे. पुढील टीका अधिकाधिक लोकाभिमुख व्हावी, अशी मी माऊलीचरणी विनम्र प्रार्थना करतो!

❑

रवींद्र भट

सी/४६, विजय कॉम्प्लेक्स, शास्त्रीनगर, पुणे ४११ ०३८.

अनिरुद्ध पब्लिशिंग हाऊस, पुणे, यांची प्रकाशने

भारतीय राज्य घटना आणि राजकीय व्यवहार : वि. मा. बाचल, पृष्ठे ५२२.

भारतीय राजकीय विचारवंत : वि. मा. बाचल, स. म. गोळवलकर, र. घ. वराडकर, व्ही. एस. क्षीरसागर, पृष्ठे ४५२.

शेषप्रश्न : प्रतिभेचा कथाविलास

❑

म. वि. कोल्हटकर

❑

(शेषप्रश्न (कथासंग्रह) : श्रीरग विष्णू जोशी, आर्यता प्रकाशन, सांगली.)

जी हकीकत दुसऱ्याला सांगावी असं आवर्जून वाटतं तिला कथा म्हणतात. श्रोत्याला ही हकीकत ऐकावीशी वाटायला हवी. कथा हुलकावण्या देते, चकवा देते, लपंडाव खेळते. चांगली रसरशीत कथा वाचून झाल्यावरही मनात रेंगाळते. कित्येकदा ती पुन्हा वाचाविशी वाटते. नव्या वाचनामध्ये ती नवनवे रागरंग प्रगट करते. जोमदार कथा भाषांतरित केल्यावरही आपले प्राणतत्व हरवून बसत नाही. चांगल्या कथेत नवनव्या प्रतिमा आढळतात, नवनवी कथाबीजे अधूनमधून डोकवतात. चांगली कथा कादंबरीच्या रूपात प्रगट होण्याची क्षमता बाळगते. चांगल्या अव्वल दर्जाच्या कथेची माझ्या मते ही लक्षणे म्हणून सांगता येईल.

अध्यात्माच्या क्षेत्रात चार प्रकारचे मुक्तीचे मार्ग किंवा योग वार्णिले जातात. ज्ञान, संन्यास, कर्म आणि भक्ती असे ते चार योग होत. कथेच्या प्रांतामधेही अशाच चार वाटांनी अग्रेसर होणारे साधक-लेखक आढळतात. ते चार योग-मार्ग असे : विनोद, विज्ञान, रहस्य आणि कवित्व. कवित्व हा पंथ भक्तिमार्गाला जवळचा म्हणायला हवा. सांगलीचे सुप्रसिद्ध कवी श्रीरंग विष्णु जोशी हे कवित्वमार्गी कथालेखक म्हणून नावारूपाला येऊ लागले आहेत.

श्री. जोशी हे तब्येतीने मूळचे कवी. श्रेष्ठ दर्जाचे प्रतिभावंत कवी. पन्नाशी ओलांडेपर्यंत त्यांनी मन:पूत विविध बाजाचे काव्यलेखन केले. प्रसन्न आणि पाणीदार अशी शब्दकळा त्यांच्या लेखणीला लाभली आहे. एखादा मल्ल भरपूर मेहनत करतो, खुराक घेतो आणि मग परिपूर्ण तयारी झाल्यावर आपले गोटीबंद शरीर घेऊन लाल मातीत उडी घेतो, त्याप्रमाणे श्री. जोशी यांनी शब्द नावाची सिद्धी आत्मसात केली आणि नंतर पूर्ण तयारीनिशी गद्यलेखनाच्या आखाड्यात ते उतरले आहेत.

'अदृष्टाची सावली', 'अनुदिनी अनुतापे' हे त्यांचे ललितलेखसंग्रह रसिकमान्य झाले. शिवाय अनेक पुरस्कारांनी सन्मानित झाले. 'धुके' या त्यांच्या कथासंग्रहामुळे समीक्षकांनाही भ्रुकुटी उंचावून त्यांच्या गद्यलेखनसामर्थ्याची दखल घ्यावी लागली. त्यानंतर नुकताच 'शेषप्रश्न' हा त्यांचा ताजा कथासंग्रह प्रकाशित होत आहे. वंगभाषीय खानदान सांगणारे हे शीर्षक संग्रहाने धारण केले असून प्रस्तुत संग्रहात परिपूर्ण कथानक असणाऱ्या एकूण दहा कथा आहेत. या सर्वच कथा दर्जेदार नियतकालिकांमधून आधी प्रसिद्ध झालेल्या आहेत आणि साक्षेपी संपादक आणि चिकित्सक वाचक यांच्या चाळणीतून उतरलेल्या आहेत.

प्रस्तुत संग्रहातील एकूण सर्वच कथांची शीर्षके नक्षत्रासारखी देखणी आहेत. कित्येक शीर्षके तर कथेच्या नाभिकमलातून अवतीर्ण झाली आहेत.

संग्रहाच्या प्रारंभी हर्मन हेज या पाश्चात्य समीक्षकांची काही वाक्ये उद्धृत करण्यात आली आहेत. घराची ओढ हेच एकमात्र आमचे मार्गदर्शक तत्व आहे असे हेज म्हणतात. गावाकडची ओढ हे जोशी यांचे एक बलस्थान आहे हे काही कथांवरून दिसते, पण घर आणि गाव यामधेच श्री. जोशी अडकून पडले नाहीत ही आनंदाची गोष्ट आहे. लेखक ज्या परिसरात वाढला आहे त्या परिसरातीलच चित्रे तो रेखाटतो आहे. खोटा अभिनिवेश किंवा कळवळा धारण करून अन्य सामाजिक स्तरांत फेरफटका टाकण्याचा सवंगपणा तो दर्शवीत नाही ही अभिनंदनीय बाब आहे.

'मुखवटे', 'अग्रे धावति धावति' आणि 'ओढ' या प्रस्तुत संग्रहातल्या विशेष उंची प्राप्त झालेल्या कथा. स्वत:जवळ स्वत:च्या मालकीचे कित्येक किलो सोने आहे, पण ते कुलदेवतेच्या मुखवट्याच्या रूपात आहे. त्यामुळे मुलीच्या लग्नखर्चासाठी पैसे उसनवार मागण्याची वेळ येते. 'मुखवटे' या कथेत आनिखिंडी नावाच्या गृहस्थाच्या नशिबी असा हा विचित्र दुर्दैवविलास येतो. 'अग्रे धावति धावति' मधे भूत आणि भविष्य यांचे ज्ञान झाल्यामुळे प्राप्त आयुष्याची घडी उद्ध्वस्त होण्याची पाळी शिंदगीसरांवर येते. विशेष म्हणजे संबंधित स्त्रीलाही गतजन्माची स्मृती होत राहिल्यामुळे निर्माण होऊ पाहणारा कोलाहल थोपवण्याचा प्रयत्न हा वाचकाला अधिकच बेचेन करतो. छोटा सचिन जन्माला येण्यापूर्वी कितीतरी वर्षे आधी त्याचे आजोबा संन्यास घेऊन परागंदा झाले आहेत. अगदी नकळत सचिनला देखील यतिजीवनाचे वाटणारे आकर्षण, त्याच्या सूचक खुणा हे पाहून सचिनची आई हैराण होते. आध्यात्मिक विकसनाची ही चाहूल एखाद्या विचित्र शापाचे रूप घेऊन 'ओढ' या कथेत व्यक्त होते.

अगदी प्रारंभीच्या 'बाराखडी' नामक कथेत लेखकाने 'चिलिया कोरडे' नावाच्या वाळबोध, निरागस, तरल मनाच्या कोवळ्या मागासवर्गीय मुलाचे सुंदर चित्र उभे केले आहे. पण त्या मुलाचे गोबर गॅस प्लँटमध्ये अपघाती मरण दाखवल्यामुळे बाराखडी पुरेशी उमटू न देता कथेचा अगदी सवंग शेवट घडला आहे. 'शेषप्रश्न' या शीर्षक-कथेत लेखकाने आईचे व्यक्तिचित्र, गाव व घर यांचा परिप्रेक्ष्य, आईचे आजारपण यांचे उत्कट कातर चित्रण केले आहे. अखेरचा श्वास घेण्यापूर्वी आईने घातलेला उखाणा,

बैराग्याच्या झोळीमधे
आभाळाची गाणी
सात रांजण भरून देखील
घरात नाही पाणी

अनुत्तरित राहतो. त्याची उकल करण्यासाठी लेखकाने केलेला विफल प्रयास याचे चित्रण उत्कट झाले आहे. तथापि त्या उखाण्यातील गूढता, अस्वस्थता, विराम न पावू शकणारा भावनांचा कल्लोळ ही पार्श्वभूमी आईच्या व्यक्तिचित्रामध्ये न आढळल्यामुळे कथा पुरेशा

उंचीवर पोहोचत नाही.

'ऐसी अहेवाची ऐलथडी' या कथेला वटसावित्रीच्या पूजेचा अभिनव आशय प्राप्त झाला आहे. 'शुक्र'मध्ये परिस्थितीच्या अभद्र लाटेमुळे देशपांडे यांना आपल्या मुलाचे आपल्या मुलीशी लग्न झालेले पहावे लागते. त्यामुळे ते स्वत:चा शेवट करतात असा विज्ञानाच्या संदर्भात नियतीचा निर्घृण खेळ पहायला मिळतो.

'नीहार' या कथेमधे रतिसौख्याचे तृप्त अतृप्त असे रंग उमटले आहेत. मात्र प्रस्तुत कथेने अचानकपणे समलिंगी संबंधांचे घेतलेले वळण न पटण्यासारखे आहे. समलिंगी संबंध ठेवणाऱ्याची मनोभूमिका, त्यांच्या मनाची जडणघडण हा एक वेगळाच विकार-प्रवास आहे. त्याचा विकास कथेत अजिबात घडलेला नाही. त्यामुळे मूळ कथेतील चौथाईकाकूंच्या कामजीवनाचा अध्याय या विषयाच्या रेषाच हरवून जातात.

'डोह' या कथेत स्त्रीच्या ठिकाणी सुप्तपणे वास करणाऱ्या आदिशक्तीचे दर्शन घडते. पण प्रस्तुत कथेचा जीव छोटा वाटतो. शिवाय त्यातील आत्महत्याविषयक वर्णनाचा पसारा बऱ्याच प्रमाणात अनावश्यक वाटतो.

'शोकसंध्या' या कथेमध्ये उत्तरायुष्याच्या अखेरच्या क्षणी कृष्ण-राधेची भेट घडली आहे. कृष्णाची मुरली राधेने जिवाभावाची खूण म्हणून बाळगली आहे. आयुष्याच्या या संध्यासमयी कृष्ण आणि राधेची झालेली पुनर्भेट आणि अस्ताचलावर उभे राहून दोघांनी आपल्या पूर्वायुष्याकडे फिरवलेली नजर हा आकांत लेखकाने विलक्षण ताकदीने चित्रित केला आहे.

तास किंवा पैलू पाडलेल्या हिऱ्याची झळाळी लेखकाच्या शब्दांना लाभली आहे. त्या दीप्तीमधे कथाविषयातील किंवा कथेच्या मांडणीतील बारीकसारीक त्रुटी लोपून जातात.

नवनव्या प्रतिमांच्या निर्मितीचे लेखकाचे सामर्थ्य लक्षणीय आहे. 'नवनीतकोवळा आवाज', 'मेंदीचं फुलपाखरू', 'लाल चोचीचे राजहंस', 'वटवृक्षाचे सहस्त्रावधी पर्णाक्ष', 'निरंजन नजर', 'हिरवेगार स्वागत' या अशा वर्णनाच्या ओघात आलेल्या काही सहजसुंदर प्रतिमा.

वर्णनाच्या ओघात कुठेकुठे गद्यपद्याचे द्वैत संपते आणि कविताच अग्रेसर होताना दिसते. एकूण संग्रहात कुठल्याही पानापासून वाचायला प्रारंभ केला तरी ओघ सापडतो आणि पुढील अक्षर न् अक्षर वाचत राहावेसे वाटते.

पृष्ठ क्र. १०२ वर ''ती अशीच अभुक्त राहिली असेल का? जवळजवळ दोन तपाचा आउटस्टँडिंग अकौंट तिने सेटल करून दिला असता?'' हा वर्णनाचा तुकडा कथेची पातळी खाली आणतो. अर्थात अशा त्रुटी फार नाहीत.

आजकाल कसदार, पिळदार कथानक असलेल्या कथा अभावाने वाचायला मिळतात. प्रस्तुत संग्रह मात्र तो दुर्मिळ आनंद प्राप्त करून देतो.

❑

म. वि. कोल्हटकर

'वैष्णव', १६ जीवनछाया वसाहत, सिव्हिल हॉस्पिटलसमोर, सातारा ४१५ ००१.

संवेदनशील मनाचे प्रतिबिंब - 'ग्रीष्मपर्व'

❑

श्रीकांत भा. गोंधळेकर

❑

(ग्रीष्मपर्व (काव्यसंग्रह) : श्री. सुरेश पाचकवडे, कीर्ती प्रकाशन, औरंगाबाद. पृ. ७५.)

कवी आणि त्याची स्वत:ची कविता ह्यांच्यामध्ये एक अतूट आणि अव्यक्त असं नातं असतं. प्रत्येक कवीला त्याची प्रत्येक कविता एका वेगळ्या अशा मानसिक स्थितीत गवसलेलं अभंग शब्दलेणं असतं. त्यामुळे कोणत्याही कवीने त्याच्या कवितेत मांडलेला विचार, त्याने अशा पद्धतीने न मांडता, अशा प्रकारे त्याने ते प्रकट केलं असतं तर ते अधिक प्रभावी झालं असतं वगैरे म्हणणं (म्हणजे समीक्षणात्मक टिका-टिप्पणी) 'आफ्टर थॉट'च ठरतो. कारण कविता हे केवळ त्या भावसमाधीचं फलित असतं. त्यामुळे कवीने एकदा कवितारूपाने मांडलेला एखादा विचार ह्यात सुधारणा किंवा बदल करण्याचा अधिकार खरं तर त्या कवीलाही उरत नाही. फार फार तर तो त्या शब्दशिल्पातील शुद्धलेखनाच्या चुकांची दुरुस्ती तेवढी सारस्वताच्या नियमांनुसार करू शकतो, नव्हे प्रत्येकाने आपली कविता ह्या कसोटीवर तपासायलाच हवी. तसा फिनिशिंग टच प्रत्येकाने आपल्या रचनेला द्यायलाच हवा. कारण त्यामुळे ती रचना सुलभतेने अर्थवाही होते. त्यावर दुर्बोधतेचं शिक्कामोर्तब करण्यास कोणी धजावू शकत नाही. तसंच त्यामुळे कवीला आपल्या कवितासंग्रहाला वेगळं मनोगत लिहायची गरज राहत नाही. प्रत्येक कविता हेच त्याचे अव्यक्त मनोगत होते.

अशाच प्रकारचा एक 'मनोगतरहित' काव्यसंग्रह श्री. सुरेश पाचकवडेंनी 'ग्रीष्मपर्व' ह्या शीर्षकाने मराठी सारस्वतात रुजू केला आहे. श्री. पाचकवडेंच्या ह्या संग्रहातील कविता ह्या वर म्हटल्याप्रमाणे विशिष्ट भावसमाधीची शब्दरूप शिल्पे असल्यामुळे आणि त्यांनी त्याला फिनिशिंग टच दिलेला असल्यामुळे, त्यांची प्रत्येक कविता हीच त्यांचं अव्यक्त मनोगत झालेली आहे. इतकंच नव्हे तर पाचकवडेंनी प्रत्येक रचना ज्या विशिष्ट भावावस्थेत जशी सुचली तशीच्या तशी स्वीकारल्यामुळे त्यांची कविता रसिक-वाचकाला स्वत:च्या अव्यक्त अनुभवाची प्रतीती आणून देते, इतकी ताकद त्यांच्या कवितांत आलेली आहे. 'ग्रीष्मपर्व' मधील कविता ही त्यांच्या वैयक्तिक अनुभूतीतून स्फुरलेली आत्ममग्न रचना आहे. त्या कवितेला स्वत:ची अशी एक ठाम 'भूमिका' आणि विशिष्ट 'लय' जागोजागी जाणवते. ही कविता वाचताना वाचक स्वत:चं वेगळं अस्तित्व टिकवून ठेवू शकत नाही, तर तो त्या कवितेतून प्रकट होणाऱ्या अनुभवाचा एक भागच होवून जातो. कवितेची लय कशी असते तसेच कवीचा

तो भाव सार्वत्रिक अनुभव कसा होतो याचं सुंदर उदाहरण म्हणजे त्यांच्या पुढील ओळी —

देह नागवा लाजला
कात सर्पाची दिसता
गेले भान विसरून
हाती बिल्लोर फुटता।

जुळ्या स्तनांमधे कोण
गेले चंद्रास गोंदून
तृप्त नदीचा किनारा
गेला पाऊस चुंबून।

पाचकवडेंच्या प्रतिभेला प्रतिमा आणि प्रतिकांच्या वापराचा खूप सोस नाही. म्हणून त्यांची कविता पचायला जड न जाता नदीच्या प्रवाही पाण्यासारखी वाचकाला हलकेच स्वत:सोबत घेऊन जाते. त्यामुळेच त्यांच्या कवितेला दुर्बोधतेचा कॅन्सर झालेला नाही. त्यांची कविता शब्दबंबाळ नाही. सहज स्वत:हून अर्थ प्रकट करणारी ती 'सेल्फ एक्सप्लेनेटरी स्टेटमेन्टस्' आहेत. कुठलंही पान उघडून वाचायला घेतलं तरी 'ग्रीष्मपर्वा'तील प्रत्येक कविता ताज्या टवटवीत फुलावरील दवबिंदूप्रमाणे वाचकाला आकृष्ट करते. मग ती 'फकीर' सारखी अष्टाक्षरी असो की मुक्तछंदातील 'घर ते घरच असतं' सारखी रचना असो, वाचकाला त्यातून मिळणाऱ्या निखळ आनंदाची श्रेणी एकच असते, हेच कवितेचं यश आहे. अशाच यशस्वी चार ओळी आपण पाहू. त्यात कवी म्हणतो —

आकाशाला साज येतो
चंद्र ताऱ्यांच्या संगाने
मातीचंही सोनं होतं
तुकोबाच्या अभंगाने।

अशा प्रकारे पाचकवडेंची कविता ही दु:खवेणांची अंतर्मुख कहाणी आहे.

पाचकवडेंना असं यश मिळण्याचं कारण, त्यांच्या कवितेतून प्राप्त परिस्थितीबाबत कुठलीही तक्रार नाही. कुठलाही आक्रस्ताळेपणा नाही, तसेच परिस्थितिशरणताही नाही. आहे त्या परिस्थितीत समाधान मानून इतरांनाही आनंद मिळवून देण्याचं गमक त्यांना साधलं आहे. जे जसं अनुभवलं ते तसंच्या तसं मांडणं ह्या स्वभावातून त्यांना साधलंय. पण ते मांडताना दुसरा कुणी दुखावणार नाही त्याची दक्षता घेताना ते वार हुकवण्यासाठी कासवाप्रमाणे हात, पाय आणि शीर आपल्या कोषात असं ओढून घेतात की, पुढच्याच्या वाराने आपल्याला इजा न होता वार करणाऱ्याचं शस्त्र बोथट व्हावं, हा भाव त्यांच्या 'शब्द', 'पदर', 'हेवा' अशा रचनांमधून अनुभवता येतो. 'पदर' मध्ये कवी विचारतो —

उन्हात कुणी सावली मागितली तर द्याल तुम्ही?
की, आडोशाला उभं राहून त्याला घालवाल तुम्ही!

अशा ओळींमधून कवीने समाजाच्या स्वार्थी वृत्तीचं मनोज्ञ चित्रण केलं आहे. यातही अनुभूती आणि अभिव्यक्तीतील एक गंमत पहायला मिळते. ती अशी की, पहिल्या ओळीतून कवीने प्रश्न विचारला आहे. या प्रश्नाचं उत्तर दुसऱ्या ओळीत आलंय. इथेच अनुभूती आणि अभिव्यक्तीचं बेमालूम मिश्रण दिसतं. दुसरी ओळ पहिल्या ओळीच्याच ढबीत वाचली तर त्यातून पहिल्या ओळीचं प्रश्नार्थक उत्तर मिळतं. पण दुसरी ओळ जशी उद्‌गारवाचक चिन्हाने अभिव्यक्त केली आहे, तशी ती वाचली तर त्यातून समाजाच्या कृतीचं स्पष्ट शब्दचित्र उभं राहतं. पाचकवडेंच्या कवितांत अशा अगदी खोचक ओळी जरी असल्या तरी त्या वाचताना वाचक दुखावला न जाता त्यातील अभिव्यक्तीने त्या वाचकांना ओशाळून टाकून अंतर्मुख करतात. ही संपूर्ण कविता समाजाच्या आपलपोटेपणाला विचारलेल्या प्रश्नांची मालिकाच आहे. बारकाईने वाचली तर सगळी कविता समाजाच्या वृत्तीतील आपलपोटेपणाची चीड आणणारी व्यक्तव्यं (स्टेटमेन्टस्) आहेत. पण कवीच्या कुर्मिवृत्तीला अनुसरून त्याने हे सगळे प्रश्न कासवासारखे आपले सर्व अवयव आत ओढून समाजावर केलेले वार आहेत, तरी ते वार वाटत नाहीत. कारण तो सार्वत्रिक अनुभव आहे. मुख्य म्हणजे, या अशा कवितांमधले प्रश्न जराही आक्रस्ताळेपणा न करता रूढ प्रमाणभाषेतून अत्यंत समंजसपणे विचारले आहेत. त्यामुळे तो विद्रोह न ठरता ते कवितेचे अलंकार ठरतात.

असं असल्यामुळे आणि सर्व कविता मराठी सारस्वतात रूढ झालेल्या प्रमाणभाषेतून अवतरल्या असल्यामुळे श्री. सुरेश पाचकवडेंच्या साहित्याला (कथा-कवितांना) कोणतंही लेबल चिकटलेलं नाही. त्यामुळे त्यांची साहित्यसेवा लेबलविरहित अशा निखळ सारस्वतांची सेवा ठरते. त्यामुळे मराठी सारस्वतांत तिचं बिनदिक्कतपणे स्वागत होतं.

श्री. सुरेश पाचकवडेंच्या कवितेला प्रतिमा-प्रतिकांचा हव्यास नाही हे जितकं खरं, तितकंच हेही खरंच आहे की, 'दिवा आणि वारा-वादळ' यांचं प्रचंड आकर्षण त्यांच्या मनाला आहे. त्यामुळे या प्रतिमा त्यांच्या या संग्रहातील ६९ कवितांपैकी ७ कवितांमधून डोकावतात. 'कात' मध्ये पाचकवडे म्हणतात —

मनी जपलेले घाव
जणू हत्याराचे पाते,
दिवा आणि वारा असे
जन्म मरणाचे नाते।

इथे जन्म-मरणाची अनिश्चितता मांडताना वादळात सापडलेल्या दिव्याची अगतिकता प्रकट होते. तर 'वादळ' मधून प्रतिपादित होणारा दिवा आणि वादळ आणखी वेगळीच

अनुभूती देतो.

कवी म्हणतो —

नाही कुणी तारा
आज आकाशात,
विझू नये दीप
द्वाड वादळात।

वरील ओळींमधे शेवटच्या दोन ओळींचं पहिल्या दोन ओळीतल्या अर्थाशी जवळचं नातं आहे. पण वर म्हटल्याप्रमाणे केवळ ह्या प्रतिमांच्या आकर्षणापायी यमकांकरिता ह्याच प्रतिमा 'भोग' ह्या कवितेत पुढीलप्रमाणे उमटतात. ह्यातील पहिल्या दोन ओळींचं एकमेकींशी काहीही नातं जुळलेलं दिसत नाही तर शेवटच्या दोन ओळींसोबत पहिल्या किंवा दुसऱ्या ओळींचा दुरान्वयानेही संबंध जुळवता येत नाही.

कवी म्हणतो —

पाण्यात जगले मासे
उन्हात सर्पांच्या काती,
अंधार गुहेच्या पाशी
वादळ विझवे वाती।

असं असलं तरी, आयुष्याच्या संध्याकाळचं समर्पक वर्णन करणाऱ्या पुढील ओळींमधून 'वारा-वादळ आणि दिवा' ह्या प्रतिमा चारही ओळी एकमेकांत 'अर्थवाहित्वाने' गुंतवून अतिशय सुंदरपणे अभिव्यक्त होतात. कवी म्हणतो —

पान पान गळू आले
गेले अस्तित्व लोपत,
वारा-वादळात कसा
दिवा ठेवू मी तेवत?

अशाच प्रकारे 'वारा-वादळ आणि दिवा' पाचकवडेंच्या वात, तळे, घरकूल या कवितांतूनही वेगवेगळ्या प्रकारे डोकावत राहतात. असं आकर्षण असणं मुळीच वाईट नाही पण त्यामुळे 'भोग' ह्या कवितेतल्याप्रमाणे होऊ न देण्याची दक्षता बाळगणं जरूरीचं आहे, असो.

तर अशा प्रकारे वैयक्तिक अनुभूतींना वैश्विक अनुभव करून सोडणाऱ्या पाचकवडेंच्या भावी सारस्वत सेवेला शुभेच्छा!

❑

श्रीकांत भा. गोंधळेकर,
द्वारा श्री. भा. अ. गोंधळेकर,
अनंत खेडकर नगर, अकोला ४४४ ००१.

सौंदर्यवती नर्मदा

❑

डॉ. सारिका ठोसर

❑

(सौंदर्यवती नर्मदा : अनु. मीनल फडणीस, श्रीविद्या प्रकाशन, पुणे ३०, प्रथमावृत्ती २००१)

'सौंदर्य की नदी नर्मदा' या श्री. अमृतलालजी बेगड यांच्या हिंदी पुस्तकाचा मराठीत स्वैर अनुवाद म्हणजे 'सौंदर्यवती नर्मदा' हे पुस्तक होय. २५००० वर्षं जुनी नर्मदा — जिचे वर्णन स्कंदपुराणातील रेवा खंडात सापडते, त्या नदीला 'चिरकुमारी' हे विशेषण लाभले आहे. गंगा नदी ही भारतीयांसाठी श्रेष्ठ असली तरी नर्मदा ही ज्येष्ठ आहे. गंगेत स्नान केल्याने जे पुण्य मिळते, तेवढे नर्मदेच्या केवळ दर्शनाने मिळते. संपूर्ण जगात फक्त याच एका नदीची परिक्रमा केली जाते. अशा या नदीच्या परिक्रमेचे साद्यंत वर्णन, सदर पुस्तकात केले आहे. मुळात सर्वांगसुंदर असणाऱ्या भावकवितेचा मीनलताईंनी तोडीस तोड असा अनुवाद केला आहे.

नर्मदापरिक्रमेच्या वर्णनात नर्मदेच्या सौंदर्याबरोबरच मुग्ध करणाऱ्या लहानलहान सुभाषितांचा पाऊसच पडला आहे. सूर्य-चंद्राच्या सुंदर उपमा-दृष्टांतांनी पुस्तक नटले आहे. प्रसंगी विनोद तर आहेच, परंतु कित्येक ठिकाणी स्तिमित करणारे जीवनभाष्यही आहे. लेखक अतिशय मनकवडा आहे. दु:खितांचे दु:ख त्याला पहावत नाही. मानवतेच्या पुजाऱ्याच्या या उदात्त जीवनदृष्टीपुढे वाचक नतमस्तक होतो.

रोजच्या धकाधकीच्या जीवनात लेखकाला संपूर्ण परिक्रमा एकाच वेळी पूर्ण करता आली नाही. त्यानी ती हप्त्याहप्त्यानी केली, याची त्याला खंत आहे. त्यावर एक खेडुत स्त्री त्याची छान समजूत काढते, 'लाडु एकदम खाल्ला काय आणि थोडा थोडा खाल्ला काय सारखाच गोड लागतो.'

लेखक नर्मदा परिक्रमेच्या संपूर्ण नियमांचे पालन करण्यासही बांधला गेला नव्हता. तो कुठेही अंधभक्तीच्या आहारी गेलेला दिसत नाही. लेखक अत्यंत भाविक आहे, परंतु भावुक नाही.

नर्मदाकाठच्या सर्व खेड्यातून सर्वच परिक्रमावासींना अतिशय आदराने आणि पूज्य भावनेने सन्मान मिळत असे. प्रत्येक ठिकाणी आपुलकीने होणारे स्वागत मानवतेने ओथंबलेले असे. अर्थात यालाही काही अपवाद होते. 'मर्दाना' या गावी ७५ वर्षांपासून एका घरी सदावर्त चालू होते. लेखकाला वाटते की, आयुष्य एका पिढीचे असते, परंतु सत्कर्म पिढ्यानपिढ्या चालू असते. भीलखेडा येथे एका सद्गृहस्थाने निराळ्याच प्रकारचे सेवाव्रत घेतले होते. अशा मानवतेच्या सेवेसाठी झिजणाऱ्या व्यक्तींवर मानवतेच्या पुजाऱ्याचे मन लुब्ध होणे स्वाभाविकच आहे.

अनुक्रमणिका

लेखकाने आपल्या जीवनाची अत्यंत मौल्यवान तरुणाईतील ५ वर्षे रवींद्रनाथ टागोर यांच्या 'शांतिनिकेतन' येथे व्यतीत केली आहेत. याचा सखोल ठसा त्याच्या व्यक्तित्वावर स्पष्टपणे उमटलेला दिसतो. अमरकंटक येथे नर्मदेच्या उगमाच्या दर्शनाने भारावलेला लेखक नर्मदेत दिवे सोडताना मागणे मागतो, 'आई नर्मदे, तुझ्या पूजेसाठी एक दिवा लावला आहे, त्याच्या मोबदल्यात माझ्याही हृदयात तू एक दिवा लाव. हृदयात खूप अंधार आहे.' या घटनेनंतर ५ वर्षांनंतरसुद्धा अंतरीचा दिवा पेटला नाही म्हणून खंतावणारा लेखक नर्मदेवर रागावून तिच्यात पुन्हा दिवे सोडायला तयार नसतो, तेव्हा त्याचा साथीदार 'दादू' समजावतो, 'बाहेरचा दिवा चटकन लागतो व चटकन विझतो. परंतु अंतरात लावलेला दिवसा सहजगत्या पेटत नाही व सहजगत्या विझतही नाही. त्याचा उजेड खूप वेळ टिकतो व खूप दूरवर पसरतो' यावर लेखकाचे बालसुलभ व्यक्तिमत्व दिवा पेटवायला राजी होते.

संपूर्ण पुस्तकात केवळ एका ठिकाणी अनुवादिकेचे अवधान सुटलेले दिसते. 'किंगरी' या गावाची आठवण लिहिताना अमृतलालजी लिहितात, 'एक जगह शादी हो रही थी। हम भी शामिल हुअे। भँवेर पड़ रही थी। सभीने दुल्हा-दुल्हनके पैर पुजे। दुल्हन के हाथ में दो रुपये रखे तो तहलका मच गया। सभी दस्सी दस्सी जो दे रहे थे।' (पृष्ठ ४१) या ठिकाणी मीनलताई लिहितात, 'गावात एका ठिकाणी लग्न होते. आम्ही सुद्धा त्याच्यात मिसळलो. सप्तपदी चालू होती. सर्वांनी वरवधूची पूजा केली म्हणून मी पण केली. इतरांप्रमाणे मी सुद्धा नवरा नवरीच्या हातात दोन रुपये ठेवले. अरे बापरे, तेथे एकदम काव-काव सुरू झाली. 'अरे या शहरी बाबूंनी फक्त दोनच रुपये दिले ? आम्ही पहा दहा-दहाची नोट देत आहोत (पृष्ठ ३४).' 'दस्सी' या शब्दाचा अर्थ 'दहा पैसे' असा आहे. परंतु अनुवादिकेने 'दस्सी' या शब्दाचा अर्थ १० रुपये असा केल्याने वाक्याचा पूर्ण अर्थच बदलून गेला. उदार मनाचे अमृतलालजी वाचकांस, अनुवादिकेच्या अनुवादाने कृपण वाटण्याइतपत बदलले गेले आहेत !

एकदा परिक्रमेची सुरुवात करताना (हप्त्याहप्त्यानी प्रदक्षिणा करताना) पैशाची व्यवस्था होत नाही. तेव्हा अग्नीसमक्ष जिचा हात हातात घेतला त्या पत्नीसमोर भिक्षांदेहीसाठी हात पसरताना होणारी लेखकाच्या मनाची घालमेल उत्कृष्ठपणे साकार झाली आहे. पत्नीच्या दानशूरपणाची स्तुती करून त्याने विषयाला आरंभ केला, तेव्हा पत्नीने क्षणाचाही विलंब न करता आपल्या हातातील अंगठी काढून दिली व त्यावर म्हणाली, 'एवढ्याशा गोष्टीसाठी एवढी स्तुती !' कुंचल्याच्या एका फटकाऱ्यासरशी लेखक-पत्नी आपल्यापुढे उभी राहते आणि तिच्या उदार व पतिपरायण दर्शनाने आपण स्तिमित होतो. दोनचार फटकाऱ्यात एखादे व्यक्तिचित्र जिवंत करण्याची कला लेखकाच्या अंगात मुरलेली आहे. आपल्या सहयात्रींविषयी लिहितो 'कक्का, रम्मू व दादू हे तिघे चहाचे पक्के चाहते. रम्मू खूप आनंदी असे. जेव्हा पहावे तेव्हा नाचत असतो. पायवाटेने जाताना किंवा गावकऱ्यांसमोर नाचताना त्याला किंचितही संकोच होत नसे. कक्का गंभीर व कामसू, तर रम्मू फक्कड व मस्तमौला. दादू खूप कमी बोलतात, परंतु जेव्हा बोलतात तेव्हा त्यांच्या धीरगंभीर स्वरांमुळे एखादा संत बोलत असल्याचा भास होत असे. उत्तम, छान, अतिउत्तम हेच शब्द त्यांच्या तोंडी असत. जाड, कच्ची किंवा करपलेली

भाकरी मिळाली तरी ते म्हणत, 'अति उत्तम.' प्रदक्षिणेच्या निरनिराळ्या टप्प्यांवर त्यांच्याबरोबर निरनिराळे साथीदार असत. परंतु त्या अल्प सहवासातही त्याचे परस्परांवर एवढे प्रेम बसे की, शेवटी निरोप घेताना त्यांच्या मनाचा बांध फुटत असे.

'व्यक्तित्व तसे साहित्य' या म्हणीप्रमाणे पुस्तकात लेखकाचे प्रांजळ, सात्विक, पारदर्शक, कठोर आत्मपरीक्षण करणारे, मनमोकळे, श्रद्धायुक्त परंतु डोळस ऋजू अंत:करण, मनकवडेपणा व भावुकता असे अनेक विशेष दिसतात. या सर्वांला हलक्याफुलक्या विनोदाची झालरही लागली आहे. उत्कृष्ट चित्रकार असल्याने कोणताही प्रसंग, व्यक्ती, वातावरण तो रसिकांपुढे स्पष्टपणे साकार करतो. छोटी छोटी सुभाषितवजा वाक्ये पानापानांवर प्रकट झाली आहेत. 'परिक्रमे' ऐवजी 'परिक्रमा' हा शब्द त्यामागील छटा उजळून टाकतो. सुभाषिते व म्हणींच्या खैरातीची अनेक उदाहरणे यात दिसतात. उदा.

१) प्रेमाचे दिवे मोठ्या कष्टाने लागतात, परंतु मत्सराची आग सहजगत्या पेटते.

२) गाकर ही प्रकृती, चपाती ही संस्कृती तर पराठे ही विकृती होय.

३) आनंदाच्या क्षणाला दु:खाची झालर असल्याशिवाय गंमतच नाही.

४) पाऊलवाटेचे सृजन लोकगीतांप्रमाणे लोकांकडून होते.

अशी शेकडो वाक्ये पुस्तकात ठायी ठायी येतात. या सर्वांबरोबर विनोदाची साथ असल्याने रसिकाची 'वाचनयात्राही' सुखद होते. खेडूत 'युकेलिप्टस' या झाडांचा उल्लेख 'लिपिस्टीक' म्हणून करतात, याचा उल्लेख लेखक आवर्जून करतो. एकदा निजल्या जागी साप निघाला आणि समोर दुसरा साप दिसला, तेव्हा या भयभीत करणाऱ्या परिस्थितीतही विनोदप्रिय लेखकाच्या मनात येते, आज आम्ही नागलोकात आलो आहोत की काय ? उन्हाच्या झळांनी अंगावर बसलेल्या धुळीच्या पुटांमुळे लेखक स्वत:ला मोहंजदडो आणि हडप्पा काळात वास्तव्य करणारा एक असे मानू लागतो. 'साठे' नावाच्या एका साथीदाराला फोडणी देण्याचे काम इतके आवडत असे, की एखादवेळी तो खिरीलाही फोडणी देईल की काय ? असे लेखकाला गमतीने वाटते.

असा विनोदी स्वभावाचा लेखक तितकाच अंतर्मुखीही आहे. जातीपाती न मानणारा लेखक म्हणूनच सहजगत्या चांभाराच्या घरी आवर्जून भिक्षा मागतो. एका मजुराच्या घरी भाकरी खाऊन पुढे तो म्हणतो, 'अरे भाऊ, आज मी नक्कीच तुझ्याकडची भाकरी खाईन. त्यामुळे महाभारतातील मुंगुसाप्रमाणे माझेही शरीर सोन्याचे होईल' त्यामागे अशी पवित्र भावना आहे.

लेखकाची सौंदर्यदृष्टी अतिशय कोमल आहे. पदयात्रेत वसंतपूर, कंचनपूर, चंदनघाट, कस्तुरी पुष्पराजगड अशी लागोपाठ येणारी सुंदर नावे पाहून तो तिथल्या लोकांच्या साहित्यिक रूचीला मनोमन दाद देतो. एका खेड्यात पोहोचतो, तेव्हा त्याला अखंड कीर्तनासाठी निमंत्रण मिळते. कारण तेथे दुसऱ्या दिवशी आंब्याच्या झाडाचा जाईच्या वेलीशी शास्त्रोक्त विधीने विवाह होणार असतो. हा विवाह झाल्याशिवाय त्या गावचे गावकरी आंबा खात नसत. लेखक लिहितो, 'खेड्यातील कष्टाळू आयुष्याला अशा घटनांनी जिवंतपणा येतो, तर तुवरखेड

येथे एका स्त्री-सौंदर्याच्या दर्शनाने लेखक अचंबित होतो. इतका सुंदर, कोमल, मृदुल, कोरीव चेहरा त्यानी यापूर्वी कधीच पाहिला नसतो. लेखकानी तिचे नाव 'कृष्णकळी' ठेवले. त्यानी केलेल्या स्त्री-सौंदर्याच्या वर्णनात त्याची पूज्य भावनाच तीव्रतेने प्रकट होते. स्त्री ही कधी आईच्या रूपात येते, तर कधी भगिनीच्या, तर कधी मुलीच्या रूपात समोर येते. तरूण सौंदर्याच्या घेतलेल्या वेधातही कुठे विकारांचा स्पर्श नाही, तर त्यातून स्फटिकासारखी स्वच्छ सौंदर्यदृष्टीच मनाला मोहून घेते. एकदा स्वयंपाकासाठी लेखकाला पाणी हवे असताना दोन स्त्रिया पूजेसाठी घेऊन जात असलेले पाणी त्याला अगत्याने देतात, परंतु त्यानंतर येणारा पुरूष 'हे पूजेचे पाणी आहे' म्हणून दुसऱ्यांदा पाणी देण्यास नकार देतो. तेव्हा लेखक लिहितो'' हे भगिनी, त्या दिवशी तू देवाला अभिषेक करू शकली नाहीस, परंतु माझा अंतरात्मा म्हणत आहे, तुझा देवाकडे खाडा झाला नाही.'

सूक्ष्म निरीक्षणशक्तीचे लेखकाला वरदान लाभले आहे, म्हणूनच एका झाडाखाली बसल्यावर त्या झाडावरील मुंगळ्यांच्या घराचे त्याने बारकाईने व सविस्तर वर्णन केले आहे. त्या घरात एखादा मांडव, एखादा महामंडप, गर्भगृह आणि एखादे नाट्यगृहही असू शकेल असे कल्पनाप्रधान लेखकाला वाटते. वास्तुशास्त्राचा हा अनुपम नमुना त्याला मनापासून आवडतो.

या पदयात्रेत लेखकाला नर्मदेने मगरीच्या रूपात दर्शनही दिले आहे. तो संपूर्ण प्रसंग फारच रोमांचकपणे रेखाटला आहे. लेखकाचा मूळ पिंड हा मूलत: अध्यात्मावर पोसला गेला आहे. त्यामुळे त्यानी केलेले जीवनभाष्य हृदयस्पर्शी ठरते. लेखक भाग्यवादी नसला तरी आशावादी आहे. अडचणीच्या वेळी देव कोणता ना कोणता मार्ग दाखवेल, यावर त्याची पूर्ण श्रद्धा आहे.

परिक्रमा जसजशी सागराजवळ सरकत जाते, तसतशी लेखकाची मनोवृत्ती अधिर होत जाते. जिथे नर्मदा आणि समुद्राचे मीलन होते, तिथे तर लेखकाच्या मनाचा बांध फुटतो आणि डोळ्यांतून तृप्तीचे आनंदाश्रू पाझरू लागतात. नर्मदास्तवनात त्याची भावसमाधी लागते. वाचकही नकळत त्या भावानंदात सहभागी होतो. शेवटचे आवाहन तर अतिशय हृदयस्पर्शी आहे. 'ऐका हो ऐका, मी नर्मदाकाठावरून आलो आहे. तिच्या सौंदर्याचा थोडा प्रसाद आणला आहे. घ्या, हा प्रसाद लुटून घ्या आणि जास्त प्रसादाची हाव असेल तर एके दिवशी पहाटे उठा, आपल्या घराचे दार पाठीमागे बंद करा. मनाची दारे उघडा. आत्म्याचा आवाज ऐकत नर्मदाकाठी धाव घ्या. ती तुम्हाला कवटाळायला उत्सुक आहे. तिची सर्व गुपिते सांगायला, तुमचे जीवन समृद्ध करायला सदैव तत्पर आहे. ऐकता ना तुम्ही ? मी नर्मदाकाठचा राहणारा, बोलत आहे...' लेखकाचे एकच स्वप्न आहे की, आपला शेवटही नर्मदेच्या कुशीत व्हावा. अशा या रेवापुत्रास शतश: नमन. 'सौंदर्यवती नर्मदा' आणि 'सौंदर्यकी नदी नर्मदा' या दोन्ही पुस्तकांचा आस्वाद बरोबर घेतल्यास रसिकांचा आनंद खचितच द्विगुणित होईल, यात शंका नाही.

❑

डॉ. सारिका ठोसर
११८, साकेत, सन्मति नगर, अधारताल, जबलपूर ४८२००४ (मध्यप्रदेश)

स्त्रीदु:खाच्या विविध मिती न्याहाळणारे - 'मनवा'

❑

डॉ. लीला दीक्षित

❑

(मनवा : भारती पांडे, पद्मगंधा प्रकाशन, प्रथमावृत्ती २००१ पृष्ठे ९६.)

कलावंताचे मन अग्नी असते. सतत जळणारे. जळणे आणि फुलणे जणु त्याचा स्थायीभाव. परंतु या जळण्याला शब्दानी अर्थपूर्णता देता देता कवीमन फुलते, कविता साकारते कधी, हे त्या कवीलाही कळत नाही. तो भानावर येतो आणि मग कविता कागदावर उतरते. सभोवतालचा परिसर आणि माणसाचे एक परिहार्य नाते असते. हा परिसर केवळ निसर्ग नसतो. या परिसराला निसर्गाबरोबरच अनके गोष्टी वेढून असतात. हव्याशा आणि नकोशाही! विविध माणसे नात्यातील, शेजारपाजारची आणि जगताना विविध संबंधातून आपल्या जीवनात प्रवेश करणारी असंख्य माणसे. वागणे, बोलणे, हसणे, दिसणे, या साऱ्यांमधून कसलाही थांग न लागावा असेच रसायन असणारी ही माणसे. ही माणसे भळभळ वाहणारी दु:खे पदरात घालीत असतात. त्या दु:खांनाच पहात बसण्याचा एक विलक्षण लळा 'मनवा'मध्ये आपल्याला जाणवत राहतो. आणि काहीतरी नवे अनुभवल्याचा आनंद देतो.

'मनवा' हा भारती पांडे यांचा पहिलाच कविता संग्रह. ग्रंथ निर्मितीच्या दृष्टीने पहिला म्हणू या. परंतु पहिलेपणाच्या अडखळणाऱ्या खुणा येथे अजिबात नाहीत. उलट पहिला कोंब जसा रसरशीत तजेलदार असतो तसेच येथे जाणवते. येथे शब्दांची मुद्रा उमटते ती सहज. झरणाऱ्या नदीसारखी सहज प्रवाही. मनवा म्हणजे मन. हे मन हळुवार संवेदनक्षम मन आहे. स्त्रीच्या वाट्याला येणाऱ्या अनेक दु:खभोगाचे अनामिक पदर लोलक फिरवून रंग न्याहळावे तसे कवयित्री न्याहळीत बसते. आयुष्यभर हातात हात घालून चाललेल्या जोडीदारामध्ये आश्वासकता न भेटल्याने मन सैरभैर होते, हे स्त्रीचे रूप केवळ एका स्त्रीचे असते का? या रूपात अनेक स्त्रियांची रूपे दिसू लागतात. नागर-ग्रामीण, शिक्षित-अशिक्षित, सनातन-कालची आणि आजच्या स्त्रीची रूपे. आज काय बदलले आहे स्त्रीचे प्राक्तन? फक्त आजची स्त्री स्वप्न पाहते, तीही कालच्या स्त्रीजवळ नव्हती. त्यामुळे हे दु:ख न्याहळणे अर्थपूर्ण बनते. ''नवे पंख उगवणार नाहीत या वयात'' असे जाणणारी, दु:ख पदरात बांधून जगणारी प्रातिनिधिक स्त्री अनेक कवितांमधून भेटते. काही वेगळी वाट शोधावी अशी आस असणारी स्त्रीही येथे खुणावत राहते.

या वाटेच्या मोहात पडावं
कडेची रानफुले कुरवाळावी
मोकळा छातीभर श्वास घ्यावा
या सगळ्याची किंमत किती चुकवावी लागेल? (पाऊलवाट)

ही किंमत परवडणारी नसतेच, गालावर ओघळणारा आसू हेच त्याचे उत्तर असते.

आपणच केलेल्या निर्मितीमधे स्त्रीचा सुखाचा वाटा किती? कारण सारे दुःख पोटात गिळून ऋतूच्या स्वागताच्या तयारीला स्त्रीने लागायचे वृक्षासारखे. मग वृक्षाला पुल्लिंग प्रदान करण्याचे कारणच काय? असा प्रश्न कवयित्रीच्या मनात सहज उमटतो. वृक्ष तर खरा 'स्त्रीजातक', ऋतु बदलले की रंग पालटणारा, सुखाची पाने गळली तरी ते दुःख मुळाशीच खोल पुरून टाकणारा, निर्माल्यातून नवा रंग शोधणारा आणि वादळवाऱ्याशी झुंजत हसत राहणारा वृक्ष खरं म्हणजे स्त्रीचे सारे गुण उरी बाळणारा.

कवयित्री विचारते,

मला सांगा.
तुम्ही माणसं
वृक्षाला 'पुरुष' का म्हणता? (स्त्रीजातक)

स्त्रीलाही माणूस म्हणून स्वयंप्रेरणेने जगण्याची आस असते. परंतु ध्येयाच्या पाऊलवाटेला दूर सारीत जगणे अटळ असते. सारी स्वप्ने पापणीतच बंद राहतात.

चारी बाजूनी - हिरवट काळं काळोखं जंगल
वेटाळून घेतं
पुढं पुढं जावं
तसा मागचा रस्ता मावळून जायला लागतो.
अजस्त्र अंधारे वृक्ष बाहू पसरलेले
आणि अजगरी वेल
रस्त्यासकट साऱ्याला गळामिठीत घेऊ पाहणारे-इथं,
मऊ गादीवर — माझी तडफड — पुढच्या श्वासासाठी. (स्वप्न)

'मनवा'तील बहुतांश कविता अशा स्त्रीची दुःखे विविध मितींनी आरास मांडावी अशी भेटतात. स्त्रीला आता ना माहेराचा आधार, ना वाढवलेल्या मुलांचा. नवरा तर कधीच आपला नसतो, तरीही स्त्रीमुक्तीच्या पाऊलखुणा धुंडाळणाऱ्या स्त्रीच्या मनात एक हळवा कोपरा मातृत्वाने नाहलेला असतोच. बिचारी आई म्हणत असते, सारी दुःखे उरी रिचवून तुझ्याबरोबर तुला मोठे करण्यासाठी मी चालले रे!

परंतु मुलगा विचारतो —

असतीस माझ्यासवे। माझ्या चालीने चालत।
आज पदांच्या या रांगा। नसत्या का दुहेरीत?

मुलासंगे प्रवास संपल्याचे दु:खात स्मरण रहावे ते 'माझी लेकुरे सानुली दु:ख स्पर्शू नये त्यांना। म्हणुनिया उचलली' असे स्वत:चीच समजून घालीत ही आई डोळ्यांमधले पाणी लपवीत सारं साजरे करते.

''बरे झाले लेकराने.। आज मला सोडवले
डोळ्यामध्ये पाणी, तरी हात मोकळे जाहले।''

हे 'मोकळेपण' किती जिव्हारी लागणारे!

सामाजिक जाणीवेला स्पर्श करणाऱ्या काही कविता (दंगल, आजची रात्र, माता) 'मनवा'त भेटतात. पण तो कवयित्रीचा स्वभाव नव्हे. प्रकृतीच्या विरुद्ध जाण्यात अर्थ नसतो. आणि असे उसनं अवसान आणण्याचे कारणही नाही. 'मनवा'चे खरे सौंदर्य स्त्रीचे दु:ख विविध पातळीवरून न्याहाळण्यात आहे. कवयित्रीच्या आस्तित्वकोषाला स्पर्श करणारी कविता येथेच भेटते. ही दु:खे व्यक्त करताना कवयित्रीने अर्थपूर्ण प्रतिमा सहजपणानी व्यक्त केल्या आहेत. या प्रतिमा अर्थप्रतिती समृद्ध करतात, तसाच आपला अनुभव श्रीमंत बनवतात. प्रतिमांचे कार्यच अर्थ सुंदर आणि समृद्ध बनवणे असते. आजकाल कवितेमध्ये भेटणाऱ्या प्रतिमा अर्थ उलगडून दाखवण्याऐवजी आपल्याला गूढ जंगलात घेऊन जातात आणि गोंधळात टाकतात. तसे येथे घडत नाही. आशयातून उमलून येणाऱ्या या प्रतिमा वेगळ्या सौंदर्याची मुद्रा आपल्या मनावर उमटवितात. काही प्रतिमांचा मुद्दाम उल्लेख करते.

बोगनवेलीच्या घोसात घुसणाऱ्या पाऊसधारा (नि:संग), रिकामे झोपाळे (माहेर), एकटेपणाचा काळा ठिपका (ठिपका), निर्घृण रेतीतील थेंब (दान), छोटेपणातील पायातील छुमछुम (सोबत), उजेडाचे बेट (बेट), वृक्ष (स्त्रीजातक), इ. 'मनवा' मुळातूनच वाचून हा आस्वाद रसिकांनी घ्यायला हवा. मधाच्या पोळ्यातून सहज थेंब ठिपकावा, तसा अर्थ येथे प्रतिमांतून उलगडतो. कोणत्याही क्लिष्टतेचे, गूढतेचे बुरखे येथे शब्दानी पांघरलेले नाहीत. अलीकडे सहसा कवितेला न लाभणारा 'प्रसाद' गुण 'मनवा'त भेटतो. जीवनातील आनंदमयतेची, तृप्ततेची मुद्रा येथे अभावानेच भेटते. 'रतिक्लान्त' यासारख्या कविता अपवाद म्हणूनच भेटतात. स्त्रीच्या दु:खाचा ठसठशीत उद्गार हेच 'मनवा'चे खरे मर्म म्हणायला हवे! पहिल्याच संग्रहात आपले वेगळेपण अधोरेखित करणारा श्रीमती भारती पांडे यांचा 'मनवा' म्हणून स्मरणात कायम राहील असाच आहे.

❑

डॉ. लीला दीक्षित
'ध्रुव', ४९/२ सहजानंद, कोथरूड, पुणे ४११ ०२९
फोन : ५३८१७३३

अनुक्रमणिका

प्रादेशिक ललित गद्याचा नवा आविष्कार: 'गावदरणी'

❑

नीलम सावंत

❑

गावदरणी (ललितलेख) : शंकर सखाराम, सिग्नेट पब्लिकेशन्स, पुणे. पृष्ठे १७१

ग्रामीण साहित्य व प्रादेशिक साहित्य यांच्या सीमारेषा एकमेकांत भिडलेल्या आहेत, तशा त्या अनेकांगी वेगळ्याही आहेत. ग्रामीण साहित्य हे ग्रामाशी, एखाद्या व्यक्तीशी निगडित असते तर प्रादेशिक साहित्य हे एखाद्या प्रदेशाशी निगडित असून तेथील वर्ण्यजीवन हे तेथील मातीशी, ऋतुचक्राशी, निसर्गाशी बांधलेले असते. ते पूर्णपणे प्रदेशनियत असते.

या दृष्टीने विचार केला तर व्यंकटेश माडगूळकर यांचे लेखन, श्री. ना. पेंडसे, चि. त्र्यं. खानोलकर यांचे कोकणच्या पार्श्वभूमीवरील लेखन लक्षणीय ठरते. कोकणच्या प्रादेशिक लेखनाचा विचार करता कै. र. वा. दिघे हे पहिले प्रादेशिक लेखन करणारे लेखक ठरतील. त्यानंतर पेंडसे, खानोलकर वगैरेंच्या लेखनाचा प्रदेश आहे तो विशेषत: दक्षिण कोकणचा. हा दक्षिण कोकणचा प्रदेश कर्णिक, पेडणेकर वगैरे लेखकांनी मराठी वाङ्मयात अक्षर केला. परंतु ज्याला आपण उत्तर कोकण म्हणजे रायगड, ठाणे परिसर हा लेखनाच्या बाबतीत तसा कोराच होता. तेथील ग्रामजीवन मराठी सारस्वतात आलेच नव्हते. कै. दिघ्यांनी ह्यापूर्वी खोपोली नजिकचा परिसर आपल्या कादंबऱ्यांनी आविष्कृत केला होता. परंतु त्याच्याही आज मर्यादा स्पष्ट होतात. दिघे मूळचे खोपोलीचे नव्हते. त्यांचा जन्म कल्याणचा. नंतर ते आजोळ गावाला — खोपोलीला — राहायला गेले. नंतर त्यांनी खिडकीत बसून बाहेरचे शेती-भातीचे, आदिवासींचे, शेतकऱ्यांचे जीवन दुरून जसे दिसले तसे पाहून त्यास पारंपरिक शृंगाराची जोड देऊन लेखन केले. एकूण कै. दिघ्यांचे लेखन तसे उपरेच.

कै. दिघ्यांनंतर कित्येक वर्षे ह्या कुलाब्याच्या (रायगड) भातखचरांतील, आगरातील, खोरेपाटातील जीवनाची वाङ्मयीन म्हणू अशी नांगरणी झालीच नाही. 'नांगरल्याविण भुई बरी, असे किती तरी —' असे केशवसुतांनी म्हटल्याप्रमाणे उत्तर कोकणची आगर भूमी मराठी साहित्यात कोरडी होती. परंतु 'सनदी तेथे कोण वदा, हजारातुनी एखादा' असा शंकर सखाराम सारखा लेखक निर्माण होतो तेव्हा तेथील आगरजीवन जिवंत होऊन वाचकांच्या समोर येते. शंकर सखाराम यांनी कथा, कादंबरी, ललितलेखन अशा प्रकारच्या लेखनातून अलिबाग ते पेण यांच्यामधला म्हणजे पोयनाड-पेझारी-कोपर ते रेवसपर्यंतचा प्रदेश अक्षर केला आहे. तेथील आगरातील आगरी जीवन, दर्यावरचे कोळी-जीवन, डोंगरातील आदिवासी जीवन त्यांनी प्रत्यक्ष पाहिले, अनुभवले, स्वत: त्या जीवनाचा एक घटक म्हणून ते कष्टकठोर

जीवन जगले; ते त्यांनी आपल्या लेखनातून रंगगंधासह उतरवले आहे. आणि ते वाचण्यालायक आहे.

'गावदरणी' हे त्यांचे अलिकडे प्रसिद्ध झालेले पुस्तक. या आधी 'घरपरसू' हे ललित-लेखांचे आलेले पुस्तक. ह्या 'घरपरसू'त घर आणि परसूसंबंधी जीवन, तेथील झाडे-पाने, लोकसंस्कृती आली आहे. ह्या 'घरपरसू'चा पुढचा टप्पा म्हणजे 'गावदरणी'. 'गावदरणी' म्हणजे गावाभोवतीचा परिसर. हा परिसर लेखकाने आपल्या लेखणीतून साकार केला आहे. तेथील वैरूप्याला सुरूप्य केले आहे.

प्रथम गावदरणीचे हिरवेगार मुखपृष्ठाचं हे लेखन काय दर्जाचे असावे ते स्पष्ट करते. गावदरणीत गाव आणि त्याभोवतीचा परिसर, निसर्ग, चित्रित झाला आहे. एकूण गावदरणीत वीस ललितलेख समाविष्ट आहेत. ह्या लेखांची सुरुवात 'वैशाख मासी' लेखाने झाली असली तरी खरी सुरुवात चैत्र महिन्याच्या वर्णनाने येते. म्हणजे चैत्र ते फाल्गुन असे हे वर्षाचे ऋतुचक्र येथे अवतरते. येथे लेखक एकेक महिन्यातील सण, उत्सव, शेतीचे हंगाम, जत्रा, खेळ, निसर्गाचे राग-रंग वर्णन करत करत एक प्रादेशिक पट विणत जातो. त्यात नाना लोकगीते, लोककथा पेरीत तो रंगतदार, सजीव करत आगरातील लोकांची, शेतकऱ्यांची सुख-दुःखे रेखीत ह्या पटाचे ताणेबाणे सशक्त करीत जातो. त्यास लेखकाच्या भाषेची कलात्मक झालर लाभली आहे.

वैशाख मासात लेखक वैशाखातील उन्हाच्या तलखीबरोबर मधुमासाचे वर्णन करतो. चैत्र म्हणजे वसंत बहार, पण खरा वसंत आस्वादायचा असेल तर वैशाख मासीच. रसिकत्वाला परतत्व स्पर्शायचा असेल तर वैशाखाच्याच गावी जावे लागेल, असे लेखक वैशाखाच्या खऱ्याखुऱ्या भरल्या दिवसांचे वर्णन करतो आणि पुढे ऋतूंची साखळी गुंफत जातो. वैशाखानंतर येतो जेष्ठ. पण ह्यावेळी लेखक 'आगोल'चे म्हणजे पावसाळ्याच्या सुरुवातीचे चविष्ट वर्णन करत वाचकापुढे नाना रंग-गंध सोडतो. ते सोडता सोडता आषाढाकडे घेऊन जातो नि आषाढातली शेतीची कामेधामे सांगत आषाढीने लेखकाला काय दिले ते कृतज्ञतापूर्वक सांगतो. श्रावणाचे वर्णन अनेकांनी कथा-काव्यातून केले आहे. लेखकाने श्रावणाचे वर्णन टाळून त्यावेळी शेतात चालणाऱ्या लावणीचे-अंबवणीचे वर्णन केले आहे. ते मुळातच वाचनीय आहे. येथे वर्णनात लोकगीतांची लय येते नि लावणी आसमंतात बहरते. येथील अंबवणी, लावणी यांची व्युत्पत्ती अभ्यासण्यासारखी आहे.

श्रावणानंतर येतो भाद्रपद. भाद्रपद भद्रपद देणारा, पण लेखकास ह्या भाद्रपदाची भीती वाटते. गणपती घरात कसा येणार ही साऱ्या घराची चिंता. मग गणपती गावाला गेल्यावर लेखकाच्या आईचा जीव भांड्यात पडतो. हे जगापेक्षा वेगळे आहे. पुढे आश्विनातील 'कोजागिरी', दिवाळी कार्तिकातील 'कार्तिकी' असे प्रत्येक महिन्यात इथे लोक येतात नि जणू आगरातील ऋतुचक्र स्पष्ट करतात. वेगळा प्रदेश साकारतात.

'पीला हत्ती' हा लेख मर्ढेकरांच्या कवितेतून प्रस्फुरित झालेला आहे. धर्माकाकाचे व्यक्तिमत्त्व येथे वाङ्मयीन मूल्य प्राप्त करून घेते आहे. 'मातीवरचे जग' ह्या लेखात तर

आजवर मराठी वाङ्मयात कधी न आलेल्या वीटभट्टीचे वर्णन आले आहे. 'खोंडा' हा तर संपूर्ण वेगळा लेख. लेखकाची आई डोक्यावर घेत असलेला आगर संस्कृतीचा ठेवा (भूषण) असलेला खोंडा (खोळा) लेखकाची सूक्ष्म निरीक्षणशक्ती दाखवतो. 'हंदी' सारखा लेख श्रमसहयोगातून काम कसे साधावे ह्याचे जणू बाळकडूच पाजतो. येथे येणारी माहिती इतरत्र मिळणे कठीण. लेखक जणू इथे आगरातील माहितीची पेठच खुली करतोय. 'जिताडा' तर खाडीच्या शेतात मिळणारा एक चविष्ट मासा; त्या माशावर लेखकाने संपूर्ण लेखच उभा केलाय. कसब सन्माननीय आहे. त्याने इथे सामान्याला असामान्य केलंय.

गारवदरणीत दोन लेख झाडांवर येतात. एक छायादार मायाळ आम्रवृक्ष. लेखक म्हणतो, 'आम्ही जन्मलो आईच्या कुशीत, पण वाढलो संत्र्यांब्याच्या छायेखाली.' असा हा लेखकाचा पालनकर्ता छत्रीच्या आकाराचा संत्र्यांबा, तर दुसरा 'मुंजवड' भुताटकीचा. येथे कोकणची भुतावळ, अंधश्रद्धा, अपसमजुती येतात नि मग दैन्य-दुःखाच्या कहाण्या येतात. पण ह्या कहाण्यांत लेखकाची मार्गदर्शकाची किंवा हितोपदेशकाची भूमिका नाही. तर जे अनुभव गाठीशी आले ते बाल्य मनाने सांगत बालपणीच आस्वादलेले. रंग-गंध-नाद सारे सारे लेखनात उतरवत वाचकांपुढे आहे त्या स्वरूपात (असंस्कारित) तो मांडतो. इथे Earthen sensibility महत्त्वाची ठरते. नशिबी आलेली गरिबी, दुःख सोसणे हे सारे होऊनही लेखक कुठे चिडचिडा होऊन काही सांगत नाही. उलट औद्योगिकरणाने बदललेले जीवन फक्त वाचकांसमोर ठेवतो, त्यावर भाष्य करीत नाही. म्हणजे इथे लेखकाने खांडेकर, फडकेकालीन लघुनिबंधाची धाटणी न स्वीकारता मुक्तचिंतनात्मक लेखन अशी नवीन मुक्त धाटणी स्वीकारलेली आहे. इथे लेखकाला काहीतरी (संस्कारक्षम) सांगायचे आहे, अशी पूर्वसुरींची लघुनिबंधाची धाटणी मान्य नाही तर ललितगद्याची मुक्त धाटणी आहे; जे इतरांना ग्रामसंस्कृतीविषयी माहीत नाही; ते सांगण्याची.

गावदरणीत काय नाही? येथे झाडे, पाने, पशु-पक्षी, जनावरे, नद्या-नाले, डोंगरदऱ्या असे काव्यसुंदर अलंकृत वर्णन आहे.

आगरातल्या माणसांच्या चालीरीती, खाणेपिणे, श्रद्धा-अंधश्रद्धा, सण, उत्सव, लोककथा-लोकगीतं आहेत. अनेक शब्दांच्या व्युत्पत्ती, सांगोवांगी निर्मिती आहे. कुठे लघुनिबंधाची सांगणी आहे. लोकगीतांची सुरेख, सुंदर पेरणी आहे. नाना प्रकारची माहिती आहे. म्हणजे हा पूर्वीचा नुसता ललितनिबंध नसून, ग्रामसाहित्याची खाण आहे. प्रादेशिक ललितगद्याचा नवा आविष्कार आहे. 'अंघोळ' किंवा 'आगरातला खोळोत्सव' सारखे लेख लांबलेत खरे. पण अशा लेखनात ते क्षम्यही आहे. नाहीतरी असे जिवंत रसरशीत रंग, रस, गंधयुक्त अनुभव आज तरी किती लेखक देऊ शकतात. असे लेखन म्हणजे ग्रामसंस्कृतीची जोपासना आहे. ती लेखकाने उत्तम तऱ्हेने केली आहे. असे लेखन महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांना अभ्यासाला नेमायला हवे. म्हणजे ही पुसली जाणारी ग्रामसंस्कृती अमर होईल, तिची जपणूक होईल.

कोकण म्हटले की तो समुद्रकिनारा, त्या नारळीपोफळींच्या बागा, असा सदाहरित पट्टा आपल्यासमोर येतो. आणि असा हा प्रदेश आधीच्या लेखकांच्या लेखनात आलाही आहे.

परंतु शंकर सखाराम आपणास दाखवितात ते कोकणचे दुसरे रूप. जे समुद्रकिनाऱ्यापासून आत असलेल्या डोंगर-दऱ्यांच्या आणि खाडीच्या लगतची — पावसाचे चार महिने सोडले तर तिथे मैलोंमैल पडलेली काळी रखरखीत अशी भातशेती. शंकर सखाराम जे वर्णन करतात ते एका बाजूस कोकणची डोंगरदऱ्यांची हिरवळ आणि दुसऱ्या बाजूस रखरखीत असा प्रदेश यांच्यामधील खलारी आणि वलाटी जोडणाऱ्या प्रदेशातील ग्रामजीवन; जे अजून मराठी साहित्याच्या वाट्याला कधी आलेच नाही. म्हणून हे लेखन प्रादेशिक (ललितगद्याचा) नवा आविष्कार, नवे रूप ठरते. ❑

प्रा. नीलम सावंत
'स्वर्ग', बाळाराम पाटील रोड, विरार (प.), जि. ठाणे.

स्वागत

खालील ग्रंथ सौ. कुसुम गोपीनाथ शेंडे यांच्याकडून ग्रंथालयास सप्रेम भेट
आधुनिक महाराष्ट्राचे जनक : जांभेकर गणेश गंगाधर भाग १, २ व ३,
बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर
हे विश्वचि माझे घर : अनुवाद, शास्त्री शंकर बालाजी
बाळशास्त्री हरदास यांचे निवडक निबंध (भाग १)
नरहर शंभूराव भावे : दिवाण वि. प्र., समर्पिता : बापू वाटवे
निरोप घेता : ना. भि. परुळेकर
लो. टिळकांचे केसरीतील लेख, भाग २
समग्र केळकर वाङ्मय खंड १ टिळक खंड
समग्र केळकर वाङ्मय खंड २ लोकमान्य खंड
समग्र केळकर वाङ्मय खंड ३ केसरी खंड
समग्र केळकर वाङ्मय खंड ४ राजकारण खंड
समग्र केळकर वाङ्मय खंड ५ असहकारिता खंड
समग्र केळकर वाङ्मय खंड ६ वार्ताहर खंड
समग्र केळकर वाङ्मय खंड ७ इतिहास खंड

- **खालील नऊ पुस्तके श्री. रवींद्र भट यांच्याकडून ग्रंथालयास सप्रेम भेट**
  लेखक रवींद्र भट, प्रकाशक इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे
  भेदिले सूर्यमंडळा, सत्यं शिवं सुंदरम, एका जनार्दनी, भगीरथ, बंध विमोचन, सागरा प्राण तळमळला, घास घेई पांडुरंगा, खुर्ची, इंद्रायणी काठी
  शिवाय सुवर्णस्मृति सुवर्णमहोत्सवी विशेषांकाची एक प्रत.
- **खालील तीन पुस्तके बाळ गाडगीळ यांच्याकडून ग्रंथालयास भेट** : ले. बाळ गाडगीळ
  आमची केळ्याची साल, हसो हसो, मी, तीन तरुणी आणि एक खलनायक,
  खालील पुस्तके माधुरी पुरंदरे यांच्याकडून ग्रंथालयास सप्रेम भेट
  वाचू आनंदे भाग १, भाग २ (बालगट), वाचू आनंदे भाग १, भाग २ (कुमार गट)
- **खालील पुस्तके डॉ. अरविंद लेले यांच्याकडून ग्रंथालयास सप्रेम भेट**
  बरील पालेवोय : एका अस्सल माणसाची कहाणी, लोकोत्तर जीवन व्रती (आनंद हर्डीकर)
  मासिक मनोरंजन (जानेवारी ते जून १९२८)

अनुक्रमणिका

'मारवा' : एक स्त्रीवादी आकलन

❑

डॉ. शोभा पाटील

❑

('मारवा' : लेखक आशा बगे, प्रकाशक मौज प्रकाशन, मुंबई, पृष्ठे १९०.)

१९७८ नंतर लेखिका म्हणून प्रसिद्धीस आलेल्या आशा बगे. यांच्या 'झुंबर', 'मनस्विनी' या कादंबऱ्या आणि 'उत्तर', 'मारवा' हे कथासंग्रह वाचकांच्या पसंतीस उतरलेले आहेत. त्यांना महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार, अ. वा. वर्टी कथालेखन पुरस्कार मिळालेले आहेत. त्यांच्या काही कथांचे कन्नड, तेलुगू, हिंदी, गुजराती, इंग्रजी या भाषांतून अनुवादही झालेले आहेत.

स्त्री-जीवन आणि स्त्रीच्या जाणिवा यांना आशा बगे यांच्या 'मारवा' कथासंग्रहात केंद्रस्थान मिळालेले आहे. स्त्रीमुक्ती, स्त्री-पुरुष समानता, स्त्रीच्या व्यक्तित्वाचे भान येण्याच्या अलीकडच्या काळात, त्या जागृत स्त्री-मन असणाऱ्या लेखिका या भूमिकेतून, स्त्री-मनाची स्पंदने अत्यंत संवेदनशीलपणे टिपतात. त्यातून स्त्री-मनाच्या पारंपरिक भावविश्वापेक्षा वेगळ्या स्त्री-जाणिवा दिसतात. या वेगळ्या जाणिवा, स्त्री-निष्ठ अनुभवांचे विशेष, त्यांच्या कथांमधून ठळकपणे अधोरेखित करता येतात.

स्त्रीचे शारीरनिष्ठ अनुभव आणि स्त्री-निष्ठ भावविश्व यांचा वेध घेण्याचा प्रयत्न आशा बगे यांच्या कथांमधून दिसून येतो. स्त्रीचे शरीरविशिष्ट अनुभव तिच्या जगण्यावरच परिणाम करतात आणि स्त्रीच्या विश्वाशी, तिच्या जगण्याशी संबंधित असणारे स्वतंत्र अनुभवही असतात. या स्त्री-निष्ठ अनुभवांचा सार्थ आणि कलात्मक आविष्कार त्यांच्या कथांमधून झालेला दिसतो. स्त्रीच्या नैसर्गिक शरीरधर्माशी जोडलेल्या तिच्या स्वतंत्र अनुभवांचा प्रभाव तिच्या भावविश्वावर कसा पडतो यांचे दर्शन 'जन्म', 'डोळे', 'कोवळी उन्हं' या त्यांच्या कथांमधून घडते. 'जन्म' या कथेत गर्भारपण, जन्मकळा, अपत्यजन्म हा स्त्रीचा अत्यंत संवेदनशील काळ लेखिकेने उभा केला आहे. या कथेतील नायिका 'ती', या अनुभवातून गेलेली, नव्याने या अनुभवाला सामोरे जाणाऱ्या आपल्या सखीला आधार द्यायला गेलेली असताना 'ती' स्वत:च पुन्हा जन्मकळांच्या वेणांची सह-अनुभूती भोगते. त्याची तीव्रताच एवढी असते की, सखीला आधाराचा स्पर्शही ती देऊ शकत नाही.

'डोळे' कथेत गर्भारपणाच्या अवस्थेत स्त्रीच्या निर्माण झालेल्या विचित्र मानसिक कोंडीचा वेध लेखिका घेते. कथेच्या नायिकेला या अवस्थेत डोळ्यांच्या निरीक्षणाचे लागलेलं वेड, सुंदर, टपोऱ्या चमकदार डोळ्यांचे वाटणारे आकर्षण, कुरूप-खुरट्या डोळ्यांविषयी निर्माण

झालेला तिरस्कार, त्यातून स्वत:चा नवरा, त्याचे प्रेम यांविषयी वाटणारी घृणा, या विचित्र मानसिक कोंडीत नायिका सापडलेली दिसते. अपत्यजन्मानंतर त्याच्या सुंदर चमकदार डोळ्यांच्या दर्शनाने, नवऱ्याच्या कुरूप, खुरट्या डोळ्यांचा वारसा घेऊन आपले अपत्य जन्मलेले नाही या भावनेने, तिची या विचित्र मानसिक कोंडीतून मुक्तता झालेली दिसते.

कोवळी उन्हं' कथेची नायिका 'मनोरमा' हिचीही विचित्र मानसिक कोंडी झालेली दिसते. अपत्य-जन्मानंतर पंधरा दिवसांतच त्याचा मृत्यू झाल्यावर, सांत्वनाला येणाऱ्या बायका, पुन्हा पुन्हा उगाळलं जाणारं दु:ख, त्यातून जीवनातले फार मोठं सुख हातातून निसटल्याची आणि आता जीवन निरर्थक असल्याची दृढ होत जाणारी भावना, व्यक्त होते. या स्थितीतही आपल्यासारखी समान दु:खी, सह-अनुभूती असणारी स्त्रीदेखील पुढे फुलली-बहरली, हे कळल्यानंतर मात्र, तिच्या मनाभोवती निर्माण झालेल्या दु:खकोशातून ती बाहेर पडते.

आशा बगे यांच्या काही कथांमधून पुरुषी मूल्यव्यवस्थेचे भान व्यक्त होते. भावना, संवेदनशीलता, निष्ठा, विश्वास यांना नाकारणारी, पुरुषार्थ, अधिकार-सत्तेच्या हव्यासातून, अहंकार, स्वार्थ, सहानुभूतिशून्यता, अनिर्बंध स्वातंत्र्य यांना स्वीकारणारी मूल्यव्यवस्था, ही पुरुषसत्ताकतेतून आलेली! त्याचे प्रकटीकरण वाळवंट, रंग, मारवा, घरटं, बेईमान, वर्तुळ या कथांमधून झालेले दिसते.

'वाळवंट या कथेची नायिका' 'ती' जेव्हा मिसेस पंडितांना भेटते तेव्हा, त्यांना साहित्य -नाटक-गाणे यात रुची असलेली, आपली समानधर्मा भेटल्याचा आनंद होतो. स्वत:ला सामावून घेणारा परिसर शोधणाऱ्या मिसेस पंडित, आपल्याला निर्भर विश्वासाने विसावता येईल, अशी व्यक्ती तिच्यात शोधत असतात, आणि ही नायिका मात्र अहंकाराच्या भावनेतून त्यांची खरी ओढ ओळखू शकलेली नसते. याची जाणीव तिला मिसेस पंडितांच्या मृत्यूनंतर होते.

'वर्तुळ' कथेतील नायिका 'नीला'च्या मनाची ओढाताण, या व्यवस्थेतल्या दोन वर्तुळांनी केलेली आहे. एक वर्तुळ तिच्या नवऱ्याच्या उच्चभ्रू अधिकारक्षेत्रातले आहे. त्यात सत्ता-अधिकार महत्त्वाचे आहेत. त्यासाठी माणुसकी, भावनिकता यांना थारा न देता, व्यक्तींना कधीही फेकून दिले जाते. तर दुसरे वर्तुळ कामगार, कष्टकरी वर्गातील माणुसकीच्या नात्याचे आहे. तिथे जो अधिक शोषित असेल त्याचा कैवार घेतला जातो. नीला या दोन्ही वर्तुळांना जवळून अनुभवते. तिच्या मनाला पटत नसतानाही तिला तिच्या नवऱ्याच्या उच्चभ्रू वर्तुळाचे नियम स्वीकारावे लागतात. सहानुभूती, माणुसकी, सच्चेपणा यांच्याकडे पाठ फिरवताना तिचे मन व्याकूळ होताना दिसते.

'बेईमान' कथेची नायिका 'माधवी' निखळ मानवी संवेदनांनी झपाटलेली स्त्री आहे. अर्थ-व्यवहार, यातून आलेल्या, भावनाशून्यतेच्या पलिकडे जाणारे तिचे मन आहे. एका घटनेने तिचे मन तळापासून ढवळून निघालेले दिसते. 'एका तरुण स्त्रीने पाण्याच्या टाकीत जीव दिला' या घटनेकडे माधवीचा नवरा, त्याची मित्रमंडळी, मुले, घरकामाला येणारी बाई, दूधवाली बाई, हे सगळे ज्याप्रकारे बघत असतात, त्यातून रोजच्या चाकोरीबद्ध जीवनात

काहीतरी वेगळे 'चघळण्यासारखे' अशी त्यांची प्रकट होणारी भावनाच माधवीला दिसते आणि या संवेदनाशून्यतेचा विलक्षण उद्वेग, तिच्या स्वत:ला अस्वस्थ करून सोडतो, ती अवस्था जाता जात नाही. दुसरा दिवस उजाडतो, मात्र जाग आलेली मानसी, या संवेदनाशून्य व्यवहारी परिसरात स्वत:ला पुन्हा हरवून बसलेली दिसते. निखळ मानवी संवेदनांशी आपण बेईमान झाल्याची एक 'सल' तेवढी शिल्लक उरते.

'घरटं' कथेत पुरुषार्थ आणि स्वातंत्र्य या भावनेने झपाटलेला 'राजीव' हा नायक तारुण्याच्या उमेदीच्या काळात कुटुंबनाती, प्रेम, बांधिलकी या सगळ्यांकडे त्याने पाठ फिरविल्यानंतर जीवनात बेतालपणे जगलेला आहे. उमेदीचा काळ सरल्यानंतर मात्र त्याला घरट्याची ऊबं, नात्यातील जिव्हाळा, बांधिलकीतला स्नेह, ओढ लावायला लागतात आणि श्याम व मृदुला यांच्या घरट्यात आपले हरवलेले समाधान तो शोधू लागलेला दिसतो.

'मारवा' कथेत आबा देशपांडे, इनामदार घराण्याची परंपरा चालविणारे कर्ते पुरुष आहेत. आपल्यानंतर हा वारसा कोण चालविणार या चिंतेने ते ग्रस्त असले तरी प्रत्यक्षात त्यांचा धाकट मुलगा रघुनाथ, नव्या पिढीतले परिवर्तन घेऊनही समर्थपणे वारसा चालविणार, आपला अधिकार हातातून निसटणार, याची जाणीव होताच आबा देशपांडे यांचे मन व्यथितच झालेले दिसते.

एकूणच पुरुषार्थ, अधिकार, सत्तेचा हव्यास, अहंकार, स्वार्थ, सहानुभूतिशून्यता, अनिर्बंध स्वातंत्र्य या पुरुषी मूल्यांचे भावविश्वावर काय परिणाम होतात याचा वेध आशा बगे यांच्या कथांमधून घेता येणे शक्य होते.

पुरुषप्रधान समाजव्यवस्थेत जगताना स्त्रीला दुय्यमतेच्या ज्या अनुभवातून जावे लागते, त्यातून तिच्या मनात 'सजग स्त्री' या नात्याने स्वत:च्या जगण्याविषयी, स्त्री-पुरुष नात्याविषयी, स्त्रीकडे गुलाम म्हणून पाहण्याच्या पुरुषी वृत्तीविषयी आणि स्वत:लाच दुय्यमतेने जोखणाऱ्या स्त्रियांविषयी अनेक प्रश्न निर्माण होतात. या प्रश्नांवरच आशा बगे यांनी रुक्मिणी, नातं, मैत्रिण या आपल्या कथांमधून प्रकाश टाकलेला दिसतो.

'रुक्मिणी' कथेची नायिका 'रेणू' ही इनामदारांच्या आश्रित असणाऱ्या हरिदास-कथेकरी परंपरेच्या घरात जन्मलेली मुलगी! पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेत जगणाऱ्या मनस्वी रेणूच्या मनाची बालपणापासून घुसमट होतात दिसते. खेळ अर्धवट सोडून लवकरच घरी का जायचे? मनसोक्त खेळायचे, हुंदडायचे का नाही? क्षमता असताना वडिलांच्या कथेकरी परंपरेचा वारसा आपल्याला का नाकारला जातो? विधवा आजीने आपल्या लग्नसमारंभात का यायचे नाही? सासरी जाताना माहेरच्या सगळ्या आठवणी का पुसायच्या? बालपणाचा मित्रच पती झाल्यावर मात्र आक्रमक, अहंकारी का होतो? त्याच्याशी पूर्वीप्रमाणेच मित्रत्वाच्या मोकळेपणाने आपल्याला का वागता येत नाही? विवाह झाल्यावर सगळी नाती का बदलतात? या प्रश्नांना आपल्या जगण्यातूनच रेणू सामोरी जाते आणि स्त्री म्हणून आपल्या स्वतंत्र अस्तित्वाचाच जणू शोध घेताना दिसते.

केवळ पुरुषाच्या संदर्भात असणाऱ्या नात्यांनाच स्त्रीच्या जीवनात महत्त्वाचे स्थान असते का? स्त्रीच्या या पुरुषसापेक्षतेचा शोधच 'नातं' कथेची नायिका 'नीता' घेताना दिसते.

नवऱ्याच्या मामेभावाची बायको जळून मरते', म्हणून तिथे सांत्वनाला जाणे हे तिचे कर्तव्य ठरते आणि नीताच्या कुटुंबाशी एकरूप झालेली, तिच्याच कुटुंबाच्या काळज्या वाहणारी, स्वयंपाकीणबाई ही मात्र दूरचीच ठरते. तिला हृदयविकाराचा झटका आल्यावर तिच्याजवळ दवाखान्यात थांबणारी आणि त्यामुळे घरातील नेहमीच घडी विस्कळीत करणारी नीता, नवऱ्याच्या रोषाला पात्र ठरते. 'गीताबाई तुझ्या कोण?' हा प्रश्न तो विचारतो, तेव्हा स्त्रीला पतीच्या संदर्भातलीच नाती महत्त्वाची मानली पाहिजेत, हा अर्थ प्रकट होतो.

एकूणच स्त्रीच्या शारीरनिष्ठ अनुभवातून निर्माण होणारे स्वतंत्र भावविश्व, पुरुषी मूल्यव्यवस्थेत जगताना स्त्रीला स्वत:ला काय वाटते, स्त्रीच्या विचार-भावनांनाही पुरुषी मूल्यांनी कसे नियंत्रित केलेले असते, हा सगळा भाग आशा बगे यांच्या कथांमधून सच्चेपणाने मांडलेला दिसतो. स्त्री-जीवनातले असे अनुभव आतापर्यंत अशा प्रकारे सच्चेपणाने प्रकट करणे हे फारसे शिष्टमान्य नव्हते. अशा अज्ञात राहिलेल्या अनुभवांना 'शो वॉल्टर' ही पाश्चात्य स्त्रीवादी समीक्षक वाईल्ड झोन (Wild Zone) असे संबोधते.

पुरुषी मूल्यव्यवस्थेत जगणाऱ्या स्त्रियांचे आणि पुरुषांचेही भावविश्व हाच आशा बगे यांच्या 'मारवा' मधील कथांचा विषय झालेला दिसतो.

❑

डॉ. शोभा पाटील
४, जयप्रकाश हौसिंग सोसायटी, माळवाडी, हडपसर, पुणे ४११ ०२८. दूरध्वनी : ६८७५८४०

श्री. मिलिंद बोकील यांच्याकडून आलेला खुलासा

''महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या एप्रिल-मे-जून २००२च्या अंकात माझा लेख छापलेला आहे. त्यात जे मुद्रणदोष राहिले आहेत, त्यातून गैरसमज होण्याची शक्यता आहे, म्हणून हे पत्र. माझ्या दोन पुस्तकांची नावे अनुक्रमे 'झेन गार्डन' व 'ज़नाचे अनुभव पुसता' अशी आहेत. देशीयतेसंदर्भात माझे पूर्ण वाक्य, 'देशीयता ही कॉमनसेन्स गोष्ट आहे. तिचा हिरीरीने पुरस्कार करण्याची किंवा त्यापेक्षाही कडवेपणाने तिचा विरोध करण्याची काहीही गरज नाही,' असे आहे (पान २३). लेखात उत्तरार्ध गाळला आहे. त्याच पानावर, 'शुद्र' राजकारण नव्हे तर 'क्षुद्र' राजकारण असे पाहिजे. लेखाच्या शेवटी 'भाषेच्या सव्यापसव्यातून लेखकांना शक्ती प्राप्त होत असते,' असे वाक्य पडले आहे. माझे मूळ शब्द 'भाषेच्या सळसळण्यातून' असे आहेत. जयप्रकाशांच्या शिकवणीमुळे सव्यापसव्य करण्याचे मी कधीच सोडले आहे. परिषदेने ते मला पुन्हा करावयास लावू नये.''

श्री. बोकीलांना झालेल्या मनस्तापाबद्दल आणि आलेल्या सात्विक संतापाबद्दल 'पत्रिका' मन:पूर्वक दिलगिरी व्यक्त करत आहे.

— संपादक

कार्यवृत्त

(१ एप्रिल २००२ ते ३० जून २००२)

❑

संकलन - श्री. रवीन्द्र भट, प्रमुख कार्यवाह

❑

सप्रेम नमस्कार,

यंदा पावसाने बरीचशी ओढ घेतली. सर्वसामान्य शेतकरी चिंताग्रस्त आहे. समाजकारण, राजकारण या क्षेत्रांकडूनही सर्वांचाच अपेक्षाभंग होत आहे. या साऱ्या चिंता ऐहिकातल्या व्यवहाराच्या. खरी चिंता आहे ती नव्या पिढीला मातृभाषेविषयी असलेली अनास्था! मराठी भाषेचे वैभव वाढविण्यासाठी म. सा. प. आपल्या सर्व शाखांनिशी सतत प्रयत्नशील आहे. शताब्दीच्या चाहुलीच्या या काळात आपण सारेच जण या स्तन्यभाषेची ओढ नव्या पिढीच्या मनी रुजवूया! डॉ. दीपा देशपांडे या इस्लामपूरच्या कार्यकर्त्या भगिनीने साहित्य पत्रिकेसाठी रु. ५०००/- आपल्या दिवंगत पतीच्या स्मरणार्थ देणगी स्वरूपात दिले आहेत. तसेच परिषदेला श्री. भाऊ फाटक यांनी रु. ५०१ ची अणि श्री. श्री. अ. पलटनवाले यांनी त्यांचे वडील कै. अ. रा. पलटनवाले (बाबा) यांच्या स्मरणार्थ रु. १००१ ची देणगी दिलेली आहे. त्यांच्या या सद्‌भावनेची प्रत्येकाने नोंद घ्यायला हवी.

*— **रवीन्द्र भट**, प्रमुख कार्यवाह*

१० एप्रिल २००२ : ज्ञानकोशकार डॉ. केतकर स्मृतिदिन : पुण्यातील कमला नेहरू उद्यानातील डॉ. केतकर यांच्या समाधीस्थळी १० एप्रिल २००२ रोजी सकाळी ठीक ८ वा. दरवर्षीप्रमाणे यंदासुद्धा पुष्पांजली वाहून डॉ. केतकरांची स्मृती जागृत ठेवण्याचे काम उत्साहाने पार पडले. परिषदेचे कर्मचारी श्री. फडके व श्री. बुवा यांनी हार, फुले, उदबत्ती यांनी समाधीस्थळ सुशोभित केले होते. परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. गं. ना. जोगळेकर यांनी उपस्थितांसमोर प्रारंभी प्रास्ताविक केले. त्यानंतर परिषदेचे कार्यकारिणी सदस्य व उपस्थित नागरिक, देणगीदार यांच्या परस्परपरिचयाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर उपस्थित नागरिकांना पेढे वाटपाचा कार्यक्रम झाला. परिषदेच्या विश्वतांपैकी माजी न्यायाधीश श्री. प्रतापराव बेहरे व डॉ. प्र. के. घाणेकर, तसेच परिषदेचे अध्यक्ष व अ. भा. म. साहित्य संमेलनाचे अध्यक्ष मा. श्री. राजेंद्र बनहट्टी आणि परिषदेच्या पदाधिकाऱ्यांपैकी सर्वश्री रवींद्र भट, रंगा मराठे, दीपक करंदीकर, प्रमोद आडकर, डॉ. कल्याण इनामदार आणि श्रीमती नंदा सुर्वे इ. उपस्थित होते. म. सा. पत्रिकेचे संपादक डॉ. अरविंद वामन कुळकर्णीही उपस्थित होते.

याच दिवशी सायंकाळी पुण्याच्या महापौर सौ. दीप्ती चौधरी आणि नगरसेवक श्री. विकास मटकरी, श्री. विजय काळे, सौ. मुक्ता टिळक, सौ. ज्योत्स्ना सरदेशपांडे, तसेच कमला नेहरू उद्यानाचे अधीक्षक यांच्यासमवेत परिषदेचे पदाधिकारी यांचा चहापान, सत्कार व परिषदेच्या शताब्दीनिमित्ताने महापौरांशी चर्चा असा एक वेगळा कार्यक्रम संपन्न झाला.

अनुक्रमणिका

१७ एप्रिल २००२ : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने व्याख्यान :

म. सा. परिषद आणि दलित साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब यांच्या जयंतीनिमित्ताने घटनेचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. वि. मा. बाचल यांचे 'घटनाकार : डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. प्रास्तविक कार्याध्यक्ष डॉ. गं. ना. जोगळेकर व आभारप्रदर्शन स्थानिक कार्यवाह दीपक करंदीकर यांनी केले.

१८ एप्रिल २००२ : डॉ. केतकर स्मृतिदिन व्याख्यान : 'डॉ. केतकरांचा बुद्धविषयक दृष्टिकोन' या विषयावर डॉ. मो. गो. धडफळे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. प्रास्ताविक कार्याध्यक्ष डॉ. गं. ना. जोगळेकर यांनी केले व कार्यवाह दीपक करंदीकर यांनी आभार मानले.

५ मे २००२ : बालकवी स्मृतिदिन : बालकविताकारांचे कविसंमेलन : या कार्यक्रमात विमल लिमये, नीलिमा गुंडी, संगीता बर्वे, आश्लेषा महाजन, कविता कुलकर्णी, जयंत भिडे, मधुसूदन घाणेकर, मिलिंद जोगळेकर व दीपक करंदीकर या बालकविताकारांनी आपल्या बालकविता सादर केल्या. ह्या कविसंमेलनाचे सूत्रसंचालन सुप्रसिद्ध बालकविताकार डॉ. कल्याण इनामदार यांनी बहारदारपणे केले. ज्येष्ठ कवयित्री श्रीमती सरिता पदकी यांनी कविसंमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविले. या निमित्ताने त्यांनी बालकवींच्या काही निवडक रचना सादर केल्या.

१० मे २००२ : प्रा. दे. द. वाडेकर जन्मशताब्दिनिमित्त व्याख्यान :

प्राचार्य डॉ. श्री. व्यं. बोकील यांचे 'प्रा. वाडेकर : व्यक्ती व कार्य' या विषयावर व्याख्यान झाले. प्रास्तविक व स्वागत कार्याध्यक्ष डॉ. गं. ना. जोगळेकर यांनी केले व कार्यवाह दीपक करंदीकर यांनी आभार मानले.

११ जून २००२ : सानेगुरुजी स्मृति व्याख्यान : वाईचे श्री. मधुसूदन नेने यांचे 'साने गुरुजी आणि भारतीय संस्कृती' या विषयावर व्याख्यान झाले. प्रास्तविक व परिचय परिषदेचे प्रमुख कार्यवाह श्री. रवीन्द्र भट यांनी केले व आभार स्थानिक कार्यवाह दीपक करंदीकर यांनी मानले.

या निमित्ताने 'श्यामची आई' ह्या पुस्तकाच्या घरोघरी, शाळा-शाळांतून प्रत्यक्ष जाऊन सुमारे १२,००० प्रती विकणारे श्री. दत्ता पुराणिक यांचा परिषदेतर्फे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

१२ जून २००२ : पु. ल. देशपांडे स्मृतिदिन कार्यक्रम : यंदा एकपात्रीकार श्री. बंडा जोशी यांच्या 'हास्यपंचमी' या बहारदार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख कार्यवाह श्री. रवीन्द्र भट यांनी प्रास्तविक व परिचय करून दिला. स्थानिक कार्यवाह दीपक करंदीकर यांनी आभार मानले. या खास विनोदी ढंगाच्या कार्यक्रमास श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

१३ जून २००२ : आचार्य अत्रे स्मृति कार्यक्रम : कथाकथनकार श्री. सुरेश पोरे यांच्या कथाकथनाचा या निमित्ताने कार्यक्रम झाला. प्रास्ताविक व स्वागत कार्याध्यक्ष डॉ. गं. ना. जोगळेकर यांनी केले. परिषदेच्या कार्यवाह नंदा सुर्वे यांनी श्री. पोरे यांचा परिचय करून दिला. व शेवटी स्थानिक कार्यवाह दीपक करंदीकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

आचार्य अत्रे स्मृतिदिनाचे औचित्य साधून पुण्यातील ज्येष्ठ पत्रकार श्री. गोपाळराव पटवर्धन यांचा ८० व्या वर्षात पदार्पण केल्यानिमित्त म. सा. परिषदेतर्फे हृद्य सत्कार करण्यात आला. श्री. पटवर्धनांनी सत्कारानिमित्त आपले मनोगत या प्रसंगी व्यक्त केले.

गतवर्षीप्रमाणे सलग तीन दिवस साजऱ्या झालेल्या या तिन्ही कार्यक्रमांना श्रोत्यांचा उत्स्फूर्त

प्रतिसाद लाभला व श्री. मधुसूदन नेने यांच्या 'सानेगुरुजी आणि भारतीय संस्कृती' या व्याख्यानाचा काही भाग पुणे आकाशवाणी केंद्रावरील रविवारच्या 'रंगतसंगत' कार्यक्रमातून प्रसारित करण्यात आला.

२१ जून २००२ : नाथमाधव स्मृतिदिनानिमित्त प्रकट मुलाखत : म. सा. परिषदेचे प्रमुख कार्यवाह आणि सुप्रसिद्ध लेखक श्री. रवीन्द्र भट यांच्या प्रकट मुलाखतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. श्री. भट यांची मुलाखत डॉ. माधवी वैद्य यांनी घेतली. कार्याध्यक्ष डॉ. जोगळेकर यांनी प्रास्ताविक केले व नंदा सुर्वे यांनी आभार मानले.

दीपक करंदीकर,
स्था. कार्यवाह, म.सा.प., पुणे.

❑

पारितोषिके

एप्रिल, मे, जून २००२

१९ एप्रिल २००२ : स. ह. मोडक पारितोषिक : कै. स. ह. मोडक स्मृतिदिनानिमित्त प्रतिवर्षी अनुवादित पुस्तकास किंवा ज्येष्ठ अनुवादकास रु. २००० चे पारितोषिक दिले जाते. यावर्षी श्रीमती अंजनी नरवणे यांच्या 'शौर्यगाथा सौराष्ट्राची' या अनुवादित पुस्तकाला हे पारितोषिक देण्यात आले. कार्यक्रमाच्या परीक्षक म्हणून श्रीमती मीना वांगीकर यांनी विचार मांडले. सुनीता लोहोकरे या सहपरीक्षक होत्या. कार्याध्यक्ष डॉ. गं. ना. जोगळेकर यांनी प्रास्ताविक केले. कार्यवाह दीपक करंदीकर यांनी आभार मानले.

२८ एप्रिल २००२ : शं. ना. जोशी पारितोषिक : प्रतिवर्षी ऐतिहासिक/सामाजिक किंवा सांस्कृतिक विषयावरील दर्जेदार वैचारिक ग्रंथासाठी रु. ५००० चे शं. ना. जोशी पारितोषिक डॉ. अनिल अवचट यांच्या 'प्रश्न आणि प्रश्न' या ग्रंथास देण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. राजेंद्र बनहट्टी होते. परीक्षकांतर्फे डॉ. अरविंद लेले यांनी विचार व्यक्त केले. डॉ. गं. ना. जोगळेकर हे सहपरीक्षक होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. कल्याणी दिवेकर यांनी केले, तर रत्नाकर कुलकर्णी यांनी आभार मानले.

२९ जून २००२ : दि. बा. मोकाशी पारितोषिक : कथा, कादंबरी, प्रवासवर्णन (देशांतर्गत) यापैकी आलटून-पालटून एका वाङ्मय-प्रकारातील उत्कृष्ट पुस्तकास रु. १००० चे कै. दि. बा. मोकाशी स्मृति पारितोषिक दिले जाते. या वर्षी हे पारितोषिक श्री. माधव कोंडविलकर यांच्या 'हाताची घडी, तोंडावर बोट' या कादंबरीस जाहीर करण्यात आले. (हे पारितोषिक समारंभपूर्वक देण्याचे नसून फक्त जाहीर केले जाते.)

पारितोषिकाच्या निवड समितीत डॉ. रेखा देशपांडे व डॉ. कल्याणी हर्डीकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

नंदा सुर्वे (कार्यवाह)

❑

सोलापूर शाखा

- दि. १२ जून २००२ रोजी 'पु. ल. देशपांडे स्मृतिदिन' - मान्यवरांचे व्याख्यान
- शाखेच्या 'महिला साहित्य विभागा'च्या वतीने 'दूरदर्शन मालिकेतील स्त्री-दर्शन'या विषयावर परिसंवाद आणि चर्चा.
- शाखेच्या 'युवा साहित्य विभागा'च्या वतीने दयानंद महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी यांच्या सहभागाने उत्स्फूर्त वक्तृत्वस्पर्धा.
- थोर राष्ट्रकवी, कवी कुंजविहारी यांच्या स्मृतिनिमित्तान ज्येष्ठ-नवोदितांचे कविसंमेलन.
- सोलापुरातील ज्येष्ठ साहित्यिक, पत्रकार,

नाटककार कै. कुमार कोठावळे स्मृतिदिनानिमित्ताने पुरस्कार सोहळा. यात १) उत्कृष्ट कादंबरीकार २) उत्कृष्ट कवी ३) उत्कृष्ट पत्रकार ४) उत्कृष्ट रंगकर्मी असे पुरस्कार दिले जातात.

- कवी संजीव स्मृतिदिन
- कवी कुलश्रेष्ठ स्मृतिदिन - कुलश्रेष्ठांच्या कवितांचे वाचन
- दि. १७, १८ डिसेंबर २००२. या दोन दिवसांत 'लोणकरणजी चंडक' सहयोगाने व्याख्यानमाला.
- सोलापूर, मंगळवेढा, सांगोला, कुर्डुवाडी, पंढरपूर, मोहोळ, बार्शी, अक्कलकोट आदी ठिकाणांच्या साहित्यिकांच्या सहभागाने एक दिवसीय 'जिल्हा साहित्य संमेलन'.
- दि. २ सप्टेंबर २००२ रोजी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कै. वि. स. खांडेकर स्मृतीदिनानिमित्ताने डॉ. गं. ना. जोगळेकर, पुणे, यांचे व्याख्यान
- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, यांच्या सहयोगाने जिल्ह्यातील कथाकारांना सामावून घेत 'नवलेखक शिबीर' घेण्यात येईल.
- सोलापुरातील मराठी, तेलुगु, कन्नड, हिंदी, उर्दू कवींच्या सहभागाने 'आंतरभारती कविसंमेलन' आयोजन.

याशिवाय प्रसंगानुसार विशेष कार्यक्रमांचे आयोजन.

लक्ष्मीनारायण बोल्ली, कार्याध्यक्ष

❑

पिंपरी-चिंचवड शाखा

महाराष्ट्र साहित्य परिषदेचे पुणे जिल्हा प्रतिनिधी व परिषदेच्या पिंपरी-चिंचवड शाखेचे सल्लागार कवी अरविंद भुजबळ यांचे वयाच्या ३६ व्या वर्षी दि. २५ मार्च २००२ रोजी अपघाती निधन झाले. दि. २७ एप्रिल २००२ रोजी त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सभा आयोजित करण्यात आली. शाखेच्या अध्यक्षा सौ. ललिता पावळकर, उपाध्यक्ष सुनील यादव, सौ. कमलिनी जगताप, डॉ. मुरलीधर जावडेकर, श्री. विश्वनाथ अवघडे इत्यादींची श्रद्धांजलीपर भाषणे झाली.

रूपाली अवचरे, कार्यवाह

धुळे शाखा

म. सा. प., धुळे आणि गरुड वाचनालय सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १ एप्रिल २००२ रोजी कै. विद्याधर वैद्य स्मृतिदिनानिमित्ताने सुप्रसिद्ध साहित्यिक, 'चंद्रास्त' काव्यसंग्रहाचे कर्ते, शिक्षणशास्त्र विद्यालयाचे प्राचार्य आणि वल्लभदास वालजी वाचनालयाचे अध्यक्ष डॉ. प्रभाकर श्रावण चौधरी यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. व्याख्यानाचा विषय 'खानदेशातील कवी' असा होता.

म. सा. प., धुळे आणि गरुड वाचनालय सांस्कृतिक विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनानिमित्त आणि बुद्धवासी सुलभाताई बाविस्कर यांच्या स्मृतिप्रित्यर्थ दि. १५।४।२००२ रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील समाजशास्त्र विभागाचे प्रपाठक, सुप्रसिद्ध विचारवंत प्रा. बा. ह. कल्याणकर यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सामाजिक पुनर्रचनेचा विचार' या विषयावर प्रबोधनात्मक व्याख्यान झाले.

प्रदीप गो. कुलकर्णी, कार्यवाह, धुळे शाखा

हडपसर उपशाखा

पुणे शहराचे उपनगर हडपसर येथे म. सा. प.ची उपशाखा स्थापन.

चै. शु. १ शालिवाहन शकारंभ १९२४ गुढी पाडव्याच्या दिवशी दि. १३ एप्रिल २००२ रोजी पुणे शहराचे पूर्वेकडील उपनगर हडपसर येथे म. सा. प.च्या उपशाखेची स्थापना करण्यात आली.

दि. २० एप्रिल २००२ रोजी म. सा. प.चे

अनुक्रमणिका

कार्याध्यक्ष डॉ. गं. ना. जोगळेकर यांचे हस्ते व प्रमुख कार्यवाह रवींद्र भट, कार्यवाह सर्वश्री दीपक करंदीकर व डॉ. कल्याण इनामदार यांचे उपस्थितीत उपशाखेचे समारंभपूर्वक उद्घाटन झाले. त्यावेळी डॉ. जोगळेकर यांनी पुणे शहरालगत असणाऱ्या हडपसरसारख्या विस्तीर्ण उपनगरात म.सा.प.ची उपशाखा स्थापण्यामागची भूमिका सांगून उपशाखेचे कार्य गतिमान करण्यासाठी मार्गदर्शन केले व या कामी श्री. पवार यांनी केलेल्या यशस्वी धडपडीबद्दल समाधान व्यक्त केले.

डॉ. जोगळेकर यांच्या हस्ते उपशाखेचे अध्यक्ष डॉ. सी. तु. गुजर व महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार करण्यात आला. उपशाखेच्या वतीने डॉ. सी. तु. गुजर यांनी डॉ. जोगळेकर व इतर म. सा. प.चे पदाधिकारी यांचा सत्कार केला.

उपशाखेचे कार्याध्यक्ष प्रा. डी. डी. पवार यांनी पाहुण्यांचा भावपूर्ण शब्दांत परिचय करून उपशाखेचा अहवाल सादर केला. उपशाखेचे एकूण पंच्याहत्तर आजीव सभासद आहेत.

'मानसन्मान प्रकाशन'चे रवींद्र कुलकर्णी, म. सा. प.चे ग्रंथालय विभागप्रमुख श्री. रंगा मराठे व दिवंगत समीक्षक रा. श्री. जोग यांची कन्या रोहिणी जोग यांनी उपशाखेला मदत केल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली गेली.

समारंभाला महानगरपालिकेचे आजी-माजी नगरसेवक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर साहित्यिक मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

म. सा. प.चे उपस्थित कार्यवाह, तसेच नगर सेवक दिलीप तुपे, डॉ. सी. तु. गुजर, साहित्यिक डॉ. भास्कर महामुनी, पंडित हिंगे यांनी समयोचित विचार मांडले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यवाह प्रा. म. बा. तौर यांनी केले. जयसिंग गोंधळे यांनी आभार मानले.

उपशाखा कार्यकारिणी

अध्यक्ष : डॉ. सि. तु. गुजर
उपाध्यक्ष : प्रा. ज. पां. देसाई
कार्याध्यक्ष : प्रा. दे. दा. पवार
कार्यवाह : प्रा. म. बा. तौर
कार्यवाह : अ. वि. कन्हेरे
कोषाध्यक्ष : ए. ज. आल्हाट
सदस्य : सौ. स्वाती शि. वज्रशेट्टी
कु. गितांजली वि. दैठणकर, सु. ध. खांबे, ज. अ. गोंधळे, प्रा. मे. चा. पिंजारी, प्रा. शि. द. पवार, नगरसेवक, प्रा. नी. जे. साठे, प्रा. ज्ञा. म. कुंभार, नियुक्त, प्रा. रा. सा. मोरे

प्रा. म. बा. तौर आणि
अ. वि. कान्हेरे,
(कार्यवाह)

❑

नवे आजीव सदस्य

(यादी मागील अंकावरून पुढे चालू)

- गायकवाड नागनाथ विठ्ठल, सोलापूर
- चिंता सत्यनारायण राजाराम, पुणे
- धीर सरला प्रल्हाद, हडपसर, पुणे
- मिस्त्री काशिनाथ रामा, मालेगाव
- कुबेर श्रुती जगदीश, पुणे
- भागवत मुकुंद श्रीराम, मुंबई
- परांजपे कमलाकर वासुदेव, पुणे
- लेले चित्रा अश्विनीकुमार, पुणे
- हसबनीस नीलकमल, खडकी, पुणे
- पाटील नितीन झुंबरलाल, पुणे
- वैद्य सुषमा मिलिंद, पुणे
- सांगडे जयंत शरद, कल्याण
- दातार महेश दुर्गादास, पुणे
- साळुंखे प्रकाश कोंडीराम, उरळीकांचन
- लिमये हरिभाऊ धुंडीराम, पुणे
- चंदनवाले सीमा संजय, पुणे
- पवार मीनल मनोज, पुणे
- आखाडे वृषाली समीर, पुणे

विशेष ग्रंथकार पुरस्कार
वार्षिक ग्रंथ व पारितोषिक वितरण समारंभ
२६ मे २००२

महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे प्रतिवर्षी २६ मे रोजी विविध वाङ्मयप्रकारांमधील उत्कृष्ट ग्रंथांना पारितोषिके दिली जातात. तसेच मराठी साहित्यात महत्त्वाची कामगिरी केलेल्या ज्येष्ठ ग्रंथकारांना विशेष पुरस्कार देऊन गौरविले जाते.

या वर्षी रविवार दि. २६ मे २००२ रोजी सायंकाळी ६ वाजता मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या पद्मजी सभागृहात सुप्रसिद्ध लेखक श्री. शिवाजीराव सावंत यांच्या अध्यक्षतेखाली वार्षिक ग्रंथ पारितोषिक वितरण-सोहळा साजरा झाला. मराठीतील ख्यातनाम ज्येष्ठ कवी श्री. मंगेश पाडगावकर यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. या समारंभास विशेष अतिथी म्हणून श्रीमती यशोदा पाडगावकर उपस्थित होत्या.

''साहित्यिकाने स्वतःच्या अंतरंगाशी प्रामाणिक राहून लिहिले पाहिजे. भाषा सर्जनशील करणे ही प्रत्येक लेखकासाठी साधना असते,'' असे उद्‌गार कविवर्य मंगेश पाडगावकर यांनी या प्रसंगी काढले. ''रसिक व कलावंत यांना जोडणारे 'हिरवे' पाते दोघांनीही जपले पाहिजे,'' असे श्री. शिवाजीराव सावंत यांनी सांगितले. आपले वडील रेव्हरंड भास्कर कृष्ण उजगरे यांच्या महाराष्ट्र साहित्य परिषदेशी असलेल्या नात्याचा उल्लेख यशोदाबाई पाडगावकर यांनी केला.

परीक्षकांतर्फे राजेंद्र खेर व रजनी अपसिंगेकर यांनी विचार मांडले, तर पारितोषिक विजेत्यांतर्फे डॉ. द. ता. भोसले व डॉ. अलका वाडकर यांनी मनोगत व्यक्त केले. उपस्थितांचे स्वागत व प्रास्ताविक म. सा. प.चे कार्याध्यक्ष डॉ. गं. ना. जोगळेकर यांनी केले तर पुरस्कारांसंबंधीचे निवेदन वार्षिक ग्रंथ पारितोषिक विभागाच्या कार्यवाह डॉ. कल्याणी दिवेकर व कोषाध्यक्ष रत्नाकर कुलकर्णी यांनी केले. म. सा. प.चे प्रमुख कार्यवाह रवींद्र भट यांनी आभार मानले व कार्यवाह नंदा सुर्वे यांनी सूत्रसंचालन केले.

विशेष ग्रंथकार पुरस्कार २६ मे २००२

(पुरस्काराचे नाव, पुरस्काराचा विषय, पुरस्कार मिळालेल्या साहित्यिकाचे नाव, पुरस्काराची रक्कम या अनुक्रमाने)

- पं. रामाचार्य अवधानी, तत्त्वज्ञानविषयक लेखक. प्रा. श्रीनिवास दीक्षित, कोल्हापूर, रु. १,५००/-
- डॉ. शं. दा. पेंडसे, संतसाहित्यविषयक लेखन, डॉ. अशोक कामत, पुणे, रु. १,०००/-
- कविवर्य भा. रा. तांबे, काव्यपुरस्कार, श्री. मंगेश पाडगावकर, मुंबई, रु. १,१००/-
- कविवर्य ना. घ. देशपांडे, काव्यपुरस्कार, श्री. सुरेश भट, नागपूर, रु. १,१००/-

- मा. कृष्णराव फुलंब्रीकर, संगीतविषयक लेखन, श्रीमती शांता निसळ, पुणे, रु. १,०००/-
- डॉ. भालचंद्र फडके, दलित साहित्य-विवेचन, डॉ. दत्ता भगत, औरंगाबाद, रु. १,०००/-
- डॉ. वि. कृ. गोकाक, महाराष्ट्र-कर्नाटक संबंधविषयक लेखन, डॉ. वसंत स. जोशी, पुणे रु. १,०००/-
- प्रा. गो. रा. परांजपे, विज्ञानविषयक लेखन, श्री. निरंजन घाटे, पुणे रु. १,०००/-
- कै. कमलाकर सारंग, नाट्यसंहिता, डॉ. सदानंद मोरे, पुणे रु. ३,०००/-
- स्व. राधाबाई गोविंदराव सावंत यांच्या स्मरणार्थ, रामायण, महाभारत, वेद, पुराणे यांवरील आधारित ग्रंथास किंवा व्रतस्थपणे संशोधनकार्य केलेल्या ज्येष्ठ लेखकास,
- डॉ. रा. चिं. ढेरे, पुणे रु. ८,०००/-

वार्षिक ग्रंथपारितोषिके
रविवार दिनांक २६ मे, २००२

पुरस्काराचे नाव, पुरस्काराचा विषय, पुरस्कार दिलेल्या साहित्यिकाचे नाव, प्रकाशनाचे नाव, पुरस्काराची रक्कम या अनुक्रमाने)

ह. ना. आपटे, 'चौखुर' (कादंबरी), विलासदत्त राऊत, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे रु.१,०००/-

वा. म. जोशी, 'दरिद्रीनारायण' (कादंबरी), व. न. इंगळे, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, रु. १,०००/-

आनंदीबाई शिर्के, 'रिवणावायली मुंगी' (कथासंग्रह), राजन गवस, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, रु. १,०००/-

नी. स. गोखले, 'वि. स. खांडेकर : सचित्र चरित्रपट' (उत्कृष्ट ग्रंथनिर्मिती), जया दडकर, देशमुख आणि कंपनी, पुणे, रु. १,०००/-

ह. श्री. शेणोलेकर, 'साहित्याचे परीघ' (समीक्षा), निशिकांत ठकार, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, रु. १,०००/-

गिरिजा गंगाधर जांभेकर, 'महाराष्ट्र-कर्नाटक सांस्कृतिक अनुबंध (संपादित ग्रंथ)', संपा. अ. रा. तोरो, प्रतिमा प्रकाशन, पुणे, रु. ५००/-

रा. ना. नातू, 'ज्वलज्जलन तेजस संभाजी राजा' (इतिहासविषयक), डॉ. सदाशिव शिवदे, निवेदिता प्रकाशन, पुणे, ७५०/-

वासुदेव धोंडो आणि भागीरथीबाई दीक्षित, 'युगायुगातील अगस्त्य परंपरा' (धार्मिक), डॉ. मधुसूदन बोपर्डीकर, श्री दत्त देवस्थान ट्रस्ट, अहमदनगर, रु. १,०००/-

तुळशीराम वाघ, 'गुरूची गुरुमाऊली मुक्ताई' (संतसाहित्यविषयक), डॉ. विजया संगवई, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, ५००/-

श्री. शा. हणमंते, 'तुका म्हणे - तुकाराम अवतरण कोश' (कोश व संदर्भ वाङ्मय),
डॉ. कृष्णा इंगोले, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, ५००

सुशील प्रधान, 'सारे छान छोटे' (बालवाङ्मय), सौ. वसुंधरा हुईलगोळ,
दिलीपराज प्रकाशन प्रा. लि., पुणे, ५००/-

विनायक कोंडदेव ओक, 'लोककथा' (कुमार वाङ्मय), संभाजी खराट,
साकेत प्रकाशन, औरंगाबाद, रु. ५००/-

डॉ. म. वि. गोखले, 'रंगरूपदर्शन' (नाट्यसमीक्षा), प्रा. मधुकर तोरडमल,
मॅजेस्टिक प्रकाशन, पुणे, १,०००/-

सत्यशोधक केशवराव विचारे, 'मुस्लिम मनाचा शोध' (ललितेतर वैचारिक), शेषराव मोरे,
संगत प्रकाशन, नांदेड, रु. १,०००/-

लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, 'विचारमंथन' (ललितेतर वैचारिक), डॉ. स. रा. गाडगीळ,
प्रतिमा प्रकाशन, पुणे, रु. १,०००/-

गणेश सरस्वती ठाकूरदेसाई, 'आहार आणि आरोग्य' (ललितेतर वैचारिक),
डॉ. ह. वि. सरदेसाई, श्री विद्या प्रकाशन, पुणे, रु. १,०००/-

शि. म. परांजपे पारितोषिक, 'ख्रिस्ती लोकहितवादी' (ललितेतवर वैचारिक), सुनील आढाव,
प्रबोधन प्रकाशन, नागपूर, रु. १,०००/-

ना. गो. चापेकर, 'नोकरदार स्त्री आणि लिंगवाद' (ललितेतर वैचारिक), डॉ. अलका वाडकर,
राजश्री प्रकाशन, पुणे, रु. ५००/-

विश्वनाथ पार्वती गोखले, 'समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर' (ललितेतर वैचारिक),
डॉ. प्रदीप आगलावे, सुगावा प्रकाशन, पुणे, रु. ५००/-

डॉ. ज. रा. कदम, 'अळिंबी लागवड - कृषी पूरक उद्योग' (कृषिविषयक लेखन),
डॉ. निदकरराव सावंत, संजय कोळसे, प्रा. चिंतामणी देवकर, उत्कर्ष प्रकाशन, पुणे,
रु. १,०००/-

वासंती काळे, 'छंदाविषयी' (कला व हस्तकलाविषयक लेखन), अनिल अवचट, मॅजेस्टिक
प्रकाशन, पुणे, ५००/-

अभिजात मराठी ग्रंथ पारितोषिक, 'संस्कृतीच्या पाऊलखुणा' (समाजशास्त्रांतर्गत लेखन),
डॉ. द. ता. भोसले, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, रु. ५००/-

या पारितोषिकांचा निर्णय करण्यासाठी म्हणून पुढील व्यक्तींनी काम पाहिले.

सुरेश देशपांडे, राजीव बर्वे, माधुरी वैद्य, नंदा सुर्वे, रविमुकुल, डॉ. अरविंद वामन कुळकर्णी, प्रा. सुजाता शेणई, डॉ. के. रं. शिरवाडकर, डॉ. मिरदेव गायकवाड, निनाद बेडेकर, प्रा. रवींद्र लोणकर, कृ. पं. देशपांडे, राजेंद्र खेर, डॉ. शकुंतला क्षीरसागर, डॉ. कल्याण इनामदार, ल. म. कडू, डॉ. सुवर्णा दिवेकर, रजनी अपसिंगेकर, भानू काळे, मधुसूदन नेने, डॉ. मनोहर जाधव, भास्कर पाटील, सुचिता तरडे आणि डॉ. गं. ना. जोगळेकर.

म. सा. परिषदेचा ९६ वा वर्धापनदिन

महाराष्ट्र साहित्य परिषदेचा ९६ वा वर्धापनदिन समारंभ सोमवार दि. २७ मे २००२ रोजी म. सा. प.चे अध्यक्ष श्री. राजेंद्र बनहट्टी यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष आमदार श्री. उल्हास पवार यांच्या हस्ते 'महाराष्ट्र साहित्य पारतोषिका'चे वितरण झाले. प्रदीर्घ आणि गुणवत्तापूर्ण लेखन कार्याबद्दल दिले जाणारे ५ हजार रुपयांचे हे पारितेषिक व स्मतिचिन्ह प्रसिद्ध विनोदी लेखक वि. आ. बुवा यांना देण्यात आले. याच समारंभात्त ज्येष्ठ समीक्षक व मध्यप्रदेश मराठी साहित्य संघाचे माजी कार्याध्यक्ष डॉ. चंद्रकांत पांढरीपांडे यांना सार्वजनिक संस्थेत निरलसपणे कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यास देण्यात येणारा कै. डॉ. भीमराव कुलकर्णी पुरस्कार प्रदान करण्यात आला.

'युनो'चे माजी अधिकारी माधवराव मदाने यांनी परिषदेस १ लाख रुपयांची देणगी दिली. म. सा. प.चे कार्याध्यक्ष डॉ. गं. ना. जोगळेकर यांनी प्रास्ताविक केले, तर कार्यवाह प्रमोद आडकर यांनी सूत्रसंचालन केले आणि कार्यवाह दीपक करंदीकर यांनी आभार मानले.

डॉ. कल्याणी दिवेकर, कार्यवाह

ग्रंथपुरस्कार : आवाहन

पुणे नगर वाचन मंदिर (१८१ बुधवार पेठ, लक्ष्मी रोड, पुणे २) या संस्थेतर्फे २००२ या वर्षात प्रकाशित झालेल्या व होणाऱ्या ग्रंथांना एकेक हजार रुपयांचे पुढील तीन पुरस्कार दिले जातात :

१. श्री. ज. जोशी पुरस्कार - यंदा कथासंग्रहासाठी
२. संत वाङ्मयविषयक ग्रंथ - ह. स. गोखले यांचे स्मृत्यर्थ
३. प्रा. श्री. ना. बनहट्टी पुरस्कार - ललितेतर वैचारिक ग्रंथासाठी

लेखकांनी अथवा प्रकाशकांनी ग्रंथाच्या दोन प्रती संस्थेकडे पाठवाव्यात, असे कार्यवाह कळवतात.

श. ग. ठकार, कार्यवाह

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

Maharashtra Sahitya Patrika Quarterly July-August-September 2002
Registered with the Registrar of Newspapers for India Under No. 6398/57

BOOK-POST

प्रति,

प्रेषक : प्रमुख कार्यवाह

महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे ४११ ०३०.